भाव-चित्रें

कृष्ण प्रसंग

५०

साहित्य

वि. वा. आंबेकर

बी. ए.

भाव-चित्रें

[अकरा कथा-प्रसंग]

लेखक

विष्णु बापूजी आंबेकर, बी. ए.

१०

विजय-साहित्य, पुणें शहर.

किंमत एक रुपाया

प्रकाशन व मुद्रण–स्थल
५७० शनवार, पुणें श

प. वा. तीर्थरूप

सौ० वहिनीस (आईस)

समर्पण

प्रस्तावना.

भवितव्यतेच्या चलच्चित्रपटावर अनेक प्रसंग दृष्टिगोचर होऊन जवनिकेच्या अंतर्भागांत लुप्त होऊन जातात. यांपैकीं कांहीं प्रसंगांची गति इतकी त्वरित असते कीं, त्यांच्याखालीं वहात असलेला भावनांचा अंतःप्रवाह कोणत्या स्वरूपाचा आहे हें त्यांच्या ध्वनीवरून ओळखण्यास प्रेक्षकांना फुरसत मिळत नाहीं. तरी पण त्यांतल्या त्यांत कांहीं प्रसंग असे असतात कीं, ज्या भावनांनीं त्यांना प्रेरणा मिळते त्या विशेष सामर्थ्यवान् असल्यामुळें त्या भावनांचा ठसा, येवढ्याशा अल्पावधींतही या प्रसंगावर उठावदार रीतीनें उमटल्याशिवाय रहात नाहीं. भावनांचा उद्भव, विकास व पर्यवसान हीं नेहमींच नियमबद्ध रीतीनें घडत असतात असें नाहीं. किंबहुना नियमबद्धतेस हुलकावणी देऊन आपल्या प्रभावशालित्वानें सर्वांना चकित करणें हेंच भावनांचें वैशिष्ट्य असल्याचा कित्येक वेळां स्पष्ट प्रत्यय येतो. रोमहर्षण प्रसंग तीव्र भावनांच्या योगानेंच उपस्थित होतात. त्याप्रमाणेंच भावनांचा प्रसवही अशाच प्रसंगांच्या अंगभूत असतो. प्रसंग व भावना यांचें हें परस्परावलंबित्व जसें अविभाज्य आहे तसेंच तें अनिर्वचनीयही आहे!

विशिष्ट प्रसंगासही मागें सारून भावनांना प्राधान्य आणण्यास परिस्थिति अचानक किंवा अनपेक्षित रीतीनें उत्पन्न झालेली असावी लागते. संसारांत किंवा व्यवहारांत अशी परिस्थिति निर्माण होणें हा साधारणतः नित्यांतला अनुभव नसल्यामुळें, संसाराचें दर्शनी चित्र पहाण्यापलीकडे ज्यांच्या दृष्टीची मजल गेलेली नसते त्यांना अशी परिस्थिति व तिच्याशीं संलग्न असलेल्या भावना या दोन्ही स्वभावतःच अस्वाभाविक किंवा असंभाव्य वाटतात. पण ज्यांना आयुष्यांत हरतऱ्हेचे अनुभव आलेले असतात किंवा इतरांस ते अनुभव आलेले ज्यांच्या सूक्ष्म दृष्टीस आकलन करतां येतात त्यांची दृष्टि साहजिकच विस्तृत व विकसित होऊन त्यांच्या संबंधांत प्रसंगाच्या संभाव्यतेचा प्रदेशही त्या मानानें प्रसार पावतो. प्रस्तुत कथाभागांतून प्रसंगांचें अशाच प्रकारचें अनुसंधान ठेवण्यांत येऊन ज्या भावनांच्या योगानें अशा प्रसंगांचा उद्भव होतो किंवा उलटपक्षीं ज्या भावनांचा उद्भव करण्यास असे प्रसंग कारणीभूत होतात त्या भावनांचें शब्दचित्र प्रायः ध्वनिरूपानेंच रेखाटण्यांत आलें असल्याचें दिसून येईल.

बगीच्यांत एखादें रोप लावलें, त्याचा कोंब चांगला जोमांत फुटूं लागला, तें रोप दिवसानुदिवस वाढीसही लागलें, लवकरच त्यास सुंदर व सुवासिक पुष्पें येतील ही रम्य आशा उत्पन्न झाली तों अचानक रीतीनें तें वठत जावें हें पाहून त्याचा मालक आश्चर्यचकित होतो! आणि शोध करतां तरूच्या मुळाशींच एक कीटक त्यास पोखरण्याचें कार्य निर्वेध रीतीनें करीत आहे ही स्थिति त्याच्या दृष्टोत्पत्तीस येते. शेवटीं इतके सायास करून अपत्यनिर्विशेष प्रेमानें वाढविलेला तो तरु त्यास आपल्याच हातानें उपटून टाकावा लागतो! आणि गंमत ही कीं, ज्याकडे मालकाचें साधारण दुर्लक्षच होतें तीं आसपासचीं सर्व रोपें चांगलीं पोसून ऋतुमानाप्रमाणें त्यांना फुलांचा बहरही आलेला दिसतो! आपल्या कृतीचा हमखास अमुकच परिणाम होईल अशी कोणीही खात्री बाळगूं नये हाच बोध वरील प्रकारावरून घेतां येण्यासारखा आहे. कोणत्या वेळीं कोणता अनपेक्षित प्रसंग उद्भवेल आणि मनुष्याचे मनोरथ किंवा त्याच्या आकांक्षा यांचीं शकलें उडून जातील याचा केव्हांही नेम सांगतां येत नाहीं. प्रस्तुत कथाप्रसंगांतून हीच परिणति प्रतिबिंबित झालेली दिसून येईल.

मनुष्याचें भवितव्य व त्याचें वर्तन यांमध्यें साधारण कार्यकारणभाव असतो, या सामान्य सिद्धांतास धाब्यावर बसवून पुष्कळ वेळां निरुपद्रवी माणसांनाही त्राहि त्राहि करून सोडण्यांत भवितव्यतेस कशी मौज वाटते हेंही दृश्य कथा-भागांतून भिन्नभिन्न परिस्थितींत चित्रित झालेलें आढळून येईल. चुलीवर बासुंदी आटविण्यासाठीं ठेवलेल्या दुधांत मिठाचें पाळें उपडें होऊन सर्व दुधाची कोय बनावी यांत दुधाचें कोणतें पातक उभें राहिलें? किंवा मिठाच्या पाळ्याची कोणती पुण्याई उदरीं आली? हें जसें सांगतां येणार नाहीं त्याप्रमाणेंच कित्येक माणसांच्या आयुष्यक्रमांत ध्यानींमनीं नसतां अनपेक्षित रीतीनें संकटावह प्रसंग उद्भवून त्यांचें सबंध आयुष्य दुःखाकुल किंवा सुखविहीन कां व्हावें याचीही मीमांसा लावणें मानवी बुद्धीच्या आटोक्याबाहेरचें ठरतें.

उत्कर्षानें कोणीही उन्मत्त होऊं नये किंवा विपत्तीनें विषण्णही होण्यांत शहाण-पणा नाहीं. या दोन्ही स्थितींची अकस्मात् उलटापालट केव्हां होईल याचा क्षणमात्र-ही भरंवसा बाळगतां येत नाहीं. आपण प्रयत्न चालू ठेवावा, मनांत सत्संकल्प बाळगावा, कर्तव्याबद्दल निष्ठा ठेवावी; पण याचें अमुकच फळ येईल या आशेंत गुरफटून जाऊं नये हा उपदेश जुनाच आहे; पण त्याचा ताजेपणा कोणत्याही

काळांत अबाधित रहावा अशी त्याची सर्वश्रेष्ठ महती आहे. प्रयत्नाचें फळ मिळालें तर उत्तमच; न मिळालें तरी फलप्राप्तीसाठीं केलेल्या प्रयत्नांच्या योगानें होणारा कार्यक्षमतेचा विकास व मानसिक उन्नति हीं आपल्या पदरांत पडतातच. आणि ह्याही फायदा कांहीं लहानसहान नाहीं, असेंच समाधान मानून घेणें श्रेयस्कर ठरतें.

जग हें सुखदुःखमिश्रित आहे. केवळ सुखमय किंवा केवळ दुःखमय असें आयुष्य अपवादादाखल सांपडणेंही कठीण आहे. मनुष्याचें आयुष्य सुखांत गेलें किंवा दुःखांत गेलें याचा निर्णय साधारणतः आयुष्याच्या पर्यवसानाचें जें स्वरूप असेल त्यावरूनच ठरविण्याची प्रवृत्ति दिसून येते. एखाद्यास युनिव्हर्सिटीच्या चारही परीक्षांत चांगलें यश आलेलें असलें आणि शेवटच्या म्हणजे पांचव्या परीक्षेंत एक दोनदां गचांड्या मिळाल्या तर त्याच्या पहिल्या परीक्षांतील यशःप्राप्तीची उज्ज्वलता बरीच मलिन होते किंबहुना लुप्तप्रायही होते. उलटपक्षीं पहिल्या चार परीक्षांत सामान्य यश आलें असलें आणि शेवटच्या परीक्षेंत यशःप्राप्तीच्या बाबतींत भरघडपणा आलेला असला तर त्यामुळें त्याच्या सर्वच विद्यार्थीदशेवर चकाकी चढल्यासारखी होते. मनुष्याच्या एकंदर आयुष्यक्रमाचा प्रकार कांहींसा अशाच स्वरूपाचा आहे.

एखाद्याच्या आयुष्याचें पर्यवसान सुखांत झालें असलें म्हणजे पूर्वीच्या सर्व दुःखकारक प्रसंगांची स्मृति बुजल्याप्रमाणें होऊन विवक्षित माणसानें अखेरी साधली असे धन्यतादर्शक उद्गार त्याच्या आप्तेष्टमित्रांच्या तोंडून निघतात. उलटपक्षीं आयुष्याची इतिश्री दुःखप्रद स्थितींत झाली म्हणजे तत्पूर्वीं त्या प्राण्यानें भोगलेलीं सुखें नजरेआड होतात व “ बिचाऱ्याची अखेर वाईट झाली ! ” असें म्हणून त्याच्या भोंवतालचा परिवार त्याच्याबद्दल हळहळत असतो. अशा प्रकारें मनुष्याचें आयुष्य सुखांत गेलें किंवा दुःखांत गेलें याचा निर्णय सबंध आयुष्यांतील सुखदुःखांची जावाढ करून ठरविण्याऐवजीं सर्वांची दृष्टि पर्यवसानावरच खिळून गेलेली असते. अशा दृष्टीनें प्रस्तुत कथाप्रसंगांकडे पहाणारास ते सर्वस्वी दुःखानेंच थथबलेले आहेत असें वाटेल; पण या प्रसंगांचें महत्त्व त्यांच्या पर्यवसानावरूनच ठरवावयाचें नसून त्यांत दृष्टोत्पत्तीस येणाऱ्या भावनांच्या सूक्ष्म व्यापारांवरूनच ठरवावयाचें आहे. कथाप्रसंग चित्रित करतांना ही जी परिस्थिति निर्माण केली आहे तिच्यामुळेंच पुस्तकास **भाव-चित्रें** हें नांव देण्यांत आलें आहे. हें

नांव कितपत अन्वर्थक व समर्पक आहे, याबद्दलचा निर्णय ठरविण्याचा अधिकार अर्थातच रसिक व मर्मज्ञ वाचकांचा आहे.

गेल्या दोन तीन वर्षांत अरुण, मनोरंजन, रत्नाकर, विविधवृत्त, यशवंत, प्रावीण्य, फर्ग्युसन कॉलेज मॅगेझीन वगैरे ज्या नियतकालिकांत हे कथाप्रसंग प्रथम प्रकाशित झाले त्या सर्वांचा येथें आभारपूर्वक निर्देश करणें जरूर आहे. नवीन तयार केलेली वस्तु प्रदर्शनांत ठेवून तेथें ती लोकांना साधारण पसंत पडली म्हणजेच ती पेठेंत निर्वेध रीतीनें मांडण्यास मनुष्याची तयारी होते. तद्वत-च वरील नियतकालिकांतून या कथांना तत्परतेनें स्थान मिळणें व त्यांच्याबद्दल वाचकांकडून साधारणतः गुणग्राहक उद्गार निघणें या दोन अवस्थांतून सही-सलामत बाहेर निघण्याचा सुयोग या कथाप्रसंगांना लाभल्यामुळें त्यांचा सर्व गटचा गट पुस्तकरूपानें प्रकाशित करण्यास लेखकाला उमेद यावी हें स्वाभाविक-च आहे.

हे कथाप्रसंग पृथक् पृथक् स्वरूपांत वाचकांपुढें आले त्यावेळीं त्यांनीं त्यांज-बद्दल जी वात्सल्ययुक्त प्रेमबुद्धि दर्शविली त्याच प्रेमबुद्धीनें, समुच्चय–स्वरूपांत प्रकाशित होणाऱ्या या प्रसंगांचें त्यांच्याकडून स्वागत होईल अशी मला आशा आहे. या कथा अल्पावधींत आणि सुबक रीतीनें छापून देण्याचे कामीं ‘विजय’ प्रेसचे मालक रा० अ. स. गोखले यांनीं जी मला आपलेपणाच्या भावनेनें मदत केली त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें. त्याचप्रमाणें हे कथाप्रसंग क्रमा-क्रमानें नियतकालिकांतून प्रसिद्ध होत असतां त्यांचें लडिवाळपणानें कौडकौतुक करून ज्या कित्येक मित्रांनीं लेखनव्यवसायाचे कार्यांत मला प्रोत्साहित केलें त्यांचे-ही मी मनःपूर्वक आभार मानतों.

डेक्कन जिमखाना,
पुणें–नं. ४.
ता. २०–३–३१.

विष्णु बापूजी आंबेकर.

1931

भाव-चित्रें

पाण्याकरितां-!

ती वाट चालतांना नित्यशः खिन्न होणारा चंद्रोजी आज जरा प्रफुल्लित झालेला दिसत होता. रोज घरांतून नोकरी पहाण्याकरितां बाहेर पडतांना फार आशा बाळगावी आणि परत येतांना कांहीं काम मिळालें नाहीं म्हणून खिन्नवदन होऊन परत यावें, असा त्याचा या महिन्याचा नित्यक्रमच होऊन बसला होता. त्याची सहधर्मिणी गोदावरी त्याला नेहमीं समजावण्याचा प्रयत्न करी आणि त्यामुळेंच चंद्रोजीला दुसऱ्या दिवशीं काम पहावयास जाण्याचा हुरूप येई. मुंबईहून मिळवून आणलेली चिरीमिरी आतां संपत आली होती. ती संपल्यावर आपलें पुढें कसें होईल अशी त्या दोघांनाही अलीकडे काळजी वाटूं लागली होती. रोज काम पहावयास जावें आणि कोठें कांहीं संधान जुळलें नाहीं म्हणजे काळजी करीत घरची वाट सुधरावी असा चंद्रोजीचा रोजचा कार्यक्रम होता! पण आज त्याच्य चेहऱ्यावर काळजी किंवा दुःख यांची यत्किंचितही छाया पडली नव्हती. मात्र त्याच्या मनांत उत्कंठा इतकी उचंबळून आली होती कीं, त्याची गतिसुद्धां अगदीं जलद झाली होती. घरीं जाऊन नोकरी मिळाल्याची बातमी बायकोला केव्हां सांगेन असें त्याला होऊन गेलें होतें. आणि याच अधीरतेच्या भरांत चंद्रोजी तो मार्ग झपाट्यानें आक्रमीत चालला होता.

अद्याप अस्पष्ट उजेड होता. लगतच्या डोंगरावर चरावयास गेलेलीं गुरें नुकतींच परतून गेलीं होतीं. चंद्रोजी चालत होता ती वाटही अगदीं खेड्याच्या बाजूचीच होती, आणि त्या रस्त्यावर चंद्रोजीशिवाय दुसरें कोणीही आढळत नव्हतें. नोकरीचे आणि तदनुषंगिक असे किती तरी विचार चंद्रोजीच्या मनांत उठत होते. सद्याच्या खिशांतील चंची बाहेर काढून चंद्रोजीनें ती उलगडून डाव्या मनगटावर

" हो तर. उजाडतांच रोज कामाला सुरवात होणार. मध्यें बारा ते दोन सुटी मिळणार. तेवढ्या वेळांत घरीं येऊन जेवून पुन्हा कामाला जाईन ! "

कामाची व्यवस्था कांहींही असली तरी काम मिळालें एवढ्यानेंच गोदावरीला फार आनंद झाला होता. पण स्त्रीस्वभावास अनुसरून इतक्या गर्दींतही ती पगार विचारावयाला विसरली नाहीं. 'रोज दीड रुपया' हें चंद्रोजीचे शब्द ऐकून तर तिला अस्मान ठेंगणें झालें !

जेवण झाल्यावर भावी सुखाचे मनोरे रचीत तीं दोघेंजणें किती वेळ तरी जागत बसलीं होतीं. कांहीं दिवसांची तरी ददात मिटली म्हणून त्यांना समाधान वाटत होतें आणि त्या समाधानाच्या भरांत त्या दोघांनाही सुखानें निद्रा लागली. पहाट झाल्यावर चंद्रोजी कामाच्या धसक्यानें जागा होऊन कामावर निघूनही गेला; पण गोदावरीला इतकी गाढ झोंप लागली होती कीं, चंद्रोजी केव्हां गेला हें सुद्धां तिला समजलें नाहीं !

२

मी म्हणतों तसें केल्याखेरीज कांहीं पाणी लागावयाचें नाहीं."

" छे! तुमचें आपलें कांहीं तरीच ! घरोघर विहिरी खणतात तेव्हां असेंच करतात वाटतें ? आपल्याला नाहीं बुवा गोड वाटावयाचें असें केल्यानें."

" घरोघरच्या विहिरींची गोष्ट वेगळी ! घराची शांति झालेली असते. त्यामुळें विहिरीला पाणी लागावयाला अडचण पडत नाहीं."

" पण काहो ! घर बांधून घेत असतांनाच विहीर खणतात तेव्हां कसें होतें ! "

" हें बघा ! आम्हांला अशी अडवाअडवी केली तर कांहीं उत्तर सुचावयाचें नाहीं."

" तुम्ही उत्तर द्या अगर देऊं नका. तुम्ही म्हणतां तसें करावयाला आपण कांहीं तयार नाहीं बुवा ! "

" तुम्हीं मी सांगतों असें जर केलें नाहीं तर मेहनत फार होईल आणि कदाचित् पाणी लागावयाचें सुद्धां नाहीं ! "

" मला वाटतें आणखी थोडी वाट पाहावी म्हणून ! "

" छे ! छे ! आतां कसली वाट पाहतां हो ! किती खोल खणलें तरी पाण्याचा टिपुस नाहीं, आतां कसली वाट बघतां ? आपण तर काम चालवावयाला आतां कांहीं तयार नाहीं."

" तें सारें खरें. पण तुम्ही म्हणतां तसें करणें साधणार कसें ? "

" अहो, न साधावयाला काय झालें ! मी सांगतों ती युक्ति करा."

तिन्हीसांज टळून गेली होती आणि अंधारही पडला होता. त्या दिवशींचे मकरी केव्हांच घरोघर निघून गेले होते. पाटलांची विहीर खणण्याचें काम सुरू त्याला आज दीड महिना झाला होता. विहीर किती तरी खोल गेली होती, । विहिरीला पाणी लागेना ! रोज रोज विहिरीची पहाणी करतांना तिला आज ना उद्यां पाणी लागेल अशी पाटलांना फार उमेद वाटे, पण दीड महिना झाला तरी ओलसर मातीसुद्धां हातीं लागेना ! पाटलांना किंचित् काळजी वाटून आज त्यांनीं आपले दोस्त गणबा यांना आपल्या देवडीवर बोलावून घेऊन त्यांचा यासंबंधांत सल्ला विचारला. याच वेळेला या दोघां सोबत्यांमध्यें वरील संवाद झाला. गणबांनीं सांगितलेली युक्ति अमलांत आणण्याखेरीज आतां गत्यंतर नाहीं अशी खात्री झाल्यावर तशी योजना करण्यास त्यांच्या मनाची तयारी झाली. पण ती युक्ति साधावयाला पुष्कळच अडचणी होत्या, त्याही त्यांनीं सविस्तरपणें गणबाला सांगितल्या. पण गणबानें त्या सर्व अडचणींनाही तोड काढली. पाटील त्या युक्तीला संमति देण्यास तयार नव्हते, पण खर्चाच्या अडचणीकरितां त्यांना ती देणें भाग पडलें. गणबांनीं एकदां आसपास पाहिलें आणि खालच्या आवाजांत बोलण्यास सुरुवात केली.

" उद्यां तुम्ही सर्व कामकऱ्यांना सांगा, कीं परवांच्या दिवशीं मधली बारा ते दोन सुटी नाहीं. दिवसभर काम चालेल !

" पण ह्याला सर्व कामकरी कबूल कसे होतील ? "

" अरे, त्यांना सांगावयाचें कीं, तेवढया दोन तासांचे पैसे अधिक मिळतील म्हणून ! "

" पण जास्त पैसे मागावयाला लागले तर ? "

" देऊन टाकावयाचे. त्यांत काय आहे ? पाणी लागल्यावर खर्चाच्या चौपट उत्पन्न काढशील तें ! "

" बरें अधिक पैसे देऊं. पुढें ? "

" सुरुंग खणण्याकरितां चंद्रोजी त्या दोन तासांत काम करीत बसेल; आपण सुरुंगाच्या वेळेला सुरुंग लावून द्यावयाचा, कीं चंद्रोजी आंतल्या आंत खलास होईल ! "

" आणि त्याची बायको ? " पाटलांनीं जरा भीतीनेंच विचारलें.

" लागली गडबड करावयाला तर तिची मूठ दाबूं ! मग तर झालें कीं नाहीं ? "

गणबांची ही सर्व मसलत ऐकून पाटलांना जरा कसेंसेंच झालें; पण विहिरीला पाणी येऊन सबंध शेतांत पुढें धान्याची सुबत्ता होईल या लोभानें त्यांना ही मसलत ऐकणें भाग पडलें. चंद्रोजी आणि त्याची बायको यांचा विचार मनांत येऊन आपण करणार आहों त्या कृत्याबद्दल पाटलांचें मन साहजिकच कच खाऊं लागलें. त्यांची चित्तवृत्ति विषण्ण झाली. आपल्या सुखाकरितां निरपराधी माणसाचा बळी घेण्याची कल्पना त्यांना असह्य झाली. गणोजी निघून गेल्यावर पाटील निजण्याकरितां म्हणून बिछान्यावर लवंडले, पण त्यांना झोंप येईना. त्यांच्यापुढें चंद्रोजी आणि त्याची सुशील पत्नी गोदावरी यांचीं चित्रें उभीं राहिलीं होतीं. आपल्याला गणोजीनें दिलेला सल्ला खरोखरच योग्य आहे का ? असाही प्रश्न त्यांच्या निर्मळ मनानें त्यांना किती वेळां केला; पण गणोबानेंच सांगितलेल्या इतर लोकांच्या उदाहरणांची आठवण होऊन पाटलांच्या या भीतीचें अल्पांशानें निराकरण होई. गणोबानें असे बळी दिल्याचे किती तरी दाखले दिले ! ज्यांचे दाखले दिले होते ती सर्व मंडळी पाटलांच्या मनांत आळीपाळीनें येत होती. त्यांची हल्लींची भरभराटीची स्थिति मनांत येतांक्षणीं पाटलांना आपल्या भित्रेपणाबद्दल हसूं येई. आपली अशी भरभराट झाली म्हणजे विहिरीला पाणी लागण्याकरितां काय केलें होतें हें आपल्याला कोण विचारणार ? आणि शिवाय चंद्रोजीचे तरी सध्यां किती हालाचे दिवस आहेत ! त्याची या हालांतून सोडवणूक झाली तर तीही कांहीं वाईट नाहीं ! आणि त्याच्या बायकोला थोडेफार पैसे दिले म्हणजे तीही गप्प बसेल. सोन्याचें दर्शन झालें कीं बाई गप्प राहिलीच !...

अशा तऱ्हेनें मनाचें समाधान करून घेतांच त्यांना झोंप लागली. दुसऱ्या दिवशीं सकाळींच पाटील कामाच्या जागीं गेले. कामकरी लोक नुकतेच येऊन तेथें दाखल झाले होते. पाटलांना पहातांच त्यांच्याभोंवतीं सर्वजण जमले आणि इतक्या लवकर आज पाटील कसे आले याचें सर्वांना आश्चर्य वाटलें. सर्व मंडळींना उद्देशून पाटील म्हणाले, " विहिरीला पाणी लागण्याकरितां जरा जास्त काम केलें पाहिजे, नाहीं ? "

" तुम्ही सांगाल तर मधली सुटी कमी करूं ! " त्यांतील एकानें उत्तर दिलें.

" पण आतां विहीर जास्त खणावयाची नाहीं असा माझा विचार आहे. फक्त

उद्यांच्या दिवसांचे सुरुंग लावावयाचे. पाणी लागलें तर ठीकच, नाहीं तर सोडून द्यावा हा नाद झालें!"

"मग उद्यांपर्यंत जास्त काम केलें पाहिजे."

"मी तर म्हणतों उद्यां सुटी घेऊंच नका." पाटलांनीं प्रस्तावना तर केली.

"रोजच्या दरांत इतकें काम आपल्या हातून नाहीं व्हावयाचें बुवा!" मघांच्याच माणसानें उत्तर केलें.

"अरे, पैसे जास्त घ्या कीं! नाहीं कोण म्हणतो?"

चंद्रोजी लांब बाजूला उभा होता. लांबूनच पाटलांना उद्देशून त्यानें म्हटलें, "कशाला करतां इतकी यातायात? भिकारणीचें पोर उचलून आणा आणि गाडा या खड्ड्यांत! हां हां म्हणतां पाणी लागेल! माझें ऐका तुम्ही."

पाटलांची दृष्टि चंद्रोजीकडे वळली. चंद्रोजीचे उद्गार ऐकून त्यांना धक्काच बसला. आपला गुप्तपणें ठरलेला बेत याला कळला तर नाहीं ना, असाही संशय त्यांच्या मनाला चाटून गेल्याखेरीज राहिला नाहीं. आपला बेत कळून आपली चेष्टा करण्याच्या उद्देशानें चंद्रोजी मुद्दामच बोलला असेंही त्यांना वाटलें. चंद्रोजी-ला उद्देशूनच पाटील बोलले, "छे! तसें नाहीं करावयाचें आपल्याला. उगीच लोकाला कशाला मारावयाचें!" पण ही सावरासावर करतांना पाटलांची कितीतरी गाळण उडाली! त्यांचें मन आंतून त्यांच्या या उच्चाराचा पूर्ण इन्कार करीत होतें. पुन्हां चंद्रोजीलाच पाटील म्हणाले, "सुरुंग खणण्यावरच सगळी मदार आहे. उद्यांला सगळे सुरुंग खणण्याचें काम चंद्रोजी, तुम्हीं करून ठेविलें पाहिजे. परवां पाहूं सर्व सुरुंग लावून! जमलेंच तर ठीक झालें, नाहीं तर पुढें काम बंद!"

"उद्यां सकाळींच जेवण करून येतों. मध्यें कांहीं भानगड ठेवीतच नाहीं मुळीं, म्हणजे मग सारखें काम करावयाला बरें!"

या उद्गारांनीं संतुष्ट होऊन पाटील घरीं निघून गेले.

३

गोदावरीनें पहाटे उठून स्वयंपाक केला. उजाडावयाच्या आंतच स्नान करून चंद्रोजी जेवावयाला सुद्धां बसला!

"आज काय तो आमच्या कामाचा निकाल!"

"पाणी लागेल का?"

“ तें काय सांगावें ! पण मी मात्र आज काम कसून करणार आहें.”

“ मग आज मध्यें भूक नाहीं का लागायची ? ”

“ छे ! आणि आज भूक लागली तरी मध्यें खावयाला वेळच नाहीं ! ”

“ नाहीं तर मी आणून देईन शिदोरी मधल्या वेळेला ? ”

“ नको नको. संध्याकाळचेंच जेवण लवकर तयार करून ठेव म्हणजे झालें !”

“ इतकं काम करून शेवटीं काय मिळायचं आहे ? ”

“ मला कांहीं मिळालें नाहीं तरी तुला मात्र गोठ मिळतील ! ”

आज जर विहिरीला पाणी लागलें तर चंद्रोजीला बक्षीस मिळेल असें पाटलांनीं सांगितलें होतें. त्या बक्षिसांतून आणि इतर सांठविलेल्या पैशांतून आपण बायकोला गोठ करावेत असें चंद्रोजीला वाटत होतें, आणि म्हणूनच त्यानें आपली ही इच्छा बायकोला कळविली.

“ मला कशाला हवे आहत गोठ ? ”

“ ही पहा ! आपली माझी इच्छा आहे तुला कांहीं तरी जिन्नस करावा म्हणून ! ”

“ हा कामधंदा संपून पुढला लागेपर्यंत आपल्याला रोकड पैसे नाहीं का लागायचे?”

“ पुढचें पुढें पाहूं ! सध्यां मला आपलें असें वाटतें ! ”

“ मला मिळाले तर हवेच आहेत ! ”

“ तुला मिळालेच पाहिजेत. तूं नसतीस तर मला हें काम लागून तें करावयाचा हुरूपसुद्धां आला नसता. तुझ्या हातचा तुकडा रोज मिळत होता म्हणूनच तर माझ्या हातून काम होत होतें.”

“ पण त्या तुकड्याला लागणारें सामान आपल्याकडून मिळत होतें म्हणून तर माझ्या हातून रोजच्या दोन वेळां साजऱ्या झाल्या.”

दोघांनाही परस्परांच्या भक्तीबद्दल पराकाष्ठेचा आनंद झाला. गोदावरीच्या आनंदाला तर डोळ्यांवाटे वाटसुद्धां मिळाली; पण चंद्रोजीच्या आनंदाला वाट मिळेना. त्याचा गळा दाटून आला आणि त्याच्या तोंडांतील घांस अडखळला. त्या गडबडींत त्याला एकदम ठसका लागला. पाणी पिऊन त्यानें जेवण भरभर आटोपलें आणि हात धुऊन तो पान खावयाला बसला. थोड्याच वेळांत आंतील काम आवरून गोदावरीही बाहेर आली, आणि पुन्हा संवादाला सुरवात झाली.

“ मी तर काल पाटलांना म्हणत होतों, कीं एखादें भिकाऱ्याचें पोर तेथें मारलें कीं, सगळीकडे पाणीच पाणी होऊन जाईल ! ”

ते पतीचे शब्द ऐकून गोदावरीचें शरीर भीतीनें थरारून गेलें. तो विचार तिला कसासाच वाटला. एकदम कांहीं तरी विचार केल्यासारखें करून ती म्हणाली, "तुम्हाला कामधंदा न मिळता तर आजही आपण भिकारीच नसतों का झालों ?"

"हो झालों असतों. पुढें काय ?"

"आणि आपल्या दोघांपैकीं कोणाला तरी त्यांनीं अशाच करणीकरितां ओढून नेलें असतें म्हणजे ?"

"पण मी मोठ्या माणसांची गोष्ट कोठें सांगतों आहे ? लहान पोरें नेलीं, तर काय बिघडतें ?"

पतीचें तें भाषण ऐकून गोदावरीच्या मनांत किती तरी विचारांचें काहूर उसळून गेलें. आपण दरिद्री असतांना आपल्याला एखादें मूल असतें आणि तेंही असेंच नेलें असतें तर...या विचारानें तर गोदावरीला भोंवळ आल्यासारखें झालें. स्वतःला किंचित् सांवरीत तिनें म्हटलें, "आणि आपल्याला एखादें मूल असून तें भिकाऱ्याचें म्हणून जर नेलें असतें तर ?"

"मीं जीवच दिला असता." चंद्रोजीनें आवेशानें उत्तर दिलें.

गोदावरीच्या बोलण्याचा आशय त्याला पुरतेपणीं समजला, आणि आपण काय बोललों हें, असें वाटून त्याचा तोंच ओशाळला.

इतरही कांहीं गप्पा होऊन चंद्रोजी जाण्याकरितां उठला. त्यानें उगवत्या सूर्य-बिंबाला भक्तिभावानें वंदन केलें, आणि गोदावरीनेंही त्याचें अनुकरण केलें. हत्यारें घेऊन चंद्रोजीनें दाराबाहेर पाऊल ठेवलें तोंच त्याचें पाळींव मांजर त्याला आडवें गेलें ! गोदावरीनें चंद्रोजीला माघारी फिरण्यास सांगितलें, पण 'आतां फार उशीर होईल', असें म्हणत चंद्रोजी वायुवेगानें वाट काढीत निघून गेला. चंद्रोजी दृष्टि-आड झाल्यावर गोदावरीनें सूर्याकडे तोंड करून पुन्हा एकवार हात जोडले. तिच्या मिटलेल्या डोळ्यांतून अश्रुधारा ओघळत होत्या, आणि तिचे ओंठ स्फुरण पावत होते. "सूर्यनारायणा ! तूंच तारणारा आहेस !" असे उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडतात न पडतात तोंच दाराच्या चौकटींतून आपलें चिमुकलें तोंड बाहेर काढून पालीनें चुकचुक असा रोमांचकारी ध्वनि काढला ! तो ऐकून तर तिच्या हृदयाला अधिकच चरका बसला. घरांत जाऊन तिनें दार घट्ट मिटून घेतलें. सकाळच्या प्रहरीं झालेल्या त्या सर्व अपशकुनांनीं गोदावरीला कामधंदासुद्धां सुचेना ! तिला त्या दिवशीं जेवणसुद्धां नीट गेलें नाहीं. पूर्वीं तिनें असे कितीतरी अपशकुन अनुभविले होते.

मग आजच घडलेले अपशकुन तिच्या मनाला इतके कां जाणवावेत हें तिचें तिलाच समजत नव्हतें!

दुपारीं बारा वाजून गेले तरी चंद्रोजी एकचित्तानें काम करीत होता. प्रखर ऊन पडलें होतें आणि खोलांत असलेल्या चंद्रोजीवर तर त्या सूर्यकिरणांचा अधिकच मारा होत होता. चंद्रोजीचें पहारेनें सुरुंग खणण्याचें काम चालू होतें. सकाळपासून तें काम करण्यांत तो आज इतका गर्क झाला होता कीं, त्या तन्मय स्थितींत तोंडानें श्वास टाकतांना तो एका विचित्र सुरांत–'हं: हं:'–अशीं अक्षरें मोठमोठ्यानें काढीत होता. खोलांतून येणारा त्याचा आवाज फारच गंभीरपणानें घुमत होता आणि आसपासच्या शेतांतून त्या आवाजाचे असंख्य प्रतिध्वनि उठत होते! आसपास काय चाललें आहे याची चंद्रोजीला मुळींच जाणीव नव्हती. पहारेचें वरखालीं होणें चालू होतें आणि त्या पहारेच्या क्रियेबरोबर चंद्रोजीचें उंच सुरांत घुमणेंही चालू होतें.

थोड्याच वेळांत एकदम दोन सुरुंग उडाल्याचा आवाज झाला आणि विहिरीला पाणी लागलें! भोंवतालचे लोक विहिरीपाशीं आले. विहिरीच्या तळाला चोहों-बाजूंनीं पाणी लागलें होतें आणि पाटलांना बोलावून पाटील तेथें येततोंपर्यंत सर्व विहीर पाण्यानें तुडुंब भरून गेली होती. बिचाऱ्या चंद्रोजीची एकट्या पाटलांखेरीज कुणाला आठवणसुद्धां नव्हती! आणि पाटलांना आठवण असली तरी त्यांनीं चंद्रोजीचें नांव उच्चारण्याचें कारणच पडूं दिलें नाहीं!

पाणी लागलें म्हणून व्हावयाच्या समारंभाची तासा दोन तासांच्या अवधींत सर्व सिद्धता झाली. सर्व कामकरी लोक शेतांत झाडाखालीं जमा झाले. नारळ आणि हळदकुंकूं घेऊन गणोबा आणि पाटील विहिरीपाशीं गेले. त्यांनीं नारळ फोडले आणि हळदकुंकूं इतस्ततः विखरून दिलें. मधल्या शांततेच्या वेळांत विहिरींतून कोणीतरी घुमत असल्याचा भास झाला! भांबावून जाऊन पाटलांनीं गणोबास विचारलें, "कोण घुमतें आहे?"

"पाटील! पाण्यांतील देवता अशा पूजेच्या वेळीं नेहमींच आशीर्वाद देत असतात."

पाटलांनीं सर्व मंडळींना प्रसाद वांटला. वाजंत्री येऊन दाखल झाले आणि मिरवणूक निघण्याचा सुमार झाला. सुरुंग खणणारे आणि लावणारे मिरवणुकीच्या

अग्रभागीं चालवावेत असें सर्वानुमतें ठरलें आणि पाटलांनींच मुद्दाम विचारलें, "चंद्रोजी कोठें आहे ?"

बाकीच्या कामकऱ्यांनीं चंद्रोजीचा फार शोध केला. चंद्रोजीचा बळी पडला अशी सर्वांची खात्री झाली. सर्वजण हळहळले ! पाटलांना किती जणांनीं तरी विहिरींतून कोणीसें घुमल्याचा आवाज येतो आहे असें सांगितलें; पण पाटलांनीं त्याकडे मुद्दामच दुर्लक्ष केलें. वाजंत्र्यांच्या दंग्यांत मिरवणूक थाटानें चालू झाली. ज्या ज्या कामकऱ्यांचीं घरें वाटेनें लागत होतीं त्या त्या घरासमोर मिरवणूक थोडा वेळ थांबत होती. कामकरी घरांत शिरल्यावर मोठा जयजयकार होत असे आणि पुन्हा मिरवणूक चालू होत असे.

मिरवणूक आली म्हणून गांवांत आधींच बातमी पसरली होती. चंद्रोजी येईल म्हणून गोदावरीही घरांत येऊन उभी राहिली होती. दोन घरें टाकून पलीकडल्या घरांतील कामकरी आंत शिरत होता. त्या घरापुढील गर्दी आणि इतर देखावा पाहून गोदावरीला अतिशय कौतुक वाटलें. आपल्या घरापुढेंही असाच प्रकार होईल या उत्कंठेनें ती मिरवणूक घरासमोर येण्याची वाट पहात होती. मिरवणूक चालू झाली. गोदावरीचें मन वरखालीं होऊं लागलें.

मिरवणूक घरासमोर न थांबतां पुढें सरकली. शेवटची रांगही दारापुढून जाऊं लागली. त्या मिरवणुकींत चंद्रोजी असेल म्हणून त्याला पहाण्याकरितां गोदावरीनें डोळे ताणताणून पाहिलें. शेवटच्या रांगेंतील दारापासूनच जाणाऱ्या दोन कामकऱ्यांत चाललेल्या संवादाचा अगदीं स्वल्प भाग तिच्या कानीं पडला.

"शेवटीं चंद्र्याचा बळी मिळाला हं !"

"काल त्यानेंच बळी द्यावा म्हणून म्हटलें होतें ना !"

मिरवणूक लांब निघून गेली; आणि शेजारच्या वळणावर वळून दृष्टिआड सुद्धां झाली. त्या कामकऱ्याच्या तोंडची ती वार्ता ऐकून गोदावरी जागच्या जागीं खिळली ! तिला आपण काय ऐकलें याचा सुद्धां नीट उलगडा होईना !

ॐ ॐ ॐ

रात्र पडल्यावर अंधाराचीच गोदावरी त्या विहिरीजवळ आली. विहिरीपाशीं येऊन ठेपल्याबरोबर ती एकदम भयचकित झाली ! चंद्रोजीचा घुमणारा सूर अद्यापही स्पष्टपणें बाहेर ऐकूं येत होता. तो आवाज गोदावरीला ओळखीचा वाटला. नीट कान देऊन ऐकल्यावर तिला चंद्रोजीच कोठें तरी काम करतो आहे असा भास

झाला. आवाजाच्या अनुरोधानें गोदाबरी पुढें सरकत सरकत अगदीं पाण्याच्या कांठाशीं येऊन ठेपली. तिनें पुन्हां कान दिला तों पाण्यांतून तेच चोहोंकडे घुमणारे सूर बाहेर पडत होते. काम करतांना तद्रूप झाल्यावर चंद्रोजी हंः-हंः असें करीत असे; आणि अगदीं तसेच शब्द पाण्यांतून बाहेर निघत होते.

सर्वत्र अंधार होता, पण कडेनें माळरान असल्यामुळें अगदीं नजीकच्या वस्तु दिसत होत्या. गोदावरीच्या पायाखालीं नारळाच्या करवंट्या होत्या. मार्गांतल्या एकदोन करवंट्या तिनें लाथाडल्या तरी त्या तिच्या पायाभोंवतीं घुटमळतच होत्या! पाण्यांतून निघणारा चंद्रोजीचा स्वर अगदीं स्पष्ट झाला होता. गोदावरीची मनःस्थिति अगदीं बेभान झाली. भिकाऱ्याची आहुति मिळाली म्हणजे विहिरीला पाणी लागतें !– ती मनाशींच म्हणाली. चंद्रोजीचे सकाळचे शब्द तिच्या श्रवणपुटांत ताजेपणानें घुमूं लागले.–मग माझ्यासारख्या कफल्लक आणि फटिंग विधवेचा बळी पडला तर पाणी जास्त नाहीं का वाढायचें ?–तिच्या मनांत हा विचार येतांक्षणीं तिनें आपली अश्रुपूर्ण दृष्टि सभोंवार फेंकली–खरेंच विहिरीचें पाणी जास्त वाढून धनधान्याची समृद्धि होईल का–आणि मग माझा बळी पडला तरी काय हरकत आहे ?......

शेजारीं जमिनीवर पडलेल्या एका अवजड शिळेभोंवतीं लुगड्याच्या पदराचें आवरण घालून पदराच्या दोन्ही टोकांनीं तिनें घट्ट गांठ मारली आणि बसल्या बसल्याच पाण्यांत अंग सोडलें ! गोदावरी तळाला पोहोंचेपर्यंत क्षणमात्र चंद्रोजीचा स्वर बंद पडला ! सर्वत्र शांत झाल्यावर तोच स्वर स्पष्टपणानें भोंवतालच्या रानांत घुमूं लागला !

किती तरी वर्षें झालीं तरी अद्यापही त्या सुपीक शेताच्या मध्यभागीं असलेल्या त्या विहिरींतून रात्रीच्या भयाण वेळेला 'हंःहंः' असे सूर स्पष्टपणें उठत असतात !

अंधाची कला—

विठाबाई, कां मनिं धरिली अढी ।
अनाथ मी अपराधी बुडतों; उतरा मज पैलथडी ॥

पहाटेच्या रम्य वेळीं मनसोक्त सारंगी छेडतांना तारानाथ मंजुळ आवाजांत वरील आळवणी करीत होता. भोंवतालचें वातावरण नुसतें प्रशांतच नव्हे तर भीषणही होतें. पडीक थडग्यांच्या आवारांत एखादाच भव्य संगमरवरी पुतळा असावा किंवा ओसाड रानाच्या मध्यभागीं एखादाच विस्तीर्ण वटवृक्ष असावा तसाच तारानाथाच्या मालकीचा तीनचौकी वाडा शतक अर्धशतकाची जिवंत साक्ष देत त्या आळींतलि पडीक खोपटांच्या मध्यभागीं आज उभा होता ! अवघ्या दहा वर्षांपूर्वी ज्या वाड्यांत शेंदीडशें माणसांची दंगल माजून राहिलेली असे त्या वाड्यांत आज तारानाथ आणि त्याची धाकटी बहीण कलावती या दोघांशिवाय चिटूपांखरू सुद्धां नव्हतें. नाहीं म्हणावयास रात्रीच्या भयाण एकांतांत घुबडांचा रोमांचकारी घूत्कार अथवा आसपासच्या पडीक खोपटांच्या वळचणींखालीं रात्रीं आश्रयार्थ निजलेल्या कुत्र्यांचें कर्णकटु रडणें किंवा अशाच कांहीं अमंगल गोष्टींचा मात्र तेथें सुकाळ झालेला होता ! त्या वाड्याच्या केवढया थोरल्या तरी भागांत आज जवळजवळ दहा वर्षें सूर्यप्रकाशाचा शिरकाव झालेला नव्हता. दोनचारशें माणसांची ती आळी आज त्या उभयतां बहीणभावंडांच्यावांचून निर्मांक्षिक आणि निर्जन अशी होती !

तारानाथाची बहीण कलावती त्याच्या शेजारींच निजली होती. त्याच्या निराशामय आयुष्यांत जर कांहीं विरंगुळा असेल तर ही त्याची बारा वर्षांची धाकटी बहीण ! तिच्याकडे बघून—छे ! तिच्याकडे बघून तरी कसें !...... तारानाथ लहानपणींच देवीच्या रोगानें आजारी असतांना आंधळा झालेला होता. त्यामुळें त्या मुलीचा नुसता शब्द ऐकूनच त्याला सुख मानून घ्यावें लागत असे ! आंधळ्याला या जगांत कशावर पोट भरतां येणार ? पण तारानाथाला फक्त सारंगी वाजवितां येत होती आणि कधीं कधीं तो गाणेंही म्हणत असे. आईबापांच्या मृत्यूनंतर तारानाथाला याच कलेवर स्वतःची व स्वतःच्या बहिणीची गुजराण करावी लागत असे. कुणाच्या तरी हातापायां पडून एखाद्या श्रीमंताच्या घरीं वरणी लावावी आणि परिश्रमपूर्वक सारंगीवादन करून दहा रुपयांची प्राप्ति करून

ध्यावी, असा तारानाथाचा योगक्षेम असे. एवढा थोरला स्वतःच्या मालकीचा वाडा ! पण त्याला एकही भाडेकरी मिळत नव्हतें !

एवढ्यानेंच तारानाथाच्या दुःखांचा शेवट झालेला नव्हता. एकुलती एक कलावती; तीसुद्धां अलीकडे आजारीच होती. तिला रोज बारीक ताप येत असे आणि तिच्या अंगांतील शक्ति दिवसेंदिवस कमी होत चालली होती. स्वतःच्य पोटाची हेळसांड करून सुद्धां वेळेस तारानाथ तिच्या पथ्यपाण्याची सोय करीत होता. तारानाथाच्या सारंगीवर खूष होऊन त्याच्याकडे कधीं कधीं येणारे कांहीं गरीब श्रोते त्याला या कामीं फार उपयोगी पडत. त्यांच्याजवळ पैसे देऊन तिच्याकरितां फळें आणवावीं, तिला औषध आणवावें, कधीं कधीं पैसे मिळविण्यासंबंधांतही त्यांचा उपयोग करून घ्यावा असा तारानाथाचा कार्यक्रम होऊन बसला होता. कलावती लहान होती, पण तारानाथाला होत असलेल्या त्रासाची तिला पूर्ण कल्पना होती; तिला त्याबद्दल फार वाईट वाटत असे. पण या सर्व त्रासाला तिचा निरुपाय होता. तिनें कित्येक वेळां या दुःस्थितीच्या वैतागानें औषध घेण्याचें नाकारलें तर तारानाथ तिची अशी कांहीं प्रेमळ मनधरणी करीत असे कीं, तिचा तिलाच पश्चात्ताप वाटावा आणि तारानाथानें पुढें केलेल्या पदार्थांचा तिनें मुकाट्यानें स्वीकार करावा !

तारानाथाचे सारंगीच्या सुराबरोबर प्रेमळ आलाप चालू असतांनाच ती जागी झाली होती. पण त्याच्या मंजुळ वाजविण्यानें आणि गाण्यानें ती आज तल्लीन होऊन गेली ! तारानाथ वरील पद म्हणत असतांना तें इतक्या संथपणानें व गंभीर-पणानें म्हणत होता कीं, त्यांतील अर्थ कोणालाही सहज कळून यावा. तें पद शांत चित्तानें ऐकत असतां कलावतीलाही त्याचा अर्थ कळून आला. भाऊला खरोखर-च जीव नकोसा झाला आहे का ? तिच्या मनांत प्रश्न उभा राहिला. आणि देवानें हें त्याचें गाऱ्हाणें ऐकलें तर......त्या अजाण बालिकेला वाटलें कीं, खरोखरच भाऊचा आर्तस्वर ऐकून जर विठोबा पुढें आला आणि त्यानें भाऊला नेलें तर !......तिचें अंग थरारलें तिनें कावऱ्याबावऱ्या नजरेनें आसपास पाहिलें आणि तारानाथाला एकदम हांक मारली, " भाऊ, भाऊ "

" ताई, जागी झालीस का ? थांब हं."

तारानाथानें सारंगी खालीं ठेवून गज भिंतीशीं उभा केला. आणि 'पैलथडी'

या चरणाच्या अक्षराची तान मारीत तो तिच्या शेजारीं आला.

" ताई, कांहीं घेतेस का ? "

" भाऊ, तूं गाणें बंद कां केलेंस ? "

" अग तुला त्रास होईल म्हणून ? "

" भाऊ, विठोबारायांनीं आपली एकदांची सुटका करावी असें तुला अगदीं खरें वाटतें का रे ? "

" छे ! ताई, आपलें कांहीं तरी भजन करावयाचें म्हणून मी तें गाणें म्हणत होतों. माझी ताई असतांना मला कधीं तरी हें जग नकोसें होईल का ? "

" आणि भाऊ, मी नसलें तर ? "

" ताई, असें बोलूं नये."

औषधाची बाटली कोनाड्यांतून आणण्याच्या मिषानें तारानाथानें तिच्याकडे पाठ फिरविली. त्याच्या डोळ्यांची उघडझांप झपाट्यानें होऊं लागली. त्याचे पांढरे शुभ्र डोळे धुक्यानें आच्छादलेल्या छोट्याशा नदीप्रमाणें चकाकत होते; आणि अश्रु आंवरण्याचे महत्प्रयास करून सुद्धां त्याच्या डोळ्यांतून एक दोन थेंब खालीं पडलेच !

...खरोखरच ताईशिवाय हें जग किती वाईट होईल ? आणि मग आपल्याला तरी कुणापासून सुख आहे ?...तारानाथाच्या विव्हळ मनांत असे विचार क्षण-मात्र येऊन गेले. तो मनाशींच म्हणाला, 'ताई काय बोललीस हें ?— मी नसलें तर—आणि तूं जाणार कुठें' ? तारानाथ एकदम नखशिखान्त थरारून गेला ! डोक्यांतील सर्व विचार घालवून देण्याच्या हेतूनें त्यानें मानेला हिसडा दिला. औषधाची बाटली हातांत घेऊन ती ताईच्या पुढें करीत त्यानें म्हटलें,

" हं. ताई, हें घे औषध ! "

" भाऊ, मला औषधाची तहान लागली नाहीं रे. मला थंडी वाजते आहे."

" ताई, तूं धोतर पांघरलें आहेस ना ? "

" भाऊ, धोतर पांघरूनसुद्धां थंडी वाजते आहे. फार थंडी वाजते आहे रे !"

" मग ताई, तुला आणखी काय पांघरायला देऊं ? "

" भाऊ, मला शालजोडी आण जा रे ! "

" ताई, आतांपुरतें हें माझें पांघरूण घे. मी दोन तीन दिवसांत तुला शालजोडी आणीन. थोडा दम धर. शहाणी आहे माझी ताई ! "

ताई गप्प बसली. तिच्या अंगावरून आपले मृदु हात फिरवीत तारानाथ

तिच्या शेजारींच बसला होता. ताईला शालजोडी कशी आणून द्यावी याचा विचार त्याच्या मनांत चालू असतांनाच जवळपास कुत्रें रडल्याचा सूर त्यानें ऐकला. त्याच्या अंगावर कांटा आला ! त्यानें कलावतीला विचारलें, " ताई, तुझी थंडी राहिली का ? "

" हो, राहिली. भाऊ, माझ्या अंगावरून असाच हात फिरव म्हणजे माझी थंडी राहील ! "

" ताई, तुला आठवतें का ग ? तूं लहानपणीं आईच्या जरीच्या शालजोडीचा कांठ फाडलास तेव्हां आई तुझ्यावर रागावली होती ! ताई, आठवतें का ग ? "

" हो, पण भाऊ, तो आधीं फाटलेला होता आणि मला फाटकी शाल नको होती म्हणून तो कांठ मीं फाडला ! "

" ताई, पण तेव्हां लागलीच तुला बाबांनीं धडकी शाल आणून दिली ! "

" भाऊ, आतां मला फाटकी शालजोडी आणलीस तरीसुद्धां ती मी पांघरेन ! "

" फाटकी कां म्हणून ? मी तुला धडकीच देईन."

कलावतीच्या बोलण्यानें तारानाथाला फार वाईट वाटलें. आपली दैन्यावस्था आहे ही गोष्ट खरी असली तरी ताईच्या मनावर त्याचा परिणाम होऊं नये अशी तारानाथ सदोदित खबरदारी बाळगीत असे. तिच्या बाल मनावर निराशेचा आघात होऊन तिच्या सुखमय आयुष्याचा अंकुर गर्भावस्थेंतच खुडला जाऊं नये, ती समंजस असली तरी तिला या गोष्टीपासून त्रास होऊं नये असें तारानाथाला मनापासून वाटत होतें. 'तूं फाटकी शालजोडी जरी मला आणून दिलीस तरी मी ती पांघरीन !' असें तरी ताईनें कां म्हणावें ? धडकी शालजोडी मिळविण्याचें सामर्थ्य भाऊच्या अंगांत नाहीं असें तिला वाटलें असेल का ? असें तिला वाटत असेल तर तसें वाटणें चांगलें का ? तारानाथाच्या मनांत किती तरी विचार येऊन जात होते. त्यामुळें त्याच्या हृदयास पीळ पडून दाबून धरलेले अश्रु बाहेर वाट काढण्याचा प्रयत्न करीत होते !

२

" ताई, तुला बरें वाटतें का ? "

" हो, माझें बरें आहे. माझा घसा दुखतो आहे, पण मला बरें वाटतें आहे."

" ताई, उद्यां रात्रीं मला एका बैठकीला गेलें पाहिजे. आपल्या सगुणाबाई सोबतीला आल्या तर तूं मला जाऊं देशील ना ? "

" पण भाऊ, तूं सारखा जवळ असावास असें मला वाटतें. तुला उद्यां गेलेंच पाहिजे का ? "

" हो. ताई, मला गेलेंच पाहिजे. तुला शालजोडी पाहिजे आहे ना ? "

" हो. मग ? "

" ती मी उद्यां रात्रीं घेऊन येणार आहें ! "

" भाऊ, मग उद्यां दिवसां कां जात नाहींस ? रात्रीचा कशाला जातोस अंधाराचा ? आधींच तुला दिसत नाहीं."

" ताई मला दिसत नसलें तरी वाट माझ्या पायाखालची आहे. त्यांतून पुन्हा चांदणें आहे."

" पण भाऊ, चांदण्याचा तुला काय उपयोग ? "

" अग, तुला वाटतें मला कांहीं दिसत नाहीं; पण मला सर्व कांहीं दिसतें. सकाळ केव्हां झाली, संध्याकाळ केव्हां झाली, चांदणी रात्र कोणती आहे, अंधारी रात्र कोणती आहे, तें सर्व कांहीं मला समजतें ! "

" पण भाऊ, रात्रीं दुकानें उघडीं असतात का ? "

" ताई, उत्तम सारंगी वाजवून दाखविली तर मला एक शालजोडी मिळावयाची आहे. आपल्या गांवांतले दादासाहेब इनामदार ठाऊक आहेत ना तुला ? ते मला शालजोडी देणार आहेत."

" भाऊ, मला शालजोडी आणण्याकरितां तुला इतका त्रास ? नकोच, मला शालजोडी नको. भाऊ, तूं आपला माझ्याजवळ बसून रहा ! "

" ताई, असें वेड्यासारखं करूं नये. आपल्याला पैसेही पाहिजेत ना ?

" तुला दादासाहेब पैसे देणार आहेत का ? "

" हो ताई. त्यांनीं आसपासचे पुष्कळ सारंगीवाले बोलाविले आहेत. त्यांत ज्याचें वाजविणें उत्तम ठरेल त्याला शंभर रुपयांचें बक्षीस आणि एक शालजोडी मिळावयाची आहे. मंडळी म्हणताहेत कीं, तुलाही आम्ही तेथें घेऊन जाऊं. मग मी जाऊं का ? "

" भाऊ, जा ! पण आज तूं कांहीं खाल्लें आहेस का ? "

" हो, पण तूं. एवढा हा मुसुंब्याचा रस पी. प्यालीस का ? "

" हो. पण भाऊ, तूं खरेंच कांहीं खाल्लें आहेस का ? "

" हो. अगदीं खरें."

आपण बोलतों आहों तें अगदीं खोटें आहे हें तारानाथाला माहीत होतें. पण तो तरी काय करणार ? ताईच्या पथ्यपाण्याकरितां जर सर्व पैसे संपून गेले तर तो तरी खाणार काय ? त्याच्या आशेला आतां उद्यांच्या प्रसंगानें अंकुर फुटूं लागले होते. ते पैसे आपणांस मिळाले म्हणजे बरें होईल आणि ताईलाही शाल-जोडी मिळेल अशा तऱ्हेच्या विचारांनींच त्याला समाधान वाटत होतें. ताई पोरकी पोर ! तिची मागणी उद्यां आपल्या हातून पुरी होणार अशा विश्वासानें त्याला एक प्रकारचा आनंद वाटत होता.

कोनाड्यांतून तारानाथ औषधाची बाटली घेऊन आला व जाग्यावर बसतां बसतां हंसला. कलावतीनें विचारलें "भाऊ, मी वेडी, म्हणून मला हंसतोस का ?"

नाहीं. ताई, तूं फार शहाणी म्हणून तर मला हंसूं आलें ! मी उद्यां गेलों म्हणजे पहाटे परत येईन आणि थंडी पडावयाचे वेळीं तुला ती नवी शाल पांघरूण घालीन. मग आमची ताई श्रीमंत होईल !"

बरीच रात्र होईपर्यंत अशा रीतीनें दोघांचा किती वेळ तरी मनसोक्त थट्टा-विनोद झाला !

* * *

कलावतीची सोबतीची नीट व्यवस्था करून तारानाथ आपलें वाद्य घेऊन घरा-बाहेर पडला. सोप्यांतील भिंतीला एक हात देऊन चांचपडत दरवाज्याकडे जात असतां अवघ्या दहा पावलांच्या रस्त्यांत त्यानें तिला किती वेळां तरी जपून राहण्याबद्दल बजावलें. किती वेळां तरी 'ताई, मी जातों हां' असें त्यानें म्हटलें असेल. पण इतक्यानें त्याचें समाधान झालें नाहीं. तो दारापर्यंत गेलेला परत फिरला. पुन्हा भिंतीला धरून चालत आला व ताईजवळ येऊन बसला. सारंगीची पेटी त्यानें बाजूलाच ठेवली आणि तिच्या तोंडावरून अतिशय नाजुकपणानें हात फिरवीत त्यानें तिला विचारलें, "ताई, मी नसतांना नीट औषधपाणी घेशील का ?"

अत्यंत प्रीतीच्या माणसाचा हात आजारपणांत अंगावरून फिरला तर त्या रोग्याला न कळतच एखाद्या वेळीं उमाळा येतो. आपल्याकरितां प्राणाचीही पर्वा न करणारा आपला भाऊ आपल्याजवळ बसून आपल्या अंगावरून हात फिरवीत आहे याचें कलावतीला विशेषसें कांहीं वाटलें नाहीं; पण दाराच्या बाहेर पडण्या-करितां निघालेला आपला भाऊराया आपल्याकरितां परत फिरला हें मनांत येऊन तिला प्रेमाचा उमाळा आला ! 'माझी हेळसांड होईल' म्हणून भाऊला किती तरी

काळजी वाटते याची तिला कल्पना आली. तिच्या मनांत वावरत असलेलें प्रेम अगदीं अनिर्वचनीय होतें. 'आपल्याकरितां भाऊला खरोखर त्रास होतो आहे का ?' तिच्या मनांत विचार आला आणि तारानाथानें तिच्या गळ्यावर जो हात ठेवला होता त्या हाताच्या मनगटाला मुठीनें धरीत तिनें विचारलें, " भाऊ, माझ्याकरितां का तुला इतका त्रास होतो आहे ? भाऊ, माझी तुला कांहीं मदत नाहीं अन् कांहीं नाहीं ! मग मी गेल तर तुझा त्रास तरी एकदांचा कमी होईल—खरेंच, भाऊ किती त्रास होतो रे तुला ! "

तारानाथानें तिच्या तोंडावर हात ठेवला. 'ताई ! काय बोललीस हें ?' असें म्हणून त्यानें प्रेमभरानें तिच्या पाठीवरून हात फिरविला. त्यानें तिला पुन्हा एकदां औषध घेण्याबद्दल बजाविलें. तिचें मनगट आणि तिचें तोंड स्वतःच्या हातांनीं आज चांचपून पहातांना तारानाथाला कसेंसेंच झालें ! ताईचा नुसता अस्थिपंजर उरला होता; त्याची जाणीव झाल्याबरोबर त्याच्या मनाला विलक्षण धक्का बसला ! त्यानें पुन्हा एकदां तिचा निरोप घेतला आणि तो दाराबाहेर पडला; थोड्याच अवकाशांत इतर मित्रमण्डळीच्या मदतीनें तो दादासाहेब इनामदारांच्या घरीं पोहोंचला.

३

तो दिवाणखाना तऱ्हेतऱ्हेच्या दिव्यांनीं नुसता फुलून गेला होता. चित्रविचित्र देखाव्यांनीं त्या दिवाणखान्याच्या भिंती रंगविलेल्या होत्या, आणि त्यांच्यावर निरनिराळ्या दिव्यांचे निरनिराळ्या रंगांचे प्रकाश पडले होते. उंची गालीच्यांनीं त्या दिवाणखान्याचा भूमिभाग आच्छादलेला होता. आणि उशा गाद्या-गिरद्यांची तर तेथें अगदीं रेलचेल होती. गावांतील सर्व प्रकारचे लोक त्या जागीं जमलेले होते आणि आसपासच्या लहान लहान गांवांतील निरनिराळे सारंगीवाले तेथें हजर राहिले होते.

योग्य वेळीं कार्यक्रमास आरंभ झाला. एकामागून एक असे पांचसात सारंगीवाले आपापल्या ठरलेल्या मुदतींत आपापली करामत दाखवून गेले. आणि आतां फक्त दोनच सारंगीवाले राहिले होते. या दोहोंपैकीं एक तारानाथ होता आणि एक शेजारच्या गांवच्या इनामदारांचा मुलगा होता. ते इनामदारही या बैठकीला हजर राहिले होते.

इनामदारांच्या चिरंजिवांना विनंति करण्यांत आली. वाद्य सरसावून तेही नियोजित स्थळीं बसले. त्यांनीं वाजविण्यास आरंभ केला. थोड्याच वेळांत त्यांनीं चांगला रंग भरला–श्रोतृवृंद डुलूं लागला. इकडे अशा प्रकारें सारंगीवादन चालू असतां चार दिवसांचा उपाशी तारानाथ एका कोपऱ्यांत बसला होता. त्या गृहस्थांचें कसब पाहून त्यालाही आतां थोडीशी भीति वाटूं लागली. या गृहस्थां-च्यापेक्षां आपलें वाजविणें कमी प्रतीचें ठरून जर आपल्याला बक्षिस मिळालें नाहीं तर आपली काय दशा होईल ? घरीं मृत्यूच्या दारीं असलेल्या ताईला कुठलें औषधपाणी देऊं ? आणि तिला जगविण्याकरितां मी तरी कसा जगूं ? या विचारां-त मग्न असतां त्याच्या डोळ्यांवर झांपड आली आणि न कळत पाण्याचे ओघळ त्याच्या डोळ्यांतून निघून गेले !

तारानाथाची पाळी आली. धडधडणाऱ्या हृदयानें त्यानें आपल्या सारंगीचा टणत्कार केला. सारंगी नीट लावून त्यानें गज फिरविण्यास आरंभ केला. त्याचें सर्व शरीर थरथरत होतें ! हृदयाच्या धडधडीपेक्षांही अधिक जलद गतीनें त्याच्या दृष्टिविहीन डोळ्यांची उघडझांप चालली होती. त्याचे डोळे थरथरूं लागले कीं, त्यांच्या कडांतून पाणी पाघळत होतें. पाणी ओघळून गेल्यावर त्यानें डोळे मिटले कीं त्याच्या ओठांचें स्फुरण सुरू होत असे. सारंगीच्या तारांवरून बोटांची हाल-चाल चालली असतांना बोटें कंप पावत होतीं आणि दुरून बघणाराला त्याचा हात तारेनें कापेल कीं काय अशी धास्ती वाटत होती.

त्या दिवशीं त्यानें आपल्या करामतीची पराकाष्ठा केली. सर्व श्रोते मंडळी प्रत्येक आलापाबरोबर वहावा देत होती ! एक राग संपून तारानाथानें दुसऱ्या रागाला सुरवात केली. बागेश्रीचे मंजुळ सूर आसमंतांतील प्रांतावर जिवंत नाच करूं लागले ! तेव्हां तर बक्षिस कोणास मिळणार याबद्दल शंकाच राहिली नाहीं. शाकुन्तलांतील दुष्यंताच्या तोंडच्या पदाची ती चाल होती. 'स्वर्गी सर्व पितर माझे ते असतील खिन्न मनें । माझ्या मागें सुखविल कोण तो तर्पण करुनि तिलांजलिदानानें'–तारानाथ मनांतल्या मनांत तें पद म्हणत होता. श्रोतेमंडळींना त्याच्या कौशल्याचें कौतुक वाटत होतें;–आश्चर्य वाटत होतें; पण त्याला स्वतःला त्या पदांतील अर्थानें पिळवटून टाकलें ! त्याला आपल्या लहानग्या बहिणीची स्मृति झाली. ती आठवण होत असतांनाच त्याच्या न कळतच सारंगीवर सूर निघत होते.–माझ्या मागें सुखविल कोण तो—

वेळ झाली म्हणून तारानाथाला इषारा मिळाला; आणि त्यानें शेवटचा झंकार करून आपलें वाद्य खालीं ठेविलें ! तो बाजूला झाला आणि पुन्हा कोंपऱ्याच्या बाजूला सरून भिंतीशीं टेंकून बसला. त्याच्या अंगांतून घामाच्या धारा चालल्या होत्या. त्याच्या डोक्यावरील घर्मबिंदु खालीं तोंडावर ओघळून येत होते. तो चार दिवसांचा उपाशी होता. जिवाचीही पर्वा न करतां केलेल्या त्या श्रमांनीं तो थकून गेला. त्यानें भिंतीला मान टेंकली आणि त्या स्थितींतच त्याला घेरी आली !

वैठक संपल्यानंतरचे इतर मामुली विधि चालू झाले ! तेही विधि संपले. आणि बक्षिसाचाही निकाल लागला. मंडळीची घरोघर जाण्याकरितां हालचाल सुरू झाली. तो आवाज ऐकून तारानाथ भानावर आला. शेजारींच त्याच्या ओळखीचा त्याच्या बरोबर आलेला गृहस्थ बसला होता त्याला त्यानें विचारलें, "बक्षीस कुणाला मिळालें, यशवंतराव ?"

"हें का सांगायला पाहिजे का ? इनामदारांच्या चिरंजिवांना !"

तारानाथानें एक अस्पष्ट निश्वास सोडला आणि यशवंतरावांचा हात धरून तो दिवाणखान्याच्या बाहेर पडला. दाराशींच दादासाहेब इनामदार उभे होते. त्यांनीं तारानाथाच्या जवळ येऊन त्याला नमस्कार केला आणि म्हटलें, तुम्हीं आज फार चांगलें वाजविलेंत ! पण तिकडे दुर्लक्ष करीत तारानाथ वाट चालूं लागला.

४

वाड्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या वळणावर आल्यावर तारानाथानें बरोबरीच्या मंडळींना आपापल्या घरीं जाण्यास सांगितलें. 'वाट पायाखालची आहे, मला नेहमींची संवय आहे' असें त्यानें दोन तीन वेळां सांगितल्यावर मंडळींनींही फारसा आग्रह धरला नाहीं. आणि तारानाथ एकटाच आपल्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यानें जाऊं लागला.

पहाट होण्याचा सुमार होता. चंद्रप्रकाशानें भोंवतालचा सर्व प्रदेश व्यापून टाकला होता. पण कोणत्याही पदार्थाचें प्रतिबिंब ग्रहण करणारी वस्तु ज्या प्रकारची असते त्याच प्रकारचें त्या पदार्थाचें प्रतिबिंब पडत असतें. रूपयौवनसंपन्न युवती एकाद्या उत्तम आरशापुढें उभी राहिली तर त्यांतील प्रतिबिंब तिचें तिलाच कौतुकास्पद वाटतें. पण तीच स्त्री एकाद्या भंगलेल्या आरशापुढें उभी राहिली तर त्यांतील विकृत प्रतिबिंब तिचें तिलासुद्धां पहावणार नाहीं ! इतका रमणीय चंद्र-

प्रकाश पडलेला होता, पण त्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या विरळ विरळ आणि जीर्ण खोपटांवर तो प्रकाश पडून त्या भागाला एक विचित्र भेसूरपणा आलेला होता! कललेल्या भिंती, गवतानें आच्छादलेलीं कांहीं कांहीं भागांवरील कौलाघरें, इतर ठिकाणचीं मोडकळीस आलेलीं कौलांशिवाय असलेलीं पांजरणें, ढांसळलेल्या भिंतीचे इतरत्र पडलेले ढीग आणि त्यांच्याच आसपास पडलेलीं सांवलींत असलेलीं कांहीं खिंडारें इत्यादिकांच्या समूहानें तो सर्वच भूभाग भयाण दिसत होता! निजलेल्या कुत्र्यांनीं मध्येंच भुंकावें, इकडे अभद्र पक्ष्यांनीं आपल्या अशुभ ओरडण्यानें त्यांना अधिकच भुंकावयास लावावें, आपल्या हालचालींनीं त्या जीर्ण घराच्या भितींतील कुजक्या विटा खालच्या ढिगांवर पाडाव्यात आणि भोंवतालच्या निस्तब्ध व अत्यंत शांत अशा वातावरणाचा तेवढ्याशा हालचालीनें-ही विघाड करावा व इतर गरीब पशु-पक्ष्यांची भीतीनें तारांबळ उडवावी! असें प्रकार चालू होते.

तारानाथाला या गोष्टी फारशा अपरिचित नव्हत्या. त्या भयाण जागेंतून अगदीं मुकाट्यानें जाणें त्याला सुद्धां प्रशस्त वाटत नव्हतें. त्यानें आपली सारंगी सरसावून धरली आणि वाजविण्यास आरंभ केला. एकटयाशीं सारंगी वाजवितांना तो नेहमीं तोंडानेंही हलक्या आवाजांत गाणें म्हणत असे. तो चार दिवसांचा उपाशी होता. चालतांना त्याचें पाऊल जड होऊन त्याचा मधून मधून झोंक जात होता. एकादी ल्हानशी चक्कर आली कीं, त्याच्या अंगाला अतिशय गार असा घाम सुटे आणि वाऱ्याची झुळुक आली कीं अंगांतील फाटकातुटका सदरा फुगवटून दूर होत असे. वाऱ्याचा आणि घर्मबिंदूंचा संयोग होऊन त्याचें शरीर थराहून कंप पावे. आधींच उपासानें तो निःशक्त झाला होता आणि त्यांत हा असा गारवा! त्याच्या मंजुळ:आवाजांतही कंप उत्पन्न होई.

विठाबाई कां मनिं धरिली अढी।
अनाथ मी अपराधी; बुडतों;
उतरा मज पैलथडी॥

हें आवडतें पद स्वतांच्या लहरीनुसार वाटेल तेथें आळवीत तो सारंगीवर छेडीत होता आणि तोंडानेंही म्हणत होता. त्याची चाहूल लागून एकादें अर्धवट जागें असलेलें कुत्रें अल्पकाळ भुंकत असे; पण सारंगीच्या गोड आवाजानें आणि त्याहूनही मंजुळ अशा त्याच्या भक्तिपर गायनानें तें मोहून जात असें! निर-

निराळ्या भक्तांकरितां विठोबानें अनेकविध रूपें घेऊन त्यांची संकटांतून सुटका केली. त्या प्रत्येक प्रसंगाच्या वर्णनाचें एकेक कडवें म्हणतां म्हणतां तारानाथ त्यांत समरस होऊन गेला ! त्या तदेकपर स्थितींत तो स्वतःलाही कांहीं वेळ विसरला. कडवें संपून पुन्हा पालुपदावर येतांना 'विठाबाई' या शब्दांतील अक्षरांचे सूर तो इतक्या मोहक रीतीनें छेडीत होता कीं, कसल्याही प्रकारच्या स्थितींत कोणत्याही श्रोत्याच्या डोळ्यांतून घळघळां अश्रु वाहूं लागले असते ! पण तारानाथाच्या चित्तवृत्तीचा एकही श्रोता त्या जागीं हजर नव्हता. घुबडादिकांना त्या अपूर्व भक्तिरसाची काय चव असणार ! त्यांचे भेसूर घूत्कार तारानाथाच्या मधुर गायनाच्या तुलनेनें अधिकच भेसूर होत होते आणि त्याच जातीच्या इतर पक्ष्यांच्या चिवचिवीनें तो भेसूरपणा द्विगुणित होत होता !

घर जसजसें जवळ येत चाललें तसतशी तारानाथाची एकाग्र तंद्री कमी होत चालली. त्याला कलावतीची आठवण झाली. तिनें आतां 'शालजोडी आणली का ?' म्हणून विचारलें तर तिला काय सांगावयाचें ? तिच्या औषध-पाण्याच्या खर्चाला आतां पैसे कोठून आणूं ? आणि तिची काळजी वाहणारा, तिची शुश्रूषा करणारा मी—मी काय खाऊं !...तारानाथाचें पाऊल अतिशय जड झालें. त्याच्या डोळ्यांची उघडझांप फारच झपाट्यानें होऊं लागली. त्याचें शरीर लटलटूं लागलें व त्याच्या घशाला कोरड पडली. घराच्या दरवाज्यापाशीं तो कसाबसा रेंगाळत आला आणि पहिल्याच पायरीवर तो मटकन् खालीं बसला. त्याला घेरी आली. बसतां बसतां त्याचा तोल त्याला संभाळतां आला नाहीं आणि त्याची सारंगी दोन तीन हातांच्या अंतरावर दूर जाऊन पडली ! मागच्या पायरीवर डाव्या हाताचें कोंपर टेंकून मनगटाच्या पृष्ठभागावर त्यानें आपलें कपाळ टेंकलें. डोळ्यांतून भरभर बाहेर गळणारे अश्रु मनगटावरून बोटांच्या नखाग्रापर्यंत वहात जात होते !

❧ ❧ ❧

दारावर थाप मारून तारानाथानें म्हटलें, " सगुणाबाई, दार उघडा."

सगुणाबाईनें दार उघडलें. दूर जाऊन पडलेली तारानाथाची सारंगी त्याच जागीं अद्यापिही होती. चंद्रप्रकाशांत त्या सारंगीच्या तारा पाण्याप्रमाणें चकाकत होत्या.

सारंगी न घेतांच तारानाथाला आंत शिरतांना पाहून सगुणाबाईनीं म्हटलें, " तारानाथ, तुझी सारंगी आंत आणूं का ? "

" हो आणा, मीं ती चांचपून पाहिली; पण मला ती सांपडेना."

तारानाथ नेहमींच्या संवयीनें ताईच्या अंथरुणाच्या अनुरोधानें पुढें सरकला. पायाला गादीचा स्पर्श होतांच तो खालीं बसला आणि ताईच्या अंगावर हात ठेवून त्यानें तोंड पुढें करून तिला विचारलें, " ताई, जागी आहेस का ? "

" कोण, भाऊ ! हो, ही मी आत्तांच जागी झालें. भाऊ, तुझे हात किती गार आहेत ! तुला थंडी वाजते आहे का भाऊ ? "

" नाहीं ! ताई, तुला थंडी वाजते आहे का ? "

" हो. भाऊ. शालजोडी आणली आहेस का ? मला घाल ना ! फार थंडी पडली आहे रे ! "

" ताई, आजच्या दिवस दम धर. मी तुला उद्यां शालजोडी आणीन. "

" भाऊ, थंडी वाजते आहे. कसेंसेंच होत आहे रे ! "

" ताई, तुला काय होतें आहे ? मला सांग ताई !

तारानाथानें तिच्या तोंडावरून हात फिरविला. किती तरी अश्रुबिंदु त्या हाताच्या तळव्यावर निखळून आले ! त्यानें गद्गद कंठानें पुन्हा विचारलें, " ताई, रडूं नकोस, एक दिवस थांव; तुला उद्यां शालजोडी देईन, अगदीं खास देईन ! "

" भाऊ, मला शालजोडी नको. मला तूं पाहिजेस. तूं कुठें आहेस ? "

कलावती अतिशय क्षीण झाली होती. तिच्या सर्व अवयवांची हालचाल जवळजवळ बंद झाली होती. तिचे डोळेही निस्तेज झाले होते, व तिची दृष्टि इतकी मंद झाली होती कीं, समोर कोणाची तरी आकृति आहे एवढेंच तिला समजत होतें; पण ती कोणाची असावी हें मात्र तिला ओळखत नव्हतें.

" ताई, मला पाहिलेंस का ? असें काय करतेस ? " तारानाथानें अत्यंत विव्हळ होऊन म्हटलें, " ताई, तुझा घसा फार बसला आहे, तुला बोलवत नाहीं. थोडें पाणी पितेस का ? "

" नको, भाऊ, घसा सुजला आहे, फार दुखतो आहे, पाणी पितां येत नाहीं ! "

" ताई, अशी कांपतेस कां ? थंडी वाजते आहे का ? ताई, एक दिवस दम धर. उद्यां...

तारानाथाला पुढें बोलवेना. त्यानें दोन्ही हातांनीं तिचें अंग हळुहळू रगडण्यास सुरुवात केली. कलावतीचें कांपणें बंद झालें. नुसतें कांपणेंच बंद झालें नाहीं—तर तिची सर्व हालचाल बंद झाली ! अखेरचा श्वास सोडतांना तिला एक मोठा हुंदका आला आणि ती एकदम निपचित्, शांत स्थितींत झोंपीं गेली !

दृष्टिविहीन तारानाथ अद्याप तिचें अंग रगडीतच होता. “ ताई—ताई, बोलत कां नाहींस ? रागावलीस का ? ताई, रडूं नकोस, एक दिवस थांब, उद्यां शालजोडी आणतों. ताई, ताई……”

तारानाथानें आपलें तोंड तिच्या तोंडाजवळ नेलें. तिचें एकवार प्रेमभरानें त्यानें चुंबन घेतलें, आणि तिच्या कपाळावर आपला डावा गाल टेंकून त्यानें तिला हांक मारली, “ ताई, तुझ्याकरितां मीं काय कमी केलें बरें ? ताई, मला बोलवत नाहीं…माझ्यावर रागावूं नकोस ताई ! ”

या उद्वेगजनक स्थितींत तारानाथाला ग्लानि आली. कलावतीच्या कपाळावर तसाच गाल टेंकून तो निजला. अश्रुविसर्जनाची क्रिया चालली असतांनाच त्याला एक जोराचा हुंदका आला. त्या हालचालीनें त्याचें तोंड तिच्या तोंडापाशीं आलें आणि त्यानंतर पुन्हा त्याची हालचाल झाली नाहीं !

❧ ❧ ❧

इकडे संधिप्रकाश पडला होता. बारा तास पुन्हां चूत्कार करावयास मिळणार नाहीं, पुन्हा हालचाल करतां येणार नाहीं म्हणूनच कीं काय, घुबडांचें ओरडणें आणि वटवाघळांचें फडफडणें चालू होतें. त्यांचा प्रतिकार करण्याकरितां जागीं झालेलीं कुत्रीं मोठमोठ्यानें भुंकत होतीं.

❧ ❧ ❧

संधिप्रकाश पडलेला पाहून सगुणाबाई मागल्या दारानें केव्हांच निघून गेल्या होत्या.

❧ ❧ ❧

उद्योगी जगाची हालचाल सुरू झाली, पण त्या भयाण वाड्यांतील हालचाल मात्र आज बंद होती !

दानाचें दान !

पूर्वेतीच्या पायऱ्या उतरून होतात न होतात तोंच सूर्याचे प्रातःकालीन किरण-पुंज सर्व दिक्प्रांतावर पसरले. ते पाहून विद्याधरानें सुशीलेला जरा जलद पाय उचलण्यास सांगितलें. वाटेनें अगदीं शुकशुकाट होता. दूर अंतरावरून एक मध्यम वयाचा थोटा मनुष्य आपल्या धड असलेल्या डाव्या हातानें एक गाडा ढकलीत येतांना दिसत होता. गाड्यांत एक पांगळा वृद्ध मनुष्य बसला होता. विद्याधर जवळ आल्यावर त्या थोट्या मनुष्यानें किंचित् पुढें होऊन आपला डावा हात पसरून करुणाजनक स्वरांत म्हटलें, "दादा पांगळ्याची कींव करा. तुम्हीच आमचे अन्नदाते !" त्या थोट्याचा आपल्या अंगाला स्पर्श झालासें विद्याधराला वाटलें. कपाळाला आंठ्या घालून दुसऱ्या हाताच्या टिचकीनें इस्तरीच्या रेशमी कोटाच्या बाहीवर बसलेला मळ उडविल्यासारखें त्यानें केलें.

"चल, दूर हट ! आमच्या घरीं काय पैशाचीं झाडें लागलीं आहेत का ! म्हणे धर्म करा ! आम्हांलाच भीक मागण्याची पाळी येईल असा धर्म करतां करतां !" विद्याधर तिरसटपणें म्हणाला.

"दादा, गरीबाला धर्म केला तर तुमचा पैसा खास वाढेल !"

गरजवंत माणसाला अक्कल असून बिनअक्कल व्हावें लागतें ! विद्याधरानें कपाळाला आंठ्या घालून इतकें हिडिसफिडिस केलें तरी त्या भिकाऱ्याला पुन्हा याचना करावीशी वाटली. विद्याधरालादेखील आज काय लहर लागली कोणास ठाऊक ! त्यानें एरवीं कितीक भिकाऱ्यांना दानधर्म केला होता; पण त्याला आज एकाएकीं अशी कांहीं संतापाची तिडीक आली कीं, त्या भिकाऱ्याच्या एक कानशिलांत भडकावून वाटेला लागावें असेंच त्याला वाटलें. तो म्हणाला, "काय करावं. कुठंही जा. लंगडे, थोटे, आंधळे या लोकांनीं जसं कांहीं भंडावून सोडलं आहे !"

"देवानं त्यांना तसं केलं म्हणून त्या बिचाऱ्यांवर कां राग ?" विद्याधरानें संतापानें काढलेल्या उद्गारांवर सुशीलेनें अगदीं शांतपणानें प्रश्न विचारला.

"देवानं केलं ! त्याची चूक झाली; म्हणून यांनीं जगांत राहून दुसरी चूक करावी ? जीव देऊन मोकळं व्हावं, नाहीं तरी जगून काय करावयाचं आहे ?"

"त्यांचंही या जगांत कदाचित् कांहीं काम असेल !"

" कसलं आलं आहे काम ? या लोकांना बिनवारशी कुत्र्यांप्रमाणं खडाखड् गोळ्या घातल्या पाहिजेत ! "

ते शब्द ऐकल्याबरोबर सुशीलेच्या अंगावर शहारे आले. प्रेमळ विद्याधराच्या तोंडून आज एकाएकीं असे अशुभ शब्द बाहेर पडतील असें तिला मुळींच वाटलें नव्हतें. उलट त्याच्या नेहमींच्या दयाळूपणावरून या भिकाऱ्याला विद्याधर खिशांतून कांहीं तरी पैसे काढून देईल असाच तिनें कयास बांधला होता. तिनेंएकवार मागें पाहिलें तों गाडा दूर राहिला असून तो थोटा मात्र त्यांच्यामागून लाचारपणें येत होता. सुशीलेची आणि त्याची दृष्टादृष्ट होतांच त्यानें अगदीं केंविलवाणें तोंड करून 'ताई' म्हणून तिच्यापुढें आपल्या धड हाताचा पंजा पसरला. ती त्याची केविलवाणी मुद्रा पाहून सुशीलेला भडभडून आलें. कशीबशी लाज राखण्यापुरतीं चिरगुटें आणि भूक भागविण्यापुरतें कसलेंही अन्न मिळालें कीं, संतुष्ट होणाऱ्या त्या थोट्याचा तो दुःखार्द्र चेहरा पाहून सुशीलेच्या डोळ्यांना टच्कन् पाणी आलें. विद्याधरानेंही मागें पाहिलें, पण त्या भिकाऱ्यानें आपली दृष्टि विद्याधराच्या दृष्टीला मुळींच भिडविली नाहीं. मूर्ख भिकाऱ्याच्या कशाला नादीं लागा, असा विचार करून विद्याधरानें आपले डोळे आपल्या वाटेकडे लावले. सुशीलेनें देवापुढें ठेवण्याकरितां म्हणून एक पावली घरांतून निघतांनाच विद्याधरापासून घेऊन ठेविली होती. बोलण्याच्या नादांत किंवा कांहीं दुसऱ्या कारणामुळें देवापुढें नुसते तांदूळ टाकूनच सुशीला परत फिरली होती. तिला त्या पावलीची आठवण झाली. किंचित् थबकून तिनें ती पावली पोलक्याच्या खिशांतून बाहेर काढली आणि त्याच्या हातावर टाकली. ती पावली घेऊन व सुशीलेकडे कृतज्ञतेच्या दृष्टीनें पाहून भिकाऱ्यानें तेथून जलदीनें काढता पाय घेतला. सुशीला किंचित् थबकलेली पाहून विद्याधरानें मागें वळून पहात थांबून विचारलें, " त्याला कांहीं तरी दिलं असशील ! "

" हो. देवापुढं ठेवावयाची पावली विसरली होती ती त्याला देऊन टाकली ! " सुशीलेनें उत्तर केलें.

" कांहीं देऊं नये अशा लोकांना. भीकदेखील कशी मागावी हें त्यांना समजत नाहीं." सुशीलेच्या कृत्याबद्दलची नापसंती त्याच्या आवाजांत स्पष्टपणें प्रतीत होत होती.

" मग परवां आपण त्या गात फिरणाऱ्या रामदाशाला कां बरं रुपाया दिला ! एक पैसादेखील त्याला देऊं नये असं मला वाटलं होतं ! "

" वा: ! तें का ? त्याचा आवाज काय उत्कृष्ट होता ! त्याच्याजवळ कांहींतरी गुण होता. या थोट्याजवळ काय गुण आहे ? "

" त्याचा गुण दिसला. याचा कदाचित् असून बाहेर दिसत नसेल ! "

" आंत कांहीं गुणच नाहीं तर बाहेर कसला दिसतो आहे ? "

" नसेना ! पण त्याला कांहीं खायला प्यायला तर लागतं ? "

सुशीलेच्या या प्रश्नाचें उत्तर विद्याधराला देतां येईना; पण आपण हार खाल्ली हें दिसून येऊं नये म्हणून त्यानें अजीबात विषय बदलून जरा रागाच्या स्वरांत तिला विचारलें, " पण मी नाहीं म्हणत असतांना तूं त्याला पैसे दिलेस हें मात्र चांगलें केलेंस ! त्यामुळें आमची किंमत मात्र खूप होईल ! उद्यां हाच भिकारी घरांत येऊन बसला तर माझ्या सांगण्यानें घराच्या बाहेरसुद्धां जायचा नाहीं ! "

" मी त्याला सांगेन कीं, यांचं ऐक म्हणून ! " सुशीलेनें हंसून उत्तर दिलें.

" थट्टेवारी नेण्यांत अर्थ नाहीं. तूं नाहीं म्हणत असतां मीं जर त्याला कांहीं दिलं असतं तर तुला कसं वाटलं असतं ? "

" मला काय वाटावयाचं आहे ? परवांचीच गोष्ट घ्या ! त्या रामदासी माणसाला माझ्या इच्छेविरुद्ध तुम्हीं पैसे देऊन वर मला त्याला वाढायला लावून त्याला जेवूं घातलंत. तेव्हां माझ्या इच्छेचा कांहीं विचार केला होता का ? "

सुशीलेला आतां राहवेना; म्हणूनच तिनें विद्याधराला या नुकत्याच घडलेल्या प्रकाराची पुन्हा एकदा आठवण दिली. वास्तविक विद्याधर फार प्रेमळ होता; पण नवरा आणि बायको यांच्यामध्यें कांहीं श्रेष्ठ-कनिष्ठत्वाचा भेद आहे अशा तऱ्हेच्या परंपरागत विचारसरणीला विद्याधरही कांहीं अपवाद नव्हता. त्या दिवशीं त्यानें नवरेपणाच्या अधिकारानें तो रामदासी घरांत बोलावून घेऊन सुशीलेच्या इच्छेविरुद्ध त्याला जेवूं घातलें ही गोष्ट त्याच्याही मनाला डांचत होती; पण झाल्या प्रकाराबद्दल आपण दिलगीर आहों हें सुशीलेला सांगण्याइतकें त्या घडलेल्या प्रकाराचें त्याला महत्त्व वाटत नव्हतें. सुशीलेनें संधि साधून त्या गोष्टीची आठवण करून देतांच विद्याधराची चित्तवृत्ति विषण्ण झाली. कांहींतरी सांवरासांवर करण्याच्या उद्देशानें तो म्हणाला, " पण मग तुझा आज्ञाधारकपणा तो कुठें राहिला ?

मी एक चुकत असेन, पण ती चूक तूं सांवरून घेऊन तीवर पांघरूण घालायचेंस कीं त्या चुकीवर मात करण्यासाठीं दुसरी चूक करायचीस ? ”

विद्याधर फारच चिडला होता. लग्न झाल्या दिवसापासून सुशीलेला आजच्यासारखा प्रसंग क्वचितच अनुभवावयास मिळाला असेल. विद्याधराचें तें विनाकारण ओढून धरणें तिला मुळींच आवडलें नाहीं. प्रेमळ विद्याधरानें त्या दिवसाप्रमाणें आजसुद्धां या भिकाऱ्याला कदाचित् पैसे दिले असते, पण एकदां नाहीं म्हटल्यावर पुन्हा दान करावयाचें म्हणजेसुद्धां त्याला कमीपणा वाटूं लागला आणि या वृथाभिमानाला बळी पडूनच त्यानें झाली गोष्ट विनाकारण उगाळीत बसण्याचा उपक्रम केला.

घरीं गेल्यापासून दोघेंहीजण आपल्या उद्योगांत गढून गेलीं असल्यामुळें दोघांचेंही परस्परांशीं कामापुरतेंच भाषण झालें. संध्याकाळ झाली. विद्याधर आज रात्रीच्या गाडीनें सोलापुरास जाणार होता. त्याच्या वडिलोपार्जित मालकीची सोलापूरला गिरणी होती; आणि त्या गिरणीचें कामकाज पाहण्याकरितां विद्याधराला त्याच्या वडिलांनीं कांहीं दिवस सोलापूरला बोलाविलें होतें. सुशीलेनें पुण्यास रहावें व विद्याधरानें कांहीं दिवस सोलापुरास गिरणीची व्यवस्था पहावयास यावें, अशी विद्याधराच्या वडिलांची इच्छा होती, त्या इच्छेनुरूप सुशीला पुण्यास राहणार होती आणि विद्याधर रात्रीं सोलापुरास जाणार होता. सकाळीं घडलेल्या प्रकाराबद्दल तो आज मनाशीं सारखा विचार करीत होता. आपण सुशीलेला टाकून बोललों असें मनांत येऊन त्याचें त्यालाच फार वाईट वाटलें. तिच्यावर नवरे-पणाचा अंमल गाजविण्याची आपण पराकाष्ठा केली असें मनांत येऊन त्याला अतोनात विषाद वाटला; आणि सुशीलेशीं बोलावयाला सुरवात कशी करावयाची याचें त्याला कोडेंच पडलें होतें.

प्रवासांत बरोबर देण्यासाठीं फराळाचा डबा घेऊन सुशीला बाहेर आल्यामुळें विद्याधराला आयतीच बोलण्याची संधि मिळाली. त्यानें किंचित् हंसून म्हटलें, “ काय करायचा आहे डबा ? सकाळीं तर मी सोलापुरास पोहोंचेन ! ”

“ तरी न्यायला कांहीं हरकत नाहीं. कांहीं बरोबर न देतां पाठवल्याबद्दल मामंजी अन् सासूबाई मला काय म्हणतील ? ”

“ मी त्यांना सांगेन, तूं डबा देत असतांना मींच नको म्हटलं म्हणून ! ”

पत्नीच्या प्रेमळपणाचें विद्याधराला फार कौतुक वाटलें.

" पण इतकं करण्यापेक्षां डबा नेला तर काय बिघडेल ? " सुशीलेनें किंचित् खोंचूनच विचारलें.

विद्याधरानें आनंदानें तो डबा हातीं घेतला व आपल्या बॅगमध्यें ठेवला.

निघण्याची वेळ जवळ येत चालली. कठोर व्यवहाराच्या जगांत विद्याधराचें पाऊल पहिल्यानेंच पडत होतें. आणि हें पाऊल टाकतांना सुशीलेला विद्याधराबद्दल विशेष काळजी वाटणें स्वाभाविक होतें. आपला नवरा कितीही प्रेमळ असला तरी हेकड स्वभावामुळें त्याच्या हातून कदाचित् नोकरचाकरांशीं अयोग्य वर्तन होऊन तो त्यांच्यामध्यें अप्रिय होईल कीं काय ! किंवा त्यावर कांहीं दैवी घाला येईल कीं काय असें तिला राहून राहून वाटत होतें !

जड पावलांनीं घराबाहेर पडतांना सकाळच्या प्रकाराबद्दल सुशीलेजवळ आपली चूक कबूल करावी असें विद्याधराला सारखें वाटत होतें; पण तें वाटणें कृतींत मात्र उतरलें नाहीं !

२

अनेक दिवसच काय, पण अनेक महिनेसुद्धां गेले. विद्याधराकडून सुशीलेला येणारीं पत्रें अगदीं तांत्रिक मजकुराचींच असत. विद्याधराच्या सहवासाला अंतरल्यामुळें सुशीलेचा वेळ अतिशय कंटाळवाणा जाऊं लागला. परस्परांबद्दलच्या सहवासांतील विशिष्ट प्रसंगांचें स्मरण होऊन त्यांवर विचार करण्यांतच तिचा काळ जाई.

कित्येक माणसें एखादी गोष्ट करतांना तिच्या बऱ्या वाईट परिणामाबद्दल फारसा विचार करीत नाहींत; पण ती होऊन गेल्यानंतर त्यांच्या मनाची एकसारखी तळमळ चालू रहाते. ती गोष्ट घडल्यानंतर तिचा परिणाम जर वाईटसाईट किंवा अगदीं अल्प प्रमाणांत कां होईना, प्रतिकूल झाला तर त्या गोष्टीवर नाना प्रकारें विचार करण्यांत त्यांचे दिवसचे दिवस जातात.

सुशीलेचा स्वभावही असाच होता. एकादी गोष्ट करतांना, मग ती चांगली असो अगर वाईट असो, त्या गोष्टीच्या परिणामांचा फारसा विचार करावयाचा नाहीं अशीच तिची वृत्ति असे. पण त्या घडलेल्या प्रकाराचें पर्यवसान जर अकल्पितपणें प्रतिकूल ठरलें तर मात्र ती गोष्ट तिच्या मनाला लागून रहात असे. पतीच्या मर्जीविरुद्ध त्या थोट्या मनुष्याला आपण धर्म केला, ही गोष्ट चांगला झाली का वाईट झाली यावर ती वारंवार विचार करूं लागली.

प्रेमळ पति नाहीं म्हणत असतां त्याच्या इच्छेविरुद्ध आपण ती गोष्ट करण्याचा हट्टी-पणा दाखविला यांत चूक कोणाची ? का आपली कृति बरोबर असून आपल्या पतीचाच हट्टीपणा आपल्या पश्चात्तापास कारण झाला...आपण केलेलें दान अनाठायीं होतें...कीं आपणच म्हटल्याप्रमाणें त्या भिकाऱ्याच्या अंगीं कांहीं गुण असून ते दिसल नसावेत...कीं आपल्या पतींनीं म्हटल्याप्रमाणें तो भिकारी आपण केलेल्या दानाला सर्वस्वीं अपात्र होता....नाहीं तर आपल्या दानशूर पतींनीं त्याच भिकाऱ्याला कांहींही देऊं नये असा आग्रह धरण्याचें तरी कारण काय ?...इतर कितीक असाहाय्य लोकांना आजपर्यंत त्यांनीं नाहीं का दान केल ? मग त्या दिवशीं तसा हट्ट धरण्यांत त्यांचा कांहीं हेतु होता का ?...तसा हेतु असल्यास त्यांनीं तो आपणास कां सांगूं नये ?...

प्रत्येक ईश्वरनिर्मित गोष्टीलाच काय, पण प्रत्येक मानवनिर्मित गोष्टीला नियंत्रण ठेवलेलेंच आहे. एकाद्या वस्तूची गति अशा अशा तऱ्हेनें बदलूं म्हटल्यास ती बदलावयाची नाहीं. आकाशांत फिरणाऱ्या सर्व लहानथोर ताऱ्यांच्या भ्रमणापासून मनुष्याच्या अगदीं नित्याच्या क्षुल्लक व्यवहारापर्यंत सर्व गोष्टींच्या गतीची एक दिशा साधारण ठरून गेलेली असते; पण अगदीं अनियंत्रित अशी जर कोणत्या गोष्टीची दिशा असेल तर ती मनुष्याच्या मनांतील विचारांचीच होय !

सुशीलेच्या मनाचें विचारचक्र एकदां सुरू झालें, कीं त्याला कोणती दिशा मिळेल याचा नियम नसे. झालेल्या प्रकाराबद्दल तिचें मन तिला खात होतें. विचार करीत करीत सुशीला सज्ज्यामध्यें आली. आज बाहेरचें वातावरणसुद्धां अगदीं विषण्ण होतें. आकाश अभ्राच्छादित असून संधिप्रकाशासारखा अंधुक प्रकाश चोहोंकडे पडला होता. पाऊस येण्याचें चिन्ह दिसत होतें; वाऱ्याची वावटळ उठून रस्त्यांतील धुळीचे फवारे सुशीलेच्या विचारांसारखेच सैरावैरा संचार करीत होते. सुशीला या वातावरणाचें निरीक्षण करीत सज्जामध्यें उभी होती. थोड्याच वेळांत पावसालाही आरंभ झाला. दुरून पावसांत भिजत एक रामदासी तंबोरीच्या तारां-वरून हात फिरवीत कांहींतरी गुणगुणत येत होता. शेजारच्या घराच्या दरवाज्यांत उभ्या असलेल्या गृहस्थानें त्याला हांक मारून म्हटलें, " बुवा ! या; पाऊस पडतो आहे. आम्हांला एक दोन गाणीं ऐकवा ! "

बुवा त्या गृहस्थांच्या बोलावण्यावरून आंत गेले. थोडयाच वेळांत पुढील मंजुळ श्लोक सुशीलेच्या कानीं पडला—

—घडे भोगणें सर्वही कर्मयोगें
मतीमंद तें मानिती दैवयोगें—

जों रामदासी सुशीलेला अप्रिय वाटत होता, त्याच्याच मुखांतून या समर्थ-वाणीचा मंजुळ गानप्रवाह चालला होता. सुशीला तें गाणें ऐकत असतां इतकी तल्लीन झाली कीं, आपण कोठें आहों याचासुद्धां तिला विसर पडला ! श्लोकाचा अर्थ किती साधा, तो श्लोक तरी किती सर्वतोमुखीं झालेला ! सुशीलेलासुद्धां तो श्लोक पाठ येत होता; पण झाल्यागेल्या गोष्टीबद्दल व्यर्थ मनस्ताप करून घेणें शहाणपणाचें नाहीं. असा त्या श्लोकाचा निष्कर्ष सुशीलेला आजच कळला; आणि त्याच तंद्रींत ती कांहीं वेळ राहिली.

भानावर येऊन सुशीला आंत जाणार इतक्यांत तिच्या कानीं खालील उद्गार पडले.

" अरे, कुणीं लंगड्यापांगळ्याची कींव करा ! "

सुशीलेनें चमकून खालीं पाहिलें तों आपण पावली दिली तोच भिकारी आपल्या बापाला गाड्यांत बसवून गाडा ढकलतां ढकलतां 'कींव करा, कींव करा !' म्हणत चालला होता. दोघांनींही आपल्या अंगावर पोतीं घेतलीं होतीं; पण त्या पोत्यांमुळें पावसाचा आणि गारठ्याचा असा कितीसा बचाव होणार ! गाड्यांतील पांगळा म्हातारा तर अतिशयच गारठून गेला होता; भिक्षेकरितां त्याला ओरडवत सुद्धां नव्हतें. त्याचा मुलगा मात्र मोठमोठ्यानें ओरडत होता ! इकडे—

—घडे भोगणें सर्वही कर्मयोगें
मतीमंद तें मानिती दैवयोगें—

अशा चढ्या स्वरांत बुवांचा उपदेश चालूच होता. या बिचाऱ्यांनीं काय कर्म केलें असेल असा प्रश्न सुशीलेपुढें उभा राहिला. तिनें खालीं पाहिलें. भिकाऱ्यानें कपाळाला हात लावला आणि 'ताई' ! अशी आर्त स्वरांत हांक मारली. हांक ऐकतांच सुशीलेचें हृदय कळवळून आलें. तिनें त्याला हातानें थांबण्याची खूण केली आणि खालीं जाऊन दरवाजा उघडला. गाडा दरवाज्यालगतच्या वळचणीखालीं ढकलून देऊन तो थोटा भिकारी दरवाज्याच्या आंतल्या बाजूला येऊन उभा राहिला.

" अरे, पावसांत कसें रे हिंडतां तुम्ही ! एकाद्याच्या घरीं असं थांबावं." सुशीलेनें त्या भिकाऱ्यास म्हटलें.

" ताई ! भिक्षा मागण्याकरितां हिंडावं लागतं. आम्हांला कसला आला आहे पाऊस ! " भिकाऱ्यानें उत्तर दिलें.

" पण पाऊस थांबेपर्यंत दम धरावा."

" ताई ! एके ठिकाणीं थांबावयाला म्हणून गेलों तों आम्हांला विचारलं, ही काय धर्मशाळा आहे का, म्हणून—"

तें ऐकून सुशीलेला फारच वाईट वाटलें. 'थोड्या वेळापुरता आसरा देण्याचेंसुद्धां या लोकांच्या हातून होत नाहीं !' असा तिनें मनालाच प्रश्न केला; पण आज इथें विद्याधर असता तर त्यानें काय केलें असतें ? या प्रश्नाचें उत्तर तिला देतांच येईना. विद्याधरानें काय केलें असतें यावद्दल तिला कोणताच निश्चित तर्क करतां येणें शक्य नव्हतें.

पाऊस थांबल्यावर भिकाऱ्यानें जाण्याकरितां दाराबाहेर पाऊल ठेवलें. सुशीलेनें त्याला रोज भिक्षेला येत जा म्हणून सांगितलें आणि भिकाऱ्यानें गाडा ढकलीत तेथून प्रयाण केलें.

३

सुशीला पत्रावळीवर वाढणें घेऊन बाहेर आली. भिकाऱ्यानें अंगांतील जुनेंपुराणें जाकीट काढून ठेवतां ठेवतां तें जाकीट चुकून उलटें झालें आणि खिशांतून एक पावली बाहेर पडली. तें पाहतांच सुशीलेनें विचारलें, " हे कुठले रे पैसे ? "

" ताई, तुम्हीं दिलेले ! "

तें उत्तर ऐकून सुशीलेला फार आश्चर्य वाटलें. दीड वर्षांपूर्वी आपण दिलेली पावली या भिकाऱ्यानें इतकी जपून ठेविली असेल अशी तिची मुळींच कल्पना नव्हती आणि त्यानें ती इतकी जपून कां ठेवावी, याचा तर तिला उलगडाच होईना !

" तूं हे पैसे इतके जपून कां ठेवलेस ? "

" ताई, ते तुम्हीं दिलेत म्हणून मीं इतके जपून ठेवले आहेत. त्या दिवशीं रावसाहेब नको म्हणत असतां तुम्हीं मला दान केलंत ! "

" पण इतके हाल सोसूनसुद्धां तूं ते जपून कां ठेवलेस ? "

" ताई ! तें मला कांहीं सांगतां येत नाहीं बघा ! "

बोलतां बोलतां त्याचा कंठ दाटून आला आणि त्याच्या डोळ्यांतून उष्ण

अश्रु बाहेर पडले. अंतर्यामीं उसळणाऱ्या विचारोर्मि भिकाऱ्याला शब्दानें व्यक्त करतां येईनात ! आपण तें दान जपून कां ठेवलें याचें उत्तर त्याचें त्यालाच माहीत नव्हतें. मग मनोभावना व्यक्त करण्याकरतां त्याला शब्द कसे सांपडावेत ? आजपर्यंत त्याला कित्येक बायाबापड्यांनीं दान दिलें असेल, कित्येक पुरुषांनीं त्याला धर्म केला असेल, पण त्या दानधर्मांची याद त्याची त्यालासुद्धां नव्हती. असें असतां सुशीलेनें दिलेली देणगी, व्यक्त करण्यास अशक्य अशा भावनेच्या अधीन होऊन, त्यानें अगदीं जपून ठेविली होती. ती पावली जपून ठेवण्यामुळें त्याची दोनतीन दिवसांची तरी निदान उपासमार झाली असेल ! स्वतःच्या सुखसोयींची क्षिति न बाळगतां सुशीलेच्या देणगीची त्यानें इतकी जपणूक कां करावी हें त्याचें त्यालाच समजत नव्हतें; सुशीलेलाही समजलें नाहीं आणि जगाला समजणें तर अशक्यच होतें ! सुशीलेविषयीं त्याला काय वाटत होतें, हें आज त्याच्या अश्रुपातांनीं अल्पांशानें सिद्धही केलें. थोड्याच वेळानें किंचित् भानावर येऊन त्यानें डोळे पुसले आणि आपल्या म्हाताऱ्या बापाला गाड्यांतून पाठीवर उचलून आणून सुशीलेनें ठेविलेल्या त्या पत्रावळीसमोर बसविलें.

* * *

नंतरच्या दीड वर्षांत किती तरी स्थित्यंतर झालें होतें. विद्याधर सोलापुराहून मधून मधून येत असे व दोन-तीन दिवस राहून पुन्हा सोलापुरास जाई. मध्यंतरीं विद्याधराचे वृद्ध वडील निवर्तले आणि विद्याधरच आतां गिरणीचा मालक झाला होता. विद्याधराच्या अलीकडच्या एकदोन खेपा झाल्यावर सुशीलेला त्याच्या-बद्दल कांहींतरी चमत्कारिक वाटून त्याच्या एकंदर वर्तनाबद्दल तिचें मन साशंक झालें. त्यामुळें त्याच्यापासून आपण आतां फार दिवस दूर राहणें तिला योग्य वाटेना आणि म्हणून तिनें विद्याधर दिवाळीला येईल तो परत जातांना त्याच्या-बरोबर कायमचेंच सोलापूरला जाण्याचें ठरविलें.

आपण येथून सोलापुरास गेल्यावर या भिकाऱ्याचा आणि आपला ऋणानुबंध आतां कायमचाच संपणार असें वाटून सुशीलेनें त्या भिकाऱ्याला आज वाढणें देण्याकरतां मुद्दाम बोलाविलें होतें ! आज दुपारच्या गाडीनें विद्याधर येणार होता. विद्याधराला खपणार नाहीं म्हणून तिनें त्या भिकाऱ्याला विद्याधर यावयाच्या आधीं बारा वाजतांच वाढण्याकरितां बोलाविलें होतें; आणि त्याप्रमाणें तो भिकारी आलाही होता. त्याला आज किती तरी आनंद वाटत होता ! त्यानें आपल्या

बापाला पत्रावळीसमोर बसवून जेवणास आरंभ केला. सुशीला शेजारींच उभी होती. तिनें त्याला सहजच विचारलें, " तुझं नांव काय? तूं कुठला राहणारा! "

" माझं नांव मारुती." भिकाऱ्यानें उत्तर दिलें.

" आम्ही शेजारच्याच खेड्यांत रहात होतों. मी अगदीं लहानच असतांना या माझ्या बापानं माझ्या आईला आणि मला एकदां नाशकाला यात्रेला नेलं होतं. परत येतांना आगगाडीच्या अपघातांत आम्ही सांपडलों. माझ्या आईचे दिवस भरले होते त्यामुळें तिला हा धक्का सोसला नाहीं आणि ती तेथल्या तेथेंच मेली. माझ्या बापाचे पाय गेले आणि कान बधिर झाले व माझा हा एक हात तुटला. माझ्या बापाची सोलापूरच्या गिरणीतील नोकरी गेली आणि पोट भरण्या-करितां तेव्हांपासून आम्ही असे भिकाऱ्यासारखे हिंडत असतों! "

तें ऐकून सुशीलेला अतिशय वाईट वाटलें. 'लंगडीं-पांगळीं माणसें बिनवारशी कुत्र्यांप्रमाणें गोळी घालून ठार मारलीं पाहिजेत' या विद्याधराच्या शब्दांची तिला आठवण झाली; आणि तिचें तिलाच वाटलें कीं,-किती राक्षसी विचार हा!...गाडी हांकणाराच्या चुकीची आज कोणाला आठवणसुद्धां नसेल! पण त्याच्या चुकीचें प्रायश्चित्त मात्र या दीनदुबळ्यांना जन्मभर सोसावें लागत आहे! या दुबळ्यांना तो अपघात झाला नसता तर यांची आपली दृष्टादृष्ट होण्याचें तरी काय कारण? अशा अनाथ अपंगांचीं कींव करायची सोडून आपण यांना हिडीसफिडीस करणं चांगलं का?......

अशा तऱ्हेचे किती तरी विचार तिच्या मनांत आले. तिच्या विचारमग्न अवस्थेचा भंग मारुतीच्या बोलण्यानें झाला.

" ताई, हें बघा! असं जेवण आज आम्हांला पहिल्यानंच मिळालं! "

हें सांगत असतां सुखदुःखाची संमिश्र छाया त्याच्या तोंडावर स्पष्ट उमटली होती. याच संमिश्र भावनेचे अश्रु डोळ्यांच्या संपुटाशीं सांठून मारुतीचे पाणी-दार डोळे अधिकच तेजस्वी दिसत होते. " आम्हांला कांहीं धर्म तर करीत नाहींतच; पण वर आणखी आमच्या अंगावर ओरडून आम्हांला चालते होण्यास बाकीचे लोक सांगतात! "

मारुतीचा प्रत्येक शब्द त्याच्या हृदयाचा ठाव घेऊन बाहेर पडत होता. आयुष्यांत नानाप्रकारचे कटु अनुभव येऊन त्या सर्वांचें सारसर्वस्व मारुती आतां

बोलून दाखवीत असतां त्याचा आवाज सकम्प होऊन त्याचे ओंठ स्फुरण पावूं लागले.

" ताई ! आम्हीं खरंच कांहीं गुन्हा केला आहे का ? "

हा प्रश्न विचारीत असतां मारुतीचा कंठ दाटून आला आणि इतका वेळ डोळ्यांतल्या डोळ्यांत फिरणारे अश्रु गालावरून खालीं ओघळले.

" मारुती ! पानावर बसून असं रडूं नये ! "

" सुशीलेलासुद्धां भडभडून आलें. या लोकांचा कांहीं गुन्हा नसतांना आपण यांना दूर दूर लोटणें किती मूर्खपणाचें आहे ! असा विचार मनांत येऊन तिला मारुतीची आणि आपली पहिल्याप्रथम गांठ पडली होती, त्या दिवशींच्या विद्याधराच्या वर्तनाचें स्मरण झालें.

मारुतीनें पानांतल्या अन्नांतील घांस हातांत घेऊन म्हटलें, " ताई, असा हातचा घांस काढून घेतात हो ! "

हृदय पिळवटून निघालेले हे मारुतीचे उद्गार ऐकून सुशीलेला तिथें बसवेना; पण मारुती जेवत होता म्हणून तिला बसणें भागच पडलें. या मारुतीला आपण जर आपल्या गिरणींत कामाला लावला तर त्याला अन्नाला लावल्याचें श्रेय आपणाला मिळेल. त्याच्याजोगतें एकादें काम काढून त्याला आपल्याबरोबर सोलापुरास न्यावें, तेथें त्याची राहण्याची सोय करावी, आपला विश्वासू नोकर म्हणून जर आपण त्याला बाळगला तर त्याचीही ददात मिटेल आणि आपल्यालाही दुवा मिळेल...पण गिरणींत किंवा इतर ठिकाणीं याला कांहीं काम देण्याचा आपला विचार आपल्या पतीला आवडेल का ? ...ते संमति देतील का—?

सुशीलेच्या मनांत अशा तऱ्हेचे किती तरी विचार येत होते. मारुती आपल्याकडेच नेहमीं असावा असें आपल्याला कां वाटावें हें तिचें तिलाच समजेना. विचारांतून भानावर येऊन सुशीला मारुतीला म्हणाली, " आतां आम्ही लवकरच सोलापुरास जाणार."

" मग ताई ! तुम्ही आमच्या गरिबांची कशाला आठवण ठेवतां आहां ? "

" मारुती ! मी कधींमधीं पुण्याला आलें तर तूं मला ओळखशील ना ? "

" हें काय विचारतां ताई ! या अन्नाशपथ मी तुम्हांला कधींच विसरणार नाहीं."

मारुतीचं हें आश्वासन ऐकून सुशीलेला समाधान वाटलें. मारुतीचें जेवण झालें. स्वतः हात धुऊन येऊन त्यानें बापाचाही हात धुतला. पत्रावळी रस्त्यावर फेंकून

दऊन उष्टें काढून तो जाण्याकरितां उठला. बापाला पाठीवर घेऊन त्यानें गाड्यांत नेऊन बसविलें. जाकीट घालून तो सुशीलेकडे बघून कृतज्ञतेच्या स्वरानें म्हणाला, " ताई, जातों...! "

सुशीलेनें त्याला निरोप दिला. ऐन उन्हाचा मारुती गाडा ढकलीत वाट चालूं लागला. पुन्हा एकवार मागें वळून 'देव तुमचें भलें करो' असें मारुतीनें अगदीं प्रेमळपणानें म्हटलें. त्याच्या तोंडावर आज एकप्रकारचा तजेला आला होता. मारुती दूर जातो न जातो तोंच दाराशीं विद्याधराचा टांगा येऊन उभा राहिला.

४

नरकचतुर्दशीच्या दिवशीं पहाटे विद्याधराला लवकर उठवून सुशीलेनें स्नान घातलें; पण त्या दिवशीं उठल्यापासून स्नान करीपर्यंत विद्याधर अगदींच वेडा-सारखें करीत होता. चालतां चालतां मध्येंच थांबून उभें रहावें, मध्येंच हंसावें, पुन्हा चालायला लागावें असें सारखें चाललें होतें. आदल्या रात्रीं विद्याधर कुठें तरी बाहेर गेला होता. त्याला यायला फारच उशीर झाला होता. त्या जाग्रणाचा हा कांहीं तरी परिणाम असेल असें सुशीलेला वाटलें.

स्नान करून विद्याधर खोलींत गेला. सुशीलाही त्याच्या मागोमाग गेली. एका बॅगमधून विद्याधरानें एक ग्लास आणि एक बाटली काढली. बाटलींतील द्रव-पदार्थानें ग्लास कांठोकांठ भरून त्यानें तोंडाला लावला. सुशीला चमकली. विद्याधराचें यथेच्छ पान झाल्यावर त्यानें सर्व वस्तु तशाच टाकल्या आणि कोट टोपी घातली. अशा स्थितींत नवऱ्यानें बाहेर जाऊं नये असें सुशीलेला साहजिक-च वाटलें आणि तिनें त्याला म्हटलें, " आतां मी चहा करतें. चहा घेऊन फराळ करावा. बाहेर कशाला जायचं ! "

या प्रश्नाचें उत्तर अडखळत अडखळत–जड जिभेनें देत देत विद्याधर सुशीले-च्या जवळ आला.

" मी फराळालाच परत येतों." असें अडखळत म्हणत विद्याधर सुशीलेच्या शेजारीं येऊन तिच्याकडे टक लावून पहात राहिला. विद्याधराच्या तोंडाला वास येत होता. सुशीलेला तेथें उभें राहवेना. ती चटकन् आंत निघून गेली. विद्याधर कांहीं वेळ जागच्या जागींच उभा राहिला. मग हेलकावे खात खात तो घराच्या बाहेर पडला. सुशीला त्याच्यामागें दारापर्यंत आली. दाराशीं आल्यावर कांहीं वेळ

थांबून विद्याधर नीट चालूं लागला होता. मागून त्याला बघितल्यावर सुशीलेला त्याचा तोच शुद्धीवर आल्यासारखें वाटलें. आतां त्याच्या चालण्यांत यत्किंचित् सुद्धां अस्वाभाविकपणा राहिला नव्हता. त्याची गति मात्र फारच जलद झाली होती. विद्याधराला असें भयंकर व्यसन लागलें असेल असा तिचा पूर्वींचा अंधुक संशय खरा ठरला होता. सर्व गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्यावर तिला अतिशय वाईट वाटलें. विद्याधर लवकरच दिसेनासा झाला. सुशीला त्याच्याकडे बघत होती खरी, पण तिच्या अंतर्दृष्टीसमोर तिच्या भावी आयुष्याचें भेसूर चित्र उभें राहिलें, आणि तिचें मन नाना प्रकारच्या विषारी विचारांनीं व्याप्त होऊन गेलें.

आज दिवाळीचा उत्सव सुरू झाला होता. भिकाऱ्यापासून राजेरजवाड्यांपर्यंत प्रत्येकाला दिवाळी आली म्हणून एक प्रकारचा आनंद होत असतो. आज सकाळ-पासूनच कित्येक भिकारी याचनेकरितां तांतडीनें हिंडत होते. आंधळे रस्त्याच्या कडेला बसून निरनिराळ्या उपायांनीं जाणाऱ्या येणाऱ्याचें लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याचा प्रयत्न करीत होते. अनाथअपंगांनींही आंधळ्यांचेंच अनुकरण चालविलें होतें. फटिंग तंबोरीवालेसुद्धां आज अधिक उल्हासानें भक्तिपूर्ण पदें म्हणत होते.

वृद्ध पित्याला गाड्यांत बसवून एकच एक धड हातानें तो रेटीत असतां मारुतीही भिक्षेकरितां मोठमोठ्यानें ओरडत चालला होता. रोजच्या परिपाठानें मारुतीला भिक्षेकरितां हिंडण्याचे फारसे श्रम होत नव्हते; पण आपल्या ओरडण्यांत जगाला उद्देशून एखादाच वेंचक प्रश्न टाकण्याची त्याच्या ठिकाणीं अशी कांहीं कला होती कीं, साधारण भावनापूर्ण अंतःकरणाच्या माणसाचें मन त्याच्याकडे चटकन् आकर्षिलें जाई.

" अरे नाहीं का रे ! देवा ! आम्हांला नाहीं का कोणी कांहीं देत ? " हा प्रश्न ऐकून एखादा देवभक्त खात्रीनें थबकून त्याला कांहीं तरी दिल्याखेरीज पुढें जाऊं शकत नसे.

" अरे आमची दया करा ! भाऊ, अहो तुम्ही नाहीं देणार तर मग आम्हांला कोण देईल ? "

अशा तऱ्हेच्या उद्गारांनीं तर सहृदयांचें मन मारुती हालवून सोडीत होता. मारुतीचा चेहरा इतका पाणीदार होता कीं, त्यानें दीन मुद्रा करून जर कांहीं याचना केली तर त्याच्या सच्चेपणाबद्दल कोणालाच शंका येणें शक्य नव्हतें.

पण दीनदुबळ्यांच्या आलापांना जग इतकें परिचित झालें होतें कीं, जगाला अशा लोकांचा वीट आला होता. त्यांच्या करुणाजनक उद्गारांनीं 'विठ्ठल'

होणारे प्राणी फारच थोडे होते. मारुतीच्या प्रश्नांना कित्येक लहान मुलें खिदळून वेडींवांकडीं उत्तरेंही देत होतीं आणि जाणारे येणारे सभ्य गृहस्थ गालांना एखादीच खळी पाडून वाट काढीत होते !

पण मारुतीही या सर्व गोष्टींना पुरून उरत होता. तोही कित्येक वेळां गंमतच करीत होता. गाडा रेंटीत रेटीत मारुती चालला असतां एक म्हातारा झाडूवाला रस्ता झाडीत होता. तिथेंच बाजूला एका झाडाखालीं मारुतीनें गाडा विसाव्या-करितां थांबविला.

शेजारींच एक टांगेवाला उभा होता. त्यानें मारुतीला म्हटलें, "काय मारुत्या, आज तुझी अगदीं चैन असेल ?"

पण या टांगेवाल्याच्या प्रश्नाला मारुतीला उत्तरच द्यावें लागलें नाहीं.

* * *

शेजारच्या वळणावरून विद्याधर होलपडत होलपडत आला आणि त्या म्हाताऱ्या झाडूवाल्याच्या शेजारीं आल्यावर त्याच्या पाठीवर थाप मारून त्यानें विचारलें, "काय दोस्त ! अरे, किती दिवसांनीं गांठ !"

मारुती हा सर्व प्रकार दुरून पहात होता. त्याला तत्काल विद्याधराची ओळख पटली. त्याला सुशीलेची आठवण होऊन, काय ही तिची स्थिति ! असें वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

"कसा बामण रंगलाय् !" झाडूवाला टांगेवाल्याला म्हणत होता.

"तुला दोस्त बनवतो आहे न् आतां काय !" टांगेवाल्यानें डोळे मिचकावीत उत्तर केलें.

एका सत्‌शील स्त्रीच्या नवऱ्याची ही चाललेली विटंबना पाहून मारुतीला अगदीं राहवेना. तो गाडा तसाच जागच्या जागीं ठेवून पुढें झाला आणि त्यानें विद्याधराला म्हटलें, "साहेब !"

विद्याधराचा मोर्चा मारुतीकडे वळला. मारुतीला मिठी मारून विद्याधरानें विकट हास्य केलें आणि विचारलें, "वा ! अरे तूं तर आपला फारा दिवसांचा सोबती ! माझी गरिबाची तुला कशाला आठवण राहते आहे ! आणि हा तुझा हात कशानं तुटला ?"

"सांगतों सगळं आतां. जरा या टांग्यांत बसूं. मग स्वस्थपणानं सगळं बोलूं."

मारुतीनें विद्याधराला हाताला धरून टांग्यांत बसविलें. टांग्यांत बसल्याबरोबर

मारुतीनें तांगेवाल्याच्या कानांत कांहीं तरी सांगितलें आणि तांगा चालू झाला. झाडूवाला तांगेवाल्याला ओरडून म्हणाला, " बघ, चांगलं सावज सांपडलं आहे. रुपया दीड रुपाया काढ ! "

" सोडतों का आतां ! " असें म्हणत तांगेवाला मोठ्यानें हंसला आणि त्यानें तांगा चालू केला. विद्याधर तांगा चालू झाल्यावर खदखदां हंसला आणि त्यानें मारुतीला मिठी मारली.

ॐ ॐ ॐ

विद्याधराच्या घरापुढें तांगा थांबला आणि तांगेवाल्यानें म्हटलें, " हं. उतरा साहेब ! "

ती इशारत ऐकून विद्याधर खालीं उतरला. घरांत शिरतांना पुन्हा तांगेवाला ओरडला, " पैसे काढा, चाललां कुठं ? "

विद्याधर परत फिरला. लालभडक डोळे अक्राळविक्राळ तऱ्हेनें वटारीत विद्याधरानें तांग्याच्या एका बाजूला खोंचून ठेविलेला चाबूक घेतला आणि तो डोक्यावर जोरानें फिरवून तांगेवाल्याला लगावणार, इतक्यांत तांगेवाल्यानें त्याचा हात धरला. चाबूक फेंकून देऊन विद्याधर आंत निघून गेला. तांगेवाल्याच्या तोंडून संतापाचे शब्द बाहेर पडण्याच्या आंत मारुती पुढें झाला आणि त्यानें तांगेवाल्याच्या पायाला हात लावून सांगितलें, " हें बघ दादा; माझ्याकडे बघ. मी तुला हे पैसे देतों. एवढे घेऊन तूं येथून जा. मला आणखी पैसे मिळाले म्हणजे मी तुला आणखी देईन; पण तूं येथून जा. मी तुझ्या पायां पडतों ! "

मारुतीनें जीर्ण जाकिटाच्या खिशांतून एक पावली काढली. साश्रु नयनांनीं तिच्याकडे बघत ती तांगेवाल्याला देऊन पुन्हा म्हटलें, " जा, माझ्याकरतां जा." तांगेवाला आश्चर्यचकित नजरेनें मारुतीकडे पहात निघून गेला आणि मारुतीही आपल्या वृद्ध बापाकडे जाण्याकरितां वाट चालूं लागला.

ॐ ॐ ॐ

विद्याधराची वाट पहात सुशीला वर सज्जांत उभी होती. खालीं चाललेला सर्व प्रकार ती अश्रुपूर्ण दृष्टीनें पहात होती.

तोंडानें " देवा ! पांगळ्याची कींव करा हो ! " असें म्हणत दूर दूर जाणाऱ्या मारुतीकडे ती भरल्या डोळ्यांनीं किती वेळ तरी बघत उभी होती !

धर्मजागृति !

"होय ! रॉबर्ट, कित्येक वेळां माझ्या वैतागाचा पारा इतका वर चढतो कीं, मला धर्मांतर करावेंसें देखील वाटूं लागतें."

मुंबईहून निघालेली दुपारची एक्स्प्रेस एखाद्या बेफाम हिंस्र पशूप्रमाणें आजूबाजूस न पहातां अविरत गतीनें चालली होती. 'निसर्गा ! तुझी इतकी मानवाशीं सिजास नको' असेंच जणुं काय ती आपल्या संचारानें सूचित करीत होती. उष्मा अतिशय होत होता. गाडी सर्वांग तापली होती. त्या तापानेंच जणुं गाडींत बसलेल्या विश्वासाचें मस्तक चढून गेलें होतें. कित्येक दिवसांनीं त्याला भेटलेला त्याचा ख्रिश्चन मित्र रॉबर्ट आज त्याच डब्यांत येऊन बसला होता. दोघां मित्रांचीं अनेक विषयांवर बोलणीं होऊन शेवटीं धर्मविषयावर वादाचा भर पडला. धर्माचा विषय विश्वासाच्या अगदीं रोमरोमीं भिनलेलाच विषय ! रूढ समजुती धर्मस्वरूपें बनून धर्माचें खरें स्वरूप तोंडावर देवी आलेल्या बालिकेप्रमाणें अजीबात बदलून जावें ही वस्तुस्थिति पाहून त्याला विषाद वाटे व त्या विषयावर वाद होऊं लागला कीं, त्याच्या कपाळाच्या शिरा तटातट उभ्या रहात. रॉबर्टनें आधीं हिंदु असून नंतर ख्रिश्चन धर्म स्वीकारला हें पाहून विश्वासला रॉबर्टनें हिंदुधर्माला कंटाळून ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला असें वाटे.

" विश्वास ! धर्मत्याग ही गोष्ट तुला वाटते इतकी सोपी नाहीं. पूर्वधर्मांतील असंख्य स्मृतींना विस्मरणप्रांतांत ढकलून देण्याची मनाची नैसर्गिक तयारी पाहिजे." रॉबर्टनें विश्वासच्या बोलण्यावर उत्तर दिलें.

विश्वासाला धर्मत्याग ही गोष्ट बरीच सोपी आणि सुखावह भासत असावी असा रॉबर्टनें तर्क करून वरील उत्तर दिलें. परधर्मांत जाऊन कदाचित् वैयक्तिक सुखोपभोग प्राप्त होत असतील, पण मनाची उन्नति होईल हें मात्र निश्चितपणें सांगण्यास रॉबर्ट तयार नव्हता.

" रॉबर्ट ! व्यक्तीच्या ऐहिक सुखांत फरक पडला कीं, त्या व्यक्तीच्या मानसोन्नतीला देखील निरनिराळीं वळणें लागतात."

" मग विश्वास ! परधर्मांत वैयक्तिक सुखें प्रत्येक व्यक्ति अधिक मिळवील हें तरी निश्चित खरें कशावरून ? " रॉबर्टनें आपली बाजू मांडली.

" रॉबर्ट ! परधर्म स्वीकारून सुखी झालेलीं माणसेंच जास्त दिसतात आणि तूंही त्यांतलाच एक आहेस ! " विश्वास म्हणाला.

" असेन कदाचित्; " अर्धस्फुट उत्तर देऊन रॉबर्टनें आपली दृष्टि गाडीच्या बाहेर वळविली. मुंबईहून पुण्याला जातांना गाडी जशी फिरून आक्रमलेलाच मार्ग आक्रमते तद्वत् या वादविवादानें रॉबर्टची दृष्टि त्याच्या पूर्व आयुष्यांतील अनेक आठवणींचें निरीक्षण करूं लागली.

" पण रॉबर्ट ! तूं धर्मत्याग करण्याचें कारण काय रे ?" विश्वासनें हा प्रश्न विचारून रॉबर्टच्या आधींच खवळलेल्या मनाला जोरदार चालन दिलें. एखादा मृगेंद्र अचानक गोळी लागली म्हणजे जसा कांहींशा आश्चर्यानें व कांहींशा क्रोधानें एकदम जमिनीवर गडबड गडबड लोळूं लागतो तशीच रॉबर्टच्या मनाची स्थिति झाली ! पण इतक्यांत गाडीची शिटी वाजली. गाडी एकदम थांबली आणि 'लोणावळा–लोणावळा' असा एकच घोष झाला. विश्वासनें काढून ठेवलेले कपडे घातले, आपली बॅग घेतली आणि रॉबर्टला गुड्बाय करून तो डब्याच्या बाहेर –नव्हे, स्टेशनच्या देखील बाहेर पडला.

गाडी चालू झाली. रॉबर्टनें आपली दृष्टि डब्याच्या बाहेर वळविली. लोकांना तो निसर्गनिरीक्षण करण्यांत दंग आहे असें वाटलें असतें; पण रॉबर्टच्या मनांत अनेक विचारांनीं गर्दी उडवून दिली.

'मीं धर्मत्याग केला ! कां केला ? क्षणिक भावनेनें मी हें करायला उद्युक्त झालों कीं पूर्ण विचारांतीं ? नाहीं तरी हिंदुधर्मांत राहून माझें आयुष्य काय सुखांत गेलें असतें ? पण या धर्मांत जी माझी हल्लीं स्थिति आहे ती मी कोणत्याही धर्मांत असतों तरी अशीच राहिली असती ! हिंदु काय किंवा ख्रिश्चन काय, डॉक्टर झालेल्या मला हल्लीं मिळतात हे सुखोपभोग मिळाले नसते का ? मग ती गोष्ट करण्यास मी जर प्रवृत्त झालों नसतों तर माझें काय झालें असतें ? जिच्या सहवासांत आजन्म आयुष्य जावें म्हणून मीं जिचा अभिलाष धरला ती मला दुष्प्राप्य ठरली, नव्हे रूढ चालीरीतींनीं तिला दुष्प्राप्य ठरविलें, याच कारणानें मी परधर्मांत आलों ना ? मग ती क्षणिक वेडाची लहर होती, कीं निरंतरच्या निराशेचा तो झटका होता ? हो. असेंच तो सदोदित माझ्या मनाला जाचेल असा निराशेचा झटका होता. प्र......छे ! माझ्यासारख्या परधर्मीयानें तिचें आतां नांव घेणें म्हणजे त्या देवतास्वरूप दिव्यांगनेच्या निष्कलंक कीर्तीला विटाळण्यासारखें नाहीं का होणार ? रूढी-

च्या घातकी बंधनांनीं धर्माला जखडलें नसतें तर माझ्या मनाला ही कधींही भरून न येणारी जखम झाली असती का ? माझ्या मनाला जो एकदां धक्का बसला आणि त्या धक्क्यानें माझें मन जें एकदां कलंडून तिरपें झालें तें पुन्हा या जन्मांत सरळ, स्थिर होणार आहे का ? नाहीं. हिंदुधर्मांत राहून तें तसें झालें नसतें, ख्रिश्चन-धर्मांत राहून तें आहे तसेंच राहिलें. मग—"

विचारांचें तारूं भडकत चाललें होतें. डॉ० रॉबर्ट आज आपल्या डोळ्यांतील, बंड करून सांचलेलीं आसवें, डोळे दाबदाबून बाहेर टाकीत होता. विचारासारखी दुसरी कोणतीही गोष्ट नाहीं, कीं जी आपल्या सतत उद्योगानें मनुष्याला असून नसल्यासारखेंच करून टाकते !

गाडी नियमित वेळीं पुण्याच्या स्टेशनवर येऊन पोहोंचली. जो तो आपल्या उद्योगांत चूर होता. डॉ० रॉबर्ट पुण्याला आज एक पेशंट पहावयास आला होता. पेशंटचें घर स्टेशनशेजारींच होतें व त्याच्याजवळ फारसें सामानही नव्हतें. त्यानें चालतच पेशंटचें घर गांठण्याचा विचार केला. तो चालूं लागला आणि मध्यें खंड पडलेले त्याचे विचार पुन्हा पूर्वीच्याहून दुप्पट वेगानें धावूं लागले.

" विश्वाससारख्या माणसानें वैतागानें धर्मत्याग केला तर माझ्यासारख्या अनुभविकांनीं त्याला त्या मार्गापासून परावृत्त करायला नको का ? माझ्यासारखीच सर्वांची परधर्म स्वीकारतांना मनोवृत्ति असेल हेंही संभवत नाहीं. प्रत्येकाला वैताग यायला, निराश व्हायला वेगवेगळीं कारणें आहेत; प्रत्येकाची मनोभूमिका वेगळी आहे; प्रत्येकाच्या अभिलाषाची, आकांक्षांची तऱ्हा वेगळी असणार ! मग माझ्यासारखेच ते आजन्म दुःखी राहतील हें शक्य आहे का ? "

खेळणीं विकणाराच्या कर्कश किंकाळीनें डॉक्टरचा विचारभंग झाला. त्यानें वर पाहिलें, तों त्याला जें घर हवें होतें तेंच त्याच्यापुढें अगदीं उभें होतें.

२

" मनिं नव्हति कशाची चिंऽता ॥
आनंऽद अखंऽडित होताऽ ।
आक्रोश कारणापुरताऽऽऽ "

संध्याकाळ झाली होती. आजूबाजूच्या वनप्रदेशांत कांहीं पांच-सहाच घरें दृष्टिपथांत येत होतीं. लोणावळ्यासारख्या गांवांत आधींच शांतता. आणि तशांत हा

तर गांवाचा अगदीं बाजूचा भाग. 'शारदेच्या' मुखांतील हें सहजमनोहर विलाप-गीत प्रभावती आपल्या मधुर कंठानें अशाच एका शांत आणि बाजूच्या बंगल्यांत आलापीत होती. आधींच तें गीत सुखदुःखांच्या संमिश्र लहरींनीं बनविलेलें आणि या वेळीं म्हणणारी व्यक्ति सुखदुःखाचा संमिश्र अनुभव घेतलेल्यांपैकीं एक अशी होती. प्रभावतीच्या आवाजांत एक तऱ्हेच्या करुण सुराची छटाही होती. ती निरनिराळ्या तऱ्हेनें तें गीत आळवीत होती. पन्ह्याकरितां उकडलेले आंबे प्रभावती सोलीत बसली होती. गिरानें भरलेला पंजा पातेल्याच्या कांठावर किंचित् आपटून निरपून घेतांना तिन्हींपैकीं कोणत्या तरी एका ओळीवर जोर द्यावा, मान हलवावी, असें तिचें चाललें होतें. आंबे सोलून झाले. प्रभावती एक हात पातेल्या-वर ठेवून व दुसऱ्या हातानें केंस सांवरीत मनाशींच विचार करूं लागली.

"हे कविहृदयाचे उद्गार अगदीं अन्वर्थक नाहींत का ? माझें बालपण—माझें रम्य बालपण—असेंच नाहीं का गेलें ? भय्या ! भय्या ! एके दिवशीं मुद्दाम शेतांत जाऊन आपण दोघांनीं पन्ह्याचा कार्यक्रम केला होता !—आज तो प्रसंग अगदीं डोळ्यांपुढें दिसतो आहे. मी रानांतील गेनू गड्याच्या खोपट्यांत पन्हें तयार करून ठेवलें अन् आपण थोडेसें हिंडायला गेलों. माघारीं येऊन पाहिलें तों सर्व पातेलें पालथें झालेलें. भय्या ! त्या दिवशीं तुझा किती हिरमोड झाला ! ते पूर्वींचे प्रसंग आठवले, कीं आतां डोळे भरून येतात कीं रे ! आपणां परस्परांची आजन्म एकत्र राहण्याची इच्छा असतांना आपल्या हातून तें तसें झालें नाहीं. भय्या ! तुला आतां माझी आठवण होत असेल का ? पतिपत्नी अगर प्रियकर-प्रियकरणीच्या नात्यानें आपल्याला भेटतां नाहीं आलें, तरी मित्र, बहीणभाऊ या नात्यानें आपण एकमेकांना भेटणें शक्य नाहीं कारे ? पण नाहीं ! जग आपल्याला काय म्हणेल ? नको ! तो जगाच्या लाजेचा आतां विचारच नको. यामुळेंच नाहीं का आपण आपलीं आयुष्यें निराशामय बनवून घेतलीं ? "

मनाशींच विचार करतां करतां वरील गोष्टी प्रभावती मोठ्यानें बोलून गेली. आणि नंतर वर पहाते तों काय, समोर विश्वास उभा ! त्यानें आपल्या हातांतील बॅग खालीं ठेवली. प्रभावती एकदम पुढें झाली. तिनें आपल्या चेहऱ्यावर आनंदा-चें हंसूं आणण्याची पराकाष्ठा केली. पण तिच्या प्रयत्नांत तिला यश आलें नाहीं ! विश्वासानें एकवार तिच्याकडे बघून हंसल्यासारखें केलें आणि तो शेजारच्याच खुर्चीवर वर्तमानपत्राच्या घडीनें वारा घेत बसला. प्रभावतीनें आणलेलें पन्हें

पिऊन तो उठला. इतक्यांत राजा पाळण्यांत रडूं लागला म्हणून तीं दोघेंही पाळण्याजवळ गेलीं. त्या निष्पाप बालकाकडे बघून विश्वासाच्या डोळ्यांतून एकच अश्रु खालीं गळला. त्यानें झट्कन् तोंड फिरविलें व तोंड धुण्याकरितां तो परसांत निघून गेला. तोंड धुऊन तो माघारीं आपल्या खोलींत गेला. आरामखुर्चीवर अंग टाकून त्यानें जवळच पडलेला 'अरुणा'चा अंक हातांत घेतला. सहज एक पान उघडलें तों जाड अक्षरांनीं लिहिलेलें एक वाक्य त्याला दिसलें—

" हा तुझा पति व ही तुझी पत्नी असें धर्मविधीनें जाहीर करून परस्परांत प्रेमोद्भवाची बाह्यात्कारी सक्ति करण्यापेक्षां—"

वाक्य अर्धवट वाचून होतांच त्यानें अंक खालीं टाकून दिला. आपल्या मनाशींच त्यानें विचार करण्यास सुरुवात केली. लेखकाचे हेच विचार! प्रभावतीच्या मर्वांच्या आत्मगत भाषणांत हेच विचार! आज माझ्या वैतागाची परिसीमा होण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली आहे असें त्याला वाटलें. त्याचा बराच वेळ विचार चालला होता. 'जेवायचं झालं आहे' म्हणून प्रभावतीनें आंतून सांगितलें. एखाद्या यंत्राप्रमाणें त्यानें जेवण आटोपलें व खोलींत अंथरुणावर निजेपर्यंतच्या गोष्टी यंत्राप्रमाणेंच शिस्तीनें केल्या.

३

पहाटेचा मंद समीर साखरझोंप अनुभवणाऱ्या सुखी जनांना अधिकच सुखकारक होत होता. सर्व सृष्टि निद्रादेवीच्या उदरीं गडप झाली होती. विश्वास एकदम उठला, त्यानें कपडे घातले, हातांत काठी घेतली आणि तो दारापर्यंत गेला. त्यानें एकवार मागें वळून पाहिलें. तो परतला. निद्राधीन प्रभावतीजवळ येऊन बसल्यावर तिचा सुकुमार हात हळुवारपणें त्यानें आपल्या हातांत घेतला. तो उलटापालटा केला. त्यानें एकवार वर पाहिलें, पुन्हा प्रभावतीच्या गौरमुखावर त्यानें आपले नेत्र वळविले. त्याचा आवेग असह्य झाला. 'प्रभावती!' हलक्या स्वरांत हांक मारून त्यानें कण्हण्यास प्रारंभ केला. जों जों तो हुंदके दाबूं लागला तों तों त्याच्या दुःखाला अधिकच भरती आली! त्याचा ऊर खालींवर होऊं लागला आणि अश्रूंचा अविरत वर्षाव त्याच्या गालावरून स्रवूं लागला.

" प्रभावती! तुला सोडून जाण्याचें माझ्या जीवावर येतें! तुझा कंटाळा येऊन मी निघून गेलों असें कदाचित् जागी झाल्यावर तुला वाटूं लागेल; पण प्रभावती, मला तुझा कंटाळा आला नाहीं. ज्या रूढीनें आपण एकत्र बद्ध झालों त्या रूढी-

च्या मला कंटाळा—तिट्कारा आला आहे. आतां ऐहिक सुखाच्या पलीकडील पारलौकिक सुखाची प्राप्ति करून घेण्यासाठीं मी परधर्म स्वीकारणार आहें. या धर्मांत राहून माझ्या मनाची मला जशी उन्नति व्हायला पाहिजे तशी होणार नाहीं अशी खात्री झाल्यावरच मी धर्माचा आणि तुझा त्याग करीत आहें. तूं निजलेली आहेस. जगाचें कटु सत्य अनुभविणें तुझ्या नशिबीं नको असेंच मी परमेश्वराजवळ मागणें मागेन. जागी झाल्यावर तूं मला मनांतल्या मनांत हांका मारशील, तुझा जीव माझ्याकरितां आंत बाहेर होईल, माझ्या वाटेकडे आशाळभूतपणानें तूं तासचे तास बघत बसशील; पण प्रभा, हा विश्वास तुझ्या हांकांच्या टप्प्याच्या बाहेर जाणार आहे. वेडे, पुन्हा भेटण्याची व्यर्थ आशा लावून घेऊं नकोस. मी तुला सोडून गेलों याबद्दल तूं मला वेडा म्हणशील ! म्हण. प्रभा, मला खुशाल वेडा म्हण ! काय नेम सांगावा ? या जन्मानंतरची स्थिति मनुष्याला अज्ञात असते. अशा स्थितींत मनुष्यानें आपल्या सर्व इच्छा पूर्ण करून घेण्याची धडपड करणें वेडेपणाचें ठरेल काय ! ज्या धर्मांत मनुष्याची मानसिक अधोगति होते असा अनुभव आला त्या धर्मांत रहाण्यापेक्षां आपली उन्नति होत आहे असें दर्शविणाऱ्या लोकांच्या धर्माची परीक्षा पहाण्याची मला इच्छा झाली तर ती मीं अपुरी ठेवावी का ! आणि पारमार्थिक सुखाच्या प्राप्तीबरोबरच मला कदाचित ऐहिक सुखांचीही अधिक प्राप्ति होईल. माझी एवढीच इच्छा तृप्त करण्याकरितां मी तुझा त्याग करीत आहें. तूंही विरहाला तोंड दे आणि आपलें पारलौकिक हित कशांत आहे हें डोळे उघडून नीट ठरव, आणि अन्धानुकरणापेक्षां दुसऱ्या एखाद्या मार्गानें त्याची प्राप्ति करून घे. नीज ! अशीच निश्चिंत निजून जगाच्या कटु अनुभवांपासून दूर रहा."

विश्वासानें आपला गद्गद कंठ साफ केला, एकवार शेवटचे अश्रु ढाळले आणि तो हलकेच उठला, दारापर्यंत गेला आणि त्याला राजाची आठवण झाली. पाळण्यांत वांकून त्यानें त्याचें चुंबन घेतलें. पुन्हां अश्रुपूर लोटले; पण जास्त वेळ घालविला कीं, आपल्या निश्चयापासून आपण परावृत्त होऊं, या भीतीनें अवघ्या तीन पावलांच्या मार्गांत त्यानें पांचसात वेळां आपल्या सुगृहिणीचें, आणि प्रिय अर्भकाचें साश्रु लोचनांनीं दर्शन घेतलें व दाराबाहेर पाय ठेवला !

सकाळ झाली. उद्योगी जगाचे व्यापार चालू झाले. प्रभावती उठली आणि तिनें इकडे तिकडे पाहिलें. विश्वास कोठें तरी फिरावयास गेला असावा असा तिच्या मनांत विचार येतो न येतो तोंच तिला तो आपल्याखेरीज कधींही फिरावयाला

जात नाहीं या गोष्टीचें स्मरण झालें. कोठें तरी बाहेर गेला असेल अशा समजुतीनें तिनें आपल्या कामाला सुरुवात केली आणि ती लवकरच कार्यमग्न झाली.

४

आपला मार्ग आक्रमीत असतां काळ हा विश्रांतीकरितां कधींही वेळ दवडीत नाहीं. वरील सर्व प्रसंगांना दोन वर्षें झालीं. विश्वास माघारीं येईल म्हणून प्रभावतीनें त्याची भिरभिर वाट पाहिली, पण विश्वास परत आला नाहीं. विश्वासाच्या मागें प्रभावतीची सांपत्तिक स्थिति अर्थातच करुणास्पद झाली असती; पण ती रहात होती त्या घराचे मालक आनंदराव यांनीं प्रभावतीला साहाय्याचें आश्वासन दिलें. प्रभावतीला–नव्हे–ताईला त्यांनीं बहीण मानली आणि या मानीव नात्याला आपल्या कृतीनें निःसीम प्रेमाची जोड दिली.

अशीच संध्याकाळ झाली होती. प्रभावतीनें चहा करण्याकरतां स्टोव्ह पेटवून त्यावर आधण ठेवलें होतें. अलीकडे ती उदासीन असल्यामुळें काम करतां करतां प्रस्तुतांतून अप्रस्तुतांत जाण्याची तिला संवयच झाली होती. विचार करतां करतां ती कामकाज विसरून कोठें तरी भलतीकडेच बघत बसे आणि तिच्या हातून नियोजित काम होण्यांत हेळसांडही होई.

आतां ती अशीच विचार करीत बसली होती. स्टोव्ह आपल्या गतीनें चालला होता. योग्य वेळीं पाण्याला आधण यावयाचें तेंही आलें; पण पाण्याच्या वाफा, डोळे आणि स्टोव्हच्या पलीकडील सृष्टि यांच्यामध्यें येऊन जेव्हां प्रभावतीला कांहींच दिसेनासें झालें तेव्हां तिनें पाण्याकडे पाहिलें. पातेलें उतरण्याकरतां ओंचे पुढें केले आणि पातेलें खालीं उतरून ठेवलें. ओंच्यांनीं पेट घेतला, तें पाहून प्रभावती घाबरली आणि तिनें सैरावैरा पळण्यास, उड्या मारण्यास आरंभ केला! लुगड्यानें पेट घेतला तो आंतील शरीर भाजून काढण्यास पुरेसा होता. त्यांतून स्त्रीसहजलज्जेमुळें तिनें वस्त्र फेडलें नाहीं. गळ्यापर्यंत लुगडें पेटलें. सर्व शरीर आंतून भाजून गेलें. तिनें एकच किंकाळी मारली आणि ती धाडकन् बेशुद्ध होऊन खालीं पडली!

किंकाळी ऐकून आनंदराव बाहेरून आंत आले. भाजलेली प्रभावती अस्ताव्यस्त पडली होती. तें भेसूर दृश्य पाहून ते किंचित्काळ बावरले. प्रभावतीला अंथरुणावर नीट व्यवस्थित निजवून त्यांनीं सावध करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांचे सर्व

प्रयत्न व्यर्थ गेले. तिला सावध करण्याकरितां डॉक्टरांना बोलवावें म्हणून ते बाहेर गेले.

* * *

"ताई, हे डॉक्टर आले आहेत. त्यांच्याकडे बघ." बेशुद्धावस्थेंत असलेल्या प्रभावतीला उद्देशून आनंदराव म्हणाले. प्रभावतीला शुद्धीवर आणण्याकरितां एखादा डॉक्टर आणावा म्हणून आनंदराव बाहेर पडले. एक सरकारी सर्जन रजेच्या दिवसांत सहज हवाफेराकरितां लोणावळ्यास आल्याचें त्यांनीं ऐकिलें होतें, व त्याच सर्जनचा शोध करण्याकरितां ते आपल्या एका मित्राकडून त्याचा पत्ता घेऊन गेले होते. डॉ० रॉबर्ट हेच ते सरकारी सर्जन होते. आनंदरावांनीं त्यांना सर्व हकीगत सांगतांच त्यांना फार वाईट वाटलें. डॉक्टर फार प्रेमळ अंतःकरणाचे होते. त्यांना आपल्या कोणत्याही पेशंटबद्दल जिव्हाळा उत्पन्न होई. त्यांची व आनंदरावांची ही पहिलीच भेट होती; पण आनंदरावांनीं सांगितलेली हकीगत ऐकून त्यांच्या डोळ्यांना एकदम पाणी आलें. आधीं भाजणें ही कल्पनाच किती दुःखदायक असते ! तशांत डॉ० रॉबर्ट हे अत्यंत कोंवळ्या मनाचे होते. अर्थात् ही हकीगत ऐकून त्यांचे डोळे एकदम अश्रूंनीं भरले असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. डॉ० रॉबर्ट एकदम जरुरीचें तेवढें साहित्य घेऊन आनंदरावाबरोबर बाहेर पडले. आपल्याला एक खेदजनक केस आज बघावयाची आहे एवढीच त्यांना कल्पना होती. आनंदरावांच्यावरोबर त्यांच्या घरीं ते पोहोंचले, आणि त्यांना रोग्याच्या खोलींत नेण्यांत आलें.

डॉ० रॉबर्ट प्रभावतीजवळ जाऊन बसले. आनंदरावांनीं दिवा पुढें केला. खोलींत दिव्याचा प्रकाश जितक्या जलद पसरला, तितक्या जलद किंबहुना त्याहूनही जास्त द्रुतगतीनें डॉ० रॉबर्टच्या शरिरांतून एक विचारांची वीज चमकून गेली. त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडेनासा झाला. एखाद्या हिडीस दृश्यापासून एखादा माणूस ज्याप्रमाणें एकदम वाईट तोंड करून आपली दृष्टि दुसऱ्या बाजूला वळवितो त्याप्रमाणें डॉक्टरांची दृष्टि एकदम बाजूला वळली. त्यांचा प्रभावतीच्या नाडीला लावण्याकरितां उचललेला हात तसाच निर्जीव बाहुलीप्रमाणें जागच्या जागींच राहिला. त्यांना आपण कोठें आहों, काय पहात आहों, हें सुद्धां समजेनासें झालें ! साश्रु दृष्टीनें त्यांनीं एकवार सभोंवार पाहिलें, मानेला हिसडा दिला आणि प्रभावतीच्या—बेशुद्ध प्रभावतीच्या—विद्रूप गौरवर्ण मुखावर त्यांनीं अचल

दृष्टीनें बघण्यास प्रारंभ केला. त्यांचें ओष्ठद्वय स्फुरण पावूं लागलें आणि थोडयाच वेळांत 'प्रभावती !' अशी कांपऱ्या आवाजानें मारलेली हाक त्यांच्या तोंडून बाहेर पडली. प्रभावतीनें डोळे किलकिले केले, एक मोठा सुस्कारा टाकला व ज्या दिशेनें तिला हांक मारल्याचा भास झाला तिकडे तिनें मान फिरविली. 'भय्या!' हा दोन अक्षरी शब्द तिच्या खोल आवाजानें उच्चारला खरा; पण एवढा लहान-सा शब्द तिच्या सर्व हृत्संवेदना बाहेर घेऊन निघाला होता !

दोघांचीही दृष्टि भेट झाली; प्रभावतीचा ऊर खालींवर होऊं लागला. तिच्या विस्फारित नेत्रांतून अश्रूंचा पूर बाहेर लोटला. शेजारीं तिच्यावर दृष्टि लावून बसलेल्या डॉक्टरांनीं एक दीर्घ उसासा टाकला व त्यांचा हात त्यांच्या खिशाकडे गेला. हातरुमाल बाहेर काढून त्यांनीं आपल्या डोळ्यांना लावला. निष्ठुर अश्रु दाबले, आवरले, तरी बाहेर येत होतेच ! श्वास कोंडून धरला तरी ऊर, समुद्रावरील लाटांप्रमाणें, वरखालीं होत होता. नाकाचा, तोंडाचा कसलाही आवाज होऊं नये म्हणून त्यांनीं पराकाष्ठा केली, तरी हुंदक्यांवर हुंदके बाहेर पडत होते !

"प्रभा ! हें असं कसं झालं ग ?" डॉक्टर रॉबर्टनीं गद्गद स्वरानें विचारलें.

"भय्या ! माझ्या गतजन्मींचीं मी हीं फळं भोगतें आहें रे ! अंगाची किती आग होते आहे सांगूं ! अग आई ग !" प्रभावतीला हुंदके आवरेनात.

शेजारीं बसलेल्या आनंदरावांना या प्रकाराचा कांहींच उलगडा होईना. डॉ० रॉबर्टना त्यांनीं कधीं पाहिलें नव्हतें. त्यांची व प्रभावतीची पूर्वी ओळख होती किंवा नाहीं हेंही त्यांना माहीत नव्हतें. आनंदराव बुचकळयांत पडले; पण ती वेळ अशा गोष्टीची विचारपूस करण्याची नव्हती.

"भय्या, मला यांतून वांचवशील कारे ?"

प्रभावतीच्या ह्या प्रश्नाला काय उत्तर द्यावें हेंच डॉ० रॉबर्टना समजेना.

"हो. प्रभावती, शक्य ते प्रयत्न करून मी तुला वांचवीन." डॉक्टरनीं डोळ्यांत आंसवें आणून उत्तर दिलें.

दोघांनाही आतां धीर धरवेना. रॉबर्ट पुरुषासारखा पुरुष, पण तोही एखाद्या लहान मुलासारखा रडूं लागला. प्रभावतीच्या हृदयवेदना निवेदन करण्यापलीकड-च्या होत्या. हृदयांत मावणार नाहीं अशा दुःखाचा आज तिला अनुभव येत होता. रात्र बरीच झाली. दुःखाचाही भर जरा कमी झाला. सर्व तऱ्हेचे उपचार करून डॉक्टरांनीं जड पावलानें व निराश अंतःकरणानें त्या भयाण खोलीचा निरोप घेतला !

५

ज्या संध्याकाळीं वर सांगितलेला हृदयाविदारक प्रसंग घडला त्याच संध्याकाळीं लोणावळ्यांतच एका निसर्गरमणीय उद्यानांतील एका बांकावर बसून विश्वास मनाशींच विचार करीत होता. त्याची स्थिति त्याला दुःसह झाली होती. विचारांच्या संमिश्र कल्लोळानें तो ग्रसून गेला होता.

"कोठेंही जा, पळसाला पानें तीनच ! हा धर्म चांगला, या धर्मांत घाणेरड्या रूढीपासून आपणांस दूर जातां येईल अशा भावनेनें मीं हा धर्म स्वीकारला—मी ख्रिस्ती झालों; पण हिंदूंच्या दृष्टीनें ख्रिस्ती झालों आणि ख्रिस्त्यांच्या दृष्टीनें हिंदु राहिलों ! हिंदुधर्माचा जो बोजवारा तोच ख्रिश्चन धर्माचा ! माझी दुःस्थिति दिवसें-दिवस दुःसह होत चालली आहे. मला हें स्पष्ट दिसत आहे ! आतां पुढें माझें काय होणार ? "

विश्वासाला डॉ० रॉबर्टनीं दोन महिन्यांपूर्वीं आपल्या सहवासाचा आश्रय दिला म्हणून तो कांहीं तरी माणसांत राहिला होता; नाहीं तर त्याला खचित् वेड लागलें असतें आणि आमरण कोठें तरी जगाच्या पाठीवर वणवण भटकण्याचा प्रसंग त्याच्या नशिबीं आला असता. भाग्यवान् असणें अगर सुस्थितीचें धनी बनणें हें ज्याच्या त्याच्या ललाटरेषांवर अवलंबून असतें. याचा दाखला त्याच्या स्वतःच्या अनुभवानेंच त्याला दिला होता. रॉबर्टनें धर्मत्याग केला, पण त्याची स्थिति चांगली राहिली. विश्वासनें धर्मत्याग केला, पण त्याचे हाल कुत्रा देखील खाईना !

आज डॉक्टर कोठें तरी व्हिजिटला गेल्यामुळें विश्वास एकटाच फिरावयाला आला होता. इतक्यांत एक युरोपिअन अधिकारी आपल्या नोकरासह तेथें येऊन दाखल झाला. विश्वास ज्या बांकावर बसला होता तेथें ते दोघेही येऊन पोहोंचले. तरी विश्वास आपल्या विचारतंद्रींतून जागा झाला नाहीं व जाग्यावरून यत्किंचितही हालला नाहीं.

" Kick him and let him die ! " (लाथ मारा त्याला. मरूंदे लेकाला.) तो युरोपिअन आपल्या नोकरांना उद्देशून म्हणाला. ते दरडावणीचे शब्द कानीं पडतांच विश्वास भानावर आला. त्यानें अदबीनें उठून साहेबांस जागा करून दिली व तेथून तो चालता झाला !

समतेच्या वायफळ गप्पा झोंकणारे साहेब वेळ आली कीं, कसें आचरण करतात याचा उत्कृष्ट मासला आज विश्वासला अनुभवावयाला मिळाला. समता हें

ज्या ख्रिस्ताचें ब्रीद त्याचेच अनुयायी कसें उलट आचरण करतात हें आज त्याच्या निदर्शनास आलें. याच गोष्टीवर वैतागाचे विचार करीत करीत विश्वास आपल्या खोलींत पोहोंचला.

टेबलासमोर खुर्चीवर बसल्यावर आज बरेच दिवस तो लिहीत असलेल्या 'धर्ममीमांसा' या पुस्तकाचीं अस्ताव्यस्त पडलेलीं पानें नीट जुळवून त्यानें पुढें लिहिण्यास प्रारंभ केला.

"—ईश्वर मनुष्याला निर्माण करतो आणि मनुष्यानें जर मूर्तिपूजेचा मार्ग स्वीकारावयाचा तर ईश्वराला मनुष्यानें निर्माण केलें असें होत नाहीं का ? प्रत्येक धर्मांत मूर्तिपूजेला महत्त्वाचें स्थान आहे; पण मनुष्य ईश्वराला निर्माण करूं शकेल काय ? खरें पाहतां धर्मांचे दोन प्रकार आहेत. एक ईश्वरनिर्मित धर्म व दुसरा मनुष्यनिर्मित धर्म. हिंदुधर्म, ख्रिश्चनधर्म हे मनुष्यनिर्मित होत. ईश्वरनिर्मित धर्म मनुष्यांच्या कर्तव्याशीं निगडित झालेले असतात. पुत्रधर्म, पितृधर्म, मातृधर्म असे या ईश्वरनिर्मित धर्मांचे निरनिराळे प्रकार आहेत. प्रत्येक मनुष्यानें दुसऱ्याकरितां देह झिजविणें, त्याला सुखांत ठेवणें हा ज्याचा त्याचा धर्म आहे ! तो पाळण्यास जर प्रत्येकजण चुकूं लागला तर मनुष्यनिर्मित धर्मांची मातबरी त्याला पुण्यवान् बनविणार नाहीं—"

इतका मजकूर लिहून होतांच पान संपलें व विश्वास तें ब्लॉटिंग पेपरनें टिपीत असतांना दारावर टिक् टिक् असा आवाज झाला व त्या आवाजाच्या समाप्ती-बरोबरच डॉ० रॉबर्ट आंत आला.

"काय रॉबर्ट ! कुठली व्हिजिट होती ?" विश्वासनें सहज विचारलें.

"आनंदराव महाशब्दे म्हणून एक गृहस्थ आहेत, त्यांच्या येथील बाई स्टोव्हनें भाजली आहे." रॉबर्टनें उत्तर दिलें आणि एक उसासा टाकला. त्याचे शब्द ऐकतांच विश्वास खोलींतून एखाद्या भ्रांतिष्टासारखा जो एकदम निघाला तो थेट आनंदरावांच्या घरापाशीं येऊन थांबला. प्रभावती कोठें असेल याचा तेथें येई-पर्यंत त्यानें मुळींच विचार केला नव्हता. प्रभावती आपल्याला भेटेल का ? भेटल्यास ती आपल्याशीं बोलेल का ? तिची आपली गाठ कशी पडेल ? असे अनेक तऱ्हेचे प्रश्न त्याच्यापुढें आतां थैमान घालूं लागले. रस्त्यावर पूर्ण अंधार पडला होता. त्या अंधारांत विश्वास किती वेळ तरी अस्वस्थ मनानें उभा होता. त्याचें हृदय प्रभावतीमय होऊन गेलें होतें. प्रभावतीची गाठ पडती तर त्यानें तिची

लाखदां क्षमा मागितली असती. त्याला पूर्वाश्रमींच्या अनेक स्मृतींनीं हैराण केलें. धर्मांचा त्याग करतांना आपण प्रभावतीचा त्याग केला याबद्दल त्याला वाईट वाटलें. तात्त्विक भलत्याच विचारांना बळी पडून आपण महामूर्खपणा केला असें त्याला आतां वाटूं लागलें. आलेले अश्रु त्यानें तसेच दाबले व गळ्यांतून बाहेर पडणारा हुंदका तसाच गिळला. मन खंबीर करून त्यानें आनंदरावांच्या घरांत पाय ठेवला. खोलीच्या कोंपऱ्यांत एक मिणमिण दिवा जळत होता. प्राणरहित प्रभावती अंथरुणावर पडून राहिली होती. आनंदराव तिच्या शेजारीं शून्य मनानें बसून राहिले होते. धाकटा राजा भूक लागली म्हणून आईला उठविण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत होता !

विश्वास दारांतून आंत शिरला. आनंदराव उठून उभे राहिले. त्यांनीं विश्वासाला थोपवून धरलें आणि अग्निस्फुलिंगासारखे आपले आरक्त नेत्र त्याच्यावरून एकवार फिरविले. त्यांनीं त्याच्या दंडाला धरलें आणि म्हटलें, " नीच, माझ्या घरांतून चालता हो ! नीचा, असें स्वर्गीय रत्न तुझ्या हातीं आलें असतां तूं त्याचें मातेरें केलेंस; आतां मेल्यावर तरी तिला सुख दे ! "

त्यांनीं विश्वासाला दाराबाहेर ढकललें. तो रस्त्यावर आला. आजूबाजूची काजळी सृष्टि आपल्या भेसूरपणानें त्याला भेवडावीत होती. संध्याकाळीं तो तसा अपमान ! आतां हा असा धिक्कार ! विश्वासाचें जिणें आतां व्यर्थ झालें. जगांत राहण्यासारखें, धरणीला भार देण्यासारखें त्याच्याजवळ काय राहिलें होतें ! अत्यंत उद्विग्न मनानें तो आपल्या खोलींत परत आला.

६

" रॉबर्ट माझी प्रभावती गेली ! " एवढें बोलून विश्वासानें रॉबर्टला एकदम मिठी मारली व तो रडूं लागला.

" विश्वास ! अरे, एवढा एक पेशंट पाहून तुला जर इतकें वाईट वाटलें तर मला आज अनेक तऱ्हेचे असे प्रसंग पाहून किती वाईट वाटलें असेल ! " विश्वासाच्या सांत्वनार्थ रॉबर्टनें वरील उद्गार काढले. पण ' माझी प्रभावती ' या शब्दांनीं त्याला आश्चर्य वाटलें. तें क्षणोक्षणीं अधिकच वृद्धिंगत झालें. विश्वासाचा प्रभावतीशीं कोणता संबंध होता हें त्याला या क्षणापर्यंत माहीत नव्हतें.

" तिच्याविषयींचा मीं आपला धर्म पाळला नाहीं; पण रॉबर्ट, तूं मात्र शेवटीं आपला मित्रधर्म पाळलास ! " विश्वास गद्गद कंठानें म्हणाला.

" 'मी तुला जगवीन' असें मीं तिला वचन रे दिलें होतें ! " रॉबर्ट दुःखावेग असह्य होऊन उद्गारला.

" आपल्याला तिच्याविषयींचे धर्म पाळतां आले नाहींत ही चूक आतां हिंदु धर्म अगर ख्रिश्चनधर्म यांना भरून काढतां येईल का रे ? " विश्वासनें प्रश्न केला.

" कर्तव्यकर्म हाच खरा धर्म होय. बाकीचे धर्म सब झूट आहेत." एवढें बोलून रॉबर्टनें आपल्या डोळ्यांना हातरुमाल लावला !

विश्वासला आतां राहवेना. त्यानें सकरुण मुद्रेनें रॉबर्टकडे एकवार पाहिलें आणि म्हटलें, " रॉबर्ट ! अरे, ती माझी विवाहित बायको होती रे ! "

" विश्वास ! ती तुझी विवाहबद्ध पत्नी होती, आणि माझी झाली असती ! " गळ्याशीं आलेला हुंदका कसाबसा दाबीत रॉबर्ट म्हणाला; आणि तो आपल्या खोलींत चालता झाला.

विश्वासच्या डोक्यांत एकदम प्रकाश पडला. त्याच्या त्या दुःखपूर्ण स्थितींतही रॉबर्टच्या धैर्याची त्याला प्रशंसा करावीसें वाटलें. 'भय्या'नें रॉबर्ट होऊन किती त्रास सोसला असेल याची विश्वासला कल्पनादेखील करवेना !

दुसऱ्या दिवशीं रॉबर्टनें विश्वासच्या खोलींत येऊन पाहिलें, तों ती मोकळी होती ! टेबलावर एक कागदांचें पुडकें होतें व त्यावर एक चिठी होती.

" प्रिय मित्र भय्या यास—

मित्रकर्तव्य म्हणून हें माझें पुस्तक प्रसिद्ध कर. जगांतून मी गेलों तरी माझी खऱ्या धर्मजागृतीची मनीषा हें पुस्तक पूर्ण करील.

विश्वास."

विश्वास नंतर जो निघून गेला तो पुन्हा परत आला नाहीं. मग त्याचें काय झालें तें त्याचें त्यालाच माहीत !

थाऱ्याशिवाय—!

फ़ाहाट होण्याच्या बेताला, लपतछपत, भीत भीत कृष्णानें त्या गांवाच्या शिवे-पर्यंतची मजल गांठली. आपणांस कोणी पहात तर नाहीं ना ? अशा प्रश्नार्थक मुद्रेनें त्याचें आसपास दृष्टिक्षेप करण्याचें काम चालू होतें. चोरपावलें टाकीत टाकीत त्यानें आपल्या जन्मभूमीच्या शिवेच्या आंत पाऊल घातलें. त्याची कावरी-बावरी नजर अतिशय जलद रीतीनें चोहों बाजूंला फिरत होती. आणि त्याच्या तोंडांतून उष्ण निःश्वास बाहेर पडत होते. चालण्याच्या श्रमानें त्याचें शरीर थकून गेलें होतें. स्वभावतःच तांबूस असलेला त्याच्या डोळ्यांतील अंतर्भाग अतिशय आरक्त झाला होता.

त्या गांवच्या शिवेलगतच स्मशानभूमि होती. गांवांत प्रवेश मिळविणाऱ्या कोणत्याही वाटसरूला ही स्मशानभूमि ओलांडून जावें लागत असे. त्या जागीं साधारणतः मध्यावरच असणाऱ्या झाडालगत कृष्णा चालून गेला नाहीं तोंच त्याला लांबून दिव्यांचा प्रकाश पडल्याचा भास झाला. त्यानें प्रकाशाच्या अनुरोधानें बऱ्याच दूरवर रोंखून बघितलें. स्मशानभूमीकडे अशा वेळीं साधारणतः कालवश झालेल्या एखाद्या व्यक्तीचा अंत्यविधि करण्याकरितांच कांहीं मंडळी येत असावी असा त्यानें तर्क केला. आपण कोणाच्याही दृष्टीस पडतां कामा नये असें वाटून कृष्णानें त्याच झाडाचा आश्रय केला. ती मंडळी जसजशी जवळ जवळ येऊं लागली तसतशी त्याला अधिकच भीति वाटूं लागली. तो चटकन् झाडावर चढला आणि एका जाडशा फांदीवर टेकून बसला. येणारी मंडळी जसजशी त्या झाडा-जवळ येऊं लागली तसतशी त्याची धास्ती अधिकच वाढली. त्यानें आपला श्वास कोंडून धरला, आणि एखाद्या नकली चित्राइतकी त्यानें स्तब्धता धारण केली. त्या झाडाजवळून ती मंडळी जाऊं लागली, त्या मंडळींनीं खांद्यावर वाहून आणलेली मृत व्यक्ति कृष्णाच्या फारच जवळून गेली, व निमिषमात्रच कृष्णानें त्या कलेवरा-कडे निरखून पाहिलें !

ती मंडळी झाडापासून थोडी दूर गेली, व मृत व्यक्तीचा अंत्यविधि सुरू झाला. कृष्णाची स्तब्धता अद्याप मुळींच कमी झाली नव्हती. मात्र त्याच्या घट्ट मिटले-ल्या डोळ्यांतून आंसवें गळत होतीं. तोंड उघडें राहिल्यास कदाचित् चुकून

एखादा हुंदका बाहेर पडेल या भयानें त्यानें वरखालचे दात अगदीं घट्ट दाबून धरले होते.

न्हावयाचे ते सर्व विधि फारच थोड्या वेळांत पूर्ण झाले. अग्निसंस्कार करण्यास आलेली मंडळी आपआपसांत बोलत बोलत स्मशानभूमीच्या बाहेर पडली आणि थोड्याच वेळांत दृष्टीआडसुद्धां झाली.

सकंप शरीरानें कृष्णा झाडावरून खालीं उतरला. भडकलेल्या चितेजवळ जाऊन त्यानें साष्टांग नमस्कार घातला. चितेलगत उभें राहून त्यानें पुन्हा एकदां हात जोडले. त्यानें डोळे मिटून घेतले. ती क्रिया होत असतांना त्याच्या डोळ्यांतून कितीतरी अश्रु ओघळले. त्याचे ओंठ स्फुरण पावूं लागले, आणि एक अनावर हुंदका त्यांच्यांतून बाहेर पडला.

त्या दुःखपूर्ण स्थितींत तो किती वेळ तरी उभा राहिला होता. प्रज्वलित चितेचा उजेड आसपासच्या बऱ्याच भागावर पडलेला होता. कृष्णाच्या तोंडावर तर त्या चितेचा उजेड पडून तें तांबडें लाल दिसत होतें. डोळ्यांतून स्रवणाऱ्या अश्रूंचा आणि त्या उजेडाचा संयोग होऊन त्या अश्रूंना फारच तेज चढत होतें.

त्यानें डोळे उघडले आणि त्या चितेजवळ अर्धवट विझलेल्या भागांतील ऊन ऊन राख बोटांच्या चिमटीनें उचलून घेऊन आपल्या कपाळाला अत्यंत भक्ति-भावानें लाविली. एकदां, दोनदां, तीनदां त्यानें तोच प्रकार केला आणि पुन्हा एकदा साष्टांग नमस्कार घालून हात जोडले. त्याचे ओंठ स्फुरण पावले आणि त्यानें बोलण्यास आरंभ केला.—

"आई, पांच वर्षांनीं तुझ्या दर्शनाला आज मी किती तरी आशेनें आलों होतों; पण तुझी व माझी गांठ अर्ध्या वाटेवरच अशा आकस्मिक तऱ्हेनें व इतक्या विचित्र स्थितींत पडेल अशी मला यत्किंचित्‌सुद्धां कल्पना नव्हती. आई, आपली भेट झाली, मीं तुला बघितलें, तुला नमस्कार केला; पण तूं मात्र माझ्याकडे बघितलें नाहींस आणि मला आयुष्यवंत होण्याचा आशीर्वादही दिला नाहींस. तुझे प्रेमळ दृष्टिक्षेप, आणि अश्रुपूर्ण आशीर्वाद यांच्या अभावीं आधींच दुःखमय असलेल्या माझ्या आयुष्याला सुखाची सावली कधींसुद्धां दिसावयाची नाहीं. आतां माझा उरलेला भोग भोगून परत तरी मी कोणाच्या आशेवर येऊं!"

त्याचा हुंदका अनावर झाला. डोळ्यांतून ओघळणारे अश्रु आंवरण्याचा त्यानें

आपल्याकडून फार प्रयत्न चालविला होता. पण जों जों तो आपलें दुःख गिळण्याची जास्त जास्त धडपड करूं लागला तों तों गंगायमुनांचा प्रवाह अधिकच जोरानें सुरू झाला. हुंदक्यांच्या पराकाष्ठेमुळें त्याचा शब्द अधिकच जड होऊन अजीबात उमटेनासा झाला. त्याच्या मनांतील विचारांची खळबळ खवळलेल्या समुद्राप्रमाणें अधिकाधिक जोरदार होऊं लागली. आतांपर्यंतच्या त्याच्या आयुष्यांत तो इतका निराश कधींच झाला नव्हता. त्याच्यावर अनेक संकटें आलीं. गरिबी होती, वडीलभावंडांच्या मृत्यूचें दुःख होतें, वृद्ध आईच्या आधिव्याधींनीं त्याला यापूर्वी किती तरी वेळां त्रास झाला होता, स्वतःचा कांहींही अपराध नसतांना तो कोर्टांत आरोपी ठरला जाऊन सक्त मजुरीची कैदही त्यानें त्या क्षणापर्यंत भोगली होती व यानंतर त्याला पुन्हा उरलेली कैद भोगावयाचीच होती! इतक्या दुःखांत त्याच्या मनावर कधींही निराशेचा पगडा बसला नव्हता. पण आज जवळ जवळ पांच वर्षांच्या विरहानंतर तो आईला भेटण्याकरितां मोठ्या आशेनें आपल्या मातृभूमीकडे—जन्मभूमीकडे—चालला असतांना स्वतःच्या प्रेमळ मातेचें प्रेतस्वरूप पाहण्याचें त्याच्या नशिबीं आलें आणि त्या दुःखानें त्याची फार निराशा झाली. त्याला वाटलें आपल्याला किती थोडा उशीर झाला. एक दिवस जर आपण आधीं आलों असतों तर आपल्याला आपली आई भेटली असती. तिनें प्रेम-भरानें आपल्याशीं भाषण केलें असतें. कशाही स्थितींत कां होईना, तिची आठवण ठेवून आपण तिच्या प्रेमाखातर जीव तोंडीत धांवून आलों म्हणून तिला कौतुक वाटलें असतें. त्या कौतुकाच्या भरांत अश्रुपूर्ण दृष्टीनें तिनें माझ्याकडे बघितलें असतें. अशा किती तरी गोष्टी त्याच्या मनांत काहूर करीत होत्या. असल्या न घडलेल्या गोष्टींची कल्पना करतां करतांच त्याचें दुःख थोडेंफार हलकें झालें. कल्पनेच्या सृष्टींतून त्याच्या मनाचें परिभ्रमण सत्यसृष्टींत होऊं लागलें. त्याचा दुःख-भार आतां जरासा कमी झाला होता. आतां या जगांत जगण्याचें तरी आपल्याला काय कारण आहे असें वाटून त्याच्या मनांत निरनिराळे विचार येऊं लागले. आपण या वेळेला जगांतूनच आपली सुटका करून घेतली तर... आईची कदाचित् भेट होण्याचा योग येईल...पण—पण आपण परवां नाइकाला दिलेल्या वचनाची काय वाट!...त्याला आपण परत येऊं असें निक्षून सांगितलें असतां परत न जातां इकडेच जिवाचें कांहीं बरेंवाईट करून घेतलें तर आपण त्याला दिलेल्या शब्दाचा काय उपयोग!...आपल्या शब्दाला किंमत नाहीं अशीच त्या नाइकाची समजूत

नाहीं का होणार ?...पापाचरण न करतांच जर आपल्याला इतकीं दुःखें भोगावीं लागलीं तर वचनभंगाचें पाप करून आपल्याला अधिक त्रास नाहीं का होणार ?....

त्या द्विधा मनःस्थितींत तो अत्यंत उद्विग्न झाला. आपण कोठें उभे आहोंत काय करीत आहोंत, आपण कोणत्या स्थितींत आहोंत याची देखील जाणीव तो विसरला. त्या तंद्रींतच तो जरा दूर झाला आणि एका बाजूला खालीं बसला. खालीं बसतो न बसतो तोंच एक मोठा आवाज झाला. जळत असलेल्या प्रेताच्या डोक्याची कवटी फुटून तो मोठा आवाज झाला होता! तो आवाज ऐकून कृष्णा भानावर आला आणि पुन्हा त्याला आपल्या दुःखाची जाणीव झाली.

नाइकाला वचन दिल्याप्रमाणें जर आपण परत गेलों नाहीं तर नाइकाला आपल्याबद्दल अविश्वास वाटेल...आणि आपल्यासारख्याच दुसऱ्या एखाद्या आपद्ग्रस्त व्यक्तीला मदत करण्याचें तो पूर्णपणें नाकारील. मग त्या व्यक्तीच्या दुःखाला आपणच पर्यायानें कारण नाहीं का होणार ?

हा विचार मनांत येतांच त्याला कसेंसेंच झालें. आणि एक-दोन दिवसांपूर्वी नाइकापाशीं याचना करीत असतांना आपली किती करुणास्पद स्थिति झाली होती त्याचें चित्र त्याच्या डोळ्यांसमोर उभें राहिलें.

* * *

२

तुरुंगांतील इतर कैद्यांबरोबर त्या दिवशीं संध्याकाळीं कृष्णाही आपल्या कोठडींत परत आला. परत आल्यावर अर्धवट अंधार पडलेल्या जागीं तो भिंतीशीं टेकून बसला. बाहेरून पहारा करणाऱ्या नाइकाची त्याच्यावर दृष्टि गेली, त्या वेळीं तो रडत होता. प्रेमळ नाइकाला त्याची कींव आली आणि त्यानें म्हटलें, "बाबारे, केल्या कर्मांचीं फळें भोगतो आहेस! आतां रडून काय होणार!"

ते शब्द ऐकून कृष्णाला अधिकच रडूं कोसळलें आणि नाइकसाहेबांना उद्देशून तो म्हणाला, "नाईकसाहेब, माझी हकीकत मीं आपणास सांगितली व आपला त्यावर विश्वास बसला तर आपल्याला माझ्याबद्दल खात्रीनें दया येईल."

"खरी काय नी खोटी काय ? ही हकीकत ऐकूनच तुला कोर्टानें ही शिक्षा केली ना!—"

"हो नाईकसाहेब. ही माझी हकीकत मीं कोर्टांत सांगितली; पण कोर्टाला ती

खरी वाटली नाहीं त्याला मी काय करूं ? पण तुमच्या गळ्याशपथ हा माझ्यावरचा आरोप खोटा आहे ! ”

“ तुझ्या बाजूनें कोर्टांत पुरावा नव्हता का ? ”

“ नाईकसाहेब, माझ्यावरचा आरोप आपल्याला कळला म्हणजे आपल्या सुद्धां ध्यानांत येईल कीं, असल्या आरोपाला पुरावा मिळणें शक्य नसतें ! ”

“ पण तूं असा कोणता अपराध केलास ? ”

“ नाइकसाहेब, सांगावयाला लाज वाटते, पण तुम्हांला आतां निर्लज्जपणें सर्व हकीकत सांगतों. या, जरा जवळ येऊन बसा. या गरिबावर एवढी कृपा करा ! ”

दिवसभर उभ्यानें आणि मुक्यानें सक्त पहारा करणाऱ्या नाइकालाही असा कांहीं तरी पालट हवाच होता ! गजांच्या दाराबाहेर नाईक कृष्णाकडे अर्धवट तोंड करून बसला. आज किती तरी दिवसांनीं–छे वर्षांनीं–कृष्णाला इतकें जिव्हाळ्याचें माणूस भेटलें. तोही दारापर्यंत गेला आणि तेथें खालीं बसून त्यानें नाइकाला उद्देशून आपली हकीकत सांगण्यास आरंभ केला.

“ त्या वेळेला मी आणि माझी आई आमच्या शेतावरच्या झोंपडींत रहात होतों. शेताचें काम करून गुरें चरवून आणण्याचें कामही मी करीत असें. म्हातारपणामुळें आईला कांहीं काबाडकष्ट होत नसत. घरांत बसल्या बसल्या ती कसेंबसें स्वयंपाकपाणी करीत असे.

एके दिवशीं दुपारच्या वेळीं गुरें चारतां चारतां मी आमच्या शेतापासून चांगला दोन मैल लांब गेलों. तेथें गुडघाभर पाण्याचा एक ओढा होता. माझीं गुरें त्या ओढ्याचें प णी पिण्याकरितां त्या ओढयांत उतरलीं. शेताच्या बांधावर उभा राहून मी ओढयाकडे उतरून जाणाऱ्या गुरांना नीट रस्त्यानें जाण्याकरितां साद घालीत होतों. पाण्यापाशीं गुरें पोहोंचल्यावर मीं सहज ओढयाच्या पलीकडे असलेल्या आंबराईकडे पाहिलें. एका आंब्याच्या झाडाखालीं आमच्या गांवचा...पण नको...मी त्याचें नांव घेत नाहीं...माझ्या जिभेला विटाळ होईल. तो त्या आंब्याच्या झाडाखालीं उभा राहून पाटलाच्या मुलीशीं कांहीं तरी बोलत होता. माझी चाहूल लागतांच त्यांच्या आधींच्या ठरावाप्रमाणें त्या मुलीनें माझ्याकडे बघून केविलवाण्या स्वरांत ‘धावा धावा’ असें म्हटलें.”

कृष्णाच्या बोलण्याला नाइकाच्या प्रश्नानें खंड पडला. नाइकानीं शंका विचारली, “ आधींचा ठराव म्हणजे काय ? ”

"तेंच सांगतों ऐका." असें म्हणून कृष्णानें पुन्हा हकीकत सांगण्यास आरंभ केला.

"एवढ्या वेळांत त्या चांडाळानें तिचा हात धरला होता. मला तिची फार दया आली. मी तीरासारखा धांवून गेलों. त्याच्याजवळ जाऊन मी पोहोंचेपर्यंत त्या दोघांपैकीं कोणीही हाललें नाहीं. त्याच वेळीं मला त्यांचा डाव समजून यावयास पाहिजे होता; पण माझें पुरें दुर्दैव ओढवलें होतें. जवळ जाऊन मीं त्या नीचाचा हात धरला. त्यानें तो सोडवून घेतला. त्या पाटलाच्या मुलीनें माझ्याशीं एकदम लगट केली आणि माझ्या हाताचा विळखा आपल्या अंगाभोंवतीं घेतला. मला एक तऱ्हेची धुंदी आली होती. एका संकटांत सांपडलेल्या मुलीला मीं ऐन वेळीं मदत केली या विचारानें मी बेहोष झालों होतों. मींही तिला जवळ घेतली. पण नाइक-साहेब, गळ्याची शपथ घेऊन तुम्हांला सांगतों कीं, तुम्हीं आपल्या पाठच्या बहिणीला जितक्या निर्मळ मनानें जवळ घेतलें असतें तितक्या निर्मळपणानें मीं तिला जवळ घेतलें. पण माझेंच दैव खोटें ! मीं केलेला चांगुलपणा माझा मलाच नडला ! त्या चांडाळानें उलट माझाच हात धरून माझ्या तोंडांत भडकाविली आणि नाईक, यानें स्वतःच केलेल्या पापाचें खापर माझ्या माथीं फोडलें ! वेळ आली म्हणजे सगळ्या गोष्टी न सांगतां होतात म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. आपल्या मुलीचा शोध करीत करीत पाटील त्या जागीं आले. ज्या मुलीला मीं आज वांचविलें अशी माझी कल्पना होती तीच माझ्यावर उलटली. तिनें आपल्या बापाच्या मनांत माझ्या-विषयीं नाहीं नाहीं त्या गोष्टी माझ्या देखत भरवून दिल्या. ज्या गोष्टी मीं मुळींच केल्या नव्हत्या, त्या गोष्टींचा आरोप तिनें माझ्यावर अगदीं निर्लज्जपणानें केला. जें पापाचरण त्या क्षणापर्यंत माझ्या कधींसुद्धां अनुभवांत नव्हतें तें तिनें माझ्या अंगीं लावलें आणि शिवाय त्या दुष्ट चांडाळानें या सर्वाला आणखी भर दिली. मला संताप आला ! पण पाटलांचा संताप अनावर झाला ! पाटलांनीं मला शिव्यांची लाखोली वाहिली. सर्व गोष्टी इतक्या विचित्रपणानें घडून आल्या कीं, मला बोलण्यास, खरी हकीकत सांगण्यास एका क्षणाचाही अवसर मिळाला नाहीं ! करावयाला गेलों काय आणि झालें काय याचेंच आश्चर्य करीत मी जागच्या जागीं उभा राहिलों. नाईक, पुढल्या गोष्टी तुम्हांला सांगितल्याच पाहिजेत असें नाहीं; माझ्यावर पाटलांनीं रीतसर खटला भरला !"

ही हकीकत सांगत असतांना कृष्णाचें अंग संतापानें थरथर कांपत होतें. जणुं

काय मागचा सांचलेला सर्व संताप या वेळीं त्याच्या अंगांत संचारला होता. हकीकत ऐकत असतांना नाइकांची दृष्टि कृष्णावर खिळून राहिली होती. सर्व वृत्तांत ऐकून त्यांना किती आश्चर्य वाटत होतें हें त्यांच्या मुद्रेवरून सहज समजण्यासारखें होतें. ती हकीकत पुढें ऐकण्याबद्दल नाईक फारच उत्सुक दिसले. त्यांनीं विचारलें, " मग पुढें कोटांत काय झालें ? "

" नाईक, सांगावयाला फार लाज वाटते. अजूनही मला सांगावेंसें वाटत नाहीं; पण सांगतोंच. माझी खरी हकिकत माहीत असलेला एखादा तरी मनुष्य या जगांत असावा म्हणूनच ती मी सांगतों. कोटांत माझ्याविरुद्ध आलेला पुरावा अगदीं बिनतोड होता. माझ्याविरुद्ध किती तरी साक्षीदार तयार होते. पण सर्वांत दुःखाची, आश्चर्याची गोष्ट म्हणजे परमेश्वरसुद्धां माझ्या विरुद्ध बाजूचा साक्षीदार बनला होता. नाईक, कसें सांगूं ? पण आतां न सांगून तरी काय करूं ? नाईक, पाटलांच्या मुलीला कांहीं महिने गेले होते. तिचें लग्न झालेलें नव्हतें. आणि प्रत्यक्ष मुलीनें त्या सर्व प्रकाराचें खापर माझ्या माथीं फोडलें. मला आपली हकीकत सांगण्याचा कोर्टाकडून हुकूम झाला. नाईक, तुम्हांला सांगितलेली ही हकीकत मीं कोर्टांत अगदीं शांतपणानें सांगितली. पण माझ्याविरुद्ध असलेल्या पुराव्या-पुढें ही हकीकत अगदींच लंगडी पडली ! "

कृष्णा एवढें बोलून थोडा थांबला नाहीं तोंच नाइकांच्या तोंडून 'अरेरे !' असे दुःखाचे उद्गार निघाले. त्यांनीं अत्यंत अधीरपणानें विचारलें, " मग कोर्टानें काय निकाल दिला ? "

" कोर्टाचा निकाल दुसऱ्या दिवशीं व्हावयाचा होता. पुढें काय होईल, काय न होईल या भीतीनें माझी आई त्या दिवशीं कोटांत आलेली मला दिसली. आरोपी म्हणून पकडल्यापासून माझ्या आईचें मला एकदांदेखील दर्शन झालें नव्हतें. कोर्टामध्यें गांवांतले इतरही कित्येक लोक आले होते. आरोपीची आई म्हणून सर्व लोकांची दृष्टि तिच्यावर खिळली होती. ठरलेल्या वेळीं कोर्टाचें काम सुरू झालें. सर्व लोक निकालाची वाट मोठ्या आतुरतेनें पहात होते. मलासुद्धां निकालाची उत्कंठा लागली होती. मी अतिशय अधीर झालों होतों. साहेबांनीं सर्व पुराव्या-वरून एक लांबलचक भाषण लिहून काढलें होतें तें वाचून दाखविलें. मराठींत त्याचा गोषवारा सांगण्यांत आला. एकंदरींत माझ्यावर गुन्हा शाबीत होण्याचा रंगा दिसूं लागला. मधून मधून मी आपल्या आईकडे पहात होतों. ती पदरानें आपले डोळे

पुशीत होती. मलासुद्धां गाडींवरून येत होतें; पण काय उपयोग ! कोर्टानें निकाल सांगितला आणि आरोपीला 'सात वर्षांची सक्त मजुरी' फर्मावली. आणि मला या तुरुंगांत आणण्याबद्दलचा शिपायांना हुकूम सुटला. कोर्टाचें काम संपल्याबरोबर जमलेल्या मंडळीच्या बोलाचालीनें गोंगाट झाला. मीं एकवार माझ्या आईकडे पाहिलें, तों ती माझ्याकडेच चालत येत होती. मी कोर्टाच्या दरवाज्यांतून बाहेर पडून बाहेरच्या पटांगणांत आलों नाहीं तोंच माझी म्हातारी आई माझ्या दंडाला बांधलेल्या दोरीला धरून चाललेल्या शिपायाजवळ आली. तिनें विचारलें, 'दादा, काय निकाल झाला ?' मी तिच्याकडे पहात होतों. पण माझा गळा भरून आला होता. शिपायानें उत्तर दिलें, 'बाई, चालला तुरुंगांत सात वर्षें !' तें उत्तर तिला ऐकूं गेलें. मलाही पूर्णपणें ऐकूं आलें. माझा पाय थोडासा घोटाळला; पण माझ्या दंडाला हिसका बसला. नाईक, तेव्हांपासून मी येथें आहें तें तुमच्या पहाण्यांत आहेच !"

"मग त्या तुझ्या आईचें पुढें काय झालें ?"

"नाईक, तिनें जेव्हां त्या शिपायाचें उत्तर ऐकलें तेव्हां तिला भोंवळ आली. आम्ही थोडे दूर जातों न जातों तोंच एक मोठा थोरला आवाज झाला. त्या शिपायानें आणि मीं मागें वळून पाहिलें तों ती खालीं पडली होती. नाईक ! तिला पडलेली पाहून माझा जीव अगदीं थोडा थोडा होऊं लागला. पण जीव कासावीस होऊन मी काय करणार ? मला थोडेंच तिच्याकडे जाऊन तिला उठवितां येत होतें ?"

"मग आतां तिची खबर काय ?"

"नाईक, आज पांच वर्षें झालीं मला या तुरुंगांत आल्याला. तिची मला कांहींच बातमी कळली नाहीं."

नाइकांच्या डोळ्यांना पाणी आलें. त्यांनीं तोंड बाजूला वळविलें. नाइकांच्याकडे आशेनें बघत कृष्णानें म्हटलें, "नाईक, आतां माझें एक काम ऐकाल का ?"

"माझ्याकडून होण्यासारखें असेल तर मी कां ऐकणार नाहीं ?"

"नाईक, काम फारसें मोठें नाहीं. जरा धाडसाचें आहे म्हणून आपल्याला विनंति करतों."

"अरे, पण आतां आडेवेढे घेऊन किती बोलणार ? चटकन् सांगून टाक ना काय तुझें काम आहे तें !"

कृष्णानें भीत भीत म्हटलें, "माझ्या आईचा कांहीं तरी समाचार कळावा अशी माझी इच्छा आहे."

"मीसुद्धां रजा मिळवून जाऊन येईन तुझ्या गांवीं, आणि पाहीन तुझ्या आईची हालहवाल."

"पण नाईक, स्वतः तिला डोळ्यांनीं पाहून यावेंसें वाटतें मला!"

"पण तें कसें जमेल?"

"नाईक, आपणच माझ्यावर पहाऱ्याला असतां. निदान सध्यां तरी कांहीं दिवस आहांत. आपण मला दोन दिवस मोकळें सोडाल तर तिसऱ्या रात्रीला आपल्या पायापाशीं मी हजर होईन."

"आणि आला नाहींस म्हणजे?"

"नाईक, आपण वेलाशक वर्दी द्या कीं, कृष्णा फरारी झाला म्हणून."

"तूंच वेळेला सांगशील कीं, यांनींच मला सोडलें म्हणून!"

"गळ्याची शपथ—तुमच्या पायांची शपथ मी असें सांगावयाचा नाहीं. इतकी पाळी यावयाचीच नाहीं. मी तिसऱ्या रात्रीं येथें हजर होतों."

नाइकांनीं बरेच आढेवेढे घेतले; पण कृष्णानें गयांवयां करून फारच गळ घातली. नाइकांनाही त्याची फार दया आली; आणि त्यांनीं त्या रात्रीं त्याचा दरवाजा खुला केला.

ॐ ॐ ॐ

पहाटेच्या सुमाराला मागें सांगितल्याप्रमाणें कृष्णा आपल्या गांवच्या शिवेशीं दाखल झाला, आणि अतिशय विचित्र परिस्थितींत त्याची व आईची भेट झाली. त्याच्या आईचें त्याला अखेरचें दर्शन झालें!

ॐ ॐ ॐ

दुसऱ्याच रात्रीच्या पहाटेला कृष्णा तुरुंगाच्या आवारांत हजर झाला. त्याची चाहूल लागतांच पहारा करीत असलेल्या नाइकांनीं सभोंवतीं दृष्टि फिरविली. क्षणा दोन क्षणांच्या अवधींतच कृष्णानें त्यांच्या पायांवर लोटांगण घातलें. त्याच्या कोठडीचें कुलूप उघडून त्यांनीं त्याला आंत लोटलें.

दुसऱ्या दिवशीं कृष्णा संध्याकाळच्या कामावरून परत आल्यावर नाइकांनीं त्याला विचारलें, "भेटली का तुझी आई? इतक्या लवकर कसा परत आलास?"

" आईचें अखेरचें दर्शनच फक्त मला घडलें. आतां पुन्हा या जन्मांत आईची भेट व्हावयाची नाहीं !"

कृष्णाचे डोळे पाण्यानें भरून आले. नाइकांचें तोंड उतरून गेलें. " नाईक, आतां मला तुम्हीं मरेपर्यंत जरी तुरुंगांत ठेवलें तरी मला वाईट वाटावयाचें नाहीं. तुरुंगाच्या बाहेर तरी आतां कोणाकरितां पडावयाचें ? " कृष्णा गद्गद स्वरांत म्हणाला.

* * *

३

रोजचे कंटाळवाणे व्यवसाय करतां करतांच कृष्णाच्या तुरुंगवासाची मुदत एकदांची संपली. त्याच्याबरोबर इतर कमी अधिक शिक्षा झालेले किती तरी कैदी त्या दिवशीं सुटावयाचे होते. सरकारी रीत्या जाहीर झालेल्या वेळीं कैद्यांच्या कोठड्यांचे दरवाजे खुले झाले. बहुधा सर्व कैदी कांहींशा आनंदानेंच बाहेर पडले; पण कृष्णाला मात्र बाहेर पडतांना मुळींसुद्धां उत्साह वाटत नव्हता. बाहेरच्या आवारांत इतर कैद्यांवर देखरेख करीत असलेल्या नाइकाची व त्याची गाठ पडली. त्यानें नाइकाच्या पायाला हात लावून नमस्कार केला आणि म्हटलें, " नाईक, आपले उपकार मी जन्मोजन्मीं विसरणार नाहीं."

नाइकांनीं उत्तर दिलें, " कृष्णा, जा. तूं खरोखरच जर निर्दोषी असशील तर तुला सुखाचे दिवस दिसल्याशिवाय रहाणार नाहींत. या जन्मीं नाहीं तरी निदान पुढल्या जन्मीं तरी तुला परमेश्वर आनंदांत ठेवल्याशिवाय खास रहाणार नाहीं. त्या परमेश्वराची आठवण मात्र रोज ठेवीत जा. माझी तुला जेव्हां जेव्हां आठवण होईल तेव्हां तेव्हां तुला मदत करण्याची, तुझ्यावर दया दाखविण्याची ज्यानें मला प्रेरणा केली त्याचें स्मरण करीत जा. माझ्या पायावर डोकें ठेवण्याच्या ऐवजीं समोर मावळत असलेल्या सूर्यनारायणाला साष्टांग नमस्कार घाल."

नाइकांच्या आवाजांत गंभीरपणाचें आणि प्रेमळपणाचें इतकें सूक्ष्म संमिश्रण झालें होतें कीं, त्यांचें बोलणें संपतें न संपतें तोंच कृष्णानें अत्यंत भक्तिभावानें अस्तमान होणाऱ्या सूर्यनारायणाला वंदन केलें आणि तो जाण्याकरितां निघाला. त्याचे पाय अडखळत होते.

कृष्णा वाट चालूं लागला. तो दृष्टीआड होईपर्यंत नाईक त्याच्याकडे सारखे टक लावून बघत होते. तो जसजसा दूरदूर जात होता तसतसें त्यांच्या डोळ्यांत पांणी येऊं लागलें. कृष्णाच्या जाण्याचा व आपल्या डोळ्यांतून ओघळणाऱ्या

आंसवांचा संबंध काय असा त्यांचा त्यांनाच प्रश्न पडला. पण त्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर त्यांचें त्यांना सुद्धां देतां आलें नाहीं !

ॐ ॐ ॐ

जड पावलांनीं वाट चालत चालत दुपार होण्याच्या वेताला कृष्णा स्वतःच्या गांवाच्या स्मशानभूमीपाशीं येऊन ठेपला. ज्या झाडावरून त्यानें आपल्या आईचा अंत्यविधि पाहिला होता तें झाड त्या वेळीं होतें त्याच स्थितींत आजही उभें होतें. त्या सर्व भूभागावर रखरखीत ऊन पडलें होतें. आसपास कुठून तरी ओढ्याची खळखळ ऐकूं येत होती.

कृष्णा गांवाच्या पायवाटेची चढण चढून गेला आणि थेट आपल्या गांवांतील घरापाशीं आला. त्याच्या अंगावर फारसे कपडे नव्हते. होते ते कपडे इतके मळकट आणि जीर्ण होते कीं, त्याला कोणींही भिकारीच म्हटलें असतें. त्याच्या डोक्यावरील केसांच्या जटा झाल्या होत्या; दाढी फार वाढली होती. त्याचे केस पिकलेले होते आणि अकालींच आलेल्या वृद्धपणाच्या सुरकुत्या त्याच्या केश-विरहित असलेल्या कपोलभागावर आणि कपालभागावर खोल कोरल्या गेल्या होत्या.

आपलें घर उभें असेल या आशेनें तो घरापर्यंत चालून गेला. पण त्या जागीं इतस्ततः मातीचे ढिगारे पडले असून त्याच्या कांहीं कांहीं भागांवर गुडघागुडघा गवत उगवलें होतें. त्या भूप्रदेशाच्या मध्यभागीं कृष्णा जाऊन उभा राहिला. गवतांतून एक कुत्रें अंग झाडीत उठलें आणि त्याच्या अंगावर भुंकूं लागलें ! आधींच पडीक असलेल्या घराची ती झालेली दशा पाहून कृष्णाच्या डोळ्याला पाणी आलें. मंद मंद पावलें टाकीत तो तेथून निघाला. सावकाशीनें चालत चालत तो आपल्या शेताच्या जागीं पोहोंचला. त्या शेतांत गवतसुद्धां उगवलें नव्हतें. त्या शेताची पुन्हा लागवड करूं म्हटलें तर किती तरी प्रयास पडले असते !

तो देखावा पाहून कृष्णाला आपल्या मृतमातेची आठवण झाली. तिला म्हातार-पणीं किती तरी त्रास झाला असेल हा विचार मनांत येऊन त्याचे डोळे पाण्यानें भरून आले. एकुलता एक मुलगा; पण तोसुद्धां मरणसमयीं जवळ नव्हता ! तो निरपराधी आहे हें सुद्धां तिला न समजतांच तिचें देहावसान झालें ! औषधपाण्या-चे, खाण्यापिण्याचे तिचे किती तरी हाल झाले असतील. दिवसचे दिवस तिच्या-कडे शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं ढुंकूनसुद्धां पाहिलें नसेल !

हे सर्व विचार मनांत येऊन त्याला रडूं कोसळलें. त्या असाहाय्य स्थितींत तो एखाद्या लहान मुलासारखा ढसढसून रडला. गांवांत परत येईपर्यंत त्याला जडजड वाटत होतें; पण प्रत्यक्ष डोळ्यांनीं या सर्व गोष्टी पाहिल्यावर त्याचा ऊर भरून आला. समोर असलेल्या भयाण प्रदेशाच्या किती तरी भागांनीं त्याला मागल्या अनेक सुखकर प्रसंगांची आठवण करून देऊन त्याच्या दुःखाला भरती आणली! आणि त्यांतल्या त्यांत प्रत्येक प्रसंगाचा संबंध कांहीं ना कांहीं कारणानें शेवटीं त्याच्या आईशीं पोहोंचत असे, त्यामुळें तर त्याचा शोकावेग अधिकच अनावर होई!

तिसऱ्या प्रहरची वेळ झाली. कृष्णाला फारच भूक लागली होती. लहानपणचे त्याचे कांहीं सवंगडी अद्यापही त्या गांवांत होते. त्यांतील एकदोघांकडे जाऊन, त्यांना आपली ओळख न देतांच त्यांनीं कांहीं दिलें तर पहावें म्हणून तो अशाच एका सवंगड्याकडे गेला.

अत्यंत शांतपणानें कृष्णानें त्या घराचें आंगण ओलांडलें, आणि ओटीच्या पायऱ्यां-पर्यंत जाऊन तो उभा राहिला. ओटीवर बसलेला मालक त्याचा बालमित्र होता. विचित्र वेषांत असलेल्या कृष्णाला त्यानें ओळखलें नाहीं.

" काय पाहिजे ? " त्यानें कृष्णाला अतिशय तिरस्कारानें विचारलें.

" साहेब, दुपारची वेळ आहे, पोटांत आज दोन दिवस कांहीं नाहीं ! "

" हं: जा, जा, आल्या वाटेनें जा. धडधाकट दिसतोस, काम करायला काय झालें ? "

एक अवाक्षरही न काढतां कृष्णानें त्याच्याकडे पाठ फिरविली आणि तो त्या घराच्या बाहेर पडला. आपल्याला कोणींच ओळखणें जर शक्य दिसत नाहीं तर आतां दुसऱ्या कोणत्याही घरांत शिरून भीक मागावयाला काय हरकत आहे ?

हा मनांत आलेला विचार संपतो न संपतो तोंच उजव्या हाताशीं असलेल्या घरांत कृष्णा शिरला, व पुन्हा तसाच ओटीपर्यंत गेला.

त्या घरची आणि तेथील मंडळीची त्याला ओळख पटली. पण त्या मालकानें कृष्णाला मात्र ओळखलें नाहीं. पुन्हा तेंच ! कृष्णानें याचना केली आणि मालकानें त्याला अत्यंत बेपर्वाईनें म्हटलें, " चल हट्, तुझ्या बापाचा कांहीं मी देणेकरी नाहीं लागलों ! "

कृष्णाच्या तोंडाशीं शब्द आले होते कीं, " अधमा, मला तुरुंगांत पाठवायला तूंच कारणीभूत झालास ! आपल्या पापाचें खापर माझ्या माथीं फोडणारा नीच तूंच ! "

पण हे शब्द तोंडाशीं यावयाच्या बेताला त्याची दृष्टि आंत माजघराकडे गेली. मोकळा केशकलाप सोडलेली एक स्त्री त्याच्याकडे पहात उभी होती. कृष्णानें तिला ओळखलें. दोघांची दृष्टिभेट होतांच तिच्या डोळ्यांना खळकन् पाणी आलें. असो. पाटलांच्या मुलीला तरी शेवटीं पश्चात्ताप झाला. बायकांचें मन मऊ असतें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. असले सर्व विचार एका निमिषमात्रांत त्याच्या मनांत आले. इतक्यांत तो नीच खेंकसला, "दिवसां पाळत ठेवून रात्रीं चोऱ्या करण्याकरितां भीक मागावयाची दुसरें काय ?"

पापाच्या चिखलांत सर्वथैव रेचलेल्या त्या हलकटाचे हे शब्द ऐकून कृष्णाच्या हृदयाचा थरकांप झाला. अत्यंत केंविलवाणी मुद्रा करून त्यानें एकवार माजघराकडे बघितलें. त्या आंतील स्त्रीचें मूकरुदन पाहून त्याच्याही डोळ्यांला पाणी आलें. तो माघारी वळला आणि घराच्या बाहेर पडला.

"रडायला काय होतें आहे ? चोराच्या डोळ्याला नेहमींच चटकन् पाणी येतें म्हणतात." हे त्या पाजी माणसाचे शब्दही त्याच्या कानीं आले.

* * *

अत्यंत उतरून गेलेला कृष्णा संध्याकाळ टळून गेल्यावर त्या स्मशानभूमीकडे चालून आला. त्याची मनःस्थिति अतिशय उद्विग्न झाली होती. भुकेनें तो इतका व्याकुळ झाला होता कीं, त्याला धड उभेंही राहवत नव्हतें.

त्या झाडाजवळ येऊन त्याच्या बुंध्याशीं तो टेकून बसला. त्याचे डोळे लाल झाले होते. आधींच उग्र असलेला त्याचा चेहरा अधिकच कठोर आणि उग्र झाला होता.

स्मशानांत रात्रीची भेसूर शांतता पडली होती. निस्तब्ध बसलेल्या कृष्णाच्या अगदीं थोड्यासुद्धां हालचालीनें कितीतरी मोठा आवाज होत होता. झुळझुळ वहाणाऱ्या ओढ्याचें नित्याचें संगीत त्या शांत वेळेला फारच मोठ्यानें चालू होतें. पक्ष्यांचा किलबिलाट केव्हांच बंद झाला होता. वटवाघुळांच्या चिंवचिंवीनें आणि संचारानें त्या स्मशानप्रांताची शांतता भंग पावत होती. वाऱ्याच्या मंद प्रवाहानें कृष्णाच्या डोक्यावर असलेल्या फांद्या वरखालीं होत होत्या आणि त्यांचीं गळणारीं पानें खालच्या पुलिनप्रदेशावर पडून सळसळ आवाज होत होता. कुत्र्यांची हालचालही थोड्या फार प्रमाणांत चालू होती. कांहीं वास आला कीं, पायांनीं ती जमीन उकरून एखादें जीर्ण हाड चघळण्यास मिळावें या इच्छेनें त्यांचीही कांहीं धडपड चालू होती. दूर अंतरावरून गिधाडांचे पंख केवळ्यानें तरी

फडफडत होते. आणि त्या फडफडाटाला कोठें तरी पडक्या आणि ओसाड जागेंत दबा धरून बसलेल्या घुबडाच्या घूत्काराची साथ मिळत होती. नाहीं म्हणावयाला ज्या जागीं कृष्णाच्या मृतमातेला अग्निसंस्कार झाला होता त्याच जागीं आज दुसरी एक चिता बऱ्याच जोरानें भडकत होती. तेथें वावरणारीं कुत्रीं त्या चितेच्या प्रकाशानें पडलेल्या आपल्याच सावलीला भिऊन एकदम भुंकूं लागत व सर्वत्र शांत असलेल्या वातावरणाला अतिशय भयंकर भीषणता आणीत.

कांहीं वेळानें उठून कृष्णा त्या चितेपाशीं गेला. त्यानें त्या चितेला हात जोडून मनांत म्हटलें, " याच भूमींत माझ्या आईचा आत्मा असेल तर तो मला भेटण्याकरितां खास उत्सुक झाला असेल. जगानें मला कोठेंही थारा न दिलेला पाहून तो अश्रु ढाळीत असेल. मग माझ्याबद्दल सहानुभूति बाळगणारा तेवढा एकच आत्मा असतांना मी त्याच्या भेटीला कां जाऊं नये ? आई, आज तूं असतीस तर—" कृष्णाचा गळा भरून आला. त्याला असह्य वेदना होऊं लागल्या. चितेंतून फुरफुर असा आवाज झाला. कृष्णाला वाटलें आपल्याला भेटण्याकरितां आपल्या आईची धडपड चालली आहे. जगाला तो इतका विटला होता कीं, मेल्यानंतर आपल्या देहाला कोणाचा सुद्धां स्पर्श होऊं नये असें त्याला अगदीं मनापासून वाटत होतें ! समोर जळत असलेल्या चितेला देहार्पण करून भस्मसात् होऊन जगाच्या दृष्टीआड होणें कितीतरी बरें, असा विचार त्याच्या मनांत आला !

त्यानें त्या चितेला एकवार साष्टांग नमस्कार घातला. अर्धवट विझलेल्या भागांतील ऊन ऊन राख मस्तकीं धारण केली, आणि पुन्हा एकदां आकाशाकडे बघून परमेश्वराला हात जोडले आणि मनाशींच म्हटलें, " आई, तूं आज असतीस तर जगानें केलेली हेळसांड पाहून आपली अश्रुपूर्ण दृष्टि माझ्यावरून फिरविली असतीस, मला धीर दिला असतास !......"

त्याचा स्वर गद्गद झाला होता. त्याचे ओठ वांकडेतिकडे होऊन त्याच्या तोंडून कितीतरी अनावर हुंदके बाहेर पडत होते. समोर जळत असलेल्या चितेवर अश्रूंचा अभिषेक होत होता.

बेभान होऊन एका निमिषमात्रांत कृष्णानें त्या चितेवर आपला देह टाकला. कांहीं क्षणच त्या चितेंत धडपड होऊन त्या स्मशानांतील भेसूर शांततेचा भंग झाला ! ती धडपड कितीतरी लवकर शांत—स्तब्ध झाली. त्यानंतर त्या भूप्रदेशाची शांतता कृष्णाच्या हालचालीनें कधींसुद्धां भंग पावली नाहीं !

ॐ ॐ ॐ

आईचा ध्यास

“पण गणू, विन्याचें काम मात्र फार फक्कड झालें बुवा!”

“अरे तें तर कोणीही कबूल करील. आज इतक्या लोकांनीं कामें केलीं, पण सगळ्या मंडळींना विनायकाचेंच काम फार आवडलें.”

“हेडमास्तरांनीं तर त्याची काय तारीफ केली! आपल्याला तर बुवा विनायकाच्या जागीं खरोखरचा संभाजी दिसायला लागला! स्वतः विनायक तर म्हणत होता कीं, आपल्याला आपण विनायक आहों याची आठवणच रहात नाहीं!”

“खरेंच, तो काम करतांना त्यांत अगदीं पुरा गढून जातो. आणि पुन्हा मास्तर म्हणत होते कीं, इतक्या लहान वयांत हें काम करणें म्हणजे कांहीं लहानसान गोष्ट नाहीं.”

“आणखी आठ दिवसांनीं ज्या समारंभाला साहेब येणार आहेत त्यांत म्हणे विनायकाला बक्षीस मिळणार आहे!”

“विनायकाला जर बक्षीस मिळालें तर आपण खास आपल्या वर्गातर्फे त्याला कांहीं तरी मदत करूं.”

“ही युक्ति मोठी छान आहे बुवा! विनायक घरचा फार गरीब आहे, नाहीं का? त्याला म्हणे वडील नाहींत. त्याची आई कुठें तरी मोलमजुरी करून पैसे मिळविते. आज त्याला मास्तरांनीं घरून स्वच्छ आणि जरा किंमतीचे कपडे घालून यायला सांगितलें होतें, पण बिचारा काय करणार? हल्लीं अंगावर आहेत हे कपडे मिळविण्याचीच त्याला मारामार पडत असेल.”

“पण आतां आपण इथें कशाला थांबून रहावयाचें? विनायकाला भेटून त्याच्या बरोबरच घरीं जाऊं.”

रात्रीचे दोन वाजले होते. शाळेचें वार्षिक संमेलन होतें, आणि आज रात्रीं संवादाचा कार्यक्रम पार पडला. विनायकाकडे राजसंन्यासांतील संभाजीचें बंदिखान्यांतील भाषण साभिनय करून दाखविण्याचें काम होतें. सर्व संवाद झाले, आणि मुलें आपापल्या घरोघर जावयास निघालीं. गणू आणि वसंत हे विनायकाचे दोस्त होते. विनायक घरीं जाण्यास निघाला म्हणजे त्याच्याबरोबरच बोलत बोलत जावयाचें असा त्या दोघांचा बेत होता. विनायकाची वाट पहात ते दोघेजण

थांबले असतां वरील संभाषण त्या दोघांमध्यें चालू होतें. विनायक करील तें चांगलें असें त्या दोघांनाही वाटे. मग आज तर काय! संभाजीच्या कामामुळें विनायकाचें नांव सर्वतोमुखीं झालें होतें. त्यामुळें त्या दोघांही दोस्तांना विनायकाला भेटण्याची अतिशय उत्कंठा लागली होती. विनायक केव्हां बाहेर पडेल आणि आपण त्याच्यावर आपल्या प्रेमपूर्ण स्तुतीचा केव्हां एकदां वर्षाव करूं असें त्यांना होऊन गेलें. सर्व मास्तरांनींसुद्धां आज या दोघांजवळ फार स्तुतिपर उद्गार काढले होते. पुढें आठ दिवसांनीं होणाऱ्या समारंभांत विनायकाला खास एखादें उत्तम पारितोषिक मिळणार अशी आज प्रत्येकाला अपेक्षा उत्पन्न झाली. त्या विनायकाच्या आनंदांत भाग घेण्याचा हक्क सर्वांपेक्षां आपणांस अधिक पोहोंचतो असें त्याच्या प्रत्येक मित्राला वाटत होतें. पण वस्तुतः गणू आणि वसंत यांचा मात्र तो खरोखरचा हक्क होता. त्यांचें विनायकावर फार प्रेम होतें. आणि विनायकाच्या सुखाकरतां ते मनापासून नेहमीं प्रयत्न करीत असत. तिघांजणांचें वय असें कांहीं फार नव्हतें. अकरा अकरा वर्षांचीं तीं मुलें. तीं एकमेकांकरितां असें काय करणार! पण त्यांतल्या-त्यांतच त्यांचें एकमेकांवरील प्रेम दृग्गोचर होत असे. एकाला शाबासकी मिळाली, कीं बाकीच्या दोघांनीं मनःपूर्वक संतोष प्रदर्शित करावा, एकाला जर मास्तर रागें भरले तर बाकीच्या दोघांनींही खिन्न व्हावें आणि त्याला समजावण्याचा प्रयत्न करावा इतकें त्यांचें सख्य होतें. प्रत्येकजण स्वतःचे धडे झटून करीत असे. एकमेकांकडून अवघड गोष्टी समजावून घेणें, शाळेंतील वेळांत अभ्यासाखेरीज दुसरें कुठेंही लक्ष न देणें, संध्याकाळीं खेळावयाच्या वेळीं खेळण्यांतही मन लावून आपलें प्रावीण्य दाखविण्याचा प्रयत्न करणें इत्यादि गुणांमुळें शिक्षकवर्गही त्यांच्या-वर लुब्ध होऊन गेला होता; आणि या मुलांची ही लोकप्रियता उत्तरोत्तर वृद्धिंगतच होत होती. त्यामुळें आजच्या विनायकाच्या संभाजीच्या कामानें सर्वजण त्याची मुक्तकण्ठानें स्तुति करीत होते. कांहीं वेळानें विनायक बाहेर आला आणि त्या अंधाऱ्या रात्रीं तीं लहान लहान मुलें एकमेकांच्या सोबतीनें आपल्या घराची वाट चालूं लागलीं. सर्वांनीं केलेली स्तुति विनायकाला मनापासून आनंद देत होती; पण या दोन दोस्तांनीं केलेली स्तुति ऐकून त्याच्या डोळ्यांतून खरोखरच आनंदाश्रु आले!

"खरेंच कारे, माझें काम इतकें चांगलें झालें!" विनायकानें प्रश्न केला.

"अरे, तें कांहीं विचारूं नकोस. ' तूं पाहिलें नाहींस का सगळी मंडळी कशी तटस्थ बसली होती ती!" गणूनें उत्तर दिलें.

"पुढल्या समारंभांत तुला बक्षीस मिळणार आहे!" वसंत म्हणाला.

"तुम्ही माझें काम चांगलें झालें असें म्हणालां याची किंमत मी बक्षिसांपेक्षांही जास्त समजतों." विनायकानें प्रेमपूर्ण भावनेनें म्हटलें.

"आतां पुढल्या समारंभाला आमचे बाबा येतील. ते तुझें काम पाहून खरोखरच फार खूष होतील. ते नेहमीं म्हणत असतात कीं, विद्यार्थ्यानें नुसता अभ्यासच करणें म्हणजे कांहीं जास्त नाहीं. अशी कांहीं तरी प्रत्येकाजवळ कला असावी लागते." गणू मोठ्या कौतुकानें म्हणाला.

"खरेंच कीं, पुढल्या समारंभाला सगळ्या मुलांच्या पालकांनाही बोलावणें जाणार आहे. मग मात्र विनायक, तुझी खरी मजा आहे."

"सर्व पाहुणेमंडळींना आपल्या कामानें खूष करण्यांत मला कांहीं विशेष वाटत नाहीं. त्या पाहुणेमंडळींत माझे बाबा असते तर..."

आपण केलेल्या कोणत्याही गोष्टीचें कौतुक आपल्या घरांतील वडील माणसांनीं करावें अशी लहान मुलांना साहजिकच अपेक्षा असते. आपण शाळेंत वरचा नंबर मिळविला अगर एखाद्या कारणामुळें आपणास बक्षीस मिळालें, तर आईबापांचा प्रेमार्द्र हात आपल्या पाठीवरून एकवार फिरावा, त्यांच्या आपल्यासंबंधींच्या सर्व मनोभावना त्यांनीं एकाच दृष्टिक्षेपानें व्यक्त कराव्यात, आपल्या आप्तेष्टांमध्यें आपल्यासंबंधीं त्यांनीं चार स्तुतिपर उद्गार काढावेत, आणि अन्य उपायांनीं आपल्याला उत्तेजन द्यावें असें प्रत्येक लहान मुलाला वाटत असतें. विनायकाच्या वयाइतक्या लहान मुलांना तर आईबाप म्हणजे परब्रह्म वाटतात. आईनें कौतुक केलें म्हणजे मग जगाच्या निंदेचीही त्यांना पर्वा वाटत नाहीं. बापानें उत्तेजनपर उद्गार काढले कीं मग तीं जगाच्या निरुत्साही निर्भर्त्सनेचीही फिकीर करीत नाहींत. विनायकालाही आज याच कारणानें आपल्या प्रेमळ पित्याची स्मृति झाली. आणि वरील वाक्य तोंडून निघतां निघतांच तो अडखडला आणि त्याचा स्वरही बदलला. 'आज माझे बाबा असते तर...' असे विचार त्याच्या मनांत आले आणि त्याला बरेंच वाईट वाटलें. शिक्षकांनीं स्तुति केली, मित्रमंडळींनीं कौतुक केलें, पण बापाची स्मृति झाल्यामुळें विनायकाला या सर्व गोष्टींचा विसर पडला. 'ते पहा आबासाहेब', म्हणून दृष्टि फांकून बघणारा

संभाजी त्याच्या अंगांत पुन्हा संचरला ! संभाजीला जशी बापाची स्मृति झाली, ज्या भावनेनें त्यानें बापाला अत्यंत करुणाजनक हांक मारली, ज्या वेडावलेल्या मनःस्थितींत त्यानें कृतकर्मांचा पाढा वाचून बापापाशीं क्षमेची याचना केली, ज्या हेतूमुळें संभाजीला आज बापाच्या अनुभवाची आणि उपदेशाची गरज भासली त्या संभाजीच्या भूमिकेची पुनरावृत्ति विनायकाच्या हातून एका क्षणांत होऊन गेली. नाटयसृष्टींतलि संभाजी आणि वस्तुसृष्टींतील विनायक या दोघांनाही बापाची स्मृति सारखीच दुःखदायक वाटली ! विनायक खिन्न झाला, आणि पित्याच्या प्रेमाला आपण मुकलों म्हणजे सर्वस्वाला मुकलों असें त्याच्या निर्व्याज बालमनाला वाटलें. समारंभाला सर्व मुलांच्या घरचीं वडील माणसें येणार आणि आपल्या घरची कोणीही मंडळी येणार नाहींत. बाकीच्यांना आनंद होईल, पण आपली आई येणार नाहीं—आणि—मग तिला तरी आपलें काम कसचें पहावयास मिळणार ! क्षणमात्रच हे विचार विनायकाच्या मनांत येऊन गेले. या त्याच्या विचारतंद्रींतून त्याला वसंतानें जागें केलें.

"का ! संभाजी अंगांत आला कीं काय ?" 'माझे बाबा असते तर...' या विनायकाच्या वाक्यावर नाटकी आवाजानें जोर देऊन वसंतानें विनायकाच्या दुःखाला अधिकच मदत केली ! नेहमींचा आनंदी विनायक आजही आपल्या चेष्टेनें हंसेल असें त्याला वाटलें होतें; पण त्यांत त्याची अर्थातच चूक झाली.

"खरंच वसंता !" विनायक अधिकच गंभीर स्वरांत म्हणाला, "तूं आज जर माझ्या जागीं असतास तर तुझ्या वडिलांना काय वाटलें असतें रे ?"

त्या दोघांही बालमित्रांना विनायकाचे हे हृदयाला पीळ पाडून निघालेले उद्गार ऐकून एकदम विचार करण्याची प्रवृत्ति झाली.

"कल्पनासुद्धां करवायची नाहीं आईबापांना अशा प्रसंगीं काय वाटेल त्याची !" विनायकच त्या दोघांना उद्देशून म्हणाला.

विनायकाचें घर आलें. त्यानें आपल्या दोघांही सोबत्यांचा निरोप घेतला. ते दोघेजण त्याला घरापाशीं सोडून चालते झाले. "आई, दार उघड." म्हणून विनायकानें हांक मारलेली त्यांनीं ऐकली व दार उघडल्याचाही आवाज त्यांच्या कानावर गेला.

"आज विनायकाला फार वाईट वाटेल नाहीं ? साहजिकच आहे. बापाची

आठवण झाल्यावर त्याच्या आजच्या स्थितींत त्याला वाईट वाटणें साहजिक आहे." वसंत म्हणाला.

"त्याची घरची जरा गरिबी नसती ना, म्हणजे त्याला असें वाईट वाटलें नसतें. श्रीमंतींत जरा सुखच जास्त असतें." गणूनें उत्तर दिलें.

"काय करणार? आमचे बाबा म्हणत होते कीं, या विनायकाचा बाप फार सज्जन माणूस होता म्हणून. पण तो लवकर वारला म्हणून त्याच्यावर हा गरिबीचा प्रसंग आला. बरें, त्याची आई तशी कांहीं शिकलेली नाहीं. त्यामुळें चांगल्या घरांतली असूनसुद्धां तिला आतां पोट भरण्याकरितां स्वयंपाकपाणी करावें लागतें. कोणावर केव्हां काय प्रसंग येतो याचा कांहीं नियम नाहीं!" वसंत म्हणाला.

"बाकी त्याची आई जर शिकलेली असती तर तिला मास्तरीण वगैरे होतां आलें असतें, नाहीं? स्वयंपाकीण म्हणून दुसऱ्याच्या घरीं एका चांगल्या बाईनें रहावयाचें म्हणजे किती वाईट?" गणूच्या तोंडून काकुळतीचे उद्गार बाहेर पडले.

"सध्यां त्याची आई कुणाकडे आहे रे?" गणूनेंच पुन्हा प्रश्न केला.

"आहे त्या देशमुखांच्याकडे. तिथें राहिल्याला त्यांना सारे पंधरा दिवसच झाले."

बोलत बोलत हीं दोन मुलें आपल्या घरांपाशीं येऊन ठेपलीं. दोघांचींही घरें जवळजवळच होतीं. घरांच्याजवळ आल्यावर साहजिकच त्यांचें संभाषण बंद झालें.

"उद्यां कांहीं शाळेंत पाठ नाहीं. सुटीच आहे!" वसंत म्हणाला.

"आहे. शाळेंत नसली तरी घरीं पडेल!" गणूनें उत्तर दिलें. दोघांनींही आपल्या घरांतील मंडळीस बाहेरून हांका मारल्या. दारें उघडून ते दोघेही आपापल्या घरांत गेले. पण प्रत्येकाच्या मनांत विनायकाच्या स्थितीनें काहूर माजविलेलें होतें.

* * *

२

"काकू, न्या कीं बबीला. ती मागें लागली आहे, आणि वेळप्रसंग आहे, तुमच्याकडे यावें लागलें तर घर माहीत असलेलें बरें. आजच आतां पहाना! पाहुणेमंडळी दुपारीं आली तेव्हां तुम्ही इथें होतां म्हणून बरें झालें. नाहींतर मग काय केलें असतें! न्या तिला!"

"पण, वहिनीसाहेब, माझ्या घरीं बबुताईसारख्या श्रीमंतांच्या मुलीनें यायचें म्हणजे माझ्या घरांत बसायला तरी कांहीं असलें पाहिजे ना ?"

"काकू, बसायला कांहीं नसलें तर मी उभी राहीन !"

"हो, तुम्ही आपलें थट्टेवारीच नेतां. मी काय गरीब ! माझ्याकडे तुमच्या-सारख्यांनीं यावयाचें कां मीं तुमच्याकडे यावयाचें ?"

"असं कांहीं नाहीं. तुम्हींच आमच्याकडे आलें पाहिजे आणि आम्हीं तुम्हांला घरदार नाहीं असें समजावें काय ? तें कांहीं नाहीं. न्या तिला."

"काकू, अशा अशा तऱ्हेच्याच श्रीमंती थाटांत मीं राहिलें पाहिजे, अमुकच घरांत गेलें पाहिजे असा कांहीं नियम आहे होय ? तें कांहीं नाहीं. मी आज तुमच्याबरोबर तुमच्या घरीं येणार !"

"पण तुम्ही येऊन काय करणार ?"

"काय करणार म्हणजे ? तुमचें घर पहाणार !"

"तसें नव्हे, तुम्हीच घर कशाला बघायला पाहिजे ? एखादा गडी माझ्या-बरोबर पाठविला म्हणजे तो नाहीं का चालायचा ?"

"अहो, पण आमच्याकडे दर आठवड्याला गडी बदलतो. आम्हांलाच गड्याचीं कामें करावीं लागतात. मला कामबीम लागलें म्हणजे मग चटकन् बबीला धाडली कीं तुम्ही याल !"

"आई, त्यांना जर त्यांचा मुलगा नसता तर आपण त्यांना आपल्याकडेच रहावयाला ठेवून घेतलें असतें. पण त्यांच्या त्या विनायकाकरतां त्यांना बिऱ्हाड तरी करावें लागतें आहे."

"जा काकू, बबीला तुमच्याबरोबर घेऊन; पुन्हा आणखी तासाभरानें तुम्हांला स्वयंपाकाला यावयाचेंच आहे. जा ग बबे !"

वरील संवाद देशमुखांच्या घरांतील बाईसाहेब, त्यांची मुलगी बबी व विनायकाची आई यांच्यामध्यें झाला.सरस्वतीकाकूंनीं बरेच आढेवेढे घेतले, पण आज बबीनें त्यांचा अगदीं पाठपुरावा केला. आपलें दैन्य दुसऱ्या कोणाच्याही नजरेस पडूं नये याबद्दल सरस्वती पराकाष्ठेचे श्रम घेत असे. सुखवस्तु कुटुंबें अचानक संकटामुळें जरी दरिद्री झालीं तरी त्यांची पूर्वीची राहणी फारशी बदलत नाहीं. आंतल्याआंत कांहींतरी तजवीज करून आपला बाहेरचा थाट बिघडूं न देण्याचा असे लोक नेहमीं प्रयत्न करतात. सरस्वती सौभाग्यवती होती तेव्हांची तिची स्थिति बरीच सुखाची होती.

निदान पुढील आयुष्याबद्दल त्या उभयतां नवराबायकोंना कशाही तऱ्हेची कधीं चिंता वाटली नाहीं. लग्न होऊन थोड्याच दिवसांत संसाराची नीट घडी बसली. या सर्व आनंदाला द्विगुणित करण्यासारखी जर कोणती गोष्ट घडली असेल तर ती विनायकाचा जन्म होय. विनायकाच्या जन्मानें सरस्वती 'गृहलक्ष्मी' या स्पृहणीय पदवीला सर्वस्वीं अनुरूप ठरली. नवऱ्यानेंही तिला कधीं दुःख दिलें नाहीं. संसार सुखी करणें हेंच व्यवहारी जगांत आपलें ध्येय आहे अशी त्याची पुरी खात्री झाली होती, आणि तदनुरूप आपल्या बायकोला सर्वदा समाधानांत ठेवणें हीच गोष्ट त्याला विशेष महत्त्वाची वाटत होती. सरस्वतीही आपल्या पतीला सदैव सुखासमाधानांत ठेवण्याचा प्रयत्न करी. विनायकाच्या जन्मानें तर या जोडप्याचा आनंद शतपट झाला ! सरस्वती थोडेंसें लिहिण्यास व वाचण्यास शिकली होती; पण तें निर्वाहापुरतेंसुद्धां नाहीं. आणि या सुखमय क्षणांत तिला त्याची गरजही भासली नाहीं. दारीं हत्तीघोडे झुलत नव्हते; पण त्यांच्या अंतःकरणांत सुखसमाधान नांदत होतें. गजान्तलक्ष्मी पायीं लोळण घेत नव्हती, पण खुद्द सरस्वतीच आपल्या दक्ष आणि चतुर स्वभावानें पतीची वृत्ति आनंदी राखीत असे ! या स्थितींत त्या उभयतांना विनायकाला कुठें ठेवूं आणि कुठें न ठेवूं असें होऊन गेल्यास नवल नाहीं. "या पोऱ्याला कशाचीही कधीं वाण पडणार नाहीं." असें बापानें मोठ्या अभिमानानें म्हणावें तर सरस्वतीनें "तो श्रीमंताचा आहे" म्हणून त्याचें कोडकौतुक करावें. पण तिच्या या सुखमय संसाराला काळदृष्ट लागली ! सत्य घडणाऱ्या गोष्टी कथा-वाङ्मयांतून दाखविलेल्या कित्येक गोष्टींहून अधिक विस्मयकारक असतात यांत शंका नाहीं. तिचा नवरा एका गृहस्थाशीं रस्त्यांत बोलत उभा राहिला काय आणि त्याच्या मागच्या घराची भिंत ढळली काय, सर्वच गोष्टी अगदीं अनपेक्षित-पणें घडल्या ! अपघात म्हटला म्हणजे तो सांगून सवरून थोडाच येत असतो ? सरस्वतीचा नवरा तिला असा अचानकपणें सोडून गेला. त्याला सरस्वतीची थोडी फार व्यवस्था करण्यालासुद्धां संधि मिळाली नाहीं. आपणांस मरण येईल हें त्याच्या ध्यानींमनीं सुद्धां नव्हतें. आपल्यावर असा भयंकर प्रसंग येऊन आपली दुःस्थिति होईल असें सरस्वतीला कधीं म्हटल्या कधींसुद्धां वाटलें नव्हतें. घर-कामांत आणि इतर व्यवहारांत ती चाणाक्ष होती. पण स्वतःचा निर्वाह करण्या-संबंधांत तिचा नन्नाचाच पाढा होता. मराठी कादंबऱ्या वाचून ती बहुश्रुत झाली होती; पण शिक्षकीण व्हावयास लागणाऱ्या बहुश्रुतपणाशीं तिची फारकतच झाली

होती. अशा स्थितींत केवळ विनायकाकरितां तिच्यावर जगण्याचा प्रसंग आला; आणि पोटाची खळगी भरण्याकरितां स्वयंपाकीण होण्याचें तिच्या नशिबीं आलें!

बबीला बरोबर घेऊन ती आपल्या चंद्रमौळी घराकडे आली. सर्वंच थाट बदलल्यावर घरही बदललें हें सांगावयाला नकोच. पूर्वीच्या भाड्याच्या टुमदार बंगलीवजा घराला रजा मिळाली. हें कित्येक दिवसांत शाकारणी न झालेलें एक चार खणांचें वादांत पडलेलें घर तिच्या वांट्यास आलें! द्रव्यानें पाठ फिरवल्यावर असल्या गोष्टींनीं पाठपुरावा केल्यास आश्चर्य कसलें? पूर्वीच्या घराभोंवतींचा स्वकष्टानें निर्माण केलेला तो छोटा बगीचा आतां दूर राहिला. आणि त्याऐवजीं रानवेलींकडे पाहून तिला आपल्या डोळ्यांचें पारणें फेडून घ्यावें लागत असे. त्या वेळचीं खुर्च्या-टेबलें स्वस्त दरांत विकलीं गेलीं; त्यांच्या जागीं फाटकीं पोतीं आलीं! अशी दुर्दशा व्हावयास तीन वर्षांचा अवधि अगदीं बस्स होता! कुठें मोलमजुरी मिळाली नाहीं म्हणजे मग घरांतील जिन्नस विकून त्यावरच तिला गुजराण करावी लागे. अशा थाटांत आपण राहतों ही गोष्ट दुसऱ्याच्या नजरेस पडूं नये, त्यामुळें कदाचित् आपल्याला अधिकच लाजिरवाणे प्रसंग सहन करावे लागतील या भीतीनें सरस्वतीची वृत्ति आपलें काम बरें कीं आपण बरे, कोणाशींही विशेष सलगी असूं नये अशी बनत चालली.

त्या दोघींना येऊन फार वेळ झाला नाहीं तोंच विनायक शाळेंतून माघारीं आला. दप्तर दूर फेंकून अंगांतील कपडे त्यानें अस्ताव्यस्त टाकले.

"आई–आई, मला पुढल्या खेपेला नवे कपडे पाहिजेत. आणखी तीन दिवसांनीं शाळेंत साहेब येणार आहेत, तेव्हां पुन्हा माझा पार्ट होणार आहे. परवांचें माझें काम इतकें चांगलें झालें कीं, मला सर्व मास्तर लोक एक खासगी बक्षीस देणार आहेत. पण आई, त्या दिवशीं मला एका दुसऱ्या श्रीमंत मुलानें कपडे घालावयाला दिले होते. तो आज मला सारखा भिकारी म्हणून चिडवीत होता. आणि मला म्हणाला कीं, "माझे कपडे घातलेस म्हणून तुझा पार्ट चांगला झाला." आई, आतां तें कांहीं नाहीं. मला पुढल्या खेपेला माझें स्वतःचे चांगले कपडे पाहिजेत ग. जास्त कांहीं नाहीं. एक पांढरी विजार, आणखी एक मलमलीचा सदरा. देशील ना ग आई?"

विनायकानें आपल्या आईला शाळेंत घडलेला हा वृत्तान्त फार आशेनें सांगितला; पण बबुताईच्या देखत जी गोष्ट होऊं नये म्हणून आपण खबरदारी घेत होतों

तींच नेमकी तिच्या कानावर आपोआप पडली याबद्दल सरस्वतीला फार वाईट वाटलें. आपल्या मुलाचा पार्ट चांगला झाला तो त्याला मिळालेल्या उसन्या कपड्यानें झाला असें कोणासही वाटणार नाहीं, अशी तिची पूर्ण खात्री होती; पण एवढी मुलाची कपड्याची हौस पुरवायलासुद्धां आपली ऐपत नाहीं हा विचार मनांत येतांक्षणींच तिचें हृदय भडभडून आलें, तिच्या डोळ्यांत अश्रु आले !

पुन्हा विनायक म्हणाला, " आई, आज तें कांहीं चालायचें नाहीं. हो म्हण. म्हण ना ग आई ! "

सरस्वतीचा शोक अनावर झाला. तिनें कसेंबसें हो म्हटलें; पण तिच्या तोंडून न कळत एक हुंदका बाहेर पडलाच !

" असें काय करतां काकू ? चालायचेंच असें ! " असें म्हणून बबुताईनें त्यांची वृथा समजूत केली. किती वेळ तरी सरस्वतीचें अश्रुसिंचन चाललें होतें. तिचा ऊर खालीं वर होत होता. आज आपल्या दैन्याची परमावधि झाली असें वाटून तिला कमालीचें दुःख झालें. थोडया वेळानें तिचें तिलाच काय वाटलें कोणास ठाऊक ! तिनें अश्रु पुसले, तोंड स्वच्छ केलें, घसा खांकरून साफ केला " देईन बरें तुला नवीन कपडे " असे शब्द तिच्या तोंडून बाहेर पडले. हृदयांतील वात्सल्य या वाक्यांतील प्रत्येक शब्दागणिक उचंबळून येत होतें. त्याबरोबरच तिचा स्वर पूर्ण निश्चयी झाला. तिनें विनायकाला आश्वासन दिलें. मध्यें घडलेल्या प्रकारानें तो अगदींच घाबरून गेला होता. पण आईच्या या प्रेमळ उद्गारांनीं त्याला थोडा हुरूप आला आणि तो म्हणाला, " आई, तूं तो समारंभ पहायला येशील का ? मास्तरांनीं सांगितलें आहे कीं, त्या दिवशीं प्रत्येक मुलानें आपल्या आईबापास घेऊन यावें. तूं ये कीं ग आई."

यावर सरस्वती काय उत्तर देणार ? ज्या घरीं काम पत्करलें असेल त्या घराव्यतिरिक्त दुसरीकडे कोठेंही जावयाचें नाहीं असा तिनें नियम केला होता. आणि त्यांतून अशा सामुदायिक समारंभांना ती कधींच जायची नाहीं. आपल्या मुलाचें कौतुक आपल्याला घरीं बसून दुरूनच केलें पाहिजे; जगानें त्याची केलेली स्तुति ऐकूनच समाधान मानलें पाहिजे; त्याला मिळालेल्या बाक्षिसावरूनच बाक्षिससमारंभाची कल्पना केली पाहिजे हें तिला पूर्णपणें माहीत होतें. मुलाची ही लोकप्रियता ऐकून—नुसती मुलाकडूनच त्या लोकप्रियतेची वार्ता ऐकून तिला आनंद

झाला, आणि तिनें किंचित् विनोदानें विनायकाला विचारलें, "हो. मी येईन. आणखी कुणाकुणाला घेऊन येऊं ! "

"आणखी ! आणखी यांना घेऊन ये." शेजारीं बसलेल्या बबुताईकडे बोट करीत विनायकानें उत्तर दिलें. या विनायकाच्या बोलण्यानें त्या दोघींनाही अगदीं मनापासून हंसूं आलें. मुलाच्या निष्कपट अंतःकरणाची सरस्वतीला दुसरी कोणती साक्ष हवी होती ! त्यानें सहज उत्तर केलें, पण त्यामुळें दोघींनीं हंसावें कां हें त्याला समजेना ! तो किंचित् ओशाळला पण त्याची आणखी गंमत करण्याच्या हेतूनें सरस्वती म्हणाली, "येईन, अगदीं खास येईन, अगदीं सुनालेकी मैत्रिणींसह येईन बरें ! " सरस्वती पुन्हा देशमुखांकडे जाण्याकरितां उठली. "अभ्यास करीत बैस. मी काम करून येतें." असें म्हणत सरस्वती घराबाहेर पडली आणि तिच्या मागोमाग बबीही निघून गेली.

❦ ❦ ❦

३

रात्रीचे साडेआठ झाले होते. देशमुखांच्या घरांतील सर्व मंडळींचें जेवण झालें होतें. फक्त सरस्वती आंत काम करीत होती. स्वतः जेवावयाच्या आधीं ती कडेचें काम आटपीत असे आणि नंतर आपण जेवावयाला बसत असे. आतां तिचें सर्व काम आटपून झालें होतें. तिनें आपलें ताट वाढून घेतलें आणि ती जेवावयाला बसली. काकू जेवावयाला बसल्या म्हणजे मग त्यांच्या शेजारींच पाट घेऊन वहिनीसाहेब आणि बबुताई बसत असत. नित्यक्रमाप्रमाणें त्या दोघीही आंत येऊन बसल्या.

"जें जें बाई पहावें तें तें नवलच ! "

"काय ग आई, असें कधीं झालें नव्हतें नाहीं ? "

"छे ! कधीं म्हटल्या कधींसुद्धां नाहीं, आमच्याकडे आज इतके हजारों पाहुणे येऊन गेले पण त्यांचा सुईएवढा जिन्नससुद्धां कधीं हरवला नव्हता."

"काय हरवलें हो वहिनीसाहेब ? "

"येऊन जाऊन तीन माणसें. नेणार कोण आणि घेणार कोण ? आणि आम्हांला काय कमी पडलें दुसऱ्याचें घ्यायला ? बबीच्या नांवाची तिच्या पहिल्या वर्षींच मीं एकदाणी करवली."

"कांहीं गळ्यांतलें हरवलें होय बबूताई ? "

" तुम्हांला कसें हो नेमकें कळलें काकू कांहीं गळ्यांतलें गेलें हें ? "

" हें काय बाई, मी आपलें सहजच म्हणालें."

" असें सहज तरी नेमकें कसें बरोबर येतें ? "

" नाहीं बाई. मला त्यांतलें कांहींसुद्धां माहीत नाहीं हो."

" हो. आतां कशाला कबूल कराल ? चोर सांगायला येतो वाटतें मीं चोरी केली म्हणून ? "

" हें काय ? मी चोर होय ? मी कशाला घेऊं तुमचें गळ्यांतलें ? "

" हा पाहिलात का काकू आईचा एकसर केवढा आहे तो ! माझा तर याच्या-पेक्षांही मोठा आहे ! "

" आमचे आम्हांला एक सोडून दहा जिन्नस असल्यावर आम्ही कशाला दुसऱ्याचा चोरीत बसूं वरें ? "

" नाहीं बरें नाहीं. वहिनीसाहेब, मी तुमच्या दोऱ्यालासुद्धां हात लावायची नाहीं ! "

" तें कांहीं नाहीं. काकू, एकदम चटकन् सांगून टाका. त्या पाहुण्या आलेल्या बाई आज गेल्या. त्या मला काय म्हणत असतील ? त्यांनीं काढून ठेवलेला गळ्यांतला एकसर दुसरें कोण घेणार ? मी घेईन का ? "

" तुम्ही कशाला घेतां आहांत ? "

" मग आमच्या घराला भुताविताची बाधा आहे होय ? "

" पण मी कशाला घेऊं तुमचा एकसर ? "

" परवां बबी तुमच्याकडे आली होती. तिनेंच मला सांगितलें कीं, तुमचा विनायक नव्या कपड्यांकरतां हट्ट घेऊन बसला होता म्हणून ! "

सरस्वतीनें तोंडांत घातलेला पहिलाच घास तसाच तिच्या जिभेवर घुटमळत होता. तिच्या डोळ्यांत पाणी आलें ! बबूताईदेखत घडलेल्या त्या प्रकाराचें पर्यवसान असें होईल असें तिच्या स्वप्नींदेखील नव्हतें. मुलानें हट्ट घेतला असला तरी मीं त्याचा हट्ट अजून पुरवला कीं नाहीं तें तरी एकदां यांनीं पहावयास पाहिजे होतें ? असा-ही प्रश्न तिच्या मनांत आला. एकसर घेतल्याचें पाप आपल्या माथीं मारलें जाणार, आणि दारिद्र्याच्या मदतीला बेअब्रूही उभी राहणार हा विचार मनांत येऊन तिचें काळीज चर्र झालें. गरिबी असली तरी हरकत नाहीं पण अब्रू असली म्हणजे पुरे, असेंच सरस्वतीला नेहमीं वाटत असे. आपण पैशानें गरीब असलों

तरी मनानें श्रीमंत आहों हें ती आपल्या वर्तनानें सिद्ध करीत असे. आहे त्या स्थितींतच सुख मानून भावी सुखावर डोळे लावून बसण्यांत ती धन्यता मानीत असे. आपल्या एकुलत्या एक मुलाचा हट्ट पुरवण्याकरितां आपण असलें निंद्य कर्म करण्यास प्रवृत्त होऊं असें तिचें शुद्ध मन तिला सांगेना. ती रडायला लागली!

" मीं तुमचा एकसर घेतला नाहीं बरें ! " असें मोठ्या काकुळतीनें ती म्हणाली. ती एकदम हुंदके देऊन रडूं लागल्यामुळें वहिनीसाहेब अर्थातच गप्प बसल्या. इतक्यांत तेथें एक नवीनच दृश्य उत्पन्न झालें. विनायकाच्या दंडाला बाबासाहेबांनीं धरलें होतें, आणि ते त्याला दरडावून विचारीत होते, " बोल, कुठले हे नवे कपडे ? "

या अनपेक्षित प्रकारानें विनायक अगदींच घाबरून गेला. आज शाळेंत सर्व मास्तर लोक आपापल्या वर्गांतील मुलांची रंगीत तालीम घेणार होते. रात्रीं नऊ वाजतां सर्व मुलांना शाळेंत बोलावलें होतें. आज विनायकाला मास्तरांनीं नवे कपडे घालून येण्याबद्दल बजावलें असल्यामुळें त्यानें नवे कपडे घातले होते. वसंतानें आपले स्वतःचे नवे कपडे आज त्याला दिले. आपण शाळेंत जात आहों व आपल्याला घरीं यावयास रात्र होईल हें आईला सांगण्याकरतां विनायक देशमुखांच्याकडे आला. नवे कपडे घातलेला विनायक दारांत दिसल्यावरोबर बाबासाहेबांनीं त्याच्या दंडालाच हात घातला. विनायकाला कांहींच उलगडा होईना. आपण घर चुकलों तर नाहींना, असेंसुद्धां त्याला वाटलें. किंचित् घाबरूनच तो म्हणाला, " मला आईला भेटावयाचें आहे."

" हो. तुझी आई आंत आहे. चल तिच्याकडे. तुलाच तिच्यापुढें उभा करतों. म्हणजे ती आपला गुन्हा कबूल करील."

बाबासाहेबांनीं विनायकाला आपल्याबरोबर स्वयंपाकघरांत जवळ जवळ ओढीतच नेलें.

" बोल, कुठले हे नवे कपडे ? "

विनायकाची ती करुण मूर्ति आणि बाबासाहेबांचा रुद्रावतार पाहून सर्वच मंडळींना किंचित् भीति वाटली. स्वयंपाकघरांत गेल्यावर त्यांनीं पुन्हा एकवार विनायकाच्या अंगावर जोरानें खेंकसून तोच प्रश्न केला.

" मला माझ्या मित्रानें दिले आहेत."

" बोल खोटें. तुझा जन्मच खोटा. आई जर खोटें बोलण्याचे तुला रोज धडेच देत असेल, तर तूं कुठला खरें बोलायला ! "

विनायकाच्या पोटांत धस्स झालें. आपली आई खोटें बोलली काय ? त्यानें एकवार आपल्या आईकडे पाहिलें. सरस्वतीनें डोळ्यांना पदर लावला होता. तिचा ऊर वरखालीं होत होता. कांहीं तरी विचित्र प्रकार घडला आहे खास असें त्याला तात्काळ वाटलें. पण काय प्रकार घडला याचा त्याला मुळींच उलगडा होईना. इतक्या लहान वयांत त्याला प्रसंगावधान तरी कसें राहणार ! आपल्या आईला हे आतां कांहीं तरी भलतेंसलतें करतील कीं काय अशीदेखील त्याला भीति वाटली.

" हें काय ! सोडा त्याला. बाळ, तूं आपला जा घरीं ! " विनायकाविषयीं वहिनीसाहेबांच्या मनांत अचानक वात्सल्य जागृत झालें. " लहानं मुलाला काय समजणार ! " असें म्हणून त्यांनीं बाबासाहेबांच्या हातून विनायकाला सोडवलेंच. कांहीं अंतरावर गणू आणि वसंत त्याची वाट पहात उभे राहिले होते. त्यांची आठवण होऊन हात सुटल्याबरोबर तो तडक निघाला तो घराबाहेर पडला.

सरस्वतीनें एकवार विनायकाकडे पाहिलें. त्याच्या अंगावरचे नवे कपडे पाहून तिलासुद्धां आश्चर्य वाटलें. आपल्यावर चोरीचा आळ बसायला आतां उशीर नाहीं हेंही तिला कळून चुकलें. पानावरून ती केव्हांच उठली होती. विनायक गेल्यावर बाबासाहेब सरस्वतीकडे वळून म्हणाले, " मी एका शब्दांत तुम्हांला सांगून टाकतों; एकसर तुम्हीं घेतलांत आणि तुम्हीं तो माघारीं दिला नाहीं तर आम्ही तुम्हांला पोलीसच्या ताब्यांत देऊं ! हें पुढचें संकट टाळायचें कीं नाहीं तें तुमचें तुम्हीच बघा."

सरस्वतीच्या मनाला या बाबासाहेबांच्या उद्गारांनीं चरका बसला. त्यांचा एकंदर संतापाचा आविर्भाव पाहून सरस्वती फारच भ्याली. भावी संकट तिला डोळ्यासमोर दिसूं लागलें, तिचें अंग थरथर कापूं लागलें, तिचे डोळे फिरूं लागले. बेअब्रू हीं अक्षरें तिच्या हृत्पटलावर उमटलीं; बाबासाहेब तेथून निघून गेले. वहिनीसाहेब आणि बबी या दोघीही त्यांच्या मागोमागच गेल्या; सरस्वतीखेरीज स्वयंपाकघरांत कोणीही नव्हतें. आज तिला स्वतःचें सौख्यपूर्ण गत आयुष्य आठवलें; तिच्या डोळ्यांतून अश्रुपूर वाहूं लागले, पतीची प्रेमळ मूर्ति तिच्या अन्तर्दृष्टीसमोर थैमान घालूं लागली. आपण काय होतों आणि झालों काय या विचारानें तिचा शोक अनावर झाला. पोलीसच्या ताब्यांत ही मंडळी आपल्याला

देणार ? बेअब्रूचें भेसूर चित्र तिला दिसूं लागलें ! तिचा उद्वेग असह्य झाला ! काय अविचार हा ? आपण कधीं यांचा एकसर घेतला ? पण आपलें ऐकणार कोण ? आपणास शिक्षा भोगावी लागेल का ? तिच्या अंगावर कांटाच उभा राहिला. हें जग आपल्याला हंसेल आणि मग आपल्याला कुठें आसरा मिळणार ?

सरस्वती एकीकडे रडत होती आणि एकीकडे आपलें उष्टें काढीत होती. हें काम करायला तिला वास्तविक एक मिनिटाचाही अवधि पुरे होता. पण आज द्विधा मनःस्थितीमुळें तिला काम करायला किती तरी वेळ लागला !

सरस्वती 'जातें' म्हणून वहिनीसाहेबांना विचारावयास गेली. " उद्यां काय तें कळवायला या, नाहीं तर पोलीस घेऊन दाराशीं येईन " अशी बाबासाहेबांनीं पुन्हा एकवार धमकावणी दिली. सरस्वती कांहींएक न बोलतां तेथून पुढें निघून गेली. गड्यानें दार बंद केल्याचाही आवाज झाला.

" यायची नाहीं ती उद्यां, " वहिनीसाहेब हळूच म्हणाल्या.

" जाते आहे कुठें ? पोलीसची धमकी दिली आहे. आपसुख येईल ! " कपाटांतून वाचण्याकरितां पुस्तक काढतां काढतां बाबासाहेबांनीं वरील उद्गार काढले. त्यांना हवें होतें तें पुस्तक त्यांच्या हातीं येईना. त्यांनीं बबीला हांका मारून विचारलें, " बबे, इथलें भावबंधन नाटक तूं घेतलेंस का ग ? "

" मीं नाहीं. त्या पाहुण्या काकूंनीं घेतलें होतें. माडीवर आहे." बबी म्हणाली.

बबी माडीवर पुस्तक आणण्याकरितां गेली, ती आईला हांका मारीतच माघारीं आली. तिच्या एका हातांत पुस्तक होतें आणि दुसऱ्या हातांत एकसर होता. तिघांनाही हंसूं आलें. पुस्तकांत एकसर सांपडेल असें कुणालासुद्धां वाटलें नाहीं.

" पाहिलें, कशा बायका गबाळ्या असतात त्या ! " बाबासाहेब गंभीर मुद्रा करून म्हणाले. " आतां सरस्वतीबाईला कळवून तिची समजूत घातली पाहिजे."

" आतांच कशाला ? पाऊस पडतो आहे. मी काकडआरतीला लवकर उठणार आहें तेव्हां बबी उठून जाईल तिच्या घरीं."

" बबीनें तिला सगळें नीट सांगितलें पाहिजे. किती त्रास झाला असेल बिचारीला. एकाचा गाढवपणा असा दुसऱ्याला नडतो बरें ! "

" आपला काय त्यांत दोष आहे ? चुकून तिच्यावर आळ घेतला याबद्दल तिची

क्षमा मागूं म्हणजे झालें.'' वहिनीबाईंनीं घडलेल्या प्रकारावर पांघरूण घालण्याच्या स्वरानें म्हटलें. थोड्या इतर गप्पागोष्टी होऊन सर्वच मंडळी झोंपी गेली.

॥ ॥ ॥

३

सरस्वती घराबाहेर पडली. तिची मनःस्थिति अतिशय अस्वस्थ झाली होती. विचारांचें अंतःकरणांत काहूर माजलें होतें; आणि मनावर निराशेचा पूर्ण पगडा बसला होता. 'काय माझी ही दुर्दशा झाली ! देवा, मीं या जन्मांत तरी असें कांहीं पाप केलें नव्हतें बरें. मी कधीं खोटें बोललें ? मीं कधीं चोरी केली ? मलाही एकदां सुखाची श्रीमंती अनुभवावयास मिळालेली आहे; पण तेव्हां मीं गरिबांचा कधीं तरी छळ केला आहे का ? माझें लग्न झालें तेव्हां माझ्यावर हा प्रसंग येईल असें माझ्या स्वप्नींसुद्धां नव्हतें. माझ्यावर खरोखरच ईश्वरी कोप झाला. त्यांना अकालीं मृत्यु आला. पतिदेवा ! तुम्हांला मृत्यु आला पण जगरहाटीकडे लक्ष्य देऊन, माझ्या लाडक्या विनायकाकरितां मीं तें दुःख सहन केलें, पण हें उद्यांचें दुःख मी कसें सहन करूं ! दारिद्र्यांतही मला सुख वाटत होतें. स्वकष्टानें मिळणारी भाजी-भाकरी मला पंचपक्वान्नांहूनही बहुमोल वाटत होती. मला जगाच्या प्रेमाची फिकीर नव्हती; पण लाडक्या विनायकाच्या प्रेमाखातर मीं प्राणही गहाण ठेवले असते. उद्यां मला पोलीसच्या ताब्यांत देणार...आधींच बाईमाणूस ! त्यांत एक विधवा आणि तीदेखील तरुण...देवा ! एका लादलेल्या गुन्ह्याबरोबर नाना तऱ्हेचे किळसवाणे गुन्हे...माझ्या माथीं हें निर्दय जग मारल्याशिवाय राहील का ?...आणि ती बेअब्रू मला सहन करावी लागणार का ? आणि माझा मुलगा—माझा लाडका विनायक कुणाच्या तोंडाकडे पाहील ? माझ्यावरून लोक त्याला चिडवतील, त्याची फजिती करतील...विनायका !...नको, तुझ्या नशिबीं असले हाल नकोत. तसल्या हालांना मीच कारण होणार ना ? आणि मीच जर नाहींशी झालें तर ?...तर काय ? जग दोन—चार दिवस माझी कुचाळकी करील; पण नंतर माझी स्मृति निःशेष नष्ट होईल....पण...विनायकाला कोण आसरा देणार ?...आज त्याला ज्यांनीं कपडे दिले ते...मिळेल का ? माझ्या विनायकाला आसरा मिळेल का ! माझं बाळ शाळेंतून उपाशीतापाशी घरीं येईल आणि मग त्याला घोटभर पाणी पाजायला प्रेमाचें माणूस मिळेल का ? माझा उपाशी आणि दीन विनू जगाच्या पाठीवर अन्नान्नगत होऊन भटकतांना त्याला

प्रेमानें कुरवाळून त्याच्या तोंडीं पहिलावहिला घांस कोण घालील ? पैशाशिवाय ज्याचे सर्व व्यापार बंद पडतील असें आपस्वार्थी जग माझ्या विनायकाला जवळ करील का ? विनायका, किती निर्दय तुझी आई ? तुला अशा खाईत लोटून आज जगाचा निरोप घेणारी तुझी आई निर्दय आहे रे ! छे !...नको. विनायकाला फार दुःख होईल—त्याचे हाल होतील. त्याला सुख देण्याकरितां मला जगायला नको का ? आणि मी जगलें तर उद्यां माझ्या अब्रूचे धिंडवडे निघतील...विनायकाला चौकीवर खेंचून आणतील. माझ्याकरतां, माझ्यावर लादलेल्या एका घोर अपराधासाठीं त्या अर्भकाला—त्या अनाथाला—त्या माझ्या लाडक्याला ते निर्दयपणानें मारहाण करतील...मला तुरुंगांत पाठवतील...तुरुंगांतून माघारीं आल्यावर गुन्हेगार म्हणून माझा बदलौकिक व्हावयाला कितीसा उशीर लागणार ? मला मजुरी मिळायची नाहीं, काम मिळायचें नाहीं, माझी दुर्दशा होईल. विनायकाचे मग किती हाल होतील...आणि माझ्यावरील त्याचें प्रेम नाहीं का कमी व्हावयाचें ? जनजिव्हेचे निर्दय वाक्प्रहार माझ्या राजसाच्या कोमल मनाला खरे तर नाहीं वाटावयाचे ?...माझा एक आशातंतूही असा क्षीण झाल्यावर मग मी तरी जगांत कशाला राहूं ? हो, आहे त्यापेक्षां मी गरीब असतें तरी मला त्यांतही समाधान वाटलें असतें. कारण माझा भूतकाळ सुखी होताच आणि भावी काळही सुखाचा होणार म्हणून माझ्या वेडया मनाला उगीच आशा वाटत होती. पण आतां माझा भावी काळ फार लाजिरवाणा होणार. माझा आणि माझ्या बाळाचा जो तो तिरस्कार करणार. जो तो आमच्याकडे बघून नाकें मुरडणार. पूर्वी ओळख असूनही मुळींच ओळख नसल्याचा बहाणा करायला हे लोक चुकायचे नाहींत ! माझें काय आहे ? पण माझ्या मुलाला किती त्रास होईल ! घरीं दारीं अपमानाखेरीज त्याच्या वांट्यास कांहींही येणार नाहीं. शाळेंतील मुलांनीं माझा मुलगा, एका गुन्हेगारणीचा मुलगा म्हणून चिडवून त्याचा पाठपुरावा करावा, सभ्य लोकांनीं त्याला पाहून कपाळास आठ्या घालाव्या, आणि आयाबायांनीं बोटें दाखवून, आणि आपसांत कुजबुजून त्याला अधिकच लाजवावें, भिकारी म्हणून त्याच्या मागें कोणींही लागावें. चिडून जाऊन तो मागें लागलेल्या लोकांना कांहीं बोलला, कीं त्याची वेडा म्हणून हुरेवडी उडवावी आणि मी मध्यें पडलें कीं, माझ्यावर जिभेचा पट्टा चालवावा अशी त्याची आणि माझी दुर्दशा होईल. मग कशाला या जगांत रहावयाचें ? आणि मी राहिलें तर माझे मानी,

आणि सज्जन पति मला काय म्हणतील?...आमचा हा छळ पाहून त्यांच्या मनाला किती त्रास होईल? आम्ही जगांत राहिलों कशाला असें नाहीं का त्यांना वाटायचें? मग माझ्या लाडक्याला बरोबर घेऊनच मीं त्यांच्या भेटीला जावें का? माझ्याबरोबर त्या बिचाऱ्याची हत्या! आत्महत्येबरोबर हें दुसरें पातक मी कशाला करूं?...नको. विनायका! रहा. माझ्यामागें रहा! कदाचित् तुला पुढें चांगले दिवस येतील. आणि चांगले दिवस येणार नाहींत या भीतीनें मीं तुझी हत्या करायची होय? आणि तुला घेऊन जगाचा त्याग करतांना मातृप्रेमाच्या उसळीसरशीं चुकून मृत्युमुखीं घेतलेली उडी माघारीं परतेल. तुला वांचविण्याकरितां मी स्वतःचीही हत्या करण्याचें चुकून विसरेन. नको, माझ्याकरितां तुझ्या प्राणांना तूं कशाला मुकतोस?...'

सरस्वतीचे विचार एखाद्या उधळलेल्या घोड्याप्रमाणें स्वैरपणें संचार करीत होते; पण उधळलेला घोडा दमून भागून कोठें तरी थांबतोच; अनेक तास कदाचित्, अनेक दिवसदेखील तो एकसारखा पळूं शकेल; पण केव्हां तरी त्याला शीण आल्याशिवाय रहावयाचा नाहीं. तो दमून जातो, आणि कुठें तरी मृतवत् पडून राहतो. सरस्वतीचे विचारही सारखे चालले होते. एक निश्चय होईपर्यंत त्यांना नानातऱ्हेचे फांटे फुटत होते. हजार वाटांनीं जाणारे सोबती शेवटीं एकाच नाक्यावर एकमेकांना भेटावेत, तद्वत् नाना दिशांनीं भडकलेले तिचे विचार एकाच निश्चयावर येऊन त्यांत विलीन होत होते! उद्विग्न आणि भडकलेल्या मनःस्थितींत असल्यामुळें तिचे पायही आज आपलें काम विशेष जोरानें करीत होते. रात्र अंधारी होती, पाऊस पडत होता, सरस्वती पावसानें चिंब भिजली होती, चालतां चालतां ती नदीवरील पुलावरून आली, पुलाच्या कट्ट्यावर ती चढून बसली आणि नदीच्या बाजूला तिनें आपले पाय खालीं सोडले; पण ती पुन्हा खालीं उतरली; विचारामुळें नाहीं, पण भीतीनेंच ती खालीं उतरली. एका क्षणांत मनांतील विचार वर उसळून आले!

चोहोंकडे अंधार म्हणजे मी म्हणत होता. मध्यरात्रीचा सुमार. पावसाच्या सरीवर सरी झडत होत्या. सर्व रस्ते जलमय होऊन गेले होते. आकाश अभ्राच्छादित असून विजांचा चकचकाट आणि मेघांचा गडगडाट चालूच होता. आधींच विस्तीर्ण असलेलें नदीचें पात्र जास्तच विस्तीर्ण दिसत होतें; ज्या जागीं नदीचा जलप्रदेश जास्त रुंद आणि खोल होता त्यावर एक दगडी पूल

बांधलेला होता. पावसाचें पाणी नदीच्या पात्रांत पडत होतें आणि अंधार व निर्जनता यांमुळें उत्पन्न झालेल्या भयप्रद वातावरणास अधिकच भेसूरपणा येत होता. मध्येंच वीज चमकली कीं, पाण्यावर प्रकाश पडत असे, पण त्यामुळें नंतर होणारा अंधार अधिकच भीतिदायक होई. पावसाचे जलबिंदु पात्रांतील संथ पाण्यावर पडले म्हणजे त्या संयोगानें पाण्यावर लहान लहान वर्तुलें होत होतीं. पुलाखालील दगडी कमानींच्या भिंतीवर आणि आसपासच्या गोंड्यांवर पाणी आपटत होतें आणि आवाज होत होता. पात्राच्या दोन्ही बाजूंवर रानवेलींची तुफान गर्दी झाली होती. आधींच अंधार, त्यांत विस्तीर्णपणामुळें पाण्यास आलेलें भयानक स्वरूप, आणि त्यांत ही कडेची किर्र झाडी ! आकाश काळ्या-कुट्ट ढगांनीं व्यापून गेलें असल्यामुळें पाणी काळेंभोर दिसत होतें. पावसाच्या सरी जोरानें येत असल्यामुळें आणि बरीच रात्र झाली होती म्हणून त्या रस्त्यावर कोणीही माणूस फिरकत नव्हतें. अशा दृष्टीनें तेथील वातावरण फारच शांत आणि एकांताचें ! पण जलप्रवाहाचा आवाज, त्याला साथ देणारा मेघांचा जलवर्षाव, झाडींतून निघणारा रानकिड्यांचा किर्र असा रोमांचकारी ध्वनि, आकाशांतील मेघांचा गडगडाट, दूरान्तरावरून बिनवारशी कुत्र्यांचें मध्येंच ऐकूं येणारें रडणें आणि भुंकणें, पावसानें तारांबळ झालेल्या एकाद्याच दिवाभीताचें भीतीनें चाललेलें फडफडणें आणि नदीकांठच्या दूरच्या देवालयांतील एकाद्या ईशभक्ताची अस्पष्ट प्रार्थना इत्यादिकांच्या संमिश्रणानें एक विचित्र सूर अखिल वातावरणांत संचार करीत होता; आणि गाढ, अतिशय भयंकर अशा अंधाराच्या साहचर्यामुळें त्या जागेला फारच गंभीर स्वरूप आलें होतें. शांतता पूर्ण होती; पण त्यामुळें भीषणता जास्तच वाढत होती. कुणालाही एकांत मिळाला असता; पण एकांताकरितां टाहो फोडणाऱ्या प्राण्यानेंदेखील तेथून काढता पायच घेतला असता !

अशा समयाला सरस्वती भिऊन खालीं उतरली यांत नवल नाहीं. दूर अंतरावर एकतारीवाल्याचें खड्या स्वरांत खालील गाणें चालू होतें—

'राधिके घराकडे चाल मला जेवूं घाल'

एकतारीवाला आपल्याच तंद्रींत होता. रोजचा परिपाठ म्हणूनच तो हें गाणें म्हणत होता; पण त्यांत एक तऱ्हेची भक्तिरसाची अपूर्व खुमारी आली होती !

उपाशीं भक्तानें फोडलेला तो टाहो सर्व वातावरण निनादित करीत होता; त्याच्या गंभीर आणि खणखणीत स्वराचा ध्वनि चोहों बाजूंला घुमत होता, आणि पावसाच्या आवाजानें हजारों प्रतिध्वनि उठत होते ! सरस्वतीच्या विचारतंद्रीचा या गाण्यानें भंग झाला; त्या आवाजांतच आपल्या लहानग्या विनायकाचा आवाज मिळून गेला असल्याचा तिला भास झाला; पुन्हा मनाचें परिभ्रमण सुरू झालें, विनायकाची आठवण झाली, भोंवतालचें निबिड जग तिला निर्दयपणाची आणि भेसूरपणाची साक्ष देत होतें. विनायकाला अशाच अंधारांत आपल्यामागें चांचपडावें लागेल याचीही तिला जाणीव झाली, पण उद्यांच्या विटंबनेच्या कल्पनामय चित्रानें तिचा निश्चय द्विगुणित झाला; ती पुन्हा पुलावर चढली. एकवार आपल्या प्रेमळ मृतपतीचें नामस्मरण करून तिनें जगदीशाला हात जोडले; डोळ्यांतून अश्रुधारा ओघळत होत्या; पावसाचें पाणी तोंडावर अस्ताव्यस्त आदळत होतें; पाण्याचें सळसळ वाहणें चालूच होतें; सरस्वतीनें अंग सोडलें; एक मोठा आवाज झाला ! पाणी इकडे तिकडे फेंकलें जाऊन पाण्यावर फेंस आला; पावसाची सर जोरांत सुरू झाली; पाण्यामध्यें एक क्षणमात्रच गड्गड् असा आवाज झाला आणि जित्या जीवाची मरणाकरितां एक क्षणमात्रच धडपड झाली. पुन्हा सर्व पूर्ववत् शांत आणि स्तब्ध झालें. ढगांचा गडगडाट झाला, विजा चमकल्या, पाण्याला संथ होण्यास थोडा कालावधि लागला; पण त्यानंतर कां होईना सर्वत्र पूर्वीची छाया पसरली ! एकतारीवाल्याचा स्वर अधिकच स्पष्ट झाला—

'राधिके घराकडे चाल मला जेवूं घाल'.

आणि वस्तुमात्राची या गाण्याला साथ चालू होती.

❦ ❦ ❦

५

" काय ग बबे ! काकूंच्याकडे जाऊन आलीस का ? "

" हो. पण आई, काकू कांहीं भेटल्या नाहींत. त्यांचा विनायक घरीं होता, त्याच्याशीं मी बोलायला गेलें, पण तो कांहीं माझ्याशीं सरळ बोलला नाहीं."

" म्हणजे ! आणि काकू मग कुठें गेल्या ! रात्रभर घरीं नव्हत्या त्या ? "

" त्या वेळेला घरीं नव्हत्या, मग रात्रभर कुठें होत्या तें कांहीं ठाऊक नाहीं, पण किनई आई तो विनायक मला वाटतें जरा वेडसरच आहे."

" कां ग ? त्यानें तुला काय केलें ? "

" अग, मला वाटतें तो मला काकूच समजला. काकूंनीं नाहीं कधीं आपल्याला सांगितलें तो असा वेडसर आहे तें, नाहीं ? "

" पण तो तुला म्हणाला काय ? "

" तो माझ्याशीं बोलला नाहींच. आपल्याशींच कांहीं तरी बरळत होता, मी सारी त्याच्या घरीं एकदांच गेलें होतें; मला नाहीं ठाऊक बाई असला वेडेपणा ! "

" पण तो आपल्याशीं तरी काय बोलत होता ? "

" आई ग, मला रात्रीं शाळेंतून येतांना मुलांनीं फार मारलें; फार मारलें ग, मी त्यांच्या हातांत एका बाजूला एकटा सांपडलों-ग...! "

" बबे, खरेंच एखाद्यानें त्याला मारलेंबिरलें असेल, तूं आपली त्याला वेडाच म्हणतेस ? म्हणजे मला तुझें हें समजतच नाहीं."

" कसलें मारलें आई ? अग तूंच वेडी आहेस, त्याला कोण मारायला बसलें, पण मला बाई त्याची भीतिच वाटली. आणखी आई तो पुष्कळ बोलत होता. माझा पार्ट लोकांना आवडला, त्यांनीं मला मारलें, फार मारलें, आतां आई तूं त्यांना मार, आई, ते तुला मारतील असें तो सारखें बडबडत होता."

" अग, त्याची विचारपूस तरी नीट करायचीस, चांगली गेली होतीस."

" छे ग ! मी कसली विचारपूस करतें आहे, तो हें कांहीं नुसतें बोलत नव्हता. तूं असतीस म्हणजे तुला सुद्धां भीति वाटली असती ! "

" चल, चहाटळ कुठली ! मी अशी कांहीं भित्री नाहीं."

" अग आई, ऐक तर खरी, तो तालसुरावर असें सारखें बडबडत होता, 'आई ! आई ! त्यांनीं मला मारलें, दगडांनीं मारलें, आई तुला मारतील, आई मला मारतात', असें हेल काढून सारखा ओरडत होता. आणखी मान इतक्या जोरानें हिसडे देऊन हलवीत होता, कीं मला वाटतें मीं जर तसें एक पांच मिनिटें केलं कीं मला घेरीच येईल ! "

" म्हणजे, अगदीं झटका आल्यासारखें करतो आहे कीं काय ? "

"मला बाई भीति वाटली. मी मुळीं तिथें फार वेळ थांबलेंच नाहीं."

"तें बाकी तुझें चुकलें. तूं तिथें थांबून त्याला विचारायचेंस."

"मग आतां आई, तूं त्याच्याकडे जा."

"छे ! आतां मी जायला बसलें ! सरस्वती झालेल्या कामाचे पैसे नेण्याकरतां येईल तेव्हां तिला विचारीन आणि तिच्याकडून परस्परच त्याचा समाचार घेईन."

"पण आई, काकू आतां पैशाला येतील का ?"

"अग न यायला काय झालें ?"

* * *

दोन दिवस झाले, बाबासाहेब असेच सकाळीं आपल्या खिडकींत सहज उभे राहिले होते; सरस्वतीबाईसंबंधीं आपण केलेला अन्याय त्यांच्या मनाला खात होता. श्रीमंत बायकांच्या गबाळेपणामुळें एका दीन अबलेला त्रास झाला आणि त्यालाही आपण प्रामुख्यानें कारणीभूत झालों हा विचार एकसारखा त्यांच्या अंगाचा दाह करीत होता. कित्येक वेळां निष्कारण अविचार आपण करतों, पण त्यामुळें एखाद्या गरीब माणसाला किती त्रास सोसावा लागतो याची आपणास कल्पना येत नाहीं. सरस्वतीला बाबासाहेबांनीं अगदीं अविचारानें पोलिसापर्यंत पोंचविण्याची धमकी दिली. त्यांतूनही आज दोन दिवस झाले, ती मुळींच फिरकली नाहीं, तिचा घरींही पत्ता लागला नाहीं. आपण बोललों, अविचाराचें वर्तन केलें त्याचा कांहीं विचित्र परिणाम तर होणार नाहीं ना ? आणि नाहक जुलूमजबरदस्ती केल्याबद्दल तसा विचित्र प्रकार घडून आला, बिचाऱ्या सरस्वतीनें जीवाला कांहीं बरेंवाईट करून घेतलें तर अप्रत्यक्षपणें कां होईना आपण त्या गोष्टीला जबाबदार ठरणार, या विचारानें बाबासाहेब बरेच खिन्न झाले होते. झाल्या प्रकाराबद्दल त्यांना खरोखरच वाईट वाटत होतें. सरस्वती जर पुन्हा भेटेल तर आपण आपल्या अविचाराबद्दल खेदसुद्धां प्रदर्शित करूं अशी त्यांची खात्री होती.

बाहेर पाऊस पडत होता. रस्त्यांतून चिखल झाला होता. इतक्यांत त्यांना लांबून एक मुलगा येतांना दिसला. आपली मान उजवीकडून डावीकडे आणि पुन्हा डावीकडून उजवीकडे तो सारखी हिसडत होता. ती त्याची क्रिया अतिशय जलद चालली होती, आणि तो तोंडानें म्हणत होता 'आई, आई, आई, आई',

हे शब्दही इतक्या जलद आणि तालांत येत होते कीं, एखाद्या शुद्धीवर असलेल्या माणसाला तसें करणें फार अवघड झालें असतें.

तो चालत चालत आला, आणि बाबासाहेबांच्या समोरच्या ओट्यावर बसला. 'आई, आई' हा त्याचा उच्चार तोंडानें एकसारखा चालू होता. पावसाच्या जलधारांनीं डोळ्यांतून ओघळणारे अश्रु न कळत धुतले जात होते. त्याचें मान हलवणें चालूच होतें. बाबासाहेबांनीं त्याला ओळखलें, आणि 'विनायक' म्हणून त्याला हांकही मारली. पण त्याच्या चालू असलेल्या व्यवसायांत यत्किंचितही बिघाड झाला नाहीं. त्याला आसपासच्या जगाची ओळख राहिली नव्हती. विनायक वेडा झाला होता! पोरका विनायक आज प्रेमाच्या भुकेनें वणवण हिंडत होता. बाबासाहेबांनीं त्याला दुसऱ्यांदा हांक मारली; पण त्याचें काम चालूच होतें. त्याचे डोळे लाल होऊन धुंद झाले होते. मस्तकावरील शिरा तटातट् फुगत होत्या 'आई, आई' असा एकच घोष त्याच्या मुखावाटे चालला होता. मृतमातेची करुणमूर्ति त्याच्या मानसचक्षूंना दिसत होती; पण त्याच्या चर्मचक्षूंना नित्याच्या दृश्य जगाची ओळख राहिली नव्हती! तो पुरा वेडा बनला होता. एकतारीवाला आपल्या खड्या स्वरांत शेवटचीच लकेर मारीत चालला होता.

घे गडे राधे घे गडे कृष्णा
कडेवर घे गडे गोजिरवाणा

पावसानें गारठल्यामुळें त्याचा आवाज कंप पावत होता. त्याच एकतारीच्या सुरांत विनायकाचा 'आई आई' स्वर विलीन होत होता. हा एकतारीवाल्याचा आवाज सर्व बाजूंनीं घुमत होता; बाबासाहेबांनीं विनायकाला आणखी एकदां हांक मारली; त्यानें एकवार वर पाहिलें, पण त्याला ओळख पटली नाहीं. तो भांबावून गेला; मानेचें हिसडणें किंचित्काल थांबलें. त्यानें बाबासाहेबांना उद्देशून कीं काय कोणास ठाऊक, अत्यंत केंविलवाणें तोंड करून उद्गार काढले, 'मला मारतात, मला दगड मारतात, मला वेडा म्हणतात...' पुन्हा 'आई, आई' हा शब्द मानेच्या तालावर सुरू झाला. बाबासाहेबांना त्या दिवशींच्या रात्रीची स्मृति झाली. त्यांनीं एकदम तोंड फिरविलें आणि ते खिडकींतून दूर झाले. "हें काय झालें!" या उद्गारानंतर त्यांच्या तोंडून एक दीर्घ निश्वास बाहेर पडला.

"आई, आई लोक मला मारतात; लोक मला वेडा म्हणतात; आई, आई, आई..." असें ओरडत विनायक रस्त्यानें चालूं लागला. एकतारीवाला समोरून जात होता आणि भक्तिभावानें—

घे गडे राधे घे गडे कृष्णा

कडेवर घे गडे गोजिरवाणा—

हा चरण आळवीत होता!

'आई, आई, आई' हा एकच प्रतिध्वनि अखिल वातावरणांत पसरून राहिला होता.

ॐ ॐ ॐ

विनायकाच्या मित्रांनीं त्याला शुद्धीवर आणण्याची पराकाष्ठा केली पण तो वेडाच राहिला!

आत्मवंचना

साडेदहा वाजले आणि घंटा झाली. सातपुते मास्तरांनीं टोपी घातली, आणि इतर मास्तर लोकांना आपल्या जाण्याचा इषारा देऊन त्यांनीं शाळेबाहेर पाऊल टाकलें. मुलांचे घोळके एकमेकांच्या चेष्टा करीत चालले होते. मास्तरांना पाहून कित्येकजण अदबीनें आणि संभावितपणानें चालत होते. आजूबाजूस न पहातां मास्तर आपल्याच तंद्रींत वाट काढीत होते. ती वेळ विशेष गर्दीची असल्यामुळें रस्त्यांतून जरा जपूनच चालावें लागत होतें. हेडमास्तर आपल्या-मधून चालले आहेत ही जाणीव ज्या लहान लहान विद्यार्थ्यांना होती, ते सर्व विद्यार्थी त्यांच्याकडे आश्चर्यदृष्टीनें बघत होते. शाळेबाहेर आपले आपण मालक आहों असें समजणारे कांहीं कोडगे विद्यार्थी किंचित् तुच्छतेनेंच मास्तरांकडे दृष्टि-क्षेप करीत होते. पण या सर्व विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देण्यासारखा स्वभाव सातपुते मास्तरांचा नव्हता, हें मात्र खरें. पत्करलेलें काम पूर्ण निष्ठेनें तडीस न्यावयाचें, त्यामध्यें मुळींच कसूर करावयाची नाहीं असें त्यांचें वर्तन असे. आजारीपणांतही त्यांनीं शाळेंत आपली कधीं गैरहजेरी लागूं दिली नाहीं. आपण ज्या संस्थेचे प्रमुख आहों त्या संस्थेची जबाबदारी सर्वस्वीं आपल्यावर आहे, ही गोष्ट नेहमीं त्यांच्या ध्यानांत असे, आणि त्या संस्थेच्या अभिवृद्धीकरितां झटणें हेंच आपल्या उरलेल्या आयुष्याचें कर्तव्यसार आहे असें त्यांना प्रामाणिकपणानें वाटे. आपल्या शाळेंतील मुलानें शाळेबाहेर, विद्यार्थ्यास अनीतिकारक असें वर्तन केलें, ही गोष्ट त्यांच्या कानावर आली म्हणजे त्यांना उद्वेग वाटत असे. शिक्षकां-कडे बघूनच त्यांच्या अनुरोधानें मुलें आपलें वर्तन ठेवतात या गोष्टीचाही त्यांना विसर पडत नसे. आणि आपण तर शाळेचे मुख्य चालक आहों तेव्हां आपण आपलें वर्तन आदर्शवत् ठेवलें पाहिजे, या जबाबदारीची त्यांना सदैव जाणीव असे.

घर म्हणण्यापेक्षां मास्तरांची खोलीच म्हणणें जास्त चांगलें होईल. मास्तर अद्याप अविवाहित होते. आईबापांची आणि त्यांची, रेल्वेंतील एका अपघाताच्या मदतीनें मृत्यूनें अगदीं लहानपणींच ताटातूट केली होती ! अनेक हालअपेष्टा सोसून मास्तरांनीं आपलें नशीब काढलें. यशस्वी रीतीनें एम्. ए. होण्याचें भाग्य त्यांना लाधलें आणि साधारण बऱ्यापैकीं अशा संस्थेचें चालकत्व त्यांच्याकडे आलें. शाळे-

पासून थोड्या अंतरावर त्यांनीं एक खोली घेतली होती. आणि जवळच्याच खाणावळींत जेवावयास जाण्याचा त्यांचा परिपाठ असे. आज शाळा सुटल्यावर मास्तर याच खोलीकडे यावयास निघाले होते. लांब अंतरावरूनच त्यांना आपल्या खोलीच्या समोरील घरांत किंचित् गडबड असल्याचा भास झाला. मास्तर आपल्या खोलीनजीक येऊन ठेपले. एक उंची पोषाख केलेला गृहस्थ आणि त्याचे दोन मित्र त्या घराच्या दरवाज्याजवळ उभे होते. दरवाज्याच्या किंचित् बाजूला उभ्या असलेल्या एका स्त्रीशीं ही मंडळी कांहीं तरी बोलत होती. मास्तरांना बघतांक्षणीं त्या गृहस्थानें मास्तरांना खूण करून आपल्याकडे बोलाविलें. घरांत जाऊन ओटीवर बसल्यावर तो गृहस्थ म्हणाला, "अहो, बाई आहे म्हणून तरी इतकें करायचें. हाच हिचा नवरा असता तर हिच्यापर्यंत गाऱ्हाणें नेण्याची पाळी आलीच नसती. पण बिचारा मरून गेला आणि त्याच्या हातून आमच्या कामासंबंधांत कांहीं नजरचूक झाली एवढें मात्र खरें!"

या बोलण्यानें मास्तरांना कांहींच उलगडा होत नव्हता. माधवराव मास्तरांनीं त्या घरासमोर खोली घेतल्याला थोडेच दिवस झाले होते. त्या स्त्रीबद्दल त्यांना कोणतीच माहिती नव्हती. आणि या गृहस्थाचें बोलणें इतकें संदिग्ध होतें कीं, त्यामुळें उलटा घोटाळाच जास्त व्हावा! मास्तरांनीं तो थोडा वेळ थांबल्याची संधि साधून त्याला विचारलें, "पण तुमचें या बाईच्याकडे काय काम आहे तें तर कळूं द्या!"

"अहो, तेंच सांगतों ना! चांगला श्रीमंत मनुष्य. अकालीं म्हणजे अवघ्या तिसाव्या वर्षीं त्याला मरण आलें. पण त्यानें या बाईला आपल्यामागें दुसऱ्याच्या तोंडाकडे बघण्याची पाळी येऊं दिली नाहीं. महिन्याकाठीं थोडे थोडके नाहींत, तर पन्नास रुपये मिळण्याइतकी त्यानें हिची व्यवस्था केली आहे. माझा त्याचा फार परिचय होता. एके दिवशीं तो गर्दीनें आला आणि माझ्याकडे थोडी रक्कम मागूं लागला. आतां माझा मित्र, त्यांतून चांगला सुखवस्तु, मग मी तरी मागेंपुढें कशाला पाहूं! माझ्याजवळ स्वतःचे पैसे नव्हते. एकाचे होते ते त्याला देऊन टाकले. पण बिचारा अकालीं निघून गेला. त्याचा तरी काय उपाय! तें खरें, पण ते पैसे माझे नाहींत म्हणून तर मी या बाईच्याजवळ पैसे मागायला आलों."

माधवराव मास्तरांना सुमतीबाईचा संक्षिप्त इतिहास कळून आला. एका गृहस्थानें पैशाकरितां या बाईकडे वरचेवर यावें, ही कल्पना त्यांच्या मनाला जाचूं लागली.

याचे पैसे आपण देऊन टाकावेत, असाही विचार त्यांच्या मनांत तात्काळ आला. मित्र म्हणवून घेऊन हा गृहस्थ पुन्हा पैशाची मागणी करतोच आहे, हा प्रकार माधवरावांना फारच विचित्र वाटला. त्यांनीं एकवार बाईच्याकडे पाहून त्यांना उद्देशून म्हटलें, "मग काय ? मी पैसे देऊन टाकूं ?" तात्काळ बाईकडून रुकार आला. शाळेच्या दुसऱ्या कामाकारितां घेऊन ठेवलेले पैसे मास्तरांनीं बाहेर काढले आणि त्या गृहस्थाला देऊन टाकले. सर्वजण तात्काळ उठले आणि घराबाहेर पडून आपापल्या व्यवसायकरितां निघून गेले. सुमतीच्या मनाला या सर्वच प्रकाराचें आश्चर्य वाटलें. तिला या पैशांसंबंधीं कांहीं एक माहीत नव्हतें. ती सुखवस्तु होती. तिला द्रव्यसाहाय्याची केव्हांही गरज भासणार नाहीं, अशीच तिची सांपात्तिक स्थिति होती. पण कांहीं तरी चूक होऊन पतीच्या हातून आजचा प्रकार टळण्याकरतां आवश्यक असलेली व्यवस्था होऊं शकली नाहीं, हें तिला कळून चुकलें; पण त्याहूनही आपल्यासमोर नवीनच रहावयास आलेल्या मास्तरांचें तिला जास्त आश्चर्य वाटलें. आणि अशाच मनःस्थितींत ती कार्यमग्न झाली.

२

जेवण होऊन मास्तर आपल्या खोलींत आले. कडक ऊन पडलें होतें आणि वारा-देखील अंगाला कढतच लागत होता. एक पुस्तक घेऊन माधवराव आपल्या ईझी-चेअरवर बसले. अर्धा तास झाला, पाऊण तास झाला, त्यांच्या नेहमींच्या प्रघाताप्रमाणें एव्हांना त्या पुस्तकाचीं किती तरी पानें वाचून व्हावयाचीं; पण आज कांहीं केल्या त्यांनीं ज्या पानापासून वाचनास प्रारंभ केला होता, त्याच्यापुढें त्यांच्या वाचनाची मजल जाईना! त्याच त्याच वाक्यावरून त्यांचे डोळे फिरत होते. तेंच पान ते आपल्या दृष्टींत अगदीं भरून ठेवीत असल्यासारखें दिसत होतें. पण त्यांचा मेंदू आणि त्यांचें मन त्यांना या कामीं मदत करीत नव्हतें. त्यांनीं एकदां सोडून दहा वेळां तेंच पान वाचण्यास सुरुवात करावी, पहिल्या एकदोन वाक्यांपुरतें लक्ष लागावें आणि नंतर वाचनाचें काम फक्त डोळ्यांनींच करूं लागावें आणि मनाचें परिभ्रमण सुरू व्हावें, असें सारखें चाललें होतें. एकाग्र होण्याची कला मास्तरांना अवगत नव्हती असें नाहीं. दारिद्र्यासारख्या खडतर परिस्थितींत, अनेक हाल-अपेष्टांचे आघात परतवून त्यांनीं आजवर आपला विद्याभ्यास केला होता; पण वाचण्याकरतां एकदां पुस्तक दृष्टीसमोर धरलें कीं, त्यांना आपल्या करुण परि-स्थितीचा आणि इतर दुःखाचा विसर पडत असे. त्यांच्या स्थितींत वाचण्याच्या

ऐवजीं, दुसऱ्या एखाद्यानें आपल्याच स्थितीवर विचार करण्यांत आणि मनांत-ल्या मनांत एकसारखें कुढण्यांत काल दवडला असता. पण विद्याव्यासंगाच्या जोरावर आपणांस पुढें हीच दुःखदायक परिस्थिति दूर अंतरावर लोटण्याचें सामर्थ्य येणार आहे, असा माधवरावांना विश्वास वाटत असे. बारीकसारीक गोष्टींवर विचार करण्यांत मनाची आणि कालाची झीज करणें त्यांना रुचत नसे. त्यापेक्षां पुढील सुखाच्या अपेक्षेनें कार्य करण्यांत मग्न राहून चालू परिस्थिति विसरणेंच बरें, असें त्यांना वाटे; पण अलीकडे प्राप्त झालेल्या सुस्थितींतही आज त्याचें चित्त एकाग्र होईना. मनुष्यानें एकदां एखादें काम केलें म्हणजे मग फुरसतीच्या वेळांत त्या कामाच्या बरेवाईटपणावर विचार करणें हें मनुष्यस्वभावास अनुसरूनच आहे. आपण जी गोष्ट केली तिचा परिणाम काय होईल, केलें तें चांगलें झालें कीं वाईट झालें, क्षणिक विचाराच्या भरांत आपण ती गोष्ट केली कीं त्या वेळीं पुरा निश्चय ठरेपर्यंत आपण विचार केला होता, विचार केला असल्यास तो बरोबर होता कीं चूक होता, चूक असल्यास त्याचा परिणाम कांहीं तरी भलताच होईल, भलता होणार असल्यास त्याचें स्वरूप फार उग्र असणार, आणि त्याखालीं कदाचित् आपल्या कोमल मनाचा चुराडा होणार! एकदां मन विभिन्न होऊन चिंताक्रांत झालें म्हणजे आपल्यावरील सर्वच जबाबदारीचीं कामें नीटपणें पार न पडतां त्यामध्यें कधींही न होणाऱ्या लाजिरवाण्या चुका होणार, असे एक ना दोन नाना-प्रकारचे फांटे विचारांना फुटूं लागतात. 'मन चिंती तें वैरी न चिंती' या न्याया-नुसार मनुष्याचें मन बऱ्यावाईट अशा सर्व भावी परिस्थितींचें आकलन एका क्षणांत करूं शकतें! माधवरावांच्या मनाची स्थिति आज अशीच झाली होती. त्यांनीं पुस्तक बाजूला ठेवून शाळेंतील कांहीं काम पुढें घेतलें. पण त्यांतही मोठमोठ्या चुका होऊं लागल्या. इतर मास्तरांना आदर्शवत् असणारें त्यांचें काम आज खोडाखोडीमुळें चिताड होऊन गेलें. तें कामही बाजूला सारून ते अगदीं स्वस्थ बसले. आज सकाळीं शाळा सुटल्यावर समोरच्या घरांत घडलेला प्रकार त्यांच्या मनावर थयथयाट करीत होता. त्या बाईची व आपली ही पहिलीच दृष्टादृष्ट होती आणि एका अबलेला साहाय्य केलें पाहिजे एवढ्याच भावनेनें आपण शाळेचे पैसे घालवून बसलों. त्या वेळीं हे पैसे आपले नाहींत असें जरी आपणास वाटलें, तरी तें वाटणें तादृश महत्त्वाचें ठरलें नाहीं. सारासार विचार न करतां आपण केलेली मदत योग्य होती का? पैशाचें विशेष कांहीं नाहीं; पण ज्याकरितां

आपण तो पैसा घालविला तें कार्य चांगलें होतें का ? चांगलें असल्यास तें चांगलें कां आणि वाईट कां नाहीं ? ओळख नसतांना नुसत्या एका देखीवरच असा अविचार करणें बरें आहे का ? पण तो अविचार होता का ? आणि नसल्यास तो कां नव्हता ?...

छे ! अविचार कसला ? पैशाचें तें काय, मदत ती काय, आणि तीदेखील एका दुर्दैवी गृहस्थाच्या पत्नीला ? यांत अविचार कसला ? आणि अविचार असला तरी त्यांत बिघडलें कुठें ? कित्येक गोष्टी अविचारानें घडल्या तरी त्या आवश्यक असतात, म्हणूनच घडतात. मग मीं ही अविचारानें केलेली गोष्ट जरूरीचीच होती. गरजवंतांना साहाय्य करावयाचें आणि विशेषतः स्त्रीजातीला समाधानांत ठेवावयाचें हेंच माझ्यासारख्या सुशिक्षितास योग्य नाहीं का ?...... त्यांना स्वतःलाच आपलें हंसूं आलें. काय मूर्खपणांत आपण वेळ दवडला, असें त्यांना वाटलें. सर्व विचार बंद करावयाचे म्हणून त्यांनीं प्रसन्न अंतःकरणानें खोलींत कांहीं वेळ येरझारा केल्या; पण कांहीं वेळानें मनाचा विचार सुरू झालाच. छे ! तसें नव्हे. आजची गोष्ट सोडून द्या. आज आपण केलेली मदत अनाठायीं झाली नसेल...हो, कदाचित् झाली नसेल...पण नेहमींच जर आपण असें करूं लागलों तर मात्र एखादे वेळीं आपल्याला चांगलाच तडाखा बसेल ! या बाईच्या जागीं दुसऱ्या एखाद्याला मदत करून त्यानें पैसे परत न देतां आणखी कांहीं केलें असतें तर...इतर कर्जासंबंधांतही त्यानें आपलेंच नांव सांगून टाकून.... कदाचित् आपल्या मदतीची दामदुप्पट केली असती...असा अविचार एकंदरींत वाईटच ! आज झालें तें झालें. आजदेखील आपण विचार करावयास पाहिजे होता. एक स्त्री झाली तरी तिला मदत करण्यांत इतकी तत्परता दाखविण्याचें वास्तविक काय कारण ? त्याच तत्परतेनें आपणांस आतां तोंडघशीं नाहीं पाडलें म्हणजे पुरवलें. छे-छे ! आजचें तर सोडून द्या. अशी संभावित बाई आपणाला, आपल्या मदतीची फेड न करतां आपणांस तोंडघशीं पाडील ? छे ! तें विसराच ! स्त्रियांच्या हातूनही जर अशा गोष्टी घडूं लागल्या तर संभावितांना जगांतून उठून जाण्याची पाळी येईल...पण सुमतीबाईंना एकवार भेटून आपण त्यांचें वर्तन, त्यांचा स्वभाव, त्यांची कृतज्ञता इत्यादि गोष्टी अजमावण्याचा प्रयत्न तर करावा. हो, ठरलेंच. चार वाजतां त्यांच्याकडेच निर्भीडपणानें जाऊन यावयाचेंच...

३

दुपारचा चहा करण्याकरितां सुमतीनें स्टोव्ह पेटविला. साधारणतः स्टोव्ह पेटलेला असला, किंवा एखादा नळ भांड्यामध्यें सुटलेला असला कीं, त्या सुरांत मनुष्य गाऊं लागतो. स्टोव्हच्या नादांत तर बहुतेक सर्वजण गुणगुणतातच. कारण, त्या वेळीं स्टोव्हचा आवाज सर्व वातावरणांत भरून गेलेला असतो, यामुळें गोंगाटाला थोडा फार हातभार लावण्यास मनुष्याकडून फारशी कसूर होत नाहीं. सभेंतील वक्ता यावयाच्या आधीं कित्येक व्याख्यानेच्छूंचीं तोंडें आणि कान सारखे उघडेच असतात. सर्वसाधारण गोंगाटाच्या मानानें मनुष्य आपला आवाज लावतो. त्याला स्वतःला त्याचा आवाज फारच अल्प प्रमाणांत ऐकूं येत असतो आणि इतरांना तर तो मुळींच ऐकूं जात नाहीं! सुमतीनें स्टोव्ह पेटविला आणि आधण आणण्याकरितां उठावयाचें राहून ती तशीच बसून राहिली. गुणगुणण्याला ही आयती संधि मिळाली होती, आणि तुकाराममहाराजांचा भक्तिभावाचा अभंग ती म्हणत होती......

“ कां रे नाठवीसी कृपाळु देवासी ।
पोषितो जगासी एकलाचि ॥ ”

अभंग म्हणण्याच्या तंद्रींत ती आधण आणण्याचें विसरून गेली. स्टोव्हचा सूर सनईला असलेल्या जोडीदार सुराप्रमाणें एकसारखा चालला होता. आणि सनईच्या बारीक आवाजाप्रमाणें सुमतीचें 'विश्वंभराचें ध्यान' चालूच होतें.

माधवराव तिच्या मागें किती वेळ तरी येऊन उभे राहिले होते. बिनतारी तारा-यंत्राप्रमाणें आपलें मनांतील काहूर या बाईला कळलें कीं काय, अशी त्यांना भीति वाटली. चिंता करणें हें मनुष्याचें काम नाहीं. कारण विश्वंभर मनुष्याची चिंता वहातोच आहे, हें सुमती जणुं काय स्वतःच्या एकनादी पण हजारों आवाजांनीं आपल्या कानाशीं गुणगुणत असल्याचा त्यांना भास झाला. खरोखर-च विश्वंभराची किती अगाध लीला आहे! माझ्या मनांत चाललेले विचार—अगदीं खोल दडून बसलेल्या चिंता—या बाईला त्यानें कशा कळविल्या कोणास ठाऊक! त्या तिला कळलेल्या आहेत आणि म्हणूनच ती आपल्याला उपदेशपर अभंग म्हणत आहे. नाहीं तर हाच अभंग नेमका आपल्याच आगमनप्रसंगीं आपल्या कानीं पडावा अशी तजवीज तरी तिच्या हातून कशी झाली असती? असेही

विचार त्यांच्या मनांत येऊन गेले. पण त्याच श्रीपतीच्या प्रेरणेनें माधवरावांना एक जोराची शिंक आली ! सुमती एकदम चमकून उठली. तिनें माधवरावांना पहातांच म्हटलें, “ वाः ! मी तुम्हांला बोलावणारच होतें. या बसा. अजून तुमचा चहा व्हायचा आहे ना ! ” शेजारींच आंथरलेल्या सतरंजीवर माधवराव बसले आणि सुमतीनें चहाचें आधण स्टोव्हवर चढविलें. चहा तयार करण्यास लागणारी सामुग्री गोळा करण्यांत ती गुंतली आणि माधवरावही अधोवदन बसून विचार करीत होते. “ कां, विचार कसला चालला ? ” सुमतीनें विचारलें. माधवरावांनीं उत्तर देण्याकरतां तोंड उघडलें; पण तोंडांतून उत्तर येण्याच्या आंत ‘कसला नाहीं’ हें सांगून टाकण्याचें काम मानेनेंच केलें. कमी बोलक्या माणसांची अगदीं भड-भड्या माणसांशीं गांठ पडली म्हणजे दोघांनाही मोठें चमत्कारिक होतें. सुमतीचा स्वभाव अतिशय बोलका आणि उमदा होता. तिला फारशी ओळखदेख नसतांना देखील माणसाशीं कसें बोलावें हें साधलें होतें. स्त्रीसुलभ नम्रपणाचा अतिक्रम न होतां तिचा स्वभाव फारच मनमोकळा राहूं शके; पण माधवरावांचे विचार वाचे-पेक्षां जास्त काम करीत आणि विचारांत सदोदित मग्न असल्यामुळें त्यांना फारसें बोलण्याचीही आवश्यकता राहत नसे.

“ ही इथली शेजारचीच तुमची शाळा ना ? ” सुमतीनें पुन्हा एक प्रश्न केला.

“ होय.” असे शब्द आतां मात्र माधवरावांच्या तोंडून बाहेर पडले.

“ शाळा चांगली आहे असं लोक म्हणतात.” सुमती सहज म्हणाली.

“ वाः ! मग लोकांचे आभारच मानले पाहिजेत.” माधवरावांनीं उत्तर दिलें.

पाण्याला आधण आलें. सुमतीनें चहा घालून आधण उतरलें, आणि दूध तापत ठेवलें.

“ तुम्हांला या शाळेंत राहून किती दिवस झाले ? ” सुमतीनें प्रश्न केला.

“ दोन वर्षें.” एवढेंच त्रोटक उत्तर माधवरावांच्याकडून मिळालें.

सुमती बोलत होती आणि माधवरावांना बोलवीत होती. माधवरावांच्याकडून तोलून उत्तरें मिळत होतीं; पण तिचे प्रश्न मात्र बेतालपणानें माधवरावांच्यावर चाल करीत होते.

“ तुम्ही इथें सर्व मंडळीसह बिऱ्हाड करून कां रहात नाहीं ? ” पण या प्रश्नाला माधवरावांना उत्तरच द्यावें लागलें नाहीं. दूध उतूं गेलें आणि स्टोव्ह एकदम विझला. सुमतीनें दूध खालीं उतरलें. आणि आपल्याच दुर्लक्ष्याबद्दल

तिला हंसूं आलें. ती हंसली, अगदीं मनमोकळेपणानें हंसली; पण माधवरावांनीं एका अक्षरानेंही तिला हंसण्याचें कारण विचारलें नाहीं. उलटपक्षीं माधवराव जर असे हंसले असतें, तर ती मात्र खास कांहीं तरी बोलली असती. सुमतीनें चहा गाळला आणि एक कप माधवरावांच्या पुढें ठेवून एक कप तिनें आपल्यापुढें घेतला. 'चहा घ्या' हें देखील तिला माधवरावांना सांगावें लागलें. इतकें औपचारिक वर्तन तिला फारसें परिचयाचें नव्हतें.

चहा घेऊन झाला आणि थोडा वेळ वर सांगितल्या स्वरूपाचेंच थोडें संभाषण झालें.

" माझ्याजवळ आज पैसे नव्हते. पण मला पैशाची मुळींच वाण नाहीं हो ! मी तुम्हांला तुमचे पैसे लवकरच देऊन टाकीन." सुमती म्हणाली.

" छे: छे: ! पण मला तरी पैशाची कुठें इतकी ददात आहे ? हे पैसे तुम्हीं माघारीं देऊं नका. त्याकरितां मी आलों नाहीं ! " किंचित् आवेशानेंच माधवरावांनीं हे उद्गार काढले.

" वा: ! तुम्हांला नको असले तरी ते तुमचे आहेत ना ? "

" माझे असले तरी ते मला काय करायचे आहेत ? मी एकटा फटिंग ! शंभर रुपये महिनाच मला जास्त होतो आहे." माधवरावांनीं उत्तर दिलें.

सुमतीनें हरतऱ्हांनीं अडवून पाहिलें, पण माधवरावांनीं पैसे परत घेण्याचें पूर्ण नाकारलें. दुपारच्या आपल्या मूर्ख विचाराबद्दल त्यांना त्वेष आला, सुमती खरोखर आहे कशी आणि आपण तिच्याबद्दल काय कल्पना केली, याचें त्यांचें त्यांनाच आश्चर्य वाटलें. सुमतीकडून पैसे परत घेणें म्हणजे लहान मुलाला खाऊ देऊन त्याच्याजवळ खाऊचे पैसे परत मागण्यासारखेंच आहे, असें त्यांना वाटलें. लहान मूल जितकें निर्व्याज, सरळ आणि अल्लड असतें तितकीच सुमतीही सरळ आणि अल्लड असल्याची त्यांना प्रतीति आली. ते जाण्याकरतां उठले. सुमती उठून उभी राहिली आणि म्हणाली, " समोरच आहांत. येत जा वरचेवर. माझा वेळ फार कंटाळवाणा जातो. नुसतं वाचणंदेखील मला त्रासदायकच वाटतं. मला बोलायला कुणी असलं म्हणजे फार आनंद होतो. तुम्हांला तरी यायला काय हरकत आहे!"

" छे: ! हरकत कसली ! " माधवरावांनीं उत्तर दिलें. " मी येत जाईन कीं ! पण मला तितकं संभाषण करणं अजून साधलं नाहीं हो."

" साधेल ! माझ्याशीं बोलतां बोलतां न कळत साधेल ! " सुमतीनें मंदस्मित

करीत उत्तर दिलें. माधवराव आपल्या कामाला निघून गेले. सुमतीही नव्या परिचयामुळें किंचित् सहर्ष मनानेंच आपल्या व्यवसायांत गुंतली.

* * *

आजच्या दिवसापुरता तरी निदान माधवरावांनीं खाणावळीला टाळा दिला होता. आज सुमतीची थोरली बहीण सुमतीकडे आली होती. या दिवाळीला नाहीं तरी पुढल्या दिवाळीला सुमतीनें आपल्या गांवीं आलें पाहिजे, असें अत्याग्रहाचें बोलावणें करण्याकरितां ताई सुमतीकडे मुद्दाम आली होती. सुमतीचा आणि माधवरावांचा परिचय झाल्याला तीन चार महिने झाले होते. पहिल्या प्रथम भिडस्त आणि मितवाक् स्वभावामुळें माधवराव जरी सुमतीकडे येत जात, तरी त्यांत अतिशय परकेपणा दिसत असे. पण सुमतीनेंच आपल्या मधुर आणि भडभड्या स्वभावानें माधवरावांचें मन आकर्षून घेतलें. अलीकडे अलीकडे तर कित्येक वेळ विविध विषयांवर मनसोक्त संभाषण करण्यांत त्यांचा कालव्यय होऊं लागला. पुस्तकांवर, मनुष्यस्वभावावर, जगांतील सुखदुःखांवर बोलतां बोलतां वेळ कसा निघून जात असे, हें त्यांचें त्यांनाही कळत नसे! माधवराव जात्या कमी बोलणारे आणि गंभीर, पण सुमतीनें त्यांना बोलके आणि विनोदी बनविलें. त्यांचा मधल्यावेळचा चहाफराळ अलीकडे कित्येक वेळां सुमतीकडेच होत होता. सुमतीचाही कंटाळवाणा जीवनक्रम जरासा आनंददायक झाला. आज सुमतीनें संध्याकाळीं माधवरावांना आपल्याकडे जेवावयास बोलाविलें होतें, आणि माधवरावांनींही तिच्या आमंत्रणाचा स्वीकार केला होता.

"पण माधवराव, तुम्हांला लांबचं, जवळचं असं कोणीदेखील नातेवाईक नाहीं का हो?" ताईनीं माधवराव जेवावयाला बसले असतांना त्यांना प्रश्न केला.

"छे! हा मी एकटा माझा स्वतःचा नातेवाईक आहें!" माधवरावांचें किंचित् विनोदी उत्तर बाहेर पडलें.

"मग तुम्ही इतके शिकलां त्याला तुम्हांला मदत कोणीं केली?" ताईनीं विचारलें.

"मीं किती हालअपेष्टांमधून माझा मार्ग काढला आहे, हें सांगून खरंसुद्धां वाटायचं नाहीं. कमिटीच्या दिव्यावर अभ्यास केला अशा ज्या कित्येकांच्या संबंधांत आख्यायिका म्हणून गणलेल्या गोष्टी घडलेल्या आहेत, त्यांचा मलाही

पूर्ण अनुभव आलेला आहे. दुकानांच्या फळ्यांवरून निजण्याचा देखील मला एकदां प्रसंग आलेला आहे !" माधवराव उत्तरले.

"वाः ! ताई, माधवराव म्हणजे कांहीं तुमच्या आमच्यासारखे माणूस नाहींत; माधवराव अगदीं मूर्तिमंत हालच आहेत !" सुमती मध्येंच बोलली.

"खरंच. पण इतक्या ह्यांतून देवानं तुम्हांला सुखाचे दिवस दाखविले अं !" ताईंनीं कौतुकानें म्हटलें.

"ज्यांना नातीगोतीं असतात, त्यांना त्याचें महत्त्व वाटत नाहीं. पण एका सड्या जिवाला, कौतुक करायला जिव्हाळ्याचं कोणी नाहीं, म्हणून किती दुःख होत असतं याची ताई, तुम्हांला कल्पना यायची नाहीं." माधवरावांनीं खेदपूर्ण उद्गार काढून एक सुस्कारा सोडला.

"ताई, तसं पाहिलं तर माझ्यामुळंच माधवरावांना आयुष्य कांहीं तरी सुखी वाटायला लागलं आहे. होय ना माधवराव ?" सुमतीनें माधवरावांना लडिवाळ प्रश्न केला.

"हो तर ! यांत काय संशय आहे ?" असें म्हणून माधवरावांनीं पोळीचा एक मोठा घांस तोंडांत घातला.

"पण माधवराव, तुम्ही आतां आम्हाला जेवायला कधीं बोलावणार ?" ताईंच्या या प्रश्नाचा रोंख माधवरावांना तितकासा समजला नाहीं. ताईंचें आपल्या बोलण्याकडे लक्ष नव्हतें कीं काय असें वाटून ते म्हणाले, "अहो, मग ऐकतां काय ? मी खानावळींत जातों. याल का तिथें माझ्याबरोबर ?"

"तसं नव्हे." सुमती मध्येंच म्हणाली. "तुमच्या राणीसरकार आतां आम्हांला आमंत्रण केव्हां देणार ? तुमचं आमंत्रण आम्हांला नको आहे !" माधवरावांना आतां उलगडा झाला. पण उत्तर द्यावयाचें टाळून त्यांनीं पाणी पिण्याकरतां भांडें तोंडाला लावलें.

"मग या वर्षीं तुमची दिवाळी कुठं आहे ?" आपण त्यांना अनायासेंच आमंत्रण करावें, या बुद्धीनें ताईंनीं माधवरावांना विचारलें.

"कां ? आजपर्यंतच्या जिथं झाल्या तिथंच हीही होईल." माधवरावांनीं हंशा पिकविला.

"मग या वर्षींचं नाहीं तरी पुढल्या वर्षींचं आमंत्रण मी आतांच देऊन ठेवतें.

सुमती येणार आहे, तिच्याबरोबर तुम्हांही आमच्या गांवीं या. तुम्ही जोडीनं आलां म्हणजे तितकीच आमचीही करमणूक होईल."

ताईंनीं आमंत्रण दिलें; माधवरावांनीं होकार दिला. जेवण झाल्यावर कांहीं विशेष गोष्टींवर अशा गप्पा झाल्या नाहींत. एकाच्या बोलण्यावर दुसऱ्यानें विनोद करावा, त्यामुळें अजिबात चाललेला विषयच बदलून जावा असें चाललें होतें. ताईंनीं माधवरावांची त्यांच्या तोंडावरच खूप तारीफ केली. आपण कोणासही अप्रिय नसलों म्हणजे बरें, असेंच प्रत्येकाला वाटत असतें. आणि या दोघी बहिणी-सारख्या स्पष्टवक्त्या व्यक्तींनीं तोंडावरच स्तुतिकारक उद्गार काढले म्हणजे तितकाच आनंद होतो.—माधवरावांनाही सुमतीनें आणि तिच्या परिचितांनीं आपणास चांगलें म्हणावें अशी साहजिकच अपेक्षा असे. आणि त्यामुळें आजचें हें जेवण त्यांच्या खरोखरच अंगीं लागलें. दोन दिवस राहून त्या दोघांनाही आग्रहाचें आमंत्रण करून ताई आपल्या गांवीं निघून गेल्या.

४

दिवाळीचे दिवस होते. सर्व लहानथोर लोक आपली उत्सवप्रियता निरनिराळ्या रीतींनीं व्यक्त करीत होते. भाऊबिजेची संध्याकाळ म्हणजे सर्व बंधुभगिनींना एक चिरस्मरणीय प्रसंगच असतो. भाऊ नसलेल्या बहिणींनीं मानीव भावांना ओंवाळा-वयाचें, आणि बहीण नसलेल्यांनीं मानीव बहिणींकडून ओंवाळून घ्यावयाचें; पण तो दिवस साधारणतः न ओंवाळतां किंवा न ओंवाळून घेतां कोणीही घालवीत नाहीं.

"म्हटलं पुढली दिवाळी ताईकडे आहे." सुमती ताम्हनांतील निरांजन लावतां लावतां म्हणाली.

"हो! बहुतेक." माधवरावांनीं किंचित् चांचपडत उत्तर दिलें.

"कां? बहुतेक कां? मी बरी राहीन तुम्हांला बरोबर नेल्याशिवाय! आणि तुम्ही नाहीं आलां तर मग मी तरी कशाला जातें आहें!" सुमतीनें ठसकेबाज उत्तर दिलें.

"वाः! मग इतकं असल्यावर तुम्ही जिकडे जाल तिकडे आम्ही तरी आल्या-शिवाय कशाला रहातों आहोंत!" माधवरावांनीं विनोदी प्रत्युत्तर केलें.

"तें कांहीं नाहीं. आधींपासून अगदीं ठरवून ठेवा." सुमतीनें जरा लाडिक-पणानेंच म्हटलें.

" हो–हो ! तें ठरविण्याच्याच विचारांत आहें; जवळ जवळ ठरल्यासारखेंच आहे म्हणा ना ! " माधवराव संदिग्ध भाषेंत उद्गारले.

" जवळजवळ कां ! अगदीं पूर्ण ठरवा." सुमती माधवरावांच्या बोलण्याचा साधा अर्थ घेत म्हणाली.

" तुम्हीं ठरवल्यावर मग आमच्याकडून ठरलेंच आहे."

या माधवरावांच्या बोलण्यावर कांहींही उत्तर न देतां सुमती त्यांच्याजवळ ताम्हन घेऊन आली. माधवरावांच्या कपाळावर कुंकवाची रेघ ओढून तिनें माधवरावांच्या डोक्यावर अक्षता टाकल्या. सुपारीनें ओंवाळून त्यांच्यापुढें ताम्हन धरलें, आणि माधवरावांनीं ओंवाळणी घातली. फराळ करून माधवराव आपल्या खोलींत निघून गेले. त्यांना आज आजूबाजूचें वातावरण विशेषच प्रसन्न वाटत होतें. भोंवतालची सृष्टि मनुष्याच्या मनःस्थितीशीं नेहमींच साहचर्य राखीत असते. दुःखी जीवाला जगामध्यें भयाण जंगलाचें स्वरूप दिसतें; पण सुखी किंवा आनंदी मनुष्याला त्याच जगामध्यें नंदनवनाचें प्रतिबिंब भासतें ! माधवरावांना दिवाळीच्या उत्सवांत आकण्ठ बुडून गेलेलें जग अत्यंत सौख्यप्रद वाटलें. याच जगाला एके काळीं आपण कंटाळलों होतों, पण याच जगाची कांस कधींही सोडूं नये, असें आतां आपणांस वाटूं लागलें आहे, ही विचित्र वस्तुस्थितीही त्यांच्या चटकन् ध्यानांत आली. त्यांनीं अंथरुणावर अंग टाकलें. त्यांच्या प्रसन्न अंतःकरणानें निर्माण केलेल्या आनंददायक विचारांच्या परिभ्रमणांत हेलकावत हेलकावत त्यांच्या मनाला शान्ति मिळाली. खिडकींतून डोकावणारा चंद्रप्रकाश त्यांच्या अंगावर पडला होता. वाऱ्याच्या शान्त आणि शीतल लहरी त्यांच्या शिणलेल्या मस्तकावरील कुरळ्या केंसांना हेलकावे देत होत्या. माधवरावांना गाढ झोंप लागली. आजच्यासारखी शान्त आणि स्वस्थ झोंप त्यांना कित्येक दिवसांत तरी लागली नव्हती !

* * *

माधवराव आपल्या खिडकींत उभे होते. शाळेंतील कामामुळें आणि नुकत्याच संपलेल्या शाळेच्या गॅदरिंगमुळें त्यांना फारच त्रास झाला होता. मध्यंतरीं सुमती एकदां आपल्या बहिणीकडे जाऊन आली. तिला येऊन सारे चारपांच दिवसच झाले होते. कामाच्या गर्दीमुळें माधवरावांना सुमतीकडे जावयाला फुरसतच झाली नाहीं. ताईचें येत्या दिवाळीचें अत्याग्रहाचें आमंत्रण सुमतीनें आणलें होतें.

अलीकडे शाळेंतील काम फारच वाढलें होतें. हाताखालचे लोक अगदीं निर्लज्ज-पणानें वाटेल त्या चुका करीत, पण माधवराव अंगमेहनतीनें त्या चुका एक अवाक्षरही न बोलतां दुरुस्त करीत. आज असाच त्यांना फार त्रास झाला होता. खोलींत येऊन त्यांनीं कपडे काढले आणि शून्य मनानें ते खिडकींत रस्त्याकडे बघत उभे राहिले. पूर्वी एकदां परिचयाचे झालेले तुकाराम महाराजांच्या अभंगाचे सूर त्यांच्या कानीं पडत होते. पण आतां त्या सुरांना पेटीची साथ होती.

> " कां रे नाठवीसी कृपाळू देवासी ।
> पोषितो जगासी एकलाचि ।
> तेणें तुझी कांहीं नाहीं केली चिंता ।
> राहे त्या अनंता आठवोनी । "

अखिल मानवजातीला जगाचें सारसर्वस्व निवेदन करणारे ते तुकोबाचे भक्ति-पूर्ण काव्योद्गार पेटीच्या साथीबरोबर वातावरणांत दुमदुमून राहिले होते. अंधारी रात्र असल्याकारणानें रस्त्यावर कोणीही माणूस फिरकत नव्हतें. माधवराव त्या गानश्रवणांत तल्लीन झाले. माधवराव विचार करीत करीत त्या अनंताची अघटित करणी आठवूं लागले. मागल्या दिवाळींतील भाऊबिजेचा प्रसंग त्यांच्या मनश्चक्षूं-समोर उभा ठाकला. सुमतीनें त्यांना ओंवाळिलें त्या समयाची त्यांना मधुर स्मृति झाली. 'किती गोड स्पर्श तो !' माधवरावांच्या तोंडून आपोआपच उद्गार निघाले. 'त्या स्पर्शांतच, तिनें आपल्या सुकुमार बोटांनीं मंगल कुंकवाच्या साहाय्यानें माझ्या ललाटरेषा ठळक केल्या. 'शुभदायक अक्षता मोतीं उधळल्याप्रमाणें तिच्या हातांतून आपल्या मस्तकावर टाकल्या गेल्या.' माधवराव या सौख्यद स्मृतींत किती वेळ तरी रममाण झाले. 'तिच्या भालप्रदेशावर—सुमतीच्या भालप्रदेशावर—अशीच कुंकवाची रेघ ओढण्याचा मला प्रसंग येईल का ? आम्हां उभयतांवर तशाच मंगलाक्षता कधीं तरी पडतील का !...' किती तरी संकटांना तोंड दिलेल्या—अगदीं धीरानें तोंड दिलेल्या—माधवरावांच्या डोळ्यांतून या विचारानें अश्रूंचा पूर वाहूं लागला. न कळत त्यांच्या भावना एकदम उचंबळून आल्या. भक्तीच्या वत्सल रसाला मिळालेली करुणरसाची जोड सुमती गात असलेल्या अभंगाला अधिकच दुःखद करीत होती. जों जों माधवराव आपले मनोभाव दाबीत होते, तों तों त्यांच्या डोळ्यांतील अश्रु जास्त उसळत होते. सुमती त्यांना समोर दिसत होती. त्यांच्या खोलींत दिवा लावलेला नसल्यामुळें त्यांचें अस्तित्व सुमतीला

समजल नाहीं. न कळत माधवरावांचे पाय जिन्याकडे वळले. त्यांनीं रस्ता ओलांडला आणि ते सुमतीच्या घरांत शिरले.

विश्वंभराचें ध्यान करण्यांत सुमती रंगून गेली होती. पेटीवरील बोटें जितक्यीं जलदीनें हालत होतीं, त्यापेक्षांही जास्त जलद तिचा कंठ आलाप घेत होता. करुणरसानें अभंग पुरेपूर भरून गेला होता. माधवराव निश्चल स्थितींत किती वेळ तरी उभे राहिले. अभंगाच्या शेवटच्या चरणाचा सूर सोडतांना तिनें सहज वर पाहिलें. तों तिला माधवराव दूर अंतरावर उभे असल्याचें आढळलें. पेटी बंद करीत तिनें विचारलें, "कां, आज आठवण झाली वाटतें ? म्हटलें आमच्या-सारख्या गरिबांची आठवण ठेवीत जा !"

"वा ! तुमची आठवण मला हरघडीला होत होती." माधवरावांनीं उत्तर दिलें.

"दिसतेंच आहे तें." एवढेंच म्हणत तिनें पेटी जागच्या जागीं ठेवली.

"आज माझेंच तुमच्याकडे काम आहे !" माधवरावांनीं सुमतीला म्हटलें.

"माझ्याकडे ? होणारें असलें तर मी करायला कांहीं मागें घ्यायची नाहीं." सुमतीनें काम ऐकण्याची उत्कंठा दाखविली.

"तुम्हीं मनांत आणलें तर तुमच्याकडून सहज होईल." माधवरावांनीं किंचित् आशापूर्ण उद्गार काढले.

"पण सांगा ना तुमचें काय काम आहे तें ?"

"मागली भाऊबीज तुम्हांला आठवते आहे का ?"

"मला सारें कांहीं आठवतें."

"त्या दिवशीं तुम्हीं काय केलें ?"

"काय केलें म्हणजे ? तुमच्या कपाळीं कुंकूं लावून तुमच्यावर अक्षता टाकल्या आणि तुम्हांला ओंवाळलें." एवढें बोलून सुमती केवढ्यांदा तरी हंसली. तिला वाटलें आपण कशी चेष्टा केली ! माधवरावांना देखील थोडें हंसूं आलें. पण त्यांनीं म्हटलें, "तसेंच आज मला तुमच्या कपाळीं कुंकूं लावूं द्या. आपण आपल्या हातांनीं एकमेकांवर मंगलाक्षता उडवून घेऊं !"

सुमतीला फार आश्चर्य वाटलें. माधवरावांच्या मनांत असली अनपेक्षित कल्पना येईल असें तिला वाटलें नव्हतें.

"पण माधवराव......छे !...भाऊ...मीं तुम्हांला बहीण या नात्यानें एकदां ओंवाळणी—मागितली आहे ना ?"

" सुमती ! सुमती ! नको. ही माझी मागणी अव्हेरूं नकोस." माधवरावांनीं काकुळतीच्या स्वरांत म्हटलें.

" नाहीं, माधवराव ! मला कृतघ्न म्हणा, कठोर म्हणा. काय पाहिजे तें म्हणा ! मी याला बिलकूल कबूल होणार नाहीं. आपली शाळा आहे, तिलाच पत्नी माना. कर्तव्याची कांस धरा, माझ्यासारख्या एका दुर्दैवी अबलेचा नाद सोडा. जा. माझ्यावर तुमचें जर खरें प्रेम असेल तर जा; येथून जा आणि आपल्या कर्तव्या-वर एकवार आपली दृष्टि फेंका. कर्तव्योन्मुख व्हा, त्यांतच रमून जा आणि मला मात्र विसरा. माधवराव ! हें माझेंच मागणें अव्हेरूं नका. जा ! "

सुमतीचा आवेश पाहून शुद्ध आणि सात्त्विक माधवरावांनीं काढता पाय घेतला. त्यांना परमावधीचें दुःख वाटलें !

" एकंदर परतफेड मागितल्याशिवाय पुरुषजात रहावयाचीच नाहीं." प्रक्षुब्ध झालेल्या भावनांच्या भरांत सुमतीचें सविकारी मन असेंही बोलून गेल्याशिवाय राहिलें नाहीं.

ॐ ॐ ॐ

ताईकडे म्हणून दुसरे दिवशीं सुमती सर्व सामानसुमान घेऊन निघून गेली.

ॐ ॐ ॐ

अलीकडे माधवराव राहत होते त्या खोलीकडे बघून लोक एकमेकांत म्हणतात, " कांहो ! त्या माधवरावानें म्हणे शाळेकरितां बांधलेल्या नव्या बोर्डिंगांत आपण स्वतां कायम रहावयाचें ठरविलें आहे. मोठा कर्तव्यदक्षच मनुष्य आहे बुवा हा माधवराव सातपुते !"

त्याचें हृदय !

जन्मभूमीच्या गांवांत शिरकाव करून देणारा पूल ओलांडीत असतांना तो नखशिखान्त थरारून गेला ! त्याची आतांपर्यंत असलेली जलद गति कमी कमी होत अतिशय जड झाली. पूर्वी एकदां असाच तो पूल ओलांडून माधव जेव्हां गांवापासून अतिशय दूर निघून गेला तेव्हां त्याची स्थिति आतांपेक्षां अगदीं उलट होती. या वेळीं गांवांत शिरेपर्यंत तो झपाट्यानें चालत होता आणि गांवांत शिरतांशिरतांच त्याचें पाऊल जड झालें. त्या वेळीं गांवाच्या बाहेर पडेपर्यंत त्याची गति अतिशय मंद होती. मार्गांत कांहीं अडथळा नसतांनाही तो अडखळत होता; पण गांवाच्या बाहेर आल्याबरोबर, पिंजऱ्यांतून बाहेर पडलेल्या पोपटाप्रमाणें त्याचा नूर बदलला व आजूबाजूस न पाहतां तो किती तरी झपाट्यानें वाट चालूं लागला. आज बऱ्याच वर्षांनीं स्वतःच्या गांवीं परत येत असतां सीमेपर्यंतची-त्या पुलापर्यंतची—त्याची चाल फारच निकडीची होती. तो पूल त्यानें अर्धाअधिक ओलांडला असेल नसेल तोंच त्याचे पाय रेंगाळूं लागले. या गांवांत आपण शिरावें कीं न शिरावें असासुद्धां त्याला प्रश्न पडला. त्या वेळेपर्यंत आशापूर्ण असलेला त्याचा चेहरा पार उतरून जाऊन अतिशय म्लान झाला.

ती थोडीशी अवेळच होती. आणि त्या गांवाला जवळचें असें स्टेशन नव्हतें. स्टेशनपासून हा गांव सहा-सात मैलांवर होता. आणि त्या स्टेशनवर थांबणारी फक्त एकच गाडी रात्रीं आठ वाजतां येत असे; स्वतःच्या गांवाला यावयाच्या उत्सुकतेमुळें माधवानें या सर्व अडचणी पत्करल्या. त्या स्टेशनवर उतरून अंधारांतच तो आपल्या गांवची वाट चालूं लागला.

रात्र अंधारी होती. आकाश ढगांनीं भरून गेलें होतें. डोक्यावर काळेंकुट्ट आभाळ आणि पायांखालीं काळें माळरान ! वाऱ्याची मंदशीसुद्धां लहर वातावरणांत उठत नव्हती. तो ओसाड प्रदेश तुडवीत असतां त्याला कोणाचीही सोबत नव्हती. कदाचित् रात्रीं गडबड करणारे पशुपक्षीसुद्धां आज पावसाच्या भतीनें अगदीं गप्प बसले होते. त्याच्या चालण्यानें आणि हालचालीनें जो काय आवाज होत होता तेवढाच !

मध्यरात्रसुद्धां झाली असेल ! तो त्या पुलापर्यंत आला आणि पूल ओलांडून गांवांत शिरला. गांवांत त्यानें आपलें जड पाऊल ठेवलें असेल नसेल तोंच पावसा-

ची सर सुरू झाली. अंगावर असलेल्या झिरझिरीत वस्त्रांखेरीज त्याच्याजवळ कांहीं-ही नव्हतें. बऱ्याच लांबून चालून आल्यामुळें त्याच्या अंगांतून ऊन ऊन घाम फुटत होता. अशा वेळीं अंगावर पडणाऱ्या जलधारा त्याला किती तरी कढत वाटल्या. डोक्यावर वीत वीत वाढलेले केंस घामानें अर्धवट ओले होतात न होतात तोंच पावसाच्या पाण्यानें ते चिंब भिजून गेले. ती सर फारच जोराची होती. किती तरी थोड्या वेळांत तो पुरा भिजून गेला. आकाशांतील ढगांची दाटी कमी होऊन ते जसजसे विरळ होऊं लागले तसतशा वाऱ्याच्या मंदमंद लहरी त्याच्या अंगाशीं झोंबूं लागल्या !

दुरूनच दिव्यांचा झगझगाट पाहून त्याला किती तरी आश्चर्य वाटलें. अशा रात्रींच्या वेळीं त्या घरांत दिव्यांचा अशा विचित्र रीतीनें प्रकाश पडला असेल असें त्याला मुळींच वाटलें नव्हतें. त्याच्या मनांत शंकासुद्धां आली कीं, आपल्याला वाटलें तसें हें घर त्या स्त्रीच्या मालकीचें नसेल.

थोडासा जवळ आल्यावर केवढा तरी प्रचंड हंशा त्याला ऐकूं आला ! तो हंशा कमी कमी होत अजीबात बंद झाल्यावर जनानी आवाजाची एक मजेदार तान त्यानें ऐकली. त्याचें आश्चर्य किती तरी पटींनीं वाढलें ! या घरांत एक कुलीन स्त्री राहत असतांना–निदान आपल्याला वाटतें त्याप्रमाणें–एक कुलीन स्त्री राहत असतांना येथें असा प्रकार कसा चालावा याचा त्याला उलगडा होईना !

कोणाचें घर आहे, आपल्याला वाटतें तसें तें जर एका स्त्रीचें असेल तर त्यांत आपला शिरकाव कसा करून घ्यावा वगैरे विचारांनीं त्याला घेरून टाकलें. पावला-चा आवाज शक्य तितका कमी करीत करीत त्यानें घराची मागील बाजू गाठली. त्या जागीं त्यानें स्वहस्तानें लावलेलें पपईचें झाड आणि इतर लहान लहान फुल-झाडें अद्याप तशींच होतीं. त्या झाडापाशीं जाऊन त्यानें आपल्या उजव्या हाताचा तळवा त्या झाडाच्या खडबडीत बुंध्यावर टेंकला. एकवार वरच्या माडी-कडे त्यानें पाहिलें. त्याच्या विषण्ण मनांत मागल्या अनेक स्मृतींनीं थैमान करण्या-स आरंभ केला.

ॐ ॐ ॐ

किती तरी वर्षांपूर्वी त्याच घरांतून त्यानें ब्रह्मदेशीं प्रयाण केलें होतें. ब्रह्मदेशाला जाऊन सट्ट्याच्या व्यापारांत बरेच पैसे मिळवून आणण्याचें त्यानें त्यावेळीं आपल्या बायकोला अभिवचन दिलें होतें. ज्या दिवशीं तो जाणार होता त्या दिवशींच्या

प्रसंगाची त्याला आतां आठवण झाली. निघायला अद्याप एकदोन तास अवकाश होता. अगदीं गंभीरपणानें त्यानें बायकोचा हात आपल्या हातांत घेत म्हटलें, "मालती, मीं तुला सांगावें अशांतला भाग नाहीं; पण तूं एकटीच आहेस. मनाला वाईट गोष्टींची चटक लागायला फार वेळ लागत नाहीं. तुझा पति या नात्यानेंच मी तुला सांगतों कीं, शक्य तोंवर शरीरानेंच काय पण मनानें सुद्धां पापाचरण करूं नकोस."

आणि त्यावर तिनें दिलेलें उत्तर ऐकून त्याला त्या वेळीं किती आनंद झाला! अत्यंत लडिवाळपणानें तिनें म्हटलें, "माझ्याबद्दल आपल्याला इतकासुद्धां विश्वास वाटत नाहीं ना! पापाच्या रस्त्याला जाऊं नकोस हें सांगण्याइतकी का मी अजाण आहें–मूर्ख आहें!"

तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत त्यानें म्हटलें, "तसें नव्हे, तुला सगळें कांहीं समजतें आहे; पण वेळप्रसंग आहे. मोठमोठ्या महात्म्यांनासुद्धां कित्येक वेळां मोह आवरत नाहीं. तुझ्याबद्दल मला विश्वास वाटत नाहीं असें नाहीं; पण माझी मलासुद्धां एखादा मोह आवरण्याची खात्री देववत नाहीं आणि म्हणूनच तुला सांगतों कीं, तरुण बाईचें काय किंवा तरुण पुरुषाचें काय शारीरिक अगर मानसिक पतन व्हायला एक क्षणसुद्धां पुरतो. रागावूं नकोस. मला संशयी म्हणूं नकोस. तूं काय किंवा मी काय, आपण दोघेंही सारखींच!"

त्याला मध्येंच थांबवून तिनें विचारलें, "मग एकमेकांना एकमेकांचा विश्वास तरी कशामुळें वाटेल?"

"मालती, मला वेडा म्हण, भोळा म्हण, कांहींही म्हण, पण माझ्या वेड्या मनाला आपलें वाटतें–उगीचच वाटतें–कीं, एकमेकांनीं जर कांहीं आणाशपथा घेतल्या तर परस्परांना खात्रीनें विश्वास वाटूं लागेल!"

परमपूज्य पतीच्या भक्तीनें भारून जाऊन तिनें म्हटलें, "आपल्या गळ्याची शपथ घेऊन आज मी सांगतें कीं, माझ्या मनांत अहोरात्र आपलेच विचार येत राहतील. आणि आपली पुन्हा गांठ पडेपर्यंत एकाद्या संन्यासिनीप्रमाणें मी अतिशय साध्या राहणीनें राहून काळ काढीन."

ही शपथ घेत असतांना तिचा चेहरा विलक्षण तेजस्वी झाला होता. तिच्या डोळ्यांतील पाणी कांहीं विशेष रीतीनें चमकूं लागलें. तिची तेजस्वी मुद्रा अतिशय

शांत, अतिशय सात्त्विक, फारच भाविक अशी दिसली. त्या सर्व दखाव्यानें त्यालाही भरतें आलें आणि त्यानेंही म्हटलें,

"परदेशीं असतांना ज्या ज्या वस्तूंचा संग्रह करीन ती ती वस्तु केवळ तुझ्याच पायावर घालण्याकरितां जतन करून ठेवीन."

जाण्याची वेळ जवळ जवळ येत चालली होती. त्यानें तिचे दोन्ही हात आपल्या हातांत घेतले आणि तिच्या दृष्टीशीं आपली दृष्टि भिडविली! अत्यंत प्रेमभरानें तिला त्यानें 'जातों' असें म्हटलें, आणि दाराच्या बाहेर पाऊल टाकलें.

ॐ ॐ ॐ

झाडाच्या बुंध्याला हात टेकून उभा असतांना त्याला तो ज्या दिवशीं येथून गेला त्या दिवशींच्या प्रसंगाचें स्मरण झालें. त्या आणाशपथांची आठवण झाली आणि त्याचा ऊर भरून आला. डोळ्यांतून बाहेर येणाऱ्या अश्रूंना, डाव्या हाताच्या पहिल्या बोटानें डोळे दावून त्यानें झाडून टाकलें आणि डोळे उघडून समोर पाहिलें तोंच वरच्या माडीवरून खालीं आलेला एक श्रोता त्याच्याच बाजूला दुरून येतांना त्याला दिसला. किंचित् पुढें होऊन त्यानें विचारलें, "हें कुणाचें घर आहे हो?"

"एका गायिकेचें आहे." त्यानें उत्तर केलें.

"तिचें नांव काय?" त्यानें आशाळभूतपणानें प्रश्न केला.

"मला माहीत नाहीं बोवा!" ह्या गृहस्थानें जबाब दिला.

थोडासा विचार केलासें करून माधवानें पुन्हा म्हटलें—अगदीं काकुळतीनें म्हटलें, "मी तुमच्याबरोबर आंत येऊं का?"

"हो चला." असें त्या गृहस्थानें सांगितल्यावर भीतभीत तो माडीचा जिना चढून गेला. शृंगारलेल्या दिवाणखान्याच्या पुढल्याच बाजूला अगदीं जिन्यापाशीं एक अरुंद सज्जा होता. अर्धवट अंधार असलेल्या त्या सज्ज्याच्या कोपऱ्याच्या भागांत त्यानें मुद्दामच जागा मिळविली. सज्ज्याच्या कठड्याला उजव्या हाताच्या बाजूनें किंचित् रेलून त्यानें दिवाणखान्यांत दूरवर बघितलें. अस्सल गवयाच्या ऐटींत बसलेल्या त्या मनमोहक गायिकेचें भूल पाडणारें गायन अद्याप चालूच होतें. त्याला त्या रूपवतीचें दर्शन झाल्याबरोबर त्याच्या कपाळाला आठ्या पडल्या, त्याचे डोळे विस्तृत झाले! अनिमिष दृष्टीनें तिच्याकडे कांहीं काळ त्यानें टक लावली. आणि नंतर तोंड वळवून त्यानें अभ्राच्छादित आकाशाकडे आपली दृष्टि वळविली!

ॐ ॐ ॐ

ती गायिका विश्रांतीच्या वेळांत आपल्या खाजगी खोलींत गेली. त्या वेळीं तिच्या नोकरानें कळविलें कीं, एका गृहस्थांना आपल्याला कांहीं निकडीच्या कामाकरितां भेटावयाचें आहे !

हलक्या आवाजांत तिनें नोकराला विचारिलें, " कुठला आहे तो ? "

त्यानें सांगितलें, " मला कधींच पाहिल्याचें आठवत नाहीं; पण त्याचें फारच जरूरीचें काम आहे ! "

तिनें म्हटलें, " काय काम आहे म्हणून तूं त्याला विचारलेंस का ? "

" हो विचारलें; पण त्यानें कांहींच उत्तर दिलें नाहीं."

किंचित् मनाशींच विचार करून तिनें नोकराला उद्देशून म्हटलें, " हं, जा त्यांना येथें घेऊन ये."

कांचेच्या रंगीत नळ्यांचा दारावरचा नाजूक पडदा दोन्ही बाजूंला सारला जाऊन गायिकेची गांठ घेण्यास उत्सुक असलेल्या व्यक्तीनें आंत प्रवेश केला. त्याच्या अंगावरील झिरझिरीत कपडे अद्याप ओलसरच होते, त्याचे डोळे लाल झाले होते, आणि कपाळाच्या दोन्ही कडांवरील शिरा तडकलेल्या होत्या !

गायिकेनें एकदम म्हटलें, " काय पाहिजे ? "

अगदीं शांत वृत्तीनें पावलें टाकीत टाकीत तो तिच्याजवळ आला. आणि लष्करांतल्या शिपायाप्रमाणें सर्व शरीर ताठ करून मान ताठ करून—तो तिच्यापुढें उभा राहिला. तिच्याकडे त्यानें आपली गहिरी नजर एकवार फेंकली. दृष्टिभेट झाल्याबरोबर तिनें आपले डोळे दुसरीकडे वळविले. त्याच्या केंसाग्राची सुद्धां हालचाल होत नव्हती. त्याच्या लाल डोळ्यांतील भुरकट रंगाचीं बुबुळेंसुद्धां एका जागीं स्थिर झालीं होतीं. अत्यंत स्तब्धपणानें तो तिच्या पुढें उभा राहिला होता. पुन्हा एकदां भीतभीत त्याच्याकडे चंचलपणानें पहात तिनें विचारलें, " कोण आपण ? आपल्याला काय पाहिजे ? "

त्याचे ओंठ स्फुरण पावूं लागले. त्यानें कांपऱ्या स्वरानें प्रश्न केला, " नीट आठवण करा. माझ्याकडे न्याहाळून बघा म्हणजे समजेल ! "

जवळचा मद्याचा पेला तिनें तोंडाला लावला आणि तो रिता करून मेजावर ठेवला. तिचे ओंठ लालभडक झाले होते आणि नासिकाग्र वरखालीं उडत होतें. तिनें सांगितलें, " मला आतां वेळ नाहीं. बाहेर मंडळी वाट पहात असेल,

तिकडे गेलें पाहिजे. आपलें काय काम आहे हें सांगायला जर तुम्हांला इतका वेळ लागणार असेल तर तुम्ही पुन्हा कधींही माझ्याकडे येऊं नका."

हे शब्द ऐकून त्या तटस्थ स्थितींत त्याचें शरीर थोडेंसें कंप पावलें. त्यानें तिला अगदीं करडेपणानें विचारलें. "मी पुन्हां कधीं येऊं नको ना ?"

बाहेर दिवाणखान्यांत गर्दीगर्दीनें पाऊल टाकतांना, मान मागें वळवून तिनेंही फारच कडकपणानें सांगितलें, "पुन्हा न याल तर फार चांगलें होईल."

ती थोडी थांबली आणि आठवण केल्यासारखें करून म्हणाली, "तुम्हांला पाहिल्याचें आठवत नाहीं. यदाकदाचित् तुमचा माझा पूर्वींचा संबंध असला तर मी तो पार विसरून गेलें आहें. तुम्हींही विसरून जाल तर फार बरें."

ती दिवाणखान्यांत निघून गेली. गायनाला सुरुवात झाली. मागल्या बाजूनें निराश माधवही निघून गेला !

ॐ ॐ ॐ

बरींच वर्षें होऊन गेलीं होतीं. 'पुन्हा न याल तर फार बरें,' अशी बहकलेल्या मालतीची बजावणी ऐकल्यानंतर माधवानें पुन्हा तिच्याकडे जाण्याचें धाडस केलें नाहीं. मालती पतित झाली हें पाहून त्याला अर्थातच वाईट वाटलें ! आपण परस्परांनीं वाहिलेल्या आणाशपथा शेवटीं मिथ्या झाल्या याचा तर त्याला फारच विषाद वाटे; पण त्याचा आतां कांहींही उपयोग नव्हता. त्याला ब्रह्मदेशाहून परत आल्याला इतकीं वर्षें होऊनही मालती निवळल्याचें त्याला समजलें नव्हतें. मालतीची व त्याची शेवटची भेट झाल्याला आज पांचसहा वर्षें झालीं होतीं. त्या दिवशीं तिनें त्याला ओळखलें सुद्धां नाहीं. किंबहुना ओळखण्याचे श्रमही घेतले नाहींत !

गांवाच्या बाहेर पडण्याकरितां जो पूल होता त्याच्या जवळपास त्यानें वाळलेल्या गवताची झोंपडी उभारली होती. ब्रह्मदेशांत तो ज्या आशेनें गेला होता, ती आशा जर फलद्रूप झाली असती तर त्याच्यावर हा आजचा प्रसंग कदाचित् आलाही नसता; पण ब्रह्मदेशांत जाऊन व्यापार सुरू केल्या दिवसापासून तो बुडींत येऊं लागला आणि दिवसेंदिवस बुडत्याचा पाय खोलांत अशी त्याची स्थिति होऊं लागली. महिन्यामागून महिने गेले, वर्षांमागून वर्षें गेलीं. पण त्याला मुळींच फायदा झाला नाहीं. अतिशय कर्जबाजारी होऊन शेवटीं जेव्हां जिवाचा धोका उत्पन्न झाला तेव्हां त्याला एका रात्रीं तेथून पळ काढावा लागला. ज्या स्थितींत आपण आपल्या

बायकोला सोडून गेलों त्याच स्थितींत तिची व आपली पुन्हा गांठ पडेल या आशेनें तो परत आला. पण त्याची फार निराशा झाली !

इतकें होतें तरी त्याची कांहीं फार हलाखीची स्थिति नव्हती. अत्यंत काटकसरीनें व सावधगिरीनें राहिल्यास त्याला तग धरून रहातां येणें शक्य होतें. आणि आज त्या चंद्रमौळी झोंपडींत तो असाच राहिला होता. कुणाच्या आध्यामध्यांत नाहीं, एकटा व स्वतंत्र अशी स्थिति असल्यामुळें अर्थातच तो एका दृष्टीनें सुखी होता. कालव्ययानें त्याच्या इतर दुःखाची तीव्रताही बरीच कमी झाली होती.

त्याच्या हातून न कळतच संन्यस्त वृत्तीचा अंगीकार झाला होता. स्वतांच्या संसाराचा त्याला विचित्र अनुभव आल्याकारणानें एकंदर भोंवतालच्या जगाशीं त्यानें फारच बेताचा संबंध ठेवला होता. द्रव्याच्या टंचाईमुळें आणि मनाच्या निराशेमुळें त्याच्या वेषांत अतिशय साधेपणा आला होता. दुःख सहन करूनच त्याच्या तोंडावर एक प्रकारचा उग्रपणा आला होता. कपाळावरील आडव्या उभ्या आठ्या त्याच्या विचारीपणाची साक्ष देत होत्या. डोक्यापासून आणि हनुवटीपासून उत्पन्न झालेले काळे-पांढरे केंस त्याची तपश्चर्या दाखवीत होते.

बाहेर पावसाळी हवा होती. खूप जोराचा पाऊस येण्याचा रंग दिसत होता. माधव त्या झोंपडींत मनाशींच विचार करीत येरझारा घालीत होता. त्याच्या झोंपडीच्या दरवाज्याचें तोंड पुलाच्या बाजूला होतें. पुलावरून जाणारींयेणारीं माणसें दिसून मनोरंजन व्हावें म्हणून तो नेहमींच आपल्या झोंपडीचें दार उघडें ठेवीत असे.

सोंसाट्याचा वारा सुटूं लागला. त्याची गवताची झोंपडी मंद मंद हेलकावे खात होती. झोंपडीच्या किंचित् वरच्या बाजूला कललेलें आंब्याचें झाड वाऱ्यानें जोरांत हालत होतें, आणि त्याचीं पानें खालच्या गवताच्या छपरावर पडून सळ-सळ आवाज होत होता.

पाऊस पडायला सुरुवात झाली. घनदाट आकाशाला भोंक पाडून निघालेली ती पहिलीच सर होती. त्यामुळें फारच जोराचा जलवर्षाव होत होता. झोंपडींत येरझारा घालणाऱ्या माधवाच्या अंगावरही गारगार पाण्याचे तुषार उडत होते आणि त्याच्या अंगावर शहारे येत होते.

पावसाची गंमत पाहण्याच्या हेतूनें तो दारापाशीं आला आणि चौकटीच्या वरच्या बाजूला मध्यभागीं असलेल्या लोखंडी कोयंड्यांत एका हाताचें बोट अडकवीत त्यानें समोर बघितलें. दुरून त्याला पावसाच्या तडाक्यांत भिजत येत

असलेली एक व्यक्ति दिसली. त्या झोंपडीचा आश्रय शोधण्याच्या हेतूनेंच ती येत असावीसें दिसलें.

ती व्यक्ति बरीच जवळ आल्यावर ती एक स्त्री असल्याचें त्याला आढळून आलें. ती स्त्री अतिशय जवळ आली तेव्हां त्याच्या कपाळाला आठया पडल्या, त्याचे डोळे मोठे झाले, त्याच्या चेहऱ्यावरील उग्रता पार निघून गेली आणि त्याचें तोंड अतिशय कष्टी दिसूं लागलें! चिंब भिजून गेलेली ती स्त्री अगदीं जवळ आली. तिला हुडहुडी भरली होती आणि थंडीनें तिची वाजत असलेली दांतखिळी त्याला स्पष्टपणें ऐकूं येत होती. ती अश्रुविमोचन करीत होती; पण जलधारांनीं तीं आंसवें धुवून जात होतीं.

पूर्वीं कांहीं वर्षांपूर्वीं त्यानें तिला पाहिलें होतें. त्या वेळीं तिचा चेहरा कितीतरी गुटगुटीत होता. तिची अंगलट बरीच भारदस्त होती आणि तिच्या गौरवर्ण मुखाची कांति दुसऱ्याचें मन मोहून टाकील इतकी खुमासदार होती. पण आज ती अगदीं वृद्ध होऊन निस्त्राण झाल्यासारखी वाटत होती. तिचा मूळचा गौरवर्ण निष्प्रभ होऊन तिची चर्या कळाहीन दिसत होती.

झोंपडीच्या दारापर्यंत ती कशीबशी धडपडत आली. माधव थोडासा पुढें झाला. तिचा जात असलेला झोंक सावरण्याकरितां तो तिला स्पर्श करणार इतक्यांत तिची तीच जरा बाजूला झाल्यासारखी झाली आणि धाड्कन् खालीं जमिनीवर पडली!

तशा निःसाहाय्य स्थितींत पावसानें गारठून गेलेली मालती आपल्या दाराशीं पडलेली पाहून त्याच्या डोळ्यांला पाणी आलें. त्यानें मनाशींच म्हटलें कीं, कांहीं झालें तरी 'तुला सुख देईन' अशी मीं तिच्याजवळ एकदां शपथ वाहिली होती. ती पतित आहे, निंद्य आहे, त्याज्य आहे हें सर्व खरें. पण माझ्यासमोर, माझ्या पायांपाशीं तिला आणून पाडण्यांत कदाचित् परमेश्वराचाही कांहीं हेतु असेल. त्याची अशीही इच्छा असेल कीं, मीं तिला आश्रय देऊन तिचा स्वीकार करावा...

त्याच्या मनांतील हे विचार चालू असतांनाच अर्धवट बेशुद्धावस्थेंत असलेली मालती एका कुशीवर झाली. तिचे दोन्ही हात जवळ जवळ आले होते आणि तिची ती हालचाल होत असतांना अगदीं सहजासहजीं ते जवळ उभ्या असलेल्या माधवच्या पायावर पडले. त्याला वाटलें तिला पश्चात्ताप होत आहे.

तो खालीं वांकला. मानेखालीं एक व गुढघ्याच्या खालच्या भागापाशीं दुसरा हात घालून त्यानें तिला अलगत उचलून झोंपडींत नेली आणि दार बंद करून घेतलें!

पितृवात्सल्य

'कुणि गोपाळ घ्या, कुणि गोविंद घ्या'.

व्रजलाल बाहेरील खोलींत येरझारा घालीत असतां वरील शब्द त्याच्या कानीं पडले. ते शब्द ऐकल्यावर त्याच्या अंतःकरणांत अननुभूत अशा किती तरी भावना उचंबळून आल्या. वृंदेशीं त्याचें लग्न झाल्याला आज उणीं पुरीं दहा वर्षें झालीं होतीं. लग्नानंतर दहा वर्षांनीं झालेला हा अपत्यसंभव त्या दोघांच्याही मनाला अपूर्व आनंद देत होता. नवीन बालिकेचा चाललेला नामकरणविधीचा सोहळा पाहून वृंदेलाही परमोच्च सुखाचा आस्वाद घ्यावयास मिळत होता.

⁂ ⁂ ⁂

आदल्या रात्रींच व्रजलाल निघून जावयाचा, पण नूतन बालिकेच्या बारशा-निमित्त त्यानें आपला जाण्याचा बेत दोन दिवस पुढें ढकलला. नवऱ्याला त्याच्या इतर मित्रमंडळींनीं आपल्यावरून चिडवूं नये म्हणून त्या रात्रीं दोघेंजण गोष्टी बोलत बसलीं असतां वृंदा मुद्दामच म्हणाली, " कांहीं नाहीं, आपल्याला जायचं असेल तर आपण बेलाशक जा. आज काय मुलीच्या बारशाकरितां राहिलों, उद्यां काय मित्राच्या लग्नाकरितां परगांवीं गेलों अशा सबबी सांगून विनाकारण दिवसगत लावूं नये."

वृंदेच्या या बोलण्याचा व्रजलालला खरा अर्थ कळला नाहीं. किंचित् रागानेंच तो तिला म्हणाला, " वा ! हे सध्यांचे समान हक्काचे दिवस आहेत. त्या मुलीचे सुखसोहळे तूं पहावेस आणि मीं मात्र तुमच्या सुखाकरितां दूर निघून जावें होय ! नोकरी जन्माचीच मागें लागली आहे. माझ्या लाडक्या मुलीच्या बारशाचा प्रसंग पुन्हा येणार आहे का ! तिच्या बारशाकरितां मी गैरहजर राहून माझी नोकरी गेली तरी पत्करली. पण आयुष्यांतील असले अत्यल्प सुखाचे प्रसंग हातचे घालविण्याइतका अरसिक मी नाहीं ! "

पतीचे हे अपत्यस्नेहसूचक उद्गार ऐकून वृंदेला पराकाष्टेचें कौतुक वाटलें. पतीनें नूतन बालकाचें कौतुक करावें, त्याच्या अल्पस्वल्प चेष्टा पाहून आपल्या-कडे बघून मूक समाधान व्यक्त करावें, परगांवीं जाण्याची वेळ आलीच तर वात्सल्यामुळें त्याचीं पावलें जड व्हावीं असेंच प्रत्येक प्रेमळ पत्नीला

वाटत असतें. व्रजलालला होत असलेला आनंद त्याच्या आतांच्या भाषणानें पुरेपूर व्यक्त होत होता. नोकरीचीही फिकीर न बाळगण्याइतकी त्याच्या कन्या-प्रेमाची मजल गेलेली पाहून वृंदेला आपल्या पतीबद्दल एक प्रकारचा अनिर्वाच्य अभिमान वाटला ! पण आज व्रजलालची पुरी परीक्षाच पहावयाची या हेतूनें ती पुन्हा म्हणाली, "पण आपल्या मुलीची जबाबदारी आपल्यावरच आहे ना ! नोकरी गेली तर मग त्या मुलीला सुखांत ठेवण्याची आपली इच्छा तडीस जाणें शक्य आहे का ? प्रेमाच्या नांवावर सुखसोईच्या गोष्टी साध्य होणें शक्य असेल तर मी तरी आपल्याला पैसे मिळविण्याबद्दल उत्तेजन दिलें असतें का ? पण आपल्या संततीबद्दलच्या सर्व आकांक्षा परिपूर्ण होण्याचं साधन पैशांतच नाहीं का ? द्रव्याशिवाय बाकीच्या सर्व सोयी असल्या तरी त्यांचा यत्किंचित्‌ही उपयोग होत नसतो !"

इतकें बोलून झाल्यावर आपल्या अधोवदन पतीकडे एक प्रेमळ कटाक्ष टाकून तिनें पुन्हा एकवार विचारलें, "कां, मी म्हणतें तें पटत नाहीं का ?"

वृंदेचा हा प्रश्न ऐकून व्रजलालनें वर पाहिलें. "माझ्या पत्नीला आणि तिच्या मुलांना सुखासमाधानांत ठेवण्यासाठीं पडतील ते कष्ट करण्याचा माझा निर्धार आहे, हें तुला माहीत आहे ना ? मग ज्या कृत्यामुळें नोकरी सुटेल असें कृत्य करण्यास मी कधीं तरी उद्युक्त होईन का ? जिवाचें मोल देऊन माझ्या लाडक्या लेकीला सुखांत ठेवण्याचा आज तिच्या प्राणांचीच शपथ वाहून मी निश्चय करतों!"

हें व्यक्त झालेलें व्रजलालचें प्रेम वृंदेच्या कल्पनेपेक्षांही अधिक उदात्त होतें. व्रजलालच्या भाषणानें वृंदेला प्रेमाचा उमाळा अनावर झाला. तिच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले. पतीच्या कोमल मनाची, पत्नीप्रेमाची, अपत्यस्नेहाची ग्वाही देणारी ती अमृतवाणी ऐकून वृंदेला आज आपण खऱ्या सात्विक प्रेमाचा धडा शिकलों असें वाटलें आणि आपल्या पतीची आपल्यावर असलेली प्राणाच्या मोलाची भक्ति पाहून तिला आश्चर्य वाटून तिच्या प्रेमाला डोळ्यांवाटे वाट मिळाली !

विषय बदलण्याच्या हेतूनें वृंदा म्हणाली, "पण एकदां नांव ठरवून टाकलं पाहिजे. मागून नांवं ठेवलेलीं मला नाहीं खपायचीं !"

"तुला जें योग्य वाटेल तें नांव तूं ठेव. माझी मुळींच त्याला हरकत नाहीं. मला सुलोचना हें नांव अधिक आवडतं."

आंत चाललेल्या नामकरणविधीकडे व्रजलाल कान टवकारून लक्ष देत होता. वर दिलेल्या रात्रीच्या संभाषणाची त्याला मधुरस्मृति झाली. आतां मुलीचें नांव काय ठेवतात इकडे त्याचें चित्त लागून राहिलें होतें. नवीन बालिकेच्या जन्माबरोबर तिच्या संगोपनाची नवीन जबाबदारीही आपल्यावर पडली आहे याची व्रजलालला पूर्ण जाणीव होती. विचारतंद्रींत निमग्न असतांना त्यानें किती तरी भावी मनोरथांचे मनोरे रचले. आपल्या बारा दिवसांच्या कन्येभोंवतीं त्यानें किती तरी प्रकारची सुखमय सृष्टि आपल्या मनाशींच निर्माण करून पाहिली. त्या बालिकेचीं निरनिराळीं स्थित्यंतरें होतां होतां तिचें एका प्रौढ वधूंत आणि नंतर एका संसाररत सुगृहिणींत रूपांतर झालें! सिगारेटचे झुरक्यांवर झुरके सोडीत व्रजलाल हिंडत असतां त्याच्या मनाचें हें काम सारखें चालू होतें. त्याच्या मनानें निर्माण केलेलीं हीं नानाविध स्थित्यंतरें तो वरचेवर पडताळून पहात होता. या प्रत्येक वेगळ्या स्थितींत आपल्या मुलीला परमावधीचें सुख कोणत्या उपायांनीं प्राप्त होईल याची सारखी छाननी चालूच होती. थोड्याच वेळांत तो भानावर आला आणि,—'कुणि गोपाळ घ्या, कुणि गोविंद घ्या'—हे शब्द त्याच्या कानीं पडले. व्हावयाचे ते सर्व प्रकार होऊन सुलोचना हें नांवही कुणींसें उच्चारलें. तें नांव ऐकल्याबरोबर व्रजलालला किती तरी आनंद झाला! शेवटीं आपल्याला जें नांव पाहिजे होतें तेंच ठेवलें गेलेलें पाहून त्याला पत्नीच्या आज्ञाधारकत्वाची प्रतीति आली. आंतील बायकांच्या आग्रहावरून वृंदेला नेहमींच्या पद्धतीप्रमाणें नांव घेण्याचाही प्रसंग आला. तो सर्व प्रकार अनुभवीत असतां व्रजलालला अभूतपूर्व अशा सुखाचा अनुभव येत होता!

दुसऱ्या दिवशीं आपल्या नोकरीवर रुजू होण्याकरितां व्रजलाल जाण्याची सिद्धता करूं लागला. त्यानें कित्येक वस्तु जरुरीच्या नाहींत म्हणून बाजूला ठेवाव्यात, वृंदेनें त्या घेण्याचा आग्रह करावा, असें चाललें होतें. पण स्टेशन आणि व्रजलालचें घर यांमध्यें थोडेंच अंतर असल्यामुळें व्रजलालला तयारी करायाला भरपूर वेळ मिळाला. स्टेशनपर्यंतचा रस्ता सारा दहाच मिनिटांचा असल्यामुळें गाडीची अगदीं वेळ होईपर्यंत व्रजलाल बायकोचा निरोप घेतच होता. आपल्यामागें करावयाची व्यवस्था त्यानें किती तरी वेळां वृंदेला समजावून दिली. सुलोचनेची नीट काळजी घेत जा, म्हणून त्यानें वृंदेला किती तरी वेळां बजावलें. बंगल्याच्या पुढील पडवींतून गाडी समोरून जातांना दिसत

असे. घरांतून निघेपर्यंत घेतलेल्या निरोपांनीं व्रजलालचें समाधान होईना. अगदीं जाण्याच्या वेळीं वृंदेनें दोन्ही हातांवर धरलेल्या सुलोचनेचें एकवार प्रेम-पूर्ण अन्तःकरणानें व्रजलालनें चुंबन घेतलें. बायकोकडे आपली प्रेमार्द्र दृष्टि टाकून व्रजलालनें म्हटलें, "सुलोचनेला घेऊन त्या पुढल्या पडवींत बैस!" "तिला वारें नाहीं का लागावयाचें?" या तिच्या प्रश्नाला 'नाहीं' असें त्रोटक उत्तर देऊन तो घराच्या पायऱ्या उतरून टांग्यांत जाऊन बसला व स्टेशनची वाट चालूं लागला.

त्या दोघांची यानंतर सुमारें वर्षानंतर गांठ पडणार होती. निरोप घेतेवेळीं दोघांच्याही अंतःकरणाला अगदीं जड-जड वाटत होतें. गाडी चालू झाल्यापासून अगदीं दिसेनाशी होईपर्यंत खिशांतील हातरुमाल बाहेर काढून व्रजलाल, सुलो-चनेला हातांत नीट गुंडाळून घेऊन जोत्यावर उभ्या असलेल्या वृंदेकडे पाहून खूण करीत होता.

२

आज व्रजलालला आपल्या बायकोला आणि मुलीला भेटून एक वर्ष झालें होतें. विजयपूरकडील वृत्त तो वर्तमानपत्रांतून सदोदित वाचीत असे. उद्यां तो विजयपूरला जाण्याकरितां निघणार होता. एक वर्ष म्हणजे तीनशें साठ दिवसांनीं तो आज आपल्या घरीं जाणार होता. उद्यां जाण्याची वेळ केव्हां येईल असें त्याला होऊन गेलें होतें! तयारी करतां करतां त्याचा एकादी वस्तु उचलण्याकरितां पुढें झालेला हात तसाच अधांतरीं राही आणि विचारतंद्रींतून शुद्धीवर आल्यावर त्याचें त्यालाच झाल्या प्रकाराबद्दल हंसूं येई. वृंदेची आठवण त्याच्या स्मृतींत ताजी झाली. वर्षापूर्वीं इकडे आलों तेव्हां अवघ्या बारा दिवसांची सुलोचना आतां किती तरी मोठी झाली असेल! या सुखद विचारानें त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले! जाण्याची जशी आपल्याला उत्कंठा आहे तशी आपल्या-करितां सर्वस्व अर्पण करणारी वृंदा आपली वाट किती उत्कंठेनें पहात असेल याचें चित्र त्याच्या मानसचक्षूंसमोर उभें राहिलें आणि त्याच्या नेत्रांवाटे दोन आनंदाश्रु बाहेर पडले! त्याला आपल्या घराची आठवण झाली. त्या जागेची आठवण होतांच तेथें घडलेल्या कांहीं सुखदायक प्रसंगांच्या मधुर स्मृतीनें त्याचें चित्त थरारून गेलें! त्या रात्रीं झालेल्या संभाषणाची आठवण होऊन त्यानें

स्वतांशींच केलेला निश्चय-प्रतिज्ञा त्याच्या मनांत उभी राहिली. दुसऱ्या दिवशीं सुलोचनेचा नामकरणविधि होऊन बारशाचा सुप्रसंग साजरा झाला त्या वेळीं त्याचा स्वतःचा उल्हास आणि वृंदेची कौतुकास्पद तारांबळ इत्यादि आठवणींनीं त्याची चित्तवृत्ति अगदीं अस्थिर झाली. विजयपूरकडील हकीकत वाचण्यासाठीं तो नेहमींच उत्सुक असे. पण उदईक प्रत्यक्ष पहावयाच्या गोष्टी आज मिळणाऱ्या वार्तेवरून कल्पावयाच्या असल्यामुळें विजयपूरकडील वृत्त कथन करणारें वर्तमानपत्र केव्हां एकदां हातीं येईल, असें त्याला झालें होतें. त्या वृत्तपत्रांत आपल्या घरची हकीगतसुद्धां असावी असें त्याच्या वेड्या मनाला आपलें उगीचच वाटत होतें. अशा मनःस्थितींतच त्यानें चहा घेतला. आतां उदईक आपल्याला आपल्या वृंदेच्या हातचा चहा घ्यावयास मिळणार अशा तऱ्हेचा सुखकारक विचारही त्याच्या मनांत आल्याखेरीज राहिला नाहीं. वर्तमानपत्रें विकणारा पोऱ्या त्याच्या दुपारच्या चहाच्या वेळीं नेहमीं येत असे; पण आज खोलीचें दार उघडून वर्तमानपत्र आंत टाकणारा पोऱ्या येण्याऐवजीं त्याचा एक मित्र त्याच्याकडे आला.

सद्यःपरिस्थितीस सोडून आपल्या मनांत कांहीं वेगळे विचार चाललेले असतात आणि त्यांतल्या त्यांत विशेषतः हे विचार जेव्हां सौख्यद असतात त्या वेळीं या सुखप्रद विचारांच्या तंद्रीचा अकस्मात् बिघाड करणाऱ्या व्यक्तीबद्दल आपल्याला तिरस्कार वाटतो. व्रजलालची स्थितिही या वेळीं अशीच झाली. माधव त्याचा जिवलग मित्र खरा; पण आपण आपल्या घराविषयीं-घराकडील गोष्टींविषयीं-विचारमग्न असतां या मित्रानें आपला आज पाठपुरावा करावा हें व्रजलालला खपलें नाहीं. पण त्या दिवशींचा योगायोगच विचित्र होता. व्रजलालला विजयपूरकडील बातमी हवी होती. ती सांगणारा त्याला कोणी भेटला असता तर त्यानें त्याचा सत्कारच केला असता. ऑफिसमधील कांहीं भाकड भानगडींसंबंधानें आज माधव बोलणें काढील असें व्रजलालला वाटलें होतें. उद्यां आपण स्वगृहीं जाणार आहोंत; अशा स्थितींत ऑफिसमधील गोष्टींचाच पुनःपुन्हा काथ्याकूट करीत बसण्याचा व्रजलालला पुरा वीट आला होता. पण माधवाच्या येण्याबद्दल व्रजलालच्या भिवयांवर आठी चढण्याच्या आधींच ती उतरण्यासारखे उद्गार माधवाच्या तोंडून बाहेर पडले व माधवाच्या येण्यानें उत्पन्न झालेला त्याच्या मनांतील सर्व तिरस्कार अर्थातच जागच्या जागीं विरून गेला. एखादी गोष्ट करण्यास उत्सुक असलेल्या माणसाचा उत्साहभंग झाल्यावर त्यानें जसा चेहरा करावा तसाच व्रज-

लालच्या चेहरा झाला. खोलींत पाय ठेवतांच माधवनें म्हटलें, " महाराज, आपलं विजयपूर आतां इथंच झालं ! "

हे उद्गार माधवनें इतक्या विचित्र स्वरांत काढले कीं, व्रजलालच्या हृदयाला त्यामुळें चरकाच बसला !

" बायकापोरांना भेटण्याचें सोडून मी सुट्टींत येथें राहून काय करणार ? " व्रजलालनें धीर करून विचारलें.

" तुझ्या बायकापोरांना तूं भेटूं नयेस असं का आम्हांला वाटतं ? पण तूं त्यांना भेटण्यासारखी स्थिति नसल्यास आम्हांला तुला नीट सांगायला नको का ? "

" मीं आपल्या घरीं जाऊं नये अशी स्थिति निर्माण व्हायला झालं तरी काय ? "

" तशी स्थिति निर्माण झाली हें वाचून मलासुद्धां अतोनात वाईट वाटलं."

" तुला विजयपूरकडील हकीगत वाचायला मिळाली ? आणि मग मला अजून वर्तमानपत्र कसं मिळालं नाहीं ? "

" येतां येतां मींच त्या पोऱ्यापासून आणलं."

" माधव, एकदां मला वर्तमानपत्र वाचूं दे तरी. नाहीं तर तूं मला वाचून दाखीव."

आतां अधिक ओढून धरण्यांत अर्थ नाहीं असें वाटून माधवानें खिशांतून वर्तमानपत्र काढून तें वाचण्यास आरंभ केला.

—'गोदावरी नदीला अकालीं पूर येऊन तिच्या कांठीं असलेल्या बऱ्याच गांवांची खूप नासाडी झाली आहे. प्राणहानिही बरीच झाली आहे. ज्या ज्या गांवीं नासधूस आणि प्राणहानि झाली आहे त्या त्या गांवीं सरकारनें अधिकारी लोक पाठवून तेथील व्यवस्था लावण्याचें काम चालविलें आहे. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट एवढीच कीं, आतां पूर बराच ओसरला आहे. कालचा दिवस पुराला आणि पावसाला बराच जोर होता; पण आज जरा उघडीप आहे. आगगाड्यांचीही ये जा आज पुन्हा थोडीफार चालू आहे'.—

एवढा मजकूर वाचून माधव थांबला; पण हा मजकूर ऐकून व्रजलालच्या मनांत मात्र शंका-कुशंकांनीं काहूर माजविलें. गोदावरीच्या कांठीं असलेलीं अनेक गांवें महापुरामुळें आज उध्वस्त झालीं ही बातमी ऐकून त्याच्या मनांत प्रथम जर कोणता प्रश्न आला असेल तर तो 'आपल्या विजयपूरचें काय झालें ?' हाच होय.

अर्थातच वृंदेची आणि सुलोचनेची आठवण होऊन त्यांचेंही काय झालें असेल अशी भीति त्याला वाटल्यावांचून राहिली नाहीं. एक वर्षानें आपण आपल्या घरीं जाणार होतों, पण आज दैवानेंच उलटा हात दाखविल्यामुळें आपलें जाणें जागच्या जागीं राहिलें. पुन्हा वृंदेची आणि लहानग्या सुलोचनेची गांठ पडेल का ? कीं या महापुराच्या धुमश्चक्रींत त्यांचेंही कांहीं बरेंवाईट झालें असेल ?...निमिषार्धांत मनांत येऊन गेलेल्या या विचारांनीं त्याचें अंतःकरण भडकून गेलें. त्यानें माधवाला एकदम प्रश्न केला, " पण माधव, आमच्या विजयपूरची बातमी आहे का कांहीं ? "

" हो; ताजी बातमी या सदराखालीं विजयपूरची हकीगत दिली आहे." माधवानें हकीगत वाचण्यास आरंभ केला.

——'विजयपूरला बरीच प्राणहानि झाली असून जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन गेलें आहे. गांवांत एकंदर नासधूसही बरीच झाली आहे. स्टेशनपर्यंत पाणी आलें आहे. स्टेशन गांवापासून जरी जवळ असलें तरी तें उंचावर आहे. स्टेशनकडे गांवांतून येणारे सर्व रस्ते गांवाच्या बाजूला उतरते असल्यामुळें गांवांत सांठलेलें भयंकर पाणी स्टेशनच्या बाजूला येऊं शकलें नाहीं. गांवांत पाण्याची इतकी रेलचेल झाली आहे कीं, कांहीं प्रेतें आणि इतर वस्तु पाण्यावरून तरंगत आहेत. पण सरकारी अधिकारी या प्रेतांची आणि इतर अस्ताव्यस्त वस्तूंची व्यवस्था लावण्याचें काम जारीनें करीत आहेत. बाहेर तरंगणारीं प्रेतें कांहीं उपायांनीं स्टेशनकडे ओढून आणून आगगाडीनें परगांवीं पोंचविण्याची व्यवस्था होत आहे. पाणी हळुहळू ओसरत आहे'.——

ही बातमी ऐकून मात्र व्रजलालच्या हृदयाचें पाणीपाणी झालें. त्याच्या मनांत नाहीं नाहीं ते वाईट विचार येऊं लागले. विजयपूरला पाणीच पाणी होऊन गेलें आहे. आपल्या घरापर्यंत पाणी आलें असेल का ?—आलें असल्यास वृंदेची आणि सुलोचनेची काय वाट ?...वृंदेनें स्वतःला आणि सुलोचनेला वांचविण्याची कांहीं खटपट केली असेल का ?—कीं तिचें कांहीं बरेंवाईट झालें असेल ?...

शेवटचा प्रश्न त्यानें आपल्या मनाला केला खरा; पण त्यासरशीं त्याचें सर्वांग थरारून गेलें. त्याला कांहीं सुचेनासें झालें. त्यानें एकदम माधवला विचारलें, " पण तेथपर्यंत आगगाडी अजून जाते ना ? "

व्रजलालचा करुणार्द्र चेहरा पाहून माधवला भडभडून आलें. त्यानें व्रजलालला 'हो'. असें त्रोटक उत्तर दिलें.

तें ऐकून व्रजलालला एक प्रकारचें समाधान वाटलें. तेथपर्यंत जर गाड्या जात असतील तर आपल्याला निदान स्टेशनपर्यंत तरी जायला मिळेल. मग घरापर्यंत कसें जावयाचें तें आपण पुढें पाहूं. ज्या जागेवरून आपल्याला आपल्या घराचें दर्शन होईल तेथून आपण लांबूनच आपल्या घराकडे पाहूं!

" माधव, मग मला जायला काय हरकत आहे?" व्रजलालनें विचारलें.

" पण नुसता स्टेशनपर्यंत जाऊन तूं पुढें काय करणार?" माधवनें उलट प्रश्न केला.

" पुढें कांहीं नाहीं. स्टेशनपर्यंतच मी जाणार." व्रजलालनें निश्चयी स्वरांत म्हटलें.

३

" विजयपूरचें एक तिकीट द्याहो!"

" थेट विजयपूरला जाणार का?"

" हो!"

" विजयपूरला यापुढं गाड्या भरून जाणार नाहींत!"

" अजीबात उतारूंची वाहतुक बंद आहे का?"

" हो, तेथील रहिवाश्यांची योग्य व्यवस्था लावण्याकरितां रिकाम्या गाड्या पाठविण्याबद्दल हुकूम झाला आहे!"

" मग आतांपर्यंत तुम्हीं त्या बाजूचीं तिकिटं विकलीं ते उतारू जाणार नाहींत का?"

" विजयपूरच्या अलीकडच्या स्टेशनपर्यंत उतारू भरून पाठवायला हरकत नाहीं, असा हुकूम आहे!"

" मग अलीकडच्या स्टेशनचं एक तिकिट द्या मला."

अजून पहाटच होती. स्टेशनवर तिसऱ्या वर्गाच्या थोड्या उतारूंखेरीज कोणीही माणसें नव्हतीं. नाना प्रकारचे पदार्थ विकणारे लोकही थंडीनें कुडकुडत आपापल्या ढकलगाड्यांलगत निजले होते. स्टेशनमधला एकच एक ग्यासचा दिवा एका विचित्र सुरानें आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत होता. अधिकारी लोकांचें हाताखालच्या लोकांवर खेंकसण्याचें काम चालूच होतें. सर्वत्र शांत असल्यामुळें

आगगाडीच्या मोकळ्या रुळांवर इतस्ततः हिंडणाऱ्या कुत्र्यांचें भुंकणें आणि कामगार लोकांचें बोलणें यांखेरीज स्टेशनवर कसलीच गडबड होत नव्हती. एकादें-च कुत्रें जर निष्कारण ओरडलें तर दोनचार कदमांच्या टापूंतील कुत्रीं एकदम जोरानें ओरडत सुटत होतीं. स्टेशनमास्तर उतारूंना तिकिटें देत होता आणि एकदां तिकीट दिल्याची निशाणी म्हणून लोखंडी यंत्रांत तिकीट घालून खणखणी-त आवाज काढीत होता. उतारू लोक मधूनमधून निजल्यानिजल्याच गाडीची वाट पाहून कंटाळा आल्याचें व्यक्त करण्याकरितां उंच स्वरांत जांभई देऊन चुटक्या वाजवीत होते. खिळ्याच्या वहाणा घातलेले पोर्टर लोक फरशीवरून ये जा करीत असतांना घर्षणानें अंगावर शहारे आणणारा ध्वनि होत होता. थंडी बरीच असल्यामुळें सर्व जणांनीं अंगाशीं हातांच्या जणुं घड्या बांधल्या होत्या. गार वाऱ्यानें अंगावरील वस्त्रें वर खालीं होत होतीं. वृंदेला आणि सुलोचनेला भेटण्यास अतिशय उत्सुक असलेला व्रजलाल स्टेशनमास्तरला तिकिट मागत होता. विजयपूरला नाहीं तरी अलीकडच्या स्टेशनवर आपण जाऊन पडलों म्हणजे तितकेंच जवळ गेल्यासारखें होईल, या विचारानें व्रजलालनें अलीकडच्या स्टेशन चें तिकिट मागितलें. स्टेशनमास्तरानें दिलेलें तिकीट कांपऱ्या हातानें घेत घेत व्रजलालनें विचारलें, " गाडी केव्हां येणार ? "

" काय सारखे सारखे प्रश्न विचारून तुम्ही त्रास देतां आहांत हो ? " चिडून स्टेशनमास्तर व्रजलालच्या अंगावर ओरडला.

चिंताग्रस्त व्रजलाल या बोलण्यानें फारच दुःखी झाला. एरवींच्या मनः-स्थितींत एखाद्या खरमरीत उत्तरानें त्यानें त्या स्टेशनमास्तरची चांगली संभावना केली असती; पण आज कोणाशींच बोलण्याइतकी त्याची चित्तवृत्ति स्वस्थ नव्हती. काल दुपारपासूनच त्याच्या डोळ्यांसमोर विजयपूर दिसत होतें. विजयपुरांतील त्याचा बंगला आणि त्या बंगल्यांतील प्राणाहून प्यार असे दोन असहाय जीव त्याच्या अंतर्दृष्टीसमोर थैमान घालीत होते. व्यग्र मनःस्थितींत असल्यावर मनुष्या-ला एक प्रकारची मानसिक व्याधि लागल्याप्रमाणें होतें. त्याच्याशीं कुणी बोलल्यास त्या बोलण्याकडे त्या मनुष्याचें लक्षसुद्धां नसतें. कोणी प्रेमानें साधा प्रश्न करो अगर रागानें कोणी वाक्ताडन करो, त्याची वेडावलेली चित्तवृत्ति फारशी बदलण्या-चा संभव नसतो. तो मनुष्य दुसऱ्याला जे प्रश्न करतो त्यांचीं त्रोटक उत्तरें ऐकून घेण्याइतकाच काय तो त्याला धीर असतो. त्यानें विचारलेल्या एकाद्या प्रश्नाचा

विपर्यास करून एकाद्यानें जर त्याला रागानें उत्तर दिलें तर विद्ध हरणाप्रमाणें तो मूकभाव धारण करून आपल्या वैतागलेल्या मनाचा अधिकच संताप करून घेतो. व्रजलालचें असेंच झालें. स्टेशनमास्तरला त्यानें अगदीं साधा प्रश्न केला. पण रोजच्या कर्मकटकटीनें जिकिरीस आलेल्या स्टेशनमास्तरला व्रजलालच्या व्यग्र मनः-स्थितीची जाणीव झाली नाहीं. त्यानें पुढील प्रश्नमालिका बंद केली. इतर उतारूं-मध्यें मिसळून आपणही गाडीची वाट पहात बसावें असा विचार करून व्रजलालनें तेथून काढता पाय घेतला. एका बांकावर बसतां बसतां 'वृंदा, सुलोचना' असें कायसें तो पुटपुटला; पण तें त्याचें त्यालासुद्धां नीटसें ऐकूं आलें नाहीं!

ॐ ॐ ॐ

दुसऱ्या दिवशीं पहाटे विजयपूरच्या अलीकडच्या स्टेशनवर गाडी थांबली होती. यापुढें विजयपूरकडे जातांना गाडींत एकसुद्धां उतारू असूं नये असा हुकूम झाल्यामुळें पोर्टर लोक गाडीची बारकाईनें तपासणी करीत होते. एकाद्या निजलेल्या उतारूला जागें करून गाडीच्या बाहेर काढावें, लपून बसून विजयपूर-पर्यंत जाण्याच्या उद्देशानें दडलेला एकादा सांपडल्यास त्याला धक्के देऊन बाहेर हांकलावें असें चाललें होतें.

कांहीं न खातां-पितां व्यथित अंतःकरणानें व्रजलाल एका फळीवर पडला असतां त्याला झोंप लागली होती. भुकेनें आणि तहानेनें व्याकुळ झाल्यामुळें कदाचित् त्याला ग्लानीसुद्धां आली असेल. पण हुकमाची तामिली करणारे पोर्टर-लोक! त्यांना खरी परिस्थिति काय माहीत? तपासणी करीत करीत ते व्रजलाल निजला होता त्या बाकापाशीं आले, आणि 'दादा उठा' असा त्यांतील एकानें इशारा दिला. व्रजलाल गडबडीनें उठला. त्यानें एकवार आसपास पाहिलें आणि त्यांतील एका पोर्टरास, विचारलें "विजयपूर आलें का?" "कुठलें विजयपूर? विजयपूर बुडलें पाण्यांत!" हे एका पोर्टराचे रांगडे उद्गार ऐकून व्रजलालची झोंप पार उडाली. तो जागचा उठला आणि डब्याच्या बाहेर पडला.

"विजयपूरच्या व्रजलालच्या कुटुंबाचें काय झालें असेल?" असा प्रश्न त्याच्या मनांत उभा राहिला!

"विजयपूर पाण्यांत बुडलें...व्रजलालचें घर...पाण्यांत बुडलें...वृंदा...... सुलोचना...पाण्यांत...नाहींशा झाल्या..." पोर्टरच जणुं हें उत्तर देत आहे असा

भास होऊन त्याच्या हृदयाचा अगदीं थरकांप झाला. डोळ्यांपुढें अंधेरी येऊन तो मटकन् खालीं बसला.

"गाडी खालीं हुवा ?" गार्डानें कर्कश आवाजांत विचारलें.

"हां साब !" म्हणून पोर्टरच्या एका मुख्यानें त्याला उत्तरही दिलें. गार्डानें शीट वाजविली आणि हातांतील हिरवा कंदील हालवला. गाडी जागची हालली. गार्ड आंत चढून उभा राहिला आणि गाडीच्या बाह्यांगाला कंदिलाचा हात संलग्न ठेवून त्यानें पुन्हा कंदील हालवला. शुद्धीवर येतांच व्रजलालनें त्या दूरदूर सरकणाऱ्या, विजयपूरला जाणाऱ्या गाडीकडे पाहिलें आणि निराशेचा दीर्घ निश्वास सोडला. गाडी लांब निघून गेली होती. गाडीचा आवाजसुद्धां ऐकूं येण्याचें बंद झालें होतें.

व्रजलाल जागचा उठला. डोळे घट्ट दाबून त्यानें डोळ्यांत सांचलेलीं आंसवें खालीं गाळलीं आणि ज्या मार्गानें गाडी दूर अंतरावर निघून गेली होती त्याच मार्गानें तो चालूं लागला. पाऊस पडत होता. व्रजलालचे सर्व कपडे भिजले होते. स्टेशनमधला ग्यासचा दिवा पावसाचे तुषार उडाल्यामुळें अंधुक प्रकाश देत होता. जलबिंदूंनीं आच्छादिल्यामुळें त्या दिव्यापासून फांकणारी प्रभा कांहीं जागेवर पूर्ण पडत होती व कांहीं जागेवर अंधुकशी पडत होती. गारगार वारा अंगाला झोंबत होता, आणि पावसाच्या पाण्याशीं संमिश्रण पावून मनुष्याच्या कानाशीं घोंघावत होता. निवडुंग आणि इतर कांटेरी रानझाडांनीं त्या मार्गाच्या दोन्ही बाजू ग्रासल्या होत्या. आणि गाडीचा लोहमार्ग दूरपर्यंत दिसून नंतर अदृश्य होत होता. व्रजलालच्या दृष्टीला उजेड दिसत होता; पण अंतःकरणांत अंधार होता !

आयुष्यांतील जिवलग सखी आणि तिच्या प्रेमाची चालती बोलती खूण सुलोचना यांच्याशिवाय इतर सर्व मनोव्यापार जणुं सुप्त झाले होते !

चालतां चालतां व्रजलालनें वर पाहिलें. विचारामुळें आपण किती चाललों याचेंसुद्धां त्याला भान राहिलें नव्हतें. झपाझप वाट चालत असतां त्यानें दोनचार मैल जमीन सहज तुडविली. त्यानें वर पाहिलें तों संधिप्रकाश पडला होता. जवळजवळच्या वस्तु स्पष्ट दिसत होत्या आणि अन्तरावरच्या वस्तु न्याहाळून बघाव्या लागत होत्या. डाव्या बाजूला व्रजलालनें आपली दृष्टि वळविली. गोदावरीचें अफाट पात्र लांबवर पसरलेलें दिसत होतें. त्या संधिप्रकाशांत नदीचा पलीकडचा तट पाहण्याकरितां व्रजलालनें डोळे ताणले, पण तो त्याला दिसला

नाहीं. किंचित् वर उजव्या बाजूला व्रजलालनें बघितलें. त्या बाजूचें निरीक्षण करतांक्षणींच व्रजलालच्या अंगावर शहारे आले. गोदावरीच्या पात्राचा पट्टा आतां वेगळा दिसत नव्हता. ऐलतीरावर वसलेलें विजयपूर अर्धें अधिक त्या पात्रांतच गडप झालेलें होतें ! पाण्यानें भिजलेल्या कांहीं इमारतीच पाण्यावर उभ्या असून पाणी हालतांना पाण्यावर तरंगल्यासारख्या दिसत होत्या. तो देखावा पाहून व्रजलाल हतबुद्ध झाला आणि आपलें स्वतःचें घर तो डोळे ताणताणून हुडकूं लागला !

४

निमिषार्धापुरता विचाराला वाव देऊन व्रजलालनें आपल्या घराकडे आपला मोर्चा वळविला. प्रथम प्रथम त्याला पाण्यांतून नुसतें चालावेंच लागलें; पण पुढें पाणी गळ्यापर्यंतही आलें. स्वगृहांत जाण्याकरितां अति उत्सुक झाल्यामुळें त्याला परतण्याची इच्छा झाली नाहीं. त्या अफाट जलसंचयाकडे त्यानें एकवार विस्फारित नेत्रांनीं पाहिलें आणि घराकडे पोहून जाण्याकरितां त्यानें पाण्यांत अंग सोडलें. क्षुधेनें व्यास झालेल्या व्रजलालला तो विस्तीर्ण जलाशय पोहून जाणें बरेंच कठीण होतें; पण वात्सल्य, आशा, निराशा वगैरे भावनांच्या भरांत व्रजलालला आपण काय करतों आहों याचेंसुद्धां भान राहिलें नाहीं. त्याचें हात मारणें चालू झालें. थकून गेल्यामुळें तोंडांतून उष्ण निश्वास जोरजोरानें बाहेर येत होते. कोठें एकाद्या वृक्षाची फांदी हातीं लागली तर ती जोरानें दोन्ही हातांनीं घट्ट दाबून धरून कांहीं वेळ विसावा घ्यावा, पुन्हा पोहावयाला सुरुवात करावी असें सारखें चाललें होतें. बायकामुलांची ताटातूट झालेला तो एकाकी जीव त्या भयाण जलाशयांतून धडपड करीत वाट काढीत होता. जसजसें घर जवळ येत चाललें तसतशी त्याची उत्कंठा अधिकच वाढली. पण या वाढत्या उत्कंठेबरोबर त्याचें शिणलेलें शरीर अधिकच थकून गेलें आणि घरापासून थोड्या अंतरावर असलेल्या एका वडाच्या फांदीला त्यानें आश्रयाकरितां घट्ट दाबून धरलें. पोहण्याच्या श्रमानें दमून गेल्यामुळें तो धापा टाकीत होता. तो पाण्यांतून पोहून आला तरी त्याच्या अंगांतून ऊन ऊन घामाच्या धारा चालल्या होत्या ! धापा टाकीत टाकीत अतिशय कष्टानें त्यानें एकवार 'वृंदा' म्हणून हांक मारली. आपण आपल्या प्रियपत्नीला हांक मारल्यावर ती आपल्या हांकेला धावून येईल असें व्रजलालला अर्थातच वाटत नव्हतें ! थकल्याभागल्या शरिरांतील सर्व शक्ति एकवटून त्यानें तीच हांक दोन-तीन वेळां

मारली; पण त्याला प्रत्युत्तर मिळालें नाहीं. फांदीला ज्या दोन्ही हातांनीं धरलें होतें त्याच हातांवर त्यानें मान टेंकली.

थोड्या वेळानें व्रजलालला किंचित् हुषारी वाटूं लागली. त्यानें वर मान केली नाहीं तोंच त्याला लहान मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकूं आला. कोणत्या दिशेनें तो आवाज येत होता हें पहाण्याकरितां व्रजलालनें कान टवकारून आसपास नीट पाहिलें. डाव्या बाजूला समोर त्याचें घर होतें आणि त्यांतूनच तो लहान मुलाच्या रडण्याचा आवाज बाहेर येत होता. तो आक्रोश व्रजलालच्या हृदयाला जाऊन भिडला. त्यानें झट्दिशीं फांदीचे हात सोडले आणि पुन्हा पोहण्यास आरंभ केला. घराच्या सज्याला व्रजलालचे हात लागले. पुढें आलेल्या एका खांबाचा आधार घेऊन व्रजलाल सज्यांत चढून गेला. मान हलवून त्यानें डोक्यावरील पाणी झाडलें आणि एकवार मागेंपुढें पाहून तो माडींत शिरला.

सुलोचनेचें रडणें चालूच होतें. व्रजलालनें चट्कन् पुढें होऊन तिला हृदयाशीं घट्ट धरलें. सुलोचनेचा स्पर्श होतांक्षणीं व्रजलालला पितृवात्सल्याचा अनावर उमाळा आला! बारा दिवसांची सुलोचना आज एक वर्षाची झाली होती. अशा असहाय स्थितींत तिचें दर्शन होऊन तिला आपला प्रेमाचा स्पर्श होत आहे ही वस्तुस्थिति जाणून व्रजलालचा ऊर भरून आला, आणि तो स्फुंदून स्फुंदून रडूं लागला. त्यानें सुलोचनेला छातीशीं अधिकच घट्ट धरलें. सुलोचनेचें रडणें थांबलें; पण व्रजलालचें आक्रंदन सुरू झालें. हुंदक्यांची पराकाष्ठा होऊन श्वास कोंडण्यापर्यंत पाळी आली. रडत रडतच त्यानें 'सुलोचना' 'सुलोचना' अशी हांक मारली! प्रेमाचा उमाळा थोडा कमी झाल्यावर व्रजलालनें एकवार सभोंवार नजर फेंकली. तो उभा होता ती माडी आणि त्या माडीखालची पडवी एवढाच कायतो घराचा भाग शाबूत होता. मागली माडी आणि घराचा इतर सर्व भाग पार ढांसळून पाण्यांत वाहून गेला होता!

पण आतां तेथें अधिक वेळ थांबणें अशक्य होतें. आईपोरकी सुलोचना! तिच्या रक्षणाकरितां जिवावर उदार होऊन व्रजलालनें पाण्यांत उडी घेतली. पाणी अगदीं संथ होतें. सुलोचनेला शक्य तितकें सुरक्षितपणें संभाळीत त्यानें पाणी तोडण्यास सुरुवात केली. पोहण्यामुळें येणाऱ्या थकव्याचा एखाद्या झाडाच्या फांदीच्या आश्रयानें परिहार करून पुन्हा पोहावें, असें करीत करीत जेमतेम जमिनीला पाय लागेपर्यंत व्रजलालनें मजल गांठली. कन्येकडे एकवार पाहून व्रज-

लालनें वर आकाशाकडे पाहिलें व समाधानाचा एक दीर्घ सुस्कारा सोडला. थोडा वेळ चालल्यानंतर तो स्टेशननजीक येऊन पोहोंचला. येथें पेटलेल्या एका आगटी-शीं बसून त्यानें सुलोचनेला नीट शेकलें. तिचे कपडे वाळवून घेतले व स्टेशन-वरील एका दुकानांतून मिळालें तसें दूध विकत घेऊन तिला पाजलें.

स्टेशनमध्यें व्रजलाल पोहोंचला त्या वेळीं एक गाडी सुटण्याच्या बेतांत होती. गाडीमध्यें विजयपूरमधील उध्वस्त झालेला माल आणि शवें यांची भरती केली होती. गाडीची प्रत्येक खिडकी बंद असून, सरकारी अधिकारी व पोलीस शिपाई गाडीची दोहों बाजूंनीं तपासणी करीत होते. त्या अधिकाऱ्यांच्या हाताखालीं काम करणाऱ्या एका पोर्टरजवळ जाऊन व्रजलालनें विचारलें, "ही गाडी कुठं जाणार आहे?"

पोर्टरनें खिन्नपणें उत्तर दिलें, "दादा, या गाडींत मेलेलीं माणसें आहेत!"

ते शब्द ऐकून व्रजलालच्या मनाला जबरदस्त धक्का बसला. घराच्या पडले-ल्या भागाबरोबर वृंदेचाही अंत झाला असला पाहिजे असाच त्यानें कयास केला. व निदान तिच्या प्रेताचें तरी अखेरचें दर्शन घ्यावें या उत्कट भावनेनें त्यानें काकुळतीनें गार्डकडे धांव घेतली. अधीरपणानें त्यानें विचारलें, "साहेब, या गाडींत विजयपूरमधलीं मेलेलीं माणसें आहेत ना?

"होय!" अगदीं थंडपणानें साहेबांनीं उत्तर दिलें.

"मग मला थोडा वेळ गाडींत जाऊं देतां का?" व्रजलालनें अगदीं आशा-पूर्ण अन्तःकरणानें हा प्रश्न विचारून उत्तराची वाट पाहिली.

"अर्ध्या तासापूर्वीं आला असतास तर इतर माणसांप्रमाणें तुलाही आंत सोडला असता." असें म्हणून गार्डनें शिटी फुंकली आणि गाडी चालू झाली. रुळावर उभा राहून व्रजलाल जाणाऱ्या गाडीकडे सारखा बघत होता. सुलोचनेला त्यानें अधिकच घट्ट आवळून धरलें. पाऊस झिमझिम् पडत होताच. दुरा-वणाऱ्या गाडीकडे बघत उजवा हात पुढें करून त्यानें 'वृंदा', 'वृंदा' म्हणून निराशापूर्ण स्वरांत किती तरी हांका मारल्या!

पण वृंदा 'ओ' देण्याला या जगांत होती कोठें?

९

सुलोचनेचा संभाळ करण्यांत व्रजलालचा वेळ जाऊं लागला. वृंदेच्या स्मृतीची साक्ष म्हणून सुलोचना व्रजलालचें प्रेमसर्वस्व होऊन राहिली. वृंदेनें जशी

सुलोचनेची काळजी वाहिली असती तशी, किंबहुना जास्तच व्रजलाल तिची काळजी घेत होता. वर्षांमागून वर्षें गेलीं. सुलोचनेच्या बरोबरीचीं इतर मुलें आपल्या रमणीय लीलांनीं आईबापांना रिझवूं लागलीं. पण सुलोचना जरासुद्धां हालेना कीं बालस्वभावाला उचित अशी एकही गोष्ट करीना ! एकदोन उत्तम डॉक्टरांना दाखवून व्रजलालनें तिची परीक्षा करवली. पण डॉक्टरांच्या निकालानें व्रजलालला पूर्ण निराश केलें. अवयवांत लहानपणींच शैथिल्य येऊन ते लुळे होण्याचा रोग सुलोचनेला झाला असल्याचें डॉक्टरांनीं निदान केलें. व्रजलाल अत्यंत निराश झाला !

सुलोचना अंथरुणांतल्या अंथरुणांतसुद्धां फारच बेतानें वळे. तिला उठून बसतां येत नव्हतें. दुधाशिवाय कोणतेंही अन्न तिला पचत नसे. तिची प्रत्येक गोष्ट व्रजलालला करावी लागे. रोजरोज तेंच तेंच करून व्रजलालला कित्येक वेळां वैताग येई; पण अशा स्थितींतही बरींच वर्षें गेलीं. काल पुढें सरकत होता; पण व्रजलालचे नित्य व्यवहार एखाद्या नियंत्रित यंत्राप्रमाणें चालू होते. त्याचे काळ्या-चे पांढरे केंस झाले; पण त्याच्या रोजच्या कार्यक्रमांत तिळमात्र फरक झाला नाहीं. किती तरी वर्षें लोटलीं; पण सुलोचनेची प्रकृति सुधारली नाहीं. बारश्याच्या दिवशीं जशी सुलोचना पाळण्यांत निजून होती तशीच ती आज पंचवीस वर्षांनीं अंथरुणावर पडून होती !

दिवसेंदिवस व्रजलाल जास्तच चिंताक्रांत दिसूं लागला. सुलोचनेबद्दल काळजी-चे विचार त्याच्या मनांत काहूर करीत व तो अत्यंत खिन्न होई. आपण वृद्ध होऊन थकलों ! अशा स्थितींत आपल्यालाही केव्हां तरी हें जग अंतरणार; मग सुलोचना मागें राहिली तर तिची स्थिति काय होईल ! एके दिवशीं पहाटे डोळे उघडल्याबरोबर अशा तऱ्हेचे विचार मनांत येऊन व्रजलाल खिन्न झाला. शेजार-च्या खोलींत सुलोचना निजली होती. तिकडे एकवार पाहून तो उठला आणि जवळच्या खिडकीचें एक दार उघडून समोर पाहूं लागला. बाहेर अस्पष्ट उजेड पडला होता.

वार्धक्यामुळें हळुवार झालेल्या व्रजलालच्या मनावर समोरच्या दृश्यानें फारच परिणाम केला.

समोर एक कुत्री निजली होती. ती निजली असल्याचाच प्रथम व्रजलालला भास झाला. नुकतेंच जन्माला आलेलें तिचे पिलूं चिंव चिंव करीत तिच्याभोंवतीं

घोंटाळत होतें. तीं दोघेंही रस्त्याच्या साधारण कडेलाच होतीं. जाणाऱ्या येणाऱ्या कांहीं व्रात्य पोरांनीं त्या कुत्रीला एखाददुसरा खडा मारून पाहिला. पण तिनें यत्किंचित्सुद्धां चलनवलन केलें नाहीं. तिच्याभोंवतीं घोंटाळतां घोंटाळतां त्या पिलानें तिला जागें करण्याचा बराच प्रयत्न चालविला होता; पण ती हालली नाहीं. किंचित् सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यावर हातपाय ताठवून तिनें प्राण सोडले असल्याचें व्रजलालच्या लक्ष्यांत आलें. त्या पिलाला भूक लागली होती कीं काय कोणास ठाऊक; तें सारखें आपल्या आईला जागें करण्याकरितां तिच्या अंगाला आपल्या चिमुकल्या पायांचा स्पर्श करीत होतें. ती त्या पिलाची चाललेली धडपड पाहून व्रजलालला वाटलें कीं, आपण त्या पिलाला उचलून आणावें व थोडेंसें शेकून त्याला ऊब आणावी. पिलूं जोरजोरानें केंकटत इकडे तिकडे करीत होतें. व्रजलाल त्याला उचलण्याकरितां खिडकींतून वळणार इतक्यांत उतारूंनीं भरलेली एक मोटारगाडी वेगानें आली. तें पिलूं दूर सरावें म्हणून हांकणारानें गाडीचें शिंग वाजविलें; पण त्या अजाण जिवाची त्या आवाजानें अधिकच तारांबळ झाली. पिलूं मोटारखालीं सांपडणार या भीतीनें व्रजलाल 'अरे! अरे!' असें स्वतःशीं म्हणतो ना म्हणतो तोंच गाडी निघून गेली आणि तें मातृहीन पिलूंही आपल्या आईच्या मागोमाग निघून गेलें!

ॐ ॐ ॐ

त्या दुःखपूर्ण दृश्यानें वृद्ध व्रजलालच्या विचारी मनाचें परिभ्रमण वायुवेगानें सुरू झालें. पंचवीस वर्षांपूर्वींचे प्रसंग आठवून तो मनाशींच विचार करूं लागला. वृंदेच्या प्रेमाची एक सजीव साक्ष म्हणून आपण सुलोचनेचें पालनपोषण केलें. आज पंचवीस वर्षें अगदीं लोळागोळा होऊन पडलेल्या स्थितींतच तिची आपण काळजी वाहिली. बाल्यावस्थेंतच तिचे पाय गेले. बालवयांतच तिची बुद्धि जड झाली. कित्येक वेळां देवाला बोल लावून आपण असेंही म्हणण्यास कमी केलें नाहीं कीं, मागल्या जन्मींच्या पातकांचा झाडा देण्याकरितां सुलोचनेला त्यानें आपल्या पोटीं जन्माला घातलें; पण तो वैताग क्षणैक होता...सुलोचनेची जर आपण शुश्रूषा केली नाहीं तर वृंदेच्या आत्म्याला फार दुःख होईल व वाईट वाटेल म्हणून स्वहस्तानें आपण सुलोचनेची सेवा-चाकरी केली. वृंदा असती तर तिनें निर्मळ आणि निर्व्याज प्रेमाखातर तिची प्राणाच्या मोलानें चाकरी केली असती...त्या वृंदेच्या जिवाला वाईट वाटूं नये, त्या वृंदेला आपल्या नवऱ्याचें प्रेम आणि त्यानें दिलेली

वचनें फोल वाटूं नयेत, यास्तव तिनें मागें ठेविलेल्या आपल्या प्रेमाचें चिन्ह म्हणून मीं सुलोचनेला हृदयाशीं बाळगली. निर्वाहापुरता वेळ कामधंद्याकडे खर्च करून बाकी अहोरात्र सुलोचनेची शुश्रूषा केली. निर्जीव हातापायांचा एक अभागी प्राणी वांचविण्याकरितां मीं कष्टांची परमावधि केली आणि करीत आहें...

वृंदा गेली तेव्हां...या पिलाप्रमाणें टाहो फोडून ओरडत असलेली सुलोचना मीं हृदयाशीं बाळगली, मी तरुण होतों...वृंदा मला जीव कीं प्राण होती...म्हणून मीं सुलोचनेचा सांभाळ केला...पण अलीकडे मीही थकत चाललों. या पिलाच्या आईप्रमाणें मीही जर एकाद्या दिवशीं हातपाय ताठवले तर माझ्या पोटचा हा गोळा प्रेमानें कोण उचलून घेईल!...तिची शुश्रूषा करण्याकरितां कोण पुढें येईल!...कीं या पिलाची जी अवस्था झाली तीच माझ्या सुलोचनेची होईल! आणि अशी तिची अवस्था झाली तर वृंदेच्या सुलोचनेभोंवतीं घोंटाळणाऱ्या आत्म्याला काय वाटेल...आज पंचवीस वर्षें सुलोचनेला सर्व प्रकारची शुश्रूषा करून जगवली, पण माझ्यामागें.........या पिलासारखी कोणाच्या तरी पायदळीं सांपडून... .....

व्रजलालच्या अंगावर कांटा उभा राहिला. आपल्यामागें सुलोचनेची काय स्थिति होईल या नुसत्या कल्पनेनेंच त्याला अत्यंत वाईट वाटलें. प्राणसंकटां-तून,–महापुरांतून, जिवावर उदार होऊन तिला वांचविली, वात्सल्यामुळें तिला लहानाची मोठी करण्याचा प्रयत्न केला, ती मोठी झाली; पण न बोलतां न चालतां! त्या महापुरांतील दोन दिवसांच्या श्रमांची व्रजलालला आठवण झाली. तारुण्याचे दिवस गेले, सुलोचनेची शुश्रूषा करतां करतां एकाद्या दिवशीं कांहीं तरी बरें वाईट होऊन तिला अगदीं असाहाय्य स्थितींत सोडून आपण निघून जाणार हें मनासमोर उभें राहिलेलें चित्र पाहून व्रजलालच्या हृदयाला वृश्चिकदंशाच्या वेदना झाल्या. आपल्यामागें सुलोचनेची काय व्यवस्था करावी हें त्याला कांहीं सुचेना.

विचार करतां करतां एक भयंकर विचार त्याच्या मनांत आला. तो विचार प्रथम मनांत येतांक्षणीं त्याच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. त्याला वाटलें कीं, आज आपल्या भोगांची पराकाष्ठा झाली. आपण हा बेत केला खरा, पण तो आपल्या हातून तडीस जाईल का? त्यानें आपल्या मनालाच प्रश्न केला, सुलोचनेची हत्या करावयाची म्हणजे पोटच्या गोळ्याचीच हत्या नव्हे का? पण

आपल्या मागें तिचे हाल होण्याकरितां तिला जगांत ठेवून काय करावयाचें ?... पण तिलाही प्रेमानें कुरवाळणारी एकादी प्रेमळ व्यक्ति निर्माण होईल. नाहीं असें नाहीं !......मग तिची निष्कारण हत्या करावयाची ?......कशाला ?......पण जगांत असे प्रेमी प्राणी आहेत का ?.... ... ...नाहींत. दुसऱ्याच्या हालांबद्दल बेफिकिरी दाखविणारे प्राणीच या जगांत पुष्कळ आहेत. अशा लोकांच्या हवालीं सुलोचनेला करून जावयाचें म्हणजे त्या पिलासारखी तिची धूळधाण होण्याकरितां तिला जाणूनबुजून संकटांच्या खाईत लोटण्यासारखें आहे...पण सुलोचनेला मारून टाकल्यावर आपल्याला या जगांत एक क्षणभर तरी रहावेल का ?... आपल्यामागें सुलोचनेला ठेवण्यापेक्षां तिच्यामागें आपण राहिलों तर आपल्याला मानसिक दुःख होईल...पण सुलोचनेला आपल्यामागें शारीरिक यातनाही होतील !

व्रजलाल विचारांतून थोडा जागा झाला. त्यानें एकवार आपल्या हाताकडे पाहिलें. सुलोचनेच्या गळ्याभोंवतीं याच हातांचा गळफांस बसणार !...हा विचार मनांत येऊन त्याला भडभडून आलें ! सुलोचनेचे प्राण वांचविण्याकरितां याच हातांचा उपयोग झाला आणि आज तिचे प्राण घेण्याकरितांही याच हातांचा उपयोग व्हावयाचा होता ! किती विचित्र योगायोग ! व्रजलालनें हातांच्या मुठी वळून हात घट्ट केले; पण सुलोचनेचा प्राण घेतांना तिला काय वाटेल...आणि तिच्याभोंवतीं वावरणाऱ्या तिच्या आईच्या आत्म्याला आपली अघोर राक्षसी करणी पाहून किती यातना होतील ? हा प्रश्न त्याच्या मनांत येतांक्षणींच त्याचा ऊर भरून आला. दोन्ही हातांनीं तोंड दाबून धरून तो आलेला उमाळा अडवण्याचा व्यर्थ प्रयत्न करूं लागला. सुलोचनेच्या आत्म्याला व तिच्या आईच्या आत्म्याला केवळ वात्सल्याच्या परमावधीमुळें ही हत्या माझ्या हातून घडली असें कोणी तरी समजावून सांगेल का ? सुलोचनेच्या भावी यातना वांचाव्यात, त्या भोगण्याकरितां तिनें व्यर्थ जगून कशाला रहावयाचें, आपल्यामागें तिचे फार हाल होतील म्हणूनच तिची हत्या करावयाची ना ? व्रजलालचा उमाळा थोडा कमी झाला. पण हा अविचार तर नाहीं ना ? असाही प्रश्न त्याच्यापुढें उद्भवला. हो., जग या खुनाला—या हत्येला अविचारच म्हणणार ! जगाच्या मनोरंजनाला माझी कृति कारणीभूत होणार ! पण माझ्यामागें सुलोचनेचे हाल होतील ते ?

त्या बेभान मनःस्थितींत व्रजलाल जागचा उठून तीरासारखा सुलोचनेच्या

खोलींत गेला. खोली बंद असल्यामुळें तेथें जरा अंधारच होता. त्याच्याच वस्त्रांचा सळसळ आवाज होत होता; पण व्रजलालला वृंदेचा आत्मा फडफड करीत असल्याचा भास झाला! त्याचीं स्वतःचींच पावलें वाजत होतीं; पण वृंदाच त्याचा प्रतिकार करण्याकरतां धावून येत आहे असें त्याला वाटलें.

थंडीपासून बचाव व्हावा म्हणून व्रजलालनें सुलोचनेला अगदीं पांघरुणांनीं लपेटून टाकलें होतें. सुलोचनेला झोंप लागली होती. व्रजलाल पुरा अविचारी बनून बेभान झाला होता. पराकाष्ठेच्या वात्सल्याखातर ही गोष्ट आपण पूर्ण विचारान्तीं करीत आहों एवढीच काय ती त्याला जाणीव होती. तेवढा विचार झाल्यानंतर दुसऱ्या कोणत्याही विचाराला त्याच्या मनांत थारा नव्हता!

कांपऱ्या कांपऱ्या हातांनीं व्रजलालनें सुलोचनेच्या गळ्याला घट्ट पकडलें. सुलोचनेच्या शरीराची बरीच धडपड झाली; पण ताठ डोळे करून घामानें डंवरले-ल्या हातांनीं व्रजलालनें मारलेली पकड मुळींच सुटली नाहीं. निमिषमात्रच सुलोचने-ला असह्य वेदना झाल्या; पण नंतर ती अगदीं शांत झाली! ती पुरी शांत झाल्या-नें व्रजलालनें अश्रुपूर्ण दृष्टीनें पाहिलें आणि तिला त्याच स्थितींत सोडून तो निघाला.

ॐ ॐ ॐ

आपण होऊन पोलीस अधिकाऱ्यांकडे जाऊन त्यांना आपला गुन्हा सांगणें सर्व दृष्टींनीं योग्य आहे असेंच स्वतःशीं ठरवून व्रजलाल पोलीस अधिकाऱ्यांकडे गेला! पूर्ण विचारांतीं, पराकाष्ठेच्या वात्सल्यामुळें मीं आपल्या मुलीचा खून केला असें त्यानें पोलीस अधिकाऱ्यांना सांगितलें. आतां स्वतः जगण्यांत आपल्याला मुळींच समाधान नाहीं; आपल्याला खुनी म्हणून फांशीं दिलें तरी त्या मरणाचा आपण आनंदानें स्वीकार करूं, असा त्यानें खुलासाही केला. सर्व हकीगत नीट सांगून त्यानें आपली ही शेवटची इच्छाही पोलीस अधिकाऱ्यांना कळविली.

कोर्टापुढें हा खटला अपूर्व होता; परंतु कोर्टानें त्याचा दिलेला निकाल ठराविकच होता!

ॐ ॐ ॐ

पण वाचक! व्रजलाल आरोपी आहे का?

“ वारयोषिता ऽ ऽ ऽ ”

“ केवळ सशास्त्र गाणें म्हणतां येऊं लागलें म्हणजे सर्व कांहीं झालें असें नाहीं.”

“ तुम्हांला एक असें वाटतें; पण अलीकडे सामान्य लोकसुद्धां गाण्यांतील शास्त्राबद्दल चौकशी करतात. कोणत्याही गवयाची किंमत तालावरून करण्याची अलीकडे पद्धत निघाली आहे.”

“ पण मला मात्र त्या गोष्टीची विशेषशी किंमत वाटत नाहीं. गाण्यांतील भावना गळ्यांतून काढतां आली नाहीं तर त्या गाण्यांत कांहीं अर्थ नाहीं. तुमचें कालचें रात्रीचें गाणें ऐकून मात्र मला फार फार आश्चर्य वाटलें.”

“ मला तरी असें काय येतें आहे म्हणा ! आणि येत असलें तरी त्यांत काय आहे ! आमचा तो धंदाच नाहीं का ? ”

“ वाः ! धंदा असला म्हणून काय झालें ? मनापासून सांगतों, काल रात्रीं तुमचें गाणें ऐकल्यावर कां कोणास ठाऊक, मला सारखें तुमच्याकडे यावेंसें वाटूं लागलें. पण मनाशीं विचार केला कीं, ओळखदेख नसतांना, जावेंसें वाटलें तरी कसें जायचें ? त्यांतून तुम्ही पडलां बाईमाणूस ! ”

“ आणि तुमच्यासारख्या तरुणांनीं आमच्याकडे येण्यांत दुसरीही एक भीति असते. आमच्या घरांत कोणताही मनुष्य शिरला रे शिरला, कीं लोकांच्या दृष्टीला तो हलकट वाटूं लागतो. एकाद्या ठिकाणीं आमचें गाणें व्हायचें असलें म्हणजे आम्हांला नांवें ठेवणारे लोकसुद्धां त्या ठिकाणीं मोठ्या उत्सुकतेनें हजर होतात. त्या वेळीं मात्र त्यांना कमीपणा वाटत नाहीं; पण आमच्या घरांत नुसतें गाणें ऐकायला जरी एकादा गरीब मनुष्य आला तरी त्याच्याकडे टवाळखोरपणानें बघण्यास हे लोक कमी करीत नाहींत.”

“ पण तुम्हांला सांगतों कीं, अशा लोकांच्या टवाळीला मी मुळींच भीत नाहीं. तुम्हांला एक गोष्ट विचारूं का ? ”

“ हो, विचारा कीं ! कोणी बोलायला नाहीं, चालायला नाहीं असे आमचे दिवसच्या दिवस जातात. त्यांतून नुसते बोलण्याकरितां येणारे कितीतरी थोडे ! आमच्यासारख्या बायकांना आमच्या दुर्वर्तनाबद्दलसुद्धां किती वेळां तरी अगदीं वीट येतो ! आज तुम्ही माझ्याकडे आलां त्या वेळीं मला फार नवल वाटलें.

पहिल्यांदा वाटलें कीं, आहेत नेहमींसारखेच एकादे विश्वकुटुंबी झालें ! पण... तुमच्याशीं बोलायला सुरुवात केल्याबरोबरच खात्री पटली. असो. तुम्हांला काय विचारावयाचें असेल तें अगदीं मोकळ्या मनानें विचारा ! ”

इतक्या चांगल्या प्रकारानें आपलें आगतस्वागत होईल असें खोलींतून निघतांना कमलाकराला मुळींसुद्धां वाटलें नाहीं. उलट त्याला सारखी भीतिच वाटत होती. वारांगनेचा पेशा पत्करलेली गायिका ! तिला अशी कितीशी चालचलणूक असणार ? हजारों लोकांशीं हजारों तऱ्हांनीं वागण्यांत जन्म घालविलेली बाई ती ! ती आपला असा कितीसा मुलाजा राखणार ? आणि त्यांतून आपण तर सर्वस्वीं अपरिचित ! तिच्याकडे ज्या कामाकरितां आपण जाणार आहों तें कामही तिच्याकडे नित्यशः जाणाऱ्या लोकांच्या मानानें अगदीं वेगळें. ती स्वतां दुर्वर्तनाला लालचावलेली असल्यामुळें आपण इतर लोकांप्रमाणें तिच्याशीं शृंगारचेष्टा केल्या नाहींत तर कदाचित् तिला रागही येईल. संभावित आणि शुद्ध लोकांशीं तिचा कशानें संबंध येणार आहे ? अशा तऱ्हेचे विचार त्याच्या मनांत वरचेवर येत होते; पण आदल्या रात्रीं एके ठिकाणीं तिचें गाणें ऐकल्यामुळें त्याला तिच्याकडे जाण्याची तर उत्कंठा लागून राहिली होती. कमलाकराला गाण्याची फार चटक होती. त्यांतून त्याचा स्वतःचा आवाजही अतिशय चांगला होता. कोणतेंही गाणें ऐकत असतांना त्याचें लक्ष शास्त्रशुद्धतेपेक्षां भावनाविष्काराकडे जास्त वेधलें जाई. तो स्वतः जेव्हां जेव्हां गाणें म्हणत असे तेव्हां तेव्हां त्याचें याच गोष्टीकडे विशेष लक्ष असे. आजपर्यंत त्यानें पुष्कळ गाणीं ऐकलीं होतीं. दोन वर्षांपूर्वी कॉलेजांत आल्यापासून त्यानें जवळ जवळ नेमच केला होता कीं, गाण्याची चांगलीशी बैठक असली, कीं तेथें जावयाचें ! काल रात्रीचा प्रसंग मात्र अपूर्व होता. तोंपर्यंत त्यानें ऐकलेलीं गाणीं बहुधा पुरुष गवयांचींच होतीं. पण कालचें गाणें एका गायिकेचें होतें आणि तेंही अगदीं शेलक्या लोकांकरितां खासगी स्वरूपाचें असें होतें. त्या गायिकेची त्यानें बरेच वेळां स्तुति ऐकिली होती. तिचें गाणें आपल्याला ऐकावयास मिळेल तर फार चांगलें होईल असेंही त्याला वरचेवर वाटत असे आणि काल तो योग अचानकपणें जुळून आला !

रात्रीं साडेनवाला बैठकीला आरंभ झाला आणि पहांटे साडेचार वाजतां शेवटची भैरवी चालू झाली; पण गायन संपल्यानंतर एकालाही असें वाटलें नाहीं,

कीं साडेचार वाजले असतील ! बाईंच्या गाण्याची गंमतच अशी होती कीं, वाटेल तितके तास गाणें झालें तरी गेलेल्या वेळाची श्रोत्यांना जाणीव राहूं नये ! गाण्यांतील भावना वठविण्यांत तर बाईंचा हातखंडा होता. शब्दोच्चार करण्याची हातोटी तर विचारूंच नये ! प्रथमतःच त्यांचें गाणें ऐकणाऱ्या कमलाकरावर या गोष्टींचा फारच परिणाम झाला. गाणें चालू असतां त्याच्या डोळ्यांत सारखे अश्रु उभे राहिलेले होते. क्वचित् प्रसंगीं ते गालावरून ओघळूनही जात होते. अशा स्थितींतच गाण्याची बैठक खलास झाली. गाणें बंद झालें; पण कमलाकराच्या कानांत मात्र त्या गाण्याचे सूर सारखे घुमत राहिले. गाणें थांबलें म्हणजे रसिक श्रोत्याला ज्या प्रकारची रुखरूख वाटते तशीच रुखरूख कमलाकराला खोलींत आल्यावर वाटूं लागली. आपलें कांहीं तरी हरवलें आहे, कांहीं तरी विसरलें आहे अशा समजुतीनें मनुष्य जसा गांगरून जातो तसेंच कमलाकराला झालें. अंथरुणावर पडल्यावरसुद्धां त्याला सारखें चुकल्याचुकल्यासारखें वाटत होतें !

त्याच्या डोळ्यांवर झोंप होती; पण मनांत मात्र विचारांचें काहूर माजलें होतें. बाईंच्याविषयीं त्याच्या मनांत किती तरी गोष्टी येत होत्या.

त्यांच्या अंगीं इतका विलक्षण गुण असूनही त्याची जगाला कुठें किंमत आहे ? पण त्यांनीं स्वतःची किंमत कमी नाहीं का करून घेतली ? त्यांनीं नुसता गाण्याचाच धंदा केला असता तरी किती बरें झालें असतें ! लोक आतां त्यांना गायिका म्हणून ओळखीत नाहींत; तर देहविक्रय करणारी एक वारयोषिता म्हणून ओळखतात. केवढा अधःपात हा ! अंगच्या गुणाची माती नाहीं का झाली ?......

त्याचे डोळे अर्धवट मिटत आले होते; पण त्यांतूनसुद्धां अश्रुबिंदु ओघळल्याशिवाय राहिले नाहींत ! अगदीं झोंप लागण्याच्या सुमारास हे विचार विस्कळित झाले. त्याला वाटूं लागलें कीं, त्या बाईंचा आणि आपला असा काय संबंध, कीं त्यामुळें आपल्याला त्यांच्या अधःपाताबद्दल खेद व्हावा ? पण त्या बाई किती छान आहेत, त्या किती उत्तम गातात, आणि–आणि... किती सुरेख आणि संभावित दिसतात ! आजचें त्यांचें वर्तन किती व्यवस्थित होतें...

असले विचार मनांत येऊं नयेत म्हणून त्यानें पांघरूण सरसावलें आणि कुशीवर वळून डोळे मिटून घेतले. पण तेवढ्या हालचालीनें त्याची झोंप अधिकच चाळवली.

जगाला त्यांच्या गुणांची किंमत असो वा नसो, आपण मात्र त्या गुणांचें योग्य

तें चीज करणार. आपण आज इतके दिवस नव्हतों का विचार करीत, कीं गाणें शिकायचेंच झालें तर तें एखाद्या गायिकेजवळ शिकावें. मग ही संधि काय वाईट आहे ?

वाऱ्याचा एक मोठा झोत आला आणि खिडकीचीं अर्धवट उघडीं दारें एकमेकांवर जोरानें आपटलीं.

हो. लोकांना काय भ्यायचें आहे ? बस्स ! आतां अगदीं ठरवून टाकावयाचें. आपण उद्यां संध्याकाळीं त्या बाईंच्याकडे जाऊन त्यांना विचारावयाचें...पण बाई संमति देतील का ?...काय न द्यायला झालें ?...आपण त्यांना असें काय जास्त मागत आहों ?

अशा तऱ्हेचा निश्चय झाल्यावर कमलाकराचें डोकें जरासें शांत झालें. चंद्रप्रकाशाचे तिरपे किरण त्याच्या खोलीच्या खिडकींतून आंतल्या भिंतीवर पडत होते. ..र वारा सुटला होता; त्या वाऱ्याबरोबर उषःकालीं उमलणाऱ्या कलिकांचा अवर्णनीय असा संमिश्र सुगंध चोहोंकडे दरवळत होता. त्या सुगंधाचा आस्वाद घेतांघेतांच कमलाकराला झोंप लागली.

* * *

जावें कीं न जावें याची मनाशींच भवति न भवति करीत कमलाकरानें अस्तिपक्षींच निकाल कायम केला. पण खोलीच्या बाहेर पडतांना त्याचा चेहरा किती तरी कावराबावरा दिसत होता. एकादी अनिष्ट गोष्ट आपल्या हातून घडत आहे असें वाटून माणसाचा चेहरा जसा म्लान होऊन जातो तसेंच कमलाकरांचें तोंड उतरून गेलें होतें. आज आपण कांहीं तरी अनाचार करीत आहों असें त्याचें मन त्याला निष्कारण त्रास देत होतें.

एका बाईकडे, आणि तेंही अशातशा नव्हे तर सर्वस्वीं बदफैली म्हणून गणल्या गेलेल्या एका गायिकेकडे जाण्याचा त्याला धीर न होणें अगदीं साहजिक होतें; या बाईशीं त्याचा कांहींही परिचय नव्हता; पण तिच्याशीं आपला परिचय व्हावा व गायनकलेचा आपण तिच्याजवळ अभ्यास करावा याच इच्छेनें कमलाकर आज तिच्या घराची वाट चालत होता.

तेवढ्या अवकाशांत त्याच्या मनाचीं किती तरी स्थित्यंतरें झालीं ! त्याला एकाएकीं उगीचच भीति वाटूं लागली. आपण त्या बाईकडे जात आहोंत खरें, पण आपली दाराच्या बाहेरूनच रवानगी झाली तर...असाही विचार त्याच्या मनांत

आला. खरोखरच आपण काय हा वेडेपणा करीत आहों? यःकश्चित् एक गायिका आणि तिच्या घरीं आपण होऊन जावयाचें म्हणजे काय! असें वाटून त्याचा तोच थबकला. पण एक क्षणभरच! पुन्हा त्याचें त्यालाच वाटलें कीं, आपल्याला पाहिजे आहे त्या तऱ्हेची गायनकला त्या बाईजवळ आहे ना? मग झालें तर....! आपलें साध्य स्तुत्य आहे, मग साधनांची वाटाघाट कशाला करावयाची आहे...? ती गणिका असली तरी गायनकलेशीं त्याचा काय संबंध?...

झपाझप वाट चालून जाऊन त्यानें खुणेची जागा तर गांठली! एकंदर घराच्या झोंकावरून त्यानें बाईचें घरही ओळखलें. दारावर थाप मारतांना त्याचा हात अतिशय कांपत होता; त्याच्या सर्वांगाला दरदरून घाम सुटला होता; आणि त्याची दृष्टि कांहीं विलक्षणच झाली होती.

थोड्याच वेळांत बाई सामोऱ्या आल्या आणि त्यांनीं कमलाकराचें फारच मृदु शब्दांनीं स्वागत केलें. त्या बाईचें बोलणें चालणें इतकें संभावित होतें कीं, कमलाकराला त्या बाईच्या ऐकीव धंद्यावर विश्वास ठेवूं नयेसें वाटूं लागलें!

माडीवर जाऊन बैठकीवर बसल्यावर बाईनीं कमालीच्या मंजुळपणानें विचारिलें, "काय आपलें काम होतें?"

कमलाकर जरासा घाबरूनच गेला होता. जणुं काय बाईनीं केलेलें आगतस्वागत त्याला अनपेक्षित होतें. त्यानें उत्तर दिलें, "छे, तसें विशेष कांहीं काम नाहीं. काल रात्रीं आपलें गाणें ऐकायला मी आलों होतों."

वास्तविक ही गोष्ट अतिशय भीतभीत, चांचपडत चांचपडत सांगण्यासारखी नव्हती; पण अगदीं अनोळखी माणसाशीं बोलतांना आरंभीं असें हास्यास्पद भाषण करण्याची सर्वसाधारण लोकांची संवयच असते.

"कॉलेजांतल्या मुलांना—बहुधा तुम्ही कॉलेजांतच असाल—आमचीं गाणीं ऐकावींशीं वाटूं लागलीं हें आमचें भाग्यच म्हणायचं!"

बाईच्या या बोलण्यांत बरीचशी खेदाची छटा होती. कमलाकरालाही आतां बोलावयास हुरूप आला; आणि त्यानें म्हटलें, "मला तर वाटतें कीं, तुमचीं गाणीं जर लोकांनीं वरचेवर ऐकलीं तर त्यांना संगीत नाटकें पाहूं नयेसें वाटूं लागेल!"

"पण संगीत नटांना आमच्यापेक्षां शास्त्राची माहिती जास्त असते." बाईनीं नम्रपणानें उद्गार काढले.

किंचित् आवेशानेंच कमलाकर म्हणाला, "केवळ सशास्त्र गाणें म्हणतां येऊं लागलें म्हणजे सर्व कांहीं झालें असें नाहीं."

येथूनच त्यांच्या दोघांच्या बोलण्याला विशेष जिव्हाळ्यानें सुरुवात झाली, आणि शेवटीं भीतभीत कमलाकरानें म्हटलें कीं, "मी तुम्हांला एक गोष्ट विचारूं का ?"

बाईंनींही स्पष्ट शब्दांत आपली संमति दिली. खुर्चीवर सरसावून बसत बसत कमलाकरानें प्रस्तावना केली, "गाणें शिकावें असा माझा बरेच दिवस विचार आहे; पण तुम्ही ज्या तऱ्हेचें गाणें म्हणतां तसलें गाणें शिकण्याची मला फार फार इच्छा झाली आहे."

"मी इतरांच्यापेक्षां असें वेगळें काय म्हणतें ?" बाईंनीं स्मितमुखानें प्रश्न केला.

"भावना ! भावना ! गायन हें काव्याचें उपांग आहे. हवें असल्यास एक प्रमुख अंग आहे असें सुद्धां म्हणा ! कवीच्या निर्जीव आणि मूक शब्दांना गवयांचा गळा सजीव आणि वक्तृत्वपूर्ण करतो. फार काय, पण ज्या गवयांच्या गळ्यानें आणि गाण्यानें मूळ काव्याचा किळसवाणा विपर्यास होतो अशा गवयांना गवई म्हणायला मी मुळीं तयारच नाहीं ! काव्यांतील भावना सोळा आणे उठविण्याची कला ज्या गळ्यांत आहे त्या गळ्याचें गाणें ऐकावयाला मी नेहमीं भुकेलेला असतों. चंपाबाई, तुमच्या तोंडावर म्हणावयाचें म्हणून नव्हे; पण अशा तऱ्हेची भावना व्यक्त करण्यांत तुमचा खरोखरच फार हातखंडा आहे!"

वरील वाक्यें कमलाकर जीव तोडून बोलत होता. त्यांत कृत्रिमपणाचा अंशमात्र नव्हता ! चंपाबाईंनासुद्धां त्याच्या या विचारसरणीचें फार कौतुक वाटलें. त्यांनीं म्हटलें, "असेल कदाचित् ! तुम्ही आहे म्हणत असतां मी तरी नाहीं कशाला म्हणूं ?"

"आपण मला गाणें शिकवावें अशी माझी फार फार इच्छा आहे." कमलाकराच्या स्वरांत उत्सुकतेची छटा पूर्णपणें दिसून येत होती.

बाईंनाही काय वाटलें कुणास ठाऊक ? त्यांनीं चट्कन् म्हटलें, "ठीक आहे. उद्यांपासून संध्याकाळीं येत जा; माझी हरकत नाहीं." क्षणमात्र थांबून त्यांनीं विचारलें, "तुमचें नांव काय ? तुम्ही इथलेच रहाणार का ?"

कमलाकरानें उत्तर दिलें, "कमलाकर देसाई. आम्ही नेहमीं वडगांवला असतों."

आपण ज्या कामाकरितां आलों होतों तें पूर्ण होणार या आशेनें कमलाकर

फारच आनंदित झाला होता; त्या आनंदाच्या भरांत चंपाबाईच्या चेहऱ्या-वरील सूक्ष्म फेरफार त्याला दिसले नाहींत; पण कमलाकराचें नांवगांव ऐकल्यावर त्यांचा चेहरा एकदम भ्यालेल्यासारखा झाला. जाग्यावरून उठतां उठतां त्यांनीं म्हटलें, "बरें आहे, आतां उशीर झाला. उद्यांपासून तुम्ही येत जा." असें कांहींसें बोलून त्यांनीं त्याची जवळ जवळ रवानगीच केली! एवढ्या थोरल्या संभाषणाचा समारोप इतक्या गर्दीगर्दीनें कां व्हावा कुणास ठाऊक!

२

भावनापूर्ण गायनाच्या अध्ययनांत आणि अध्यापनांत गेलेला काळ अगदींच वायां गेलेला नव्हता; त्यांतून शिकणारी व्यक्ति आणि शिकविणारी व्यक्ति यांच्यामधील स्त्री-पुरुषांचें नातेंच असें कांहीं मजेदार होतें कीं, अशा तऱ्हेच्या त्यांच्या सहवासानें एकमेकांच्यामध्यें एकमेकांबद्दल कांहींतरी अबोधपूर्व आकर्षण घडून यावें. विशेष गोष्ट ही कीं, त्या वेळची त्या दोघांची परिस्थिति अशा तऱ्हेच्या आकर्षणाला सर्वस्वीं अनुकूल अशीच होती. कमलाकर म्हणजे ऐन विशीचा तरुण! चंपाबाईची उमर साधारण चाळिशीच्या बाजूला नुकती कोठें कललेली होती. पण तिची अंगयष्टि तिच्या वयाशीं विरोधी भावानेंच वागत होती. चंपाबाईस पाहिल्यावर ती तीस वर्षांची आहे असेंसुद्धा फारच थोड्या लोकांनीं सांगितलें असतें!

भावनापूर्ण गाणें शिकत आणि शिकवीत असतांना गाण्यांतील भावना नुसत्या गळ्यांतच राहिल्या नाहींत. त्या जशा कित्येक वेळां तोंडांतून बाहेर पडल्या होत्या तशाच त्या बऱ्याच वेळां विरुद्ध दिशेलाही वहात गेलेल्या होत्या! आणि मुखांतून बाहेर पडणाऱ्या स्वरसमूहाशीं तंतोतंत सुसंगत असें तांडव अंतः-करणाच्या अदृश्य रंगपटावर त्या भावना कित्येक वेळां तरी करीत असत! बाह्य स्वरांची समाधि लागून दोन भिन्न, पण गोड गळ्यांचा एकच एक लयदार सूर लागून रहावा आणि दोन अंतःकरणांतील भावनांच्या सुसंवेदनांमुळें त्या अंतः-करणांचेंही ऐक्य व्हावें असे प्रकार कितीदां तरी होत असत!

कमलाकराच्या शिक्षणाला प्रारंभ होऊन बरेच दिवस झाले होते. वर सांगितल्याप्रमाणें हें शिक्षण अगदींच रूक्ष नव्हतें. हिंदुस्थानी चिजा किंवा मराठी पदें म्हणत असतांना त्यांतील शृंगारपर भागांचा परिणाम त्या दोघांच्याही मना-

' बऱ्याच मोठ्या प्रमाणांत होत असे. उत्तान शृंगाररसाचीं गाणीं भावना समजून घेऊन म्हणावयाचीं म्हणजे अर्थातच समरसतेशिवाय तीं तशीं म्हणतां येणें शक्य नव्हतें.

एके दिवशीं तर अशा तऱ्हेच्या प्रकाराची अगदीं पराकाष्ठा झाली. गाणें बराच वेळ चालू होतें. चंपाबाईंच्या कौशल्यानें कमलाकर पार मोहून गेला होता. चंपाबाईंची वृत्तीही इतकी तन्मय झाली होती कीं, आपण जें गाणें म्हणत आहों तें खरोखरच आपल्या प्रियकराला उद्देशून म्हणत आहों असें त्यांना वाटत होतें ! एवढेंच वाटून राहिलें नाहीं तर समोर बसलेल्या कमलाकराचीच प्रियकराच्या जागीं त्यांच्या अंतःकरणानें न कळतच योजना केली ! त्या जें गाणें म्हणत आहेत तें पूर्णपणें ऐकून घेऊन नंतर आपण सुरुवात करावी अशा विचारानें कमलाकर कान देऊन गाणें ऐकत होता. त्या दिवशींचा सूर, बाईंनीं लावलेला गळा, त्याला अनुरूप असें तें गाणें आणि त्या सर्वांवर ताण करणारा त्या गाण्यांतील रोमहर्षण असा शृंगार या सर्वांचा इतका कांहीं गोड मिलाफ झाला होता कीं, नुसत्या बाईंच्याच अंतःकरणाची खळबळ जोरानें चालली होती असें नव्हे, तर कमलाकरालादेखील कांहींतरी अननुभूत वृत्ति आपल्या शरिरांत संचार करीत आहेत असा वारंवार भास झाला !

आपलें एकमेकांचें नातें गुरुशिष्यांचें आहे, याची जाणीव दोघांनाही राहिली नाहीं. त्या तन्मय स्थितींतच चंपाबाईंनीं आपल्या हातांतला तंबोरा एकदम खालीं ठेवला, आणि कमलाकराकडे अतिशय गहिऱ्या नजरेनें बघत त्याला त्यांनीं हांक मारिली.

" कमलाकर..."

त्यांच्या दृष्टीशीं आपली दृष्टि भिडवीत कमलाकरानें म्हटलें, " चंपाबाई..."

कांहीं वेळ त्या जागीं अगदीं निस्तब्ध शांतता होती, आणि गाणें एकदम थांबल्यामुळें त्या शांततेची जाणीव फारच तीव्रतेनें होत होती. चंपाबाई ताड्कन् उभ्या राहिल्या आणि एक पाऊल पुढें येऊन त्यांनीं कमलाकराला विचारलें, " काय झालें ? "

तितक्याच झपाट्यानें कमलाकरही जागचा उठला, आणि किंचित् चांचरत त्यानें म्हटलें, " कांहीं नाहीं ! "

" कमलाकर! मीं तुम्हांला आज बरेच दिवस शिकविलें. मला जसें आलें तसें शिकविलें." चंपाबाईंचा स्वर कंप पावत होता.

यावर कमलाकरानें उत्तर दिलें, " चंपाबाई, या तुमच्या उपकारांची मला जन्मभर आठवण राहील ! "

" पण कमलाकर ! नुसती तुम्हांलाच आठवण राहून कसें चालेल; मलाही तुमची आठवण राहिली पाहिजे ! "

" मग आतां तुम्हांला माझी आठवण राहणार नाहीं का ? "

" क्वचित् प्रसंगीं मला तुमची आठवण होईल; पण त्या त्या वेळीं मला दुःखच होईल. कांहींही मोबदला न देतां मला सोडून गेलेला एक आपमतलबी तरुण म्हणूनच मला तुमची आठवण होईल. मी पैसे मागतें आहें असें समजूं नका; मला पैशाची जरूर नाहीं...मी मुळीं पैसे घेणारच नाहीं. मला...मला......."

" सांगा ! चंपाबाई, सांगा ! तुमची वाटेल तसली कामगिरी करणें माझें कर्तव्यच नाहीं का ? गुरु सांदीपनीच्या घरीं असतांना भगवान् कृष्णांनीं देखील गुरुपत्नीचीं लांकडें आणून देण्याची आज्ञा नाहीं का मानली ! चंपाबाई, तुम्ही मला कोणतेंही काम सांगावें असाच तुमचा अधिकार आहे."

बोलत बोलत कमलाकर एकदोन पावलें पुढें सरकला. त्याच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले होते. डंवरलेल्या डोळ्यांनीं तो चंपाबाईकडे एकसारखा बघत होता.

" कमलाकर ! पहा बरं ! मी सांगेन तें काम कराल ?..."

त्या थोड्या पुढें झाल्या. त्यांच्या अंगाला कसला तरी मनमोहक वास येत होता. त्यांनीं खाल्लेल्या विड्यांमुळें त्यांच्या ओंठांची लाली अधिकच वाढली होती. डोळ्यांत एक तऱ्हेचें पाणी खेळत होतें आणि नाकांतील मुरणीच्या चमचमाटानें त्या डोळ्यांना तेज आलें होतें !

कमलाकरानें कांहीं वेळानें उत्तर दिलें, " होय ! चंपाबाई, मी नाहीं होय करीन असें तुम्हांला वाटतें का ? "

हा प्रश्न करतांना कमलाकराच्या मनाची आंतल्याआंत सारखी धडपड चालली होती. आपण हा प्रश्न विचारण्यांत अविचार करीत आहों याची त्याला पूर्ण खात्री होती; पण त्या वेळीं त्याची मनःस्थिति अतिशय चमत्कारिक झाली होती. इतकें निकडीचें भाषण बोलूं नकोस म्हणून आंतून मन तर सांगत होतें; पण

समोर उभ्या असलेल्या स्त्रीची त्याच्यावर अशी कांहीं जबरदस्त मोहिनी पडली होती कीं, त्याला असें भाषण करण्याशिवाय गत्यंतर नव्हतें !

चंपाबाई आपल्याला इतकें बजावून बजावून विचारीत असतांना आपण इतका अविचार कसा करीत आहों याचें त्याचें त्यालाच आश्चर्य वाटत होतें ! न जाणों भलतेंसलतें एकादें कांहीं काम असेल तर......

चंपाबाई त्याच्या अगदीं जवळ आल्या. माडींत अंधार पडलेला होता. दिवा लावण्यास सांगण्याचें भान चंपाबाईला होतें कुठें ? उन्हाळ्याचे दिवस नव्हते; पण त्या दोघांच्या अंगांतून कढत कढत वाफा निघत होत्या. कमलाकराच्या नाकांतून, कानांतून आणि अर्धवट उघडया तोंडांतून ऊन ऊन निःश्वास बाहेर येत होता. हवेंत गारठा असूनही वाऱ्याची एकसुद्धां लहर येत नव्हती !

सर्वत्र शांत शांत होतें. श्वासोच्छ्वासाशिवाय कसलाही आवाज ऐकूं येत नव्हता. हृदयांच्या धडधडीशिवाय कसलाही ध्वनि उठत नव्हता ! त्या शृंगारलेल्या दिवाणखान्यांतील एकाही वस्तूच्या अस्तित्वाची जाणीव कुणालाच राहिलेली नव्हती.

एकच पाऊल ! आणि चंपाबाईंनीं कमलाकराच्या हाताला घट्ट धरलें. आपल्या दोन्ही हातांनीं तो दाबीत त्यांनीं अगदीं हलक्या आवाजांत-फक्त त्यालाच ऐकूं जाईल अशा आवाजांत-त्याला हांक मारली, “ कमलाकर...”

मूढस्थितींत कमलाकरानें आपला हात चंपाबाईंच्या हातांत मुकाट्यानें दिला ! त्याची स्थिति एकाद्या मंत्रमुग्ध माणसाप्रमाणें झाली होती. मात्र चंपाबाईंच्या हाताचा स्पर्श होतांच त्याच्या डोक्यावरील केंस रांगेनें उभ्या राहिलेल्या कवाइती-च्या शिपायांप्रमाणें ताठ झाले ! त्याचे डोळे सहजासहजीं मिटले गेले आणि ओंठही किंचित् कंप पावले.

थोडयाच वेळांत डोळे अर्धवट उघडून त्यानें खोल आवाजांत म्हटलें, “ चंपा-बाई, तोंडानें कांहीं काम न सांगतां तुम्ही हें असें काय करतां आहां ? ”

त्याचा हात जोरानें दाबीत चंपाबाईंनीं प्रश्न केला, “ कमलाकर ! तोंडानेंच सांगितलें पाहिजे का ? समजत नाहीं का तुम्हांला ? कमलाकर ! मीं...मीं... आपल्या हातानें तुमचा हात माझ्या हातांत घेतला आहे ! कमलाकर, नाहीं का समजलें अजून ! ”

कमलाकराचे डोळे पूर्णपणें उघडले. डोळ्यांत भरलेलें पाणी जागच्या जागीं

जिरून गेलें. आपला हात चंपाबाईंच्या हातांत तसाच ठेवून किंचित् दूर सरत कमलाकरानें त्यांच्याकडे एकवार टक लावून पाहिलें

चंपाबाईंनीं काकुळतीच्या स्वरानें म्हटलें, "कमलाकर! आमच्यासारख्या पतितांना तुमच्यासारख्यांनींच पावन करायला नको का? रामचंद्रांनीं पदस्पर्शानें शिळेची अहिल्या बनविली. तुम्ही आपल्या शरीरस्पर्शानें माझाही उद्धार करा! माझ्या विद्यादानाचा एवढा तरी मोबदला द्याहो! कमलाकर! नका-नका, माझा असा अव्हेर करूं नका!"

गद्गद स्वरानें कमलाकर बोलूं लागला, "चंपाबाई! विद्यादानाचा मोबदला देणें माझें काम आहे. तुमच्या सर्व गोष्टी मला पटतात; पण...पण..."

"मी पतिता आहें, गणिका आहें म्हणून माझी तुम्हांला शिसारी येत आहे. माझा स्पर्श तुम्हांला नकोसा वाटतो आहे, हीच ना, हीच ना कमलाकर, तुमची अडचण?"

"नाहीं-नाहीं. चंपाबाई, तुम्हांला समजत नाहीं. कसें सांगूं हो? तुम्ही पतिता आहांत म्हणून मी टाळाटाळ करतों आहें असें नव्हे! पतिता असूनसुद्धां मीं तुमचें म्हणणें ऐकलें असतें; पण...पण...तुम्ही मला आईसारख्या आहांत..."

केविलवाण्या नजरेनें कमलाकर चंपाबाईकडे बघत होता. किंचित् चवताळून चंपाबाई उद्गारल्या, "कमलाकर, तसें नव्हे; अगदीं खास नव्हे. मी पतिता आहें हीच तुम्हांला अडचण वाटते आहे!"

"नाहीं हो! चंपाबाई! तसें मुळींच नाहीं! मला पतितांच्याबद्दल सहानुभूति वाटते. अगदीं मनापासून वाटते. माझी आईसुद्धां पतिताच होती."

चंपाबाईंनीं कमलाकराचा हात एकदम सोडून दिला आणि दोनतीन पावलें झपाट्यानें मागें सरत त्यांनीं आश्चर्यानें विचारलें, "म्हणजे? तुमचीही आई पतिता होती!...कमलाकर, तुमची आई पतिता होती...होती म्हणजे ती सध्यां नाहीं का...खरेंच नाहीं का?"

"हो. माझी आई पतिता होती! सध्यां...सध्यां कदाचित् नसेल...!"

कमलाकरानें खिडकीच्या बाहेर दृष्टि टाकली. बाहेर अंधार पडलेला होता. त्यानें मनगटावरील घड्याळांत पाहिलें, तों आठ वाजून गेले होते.

"बस्स पुरे! मला आतां वेळ नाहीं. फार उशीर झाला." असें म्हणत म्हणत तो दिवाणखान्याच्या दारापर्यंत गेला.

लगबगीनें त्याच्यामागें जात चंपाबाईनीं काकुळतीनें म्हटलें, " कमलाकर ! उद्यां याल ना ? या, अवश्य या. मी वाट पाहीन. माझ्यावर रागावूं नका. मला माफ करा."

" नाहीं. मी...उद्यां येईन." असें पुटपुटून कमलाकर जिना उतरला.

पुन्हा ओरडून चंपाबाईनीं बजावलें, " कमलाकर ! या हं ! "

३

" तुम्ही आज येणार नाहीं अशी मला भीति वाटत होती."

" मला मात्र जाऊं नये असें मुळींच वाटलें नाहीं. कारण काल घडलेल्या प्रकारानें तुमचे माझ्यावर उपकार झालेले आहेत हें मला मोकळ्या मनानें कबूल केलें पाहिजे."

" नव्हे, तसें नव्हे, तुमचेच माझ्यावर जास्त उपकार आहेत. आम्ही नेहमींचे पापाचरणी असलों तरी आम्हांला एकदां तरी कां होईना; पण तसल्या वाईट मार्गापासून तुम्हीं परत फिरविलेंत हे काय तुमचे थोडे उपकार झाले का ? "

" तसें असेल; पण मला मात्र माझ्या स्वतःच्या मनाची कल्पना आली. आतां पुष्कळ वेळां मला माझ्या मनावर ताबा चालवितां येईल असा भरंवसा मला वाटायला लागला आहे. मोहाची वस्तु अतिशय नजीक असतांनाच मोहापासून दूर राहण्याचा प्रयत्न करण्यांत माणसाची खरी परीक्षा होत असते ! "

" तुमच्यासारख्याच्या हातून इतकें संयमन होईल असें मला मुळींच वाटलें नव्हतें. माझी धुंदी उतरल्यावर काल मीं मनाशींच विचार केला. मला फार वाईट वाटलें. तुमच्यासारख्या एका तरुण माणसावर आपण आज काय प्रसंग आणला होता असें मनांत येऊन मला अतिशय दुःख झालें."

" असो. झालें ते गेलें. असें होणें साहजिक असतें. बायका-पुरुषांचें नातें असें कांहीं चमत्कारिकच आहे."

" पण राहून राहून मला तुमची स्तुति करावीशी वाटते. त्यांतून तुम्हीही एका पतितेचेच मुलगे आहां ! खरेंच, तुमच्या मातोश्री सध्यां कुठें असतात ? "

या प्रश्नाची कमलाकरानें केव्हांही अपेक्षा केली नव्हती. कांहीं वेळ थांबून त्यानें उत्तर दिलें, " माझा जन्म झाल्यापासून माझ्या आईचा कोणालाच पत्ता नाहीं ! "

" म्हणजे ! " कुतूहलानें चंपाबाईनीं विचारलें.

" मला तरी कुठें माहीत होतें म्हणा ! एके दिवशीं ही गोष्ट अचानकच माझ्या कानावर आली. वडगांवला शाळेंत असतांना एकदां मी आपल्या एका मित्राच्या घरीं गेलों होतों. ओसरीवरच एक म्हातारे गृहस्थ होते, त्यांनीं मला विचारलें."

" कोणाचा रे तूं मुलगा ? " आणि मीं उत्तर दिलें, " शामराव देसायांचा ! "

पण त्या गृहस्थांना माझ्या या उत्तरानें किती तरी आश्चर्य वाटलें ! त्यांनीं हंसत हंसत म्हटलें, " आणि शामरावाला मुलगा कधीं झाला ? "

मी त्या वेळीं जरा लहानच होतों. " मला काय माहीत ? " मीही चट्कन म्हणून गेलों, " केव्हां म्हणजे काय ? मी झालों तेव्हांच ! "

माझ्या या बोलण्यानें तर त्यांना फारच हंसूं आलें तें दाबीत दाबीत त्यांनीं मला म्हटलें, " छे, तसें नसेल ! "

इतक्यांत आंतून दुसरे गृहस्थ " काय ? पाहुणे, काय चाललें आहे ? " असें म्हणत ओसरीवर आले. त्यांना म्हाताऱ्या गृहस्थांनीं उत्तर दिलें, " कांहीं नाहीं. आपलें या मुलाशीं बोलत बसलों होतों. काय हो, हा म्हणे शामराव देसायांचा मुलगा ! "

नंतर आलेल्या गृहस्थांची आणि माझी चांगली ओळख होती. ते माझ्या मित्राचे चुलतेच होते. त्यांनीं एकदां माझ्याकडे पाहून त्या गृहस्थांना उत्तर दिलें, " छे ! त्याचा इतिहास फार वेगळा आहे."

आणि त्यांचें बोलणें तितकेंच थांबलें. मला मात्र त्या दिवशीं कसेंसेंच झालें. घरीं गेल्यावर मीं आईला सर्व हकीगत सांगितली. तिनें मला म्हटलें, " जाऊं दे त कीं, तुला त्याच्याशीं काय करावयाचें आहे ? "

पण कांहीं वेळानें तिनें मला हांक मारली आणि आपल्या जवळ बसविलें. मला तिच्याबद्दल अविश्वास वाटूं नये म्हणूनच कदाचित् तिनें सर्व खरी हकीगत सांगण्याचा बेत केलेला असावा असें दिसलें."

चंपाबाईनीं आपली खुर्ची जरा पुढें ओढली. कमलाकराच्या तोंडावर त्यांची दृष्टि खिळून राहिली होती. तो सांगत होता ती हकीगत ऐकण्यास त्या किती तरी उत्सुक झाल्या होत्या. कमलाकरानें पुढें बोलण्यास आरंभ केला.

" आश्चर्याची गोष्ट ही कीं, मी खरोखरच देसायांचा मुलगा नव्हतों. शामरावांनीं व त्यांच्या बायकोनें (जिला मी आई म्हणत होतों ती) मला नुसतें पाळलें

होतें. मला आईनें जी मागली हकीगत सांगितली ती खरोखरच फार विचित्र आहे. एक तरुण मुलगी होती; ती लहानपणापासूनच अनाथ होती. तिचें नांव असेंच कायसेसें होतें. मुलगी फार देखणी होती. वयांत आली तरी तिचें लग्न झालें नाहीं. तिला नात्याचें कोणी नव्हतेंच. इकडे तिकडे कांहीं काम करून आनंदानें रहावें, असा तिचा क्रम होता; पण मध्यंतरीं कांहीं दिवस ती आपल्या घराच्या बाहेर पडेनाशी झाली. "हिंवताप येतो," अशी सबब सांगून ती सारखी अंथरुणावर पडून राहिली. शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या बायकांनीं तिला मधून मधून अन्नपाणी द्यावें असें चाललें होतें. कोणीं विशेष बारकाईनें मात्र तिची चवकशी करीत नव्हतें. होतां होतां ती आपल्या खोलींतून एकदम नाहींशी झाल्याचें लोकांच्या नजरेस आलें. त्याच दिवशीं संध्याकाळीं गांवाबाहेरच्या देवळांत जाऊन आलेले लोक येऊन सांगूं लागले कीं, तिथें देवाच्या पायापाशीं एक अनाथ मूल आहे आणि तें सारखें रडतें आहे. इतरांच्या बरोबर आम्हीही तिथें काय आहे तें पहायला गेलों. तेथें तें मूल तोंपर्यंत होतेंच. कांहीं लोकांची संमति घेऊन तें मूल आम्हीं उचललें आणि घरीं आणलें. आणि आम्हांला मूलबाळ नसल्यामुळें आम्ही त्याला पोटच्या मुलाप्रमाणेंच वाढविलें. ती मुलगी जी नाहींशी झाली ती पुन्हा परत आली नाहीं; मग तिचें काय झालें देव जाणे! पण ती निघून जाण्याचा आणि हें मूल त्या देवळांत येण्याचा कांहीं तरी संबंध खास आहे; तसें कांहीं तरी होतें म्हणूनच तिनें नाहींसें होण्याच्या आधीं आजारीपणाचें सोंग केलें होतें; आणि तेंसुद्धां कांहीं थोडेंथोडकें नाहीं, चांगलें चार महिने केलें होतें!"

कमलाकर ही हकीगत सांगत असतांना चंपाबाईच्या डोळ्यांला पाणी येत होतें. त्याला वाटलें कीं, आपली जन्मकथाच अशी हृदय हलवून सोडणारी असावी! तो पुढें म्हणाला, "त्या वेळेपासून शामराव देसाई आणि त्यांची बायको या दोघांनीं माझ्यावर पोटच्या मुलाप्रमाणें प्रेम करून मला वाढविलें आहे. त्या दिवशीं ही हकीगत आईनें मला सांगितली खरी; पण त्यानंतर ती मला हें मात्र बजावायला विसरली नाहीं कीं, 'कांहीं असलें तरी तूं मात्र ही गोष्ट मनांत ठेवूं नकोस'. आणि मींही त्या गोष्टीचा आतांपर्यंत कधीं उच्चारसुद्धां केला नव्हता! मला ती सगळी तितकीशी नीट सांगतांही आली नाहीं. त्या बाईचें नांव–नांव कांहीं तरी आईनें सांगितलें होतें खास! हो, तिला वच्छी, वच्छे असें कायसेंसें म्हणत असत!"

" काय, वत्सला ! " चंपाबाई केवढ्यांदा तरी ओरडल्या ! कमलाकराला तर दचकल्यासारखें झालें.

चंपाबाई एकदम खुर्चीवरून कमलाकराच्या जवळ आल्या आणि त्याचा हात आपल्या हातांत त्यांनीं घेतला. इतक्यांत कमलाकर म्हणाला, " चंपाबाई ! हें काय कालच्यासारखें...! "

" नव्हे. कमलाकर, मी तुम्हांला काल आईसारखी होतें. आज तुम्ही मला मुलासारखे आहांत. कमलाकर ! काय ही माझी दशा झाली ! बरें झालें, कालच प्रसंग टळला ! नाहीं तर !...पण का हो कमलाकर, माझ्यासारखाच असा विचित्र प्रसंग माझ्यासारख्या इतर बायकांच्यावर येत असेल का हो ? "

कमलाकराला त्या बोलण्याचा अर्थ तितकासा नीट समजला नाहीं. चंपाबाईंच्या हातांतील आपला हात तसाच ठेवून त्यानें विचारलें, " चंपाबाई, तुम्ही काय म्हणतां आहांत हें ? "

" कमलाकर, कसें सांगूं हो ! मी...मीच...ती वत्सला आहें ! "

शेजारच्याच कोंचावर चंपाबाईंचा देह धाड्कन् कोसळून पडला. तिचे ते शेवटचे शब्द ऐकून कमलाकर तर हतबुद्ध झाला ! आपली आई आज आपल्या समोर आहे हें सांगूनसुद्धां त्याला खरें वाटेना ! त्याच्या शरिरांतून वीज चमकून गेल्याचा त्याला भास झाला. चंपाबाईंना सांवरण्याकरितां पुढें होण्याचें त्याला भानही राहिलें नाहीं !

कांहीं वेळानें चंपाबाई शुद्धीवर आल्या तेव्हां कमलाकर त्यांच्या शेजारीं रडत बसला होता. डोळे उघडल्यावर कांहीं वेळानें चंपाबाईंनीं विचारलें, " कमलाकर ! बाळ ! किती वाजले ? "

घसा साफ करून कमलाकरानें उत्तर दिलें, " साडेनऊ ! "

" मग तुम्हांला गेलें पाहिजे ! या आज नवीन निर्माण झालेल्या नात्यामुळें मला तुम्हीं मजजवळ रहावें असें वाटेल; पण एकंदरीनें पहातां तुम्ही नेहमींप्रमाणें जाणेंच बरें नाहीं का ? संध्याकाळचें येऊन जाणें बरें दिसेल...पण नेहमीं राहण्यानें ...आणि खरें नातें लोकांना सांगूनसुद्धां खरें वाटावयाचें नाहीं. कमलाकर ! मी तुमची आई असलें तरी तुम्ही मात्र मला आई मानूं नका. कारण...माझा धंदा असला वाईट...मी तुम्हांला आई शोभते तरी का ? "

पण कमलाकरानें त्यांना पुढें बोलूं दिलें नाहीं. त्यानें त्यांना बजावून निक्षून

सांगितलें, " चंपाबाई, छेः ! आई...आतां असले विचार मनांतसुद्धां आणायचे नाहींत हं ! मी उद्यां पुन्हा येईन. आतां मी जायला कांहीं हरकत नाहीं ना ? "

" हं जा." चंपाबाईंना पुढें कांहीं तरी बोलावयाचें होतें, पण त्यांचा गळा अतिशयच रुद्ध झाला आणि त्यांना पुढें बोलवेना !

कमलाकर जिना उतरून गेल्याचा आवाज कानावर आला आणि उशींत तोंड खुपसून चंपाबाईंनीं हुंदके देण्यास सुरुवात केली !

ॐ ॐ ॐ

दुसऱ्या दिवशीं कमलाकर अतिशय तांतडीनें आपल्या आईला भेटण्याकरितां बाहेर पडला. आसपास न बघतांच तो एकदम चंपाबाईंच्या घरांत शिरला. पण वर जाऊन पाहतो तों माडी उजाड होती ! आईला भेटण्याचा योग जसा अचानक होता तसेंच तिचें नाहींसें होणें ही योगायोगाचीच गोष्ट असावी असें कांहींसें समाधान करून घेत कमलाकर खालीं आला. रस्त्यावर येऊन सजल दृष्टीनें पुन्हा एकदां वरच्या माडीकडे त्यानें पाहिलें तों त्याला दिसलें—'भाड्यानें देणें आहे'.

जवळूनच दुसरे एक गृहस्थ तसेच वरवर पहात चालले होते. त्यांनीं कमलाकराला विचारलें, " काय हो, बाई गेल्या वाटतें ? "

कमलाकरानें आश्चर्यानें उत्तर दिलें, " हो ! "

त्यावर हंसून किंचित् हेटाळणीच्या स्वरानें ते गृहस्थ कमलाकराला कांहींसें म्हणाले.

ॐ ॐ ॐ

" वारयोषिता ऽ ऽ ऽ—असाच त्यांच्या बोलण्याचा नागरभाषेंतील मथितार्थ होता !

आक्काचा मृत्यु !

"कसें काय आहे आक्काचें ?"

"छे ! तिचें चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं."

"बरें होईल ! सुटेल तरी बिचारी या यातनांतून."

त्या वेळीं आसपासच्या घरांतील लोक दिवे मालवून निद्रावश झालेले होते. अनेक आप्तेष्टांचे मृत्यु अगदीं निर्भयपणानें तिनें पाहिलेले होते, पण तीच निर्भय आक्का आज स्वतांच्या जवळ येऊन टेपलेल्या अंताला भीत होती. तिचे डोळे मिटलेले होते आणि ती डोळ्यांची उघडझांप थोडथोडी करीत होती; पण तिच्या जवळ बसलेल्या तिच्या वृद्ध पतीला आणि तरुण मुलाला ती काय करीत होती हें समजत नव्हतें. ते दोघेजण तिच्याविषयीं काय बोलत होते हें तिच्या क्षीण कर्णेन्द्रियांना समजत नव्हतें असें नाहीं, पण मला सर्व कळत आहे असें तरी ती कोणत्या उपायानें दर्शविणार ? सर्व देह जीर्ण होऊन निस्त्राण झालेला होता. त्या देहाच्या कोणत्याही अवयवाची हालचाल होत नव्हती. आणि ती आपल्याकडून अतिशय जोरानें हालचाल करीत होती; पण जवळ टक लावून बसलेल्या लोकांना ती निपचित पडून राहिली असल्याचा भास होत होता. तिच्याभोंवतीं असलेल्या अंथरुणावर अर्धवट जाग्या असलेल्या तिच्या जाणत्या मुली मधूनमधून स्फुंदत होत्या. निश्चेष्ट पडलेल्या, बेशुद्ध समजल्या जाणाऱ्या आक्काला तें स्फुंदणें चांगलें ऐकूं जात होतें; पण त्या स्फुंदण्याला ती देत असलेला प्रतिध्वनि बाहेर मुळींच उमटत नव्हता. शरिरांतील सर्व शक्ति एकवटून आणि प्राण गोळा होऊन तिला दुःखाचे उमाळे येत होते. कडेची मंडळी आपल्याला बेशुद्ध म्हणत आहेत हेंही तिला कळत होतें ! ती बेशुद्ध आहे असें समजून भोंवतालचे आप्तजन जें भाषण करीत होते तेंही तिला पूर्णपणें समजत होतें. 'कसें काय आक्काचें' ? असा तिच्या थोरल्या मुलानें विचारलेला प्रश्न तिला ऐकूं गेला. 'छे ! तिचें चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं', असें तिच्या पतीनें दिलेलें उत्तरही तिनें ऐकलें. आणि त्यावर त्यानें काढलेले उद्गारही तिला समजले. तिचा मुलगा कांहीं फार लहान नव्हता; पंचविशी उलटून जाऊन लग्नास तयार अशी जगाला त्याची जाहिरात मिळालेली

होती. त्याला मुली सांगून येत होत्या आणि त्यांवर पसंती नापसंतीचे छाप जोर-जोरानें मारले जात होते.

आपल्या मुलाच्या तोंडचे वरील उद्गार ऐकून तिच्या थिजलेल्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. मीं या यातनांतून सुटावें अशी याची खरोखरच इच्छा आहे का ? या यातनांतूनही मीं जगावें असें याला कां वाटूं नये ? मी जगलें तर मी याला नको आहें का ? आणि मी मेलें तर याला काय वाटेल ?......या विचारांनीं तिच्या मनांत अतोनात खळबळ उडवून दिली. या दुखण्यांतून ही उठावी असें यानें कां म्हणूं नये ? हो, यानें असें म्हणावयाला काय हरकत आहे ? ही यांतून सुटली म्हणजे बरें होईल असें हा म्हणतो त्याचा खरा अर्थ काय ?.......आपल्या यातना त्याला बघवत नाहींत हेंच खरें, कीं आतां आपली याला जरूरच नाहीं ?

तिच्या विषण्ण, क्षीण मनाचा दाह करावयास एवढे विचार अगदीं पुरे होते. उभ्या पंचवीस वर्षांत जीव कीं प्राण असणाऱ्या त्या मुलासंबंधानें तिच्या मनांत अशी एकदांदेखील शंका आली नव्हती; पण आयुष्याच्या अखेरीला, मृत्यूच्या मुखांत पाऊल टाकण्याची वेळ अतिशय नजीक आली असतांना प्रत्यक्ष पोटच्या मुलाविषयींही असले विचार तिच्या मनांत आले. 'बरें होईल ! सुटेल तरी बिचारी एकदां या यातनांतून !' असे आपल्या थोरल्या भावाच्या तोंडून उद्गार निघतांच तिच्याभोंवतीं अर्धवट जागृतावस्थेंत असलेल्या त्याच्या बहिणींचें स्फुंदणें अधिक जोरानें, अधिक वेगानें चालू झालें. तेंही तिला ऐकूं गेलें. आपल्या-मागें आपल्या मुलींची काय दशा होईल या विचारानें तिचें मन ग्रासून टाकलें. आणि तिनें आपल्या क्षीण कल्पनेच्या जोरावर त्या मुलींची ही मातृविहीन अवस्था अंतर्दृष्टीसमोर उभी करून पाहिली. तें चित्र अर्थातच करुणास्पद असेल, आणि प्रेमळ मातेला तें चित्र किती व्यथित करूं शकलें असेल हें कल्पनेनेंच जाणणें बरें ! तिच्या मनांत आलेल्या विचारांनीं डोळ्यांत जीं आसवें जमलीं होतीं तीं कानापर्यंत ओघळून गेलीं. तिनें आपले डोळे किलकिले केले आणि डाव्या बाजूस बसलेल्या आपल्या पतीकडे तिनें एकवार पाहिलें. तिच्या थिजले-ल्या डोळ्यांची उघडझांप अर्थातच कोणालाही समजून येत नव्हती. वृद्ध पतीचें दर्शन होतांच तिचा ऊर भरून आला. चाळीस वर्षांच्या संसारांत ज्याच्या सुखाची आपण तिळप्रायही हेळसांड केली नाहीं, त्या आपल्या प्रेमळ, सुस्वभावी आणि आपल्यामागें सर्वस्वीं पराधीन होणाऱ्या पतीची किती दुःखदायक दशा

होईल हा विचार मनांत येऊन तिचा ऊर भरून आला! पण अंगांतील शक्ति इतकी कमी झाली होती कीं, तिचा श्वासोच्छ्वास दुःखावेगानें जलद चालला आहे अशी भोंवतालच्यांपैकीं कोणालाच शंका आली नाहीं. तिच्यासमोर पतीचें तेंही विधुरावस्थेंतील चित्र उभें राहिलें. आजपर्यंत आपल्या जिवावर ज्यानें कुणाचा ब्रही म्हणवून घेतला नाहीं त्या पतीची आपल्यामागें कशी परावलंबी स्थिति होईल हें मनांत येऊन तिला कसेंसेंच झालें. डोळ्यांच्या संपुटांतून पुन्हा अश्रु आले आणि कानांच्या मागून जाऊन अंथरुणावर टिबकले. आणि हें चित्र पुसट होऊन तिच्या लाडक्या वसंताचेंही चित्र तिच्या डोळ्यांसमोर उभें राहिलें व तिनें मनांत म्हटलें कीं, पंचवीस वर्षांचा झाला म्हणून काय झालें! तोही अजून फार लहान आहे. आपल्यामागें त्याला तरी प्रेमानें कोण बघणार! हो. मुलाला जोंपर्यंत आई आहे तोंपर्यंतच बापाचें व मुलाचें नातें विशेष जिव्हाळ्याचें असतें; पण दोघांमध्यें जिव्हाळा उत्पन्न करणारी ती व्यक्ति चितेच्या भक्ष्यस्थानीं पडली कीं, तो जिव्हाळा-ही त्या धगीनें होरपळून जातो, या गोष्टीची तिला पूर्ण जाणीव होती. तिला वाटलें कीं, वसंताचे आपल्यामागें फार हाल होतील. त्याची काळजी वहायला दुसरें कोण आहे? वसंताला वेळच्यावेळीं खायला प्यायला मिळणार नाहीं. अजून त्याचें लग्न व्हावयाचें आहे आणि तें तरी आतां हौसेनें कोण करणार? आपल्या पतीला आतां हौस वाटेल का? पत्नीच्या आठवणीनें त्यांनाही विरक्ति उत्पन्न नाहीं का व्हायची? आणि मग वसंताचें लग्न!...एवढ्या प्रश्नानें तिचें लग्न झालें त्या दिवसापासून घडलेले किती तरी शोककारक प्रसंग तिच्या मनांत ताजेपणानें उद्भूत झाले.

* * *

२

त्या वेळीं तिच्या लग्नाच्या जेवणावळी चालू होत्या. एके दिवशीं संध्याकाळीं ती आपल्या एका मैत्रिणीशीं हितगुज करीत झोंपाळ्यावर बसली होती.

"किनई यमे, आईची आठवण सारखी होऊन मनाला अगदीं चैनच पडत नाहीं. माझें लग्न तिनें किती हौसेनें केलें असतें, नाहीं!"

"आक्का, अग तुलाच एकटीला आई नाहीं असें आहे होय!"

"यमे, इतरांनाही आया नसतात, पण माझ्यासारखी त्यांची गोष्ट असते

का ! खरेंच सांग तूं. मी एकदां सासरीं गेलें, कीं माहेरीं यावें असें वाटायला इथें कोणी तरी प्रेमाचें आहे का ?"

"आक्का, माझ्याकरितां तरी तूं नाहीं का येणार ?"

"यमे, कशी येऊं तूंच सांग ? माहेरच्यांनीं बोलाविलें नसतांना मीं आपल्या स्वतःच्या मुखत्यारीनें तुझ्याकरतां इकडे कशी निघून येऊं ?"

यमीचे डोळे भरून आले. आक्काच्या डोळ्यांनाही पाणी आलें, पण तें डोळ्यांतल्या डोळ्यांतच ठेवून ती म्हणाली, "यमे, एक माहेरपण राहो मेलें ! पण आई माझें लग्न पहायलासुद्धां जगली नाहीं याचें मला राहून राहून वाईट वाटतें."

"आक्का, तूं किती वाईट वाटून घेणार ? देव करतो तें सर्व आपल्या बऱ्या-करतांच करतो, असें तूंच नाहीं का नेहमीं म्हणत ?"

"पण माझ्या आईला नेऊन, यमे, त्यानें काय ग चांगलें केलें ?"

"अग, तें आपल्याला एक समजत नसेल ! म्हणून त्यानें मुळींच कांहीं चांगलें केलं नसेल असें आपण कसें म्हणावें बरें ?"

"पण यमे, ती नेहमीं म्हणत असे कीं, माझी आई पोराबाळांचीं लग्नें न पहातां मेली आणि माझेंही असेंच होणार ? यमे, माझेंही असेंच होईल काग ?"

"बघूं तुझा हात !"

यमीला हातावरचें कांहीं म्हटल्या कांहीं सुद्धां समजत नव्हतें; पण लग्नासारखा आनंदाचा प्रसंग नुकताच साजरा झाला असतांच आपल्या नवविवाहित मैत्रिणी-नें आनंदी रहावें अशी तिची मनापासून इच्छा होती. आणि म्हणूनच तिनें आपल्या भाषणाला थट्टेचा ओघ आणला. तिचा हात आपल्या हातांत घेऊन यमी म्हणाली,

"छे ! आक्का, तुझें असें व्हायचें नाहीं."

त्यांच्या थट्टेला आरंभ होणार इतक्यांत आक्काच्या वडिलांनीं तिला हांक मारली. आक्काही आपला हात यमुनेच्या हातांतून सोडवून घेऊन निघून गेली.

"हं शास्त्रीबुवा, ही आमची मुलगी."

वडिलांनीं ज्या गृहस्थांना उद्देशून वरील शब्द काढले होते त्यांना आक्कानें नमस्कार केला आणि वडिलांच्या सांगण्यावरून ती तेथें बाजूलाच बसली.

"बघा हिचा हात."

यजमानांची ती आज्ञा ऐकून शास्त्रीबुवांनीं आक्काचा हात हातांत घेतला, "या मुलीला मातृसुख फार कमी आहे." शास्त्रीबुवांनीं भविष्य सांगण्यास आरंभ केला.

शास्त्रीबुवांना वाटलें कीं आपण भविष्य अगदीं बरोबर सांगितलें. पण 'हिला मातृ-सुख नाहीं,' अशा आशयाचे शास्त्रीबुवांचे उद्गार ऐकल्याबरोबर आक्काचा चेहरा खिन्न झाला.

"हिला भावंड मुळींच नाहीं," शास्त्रीबुवांनीं तिच्या वडिलांकडे पाहिलें.

"शास्त्रीबुवा, अगदीं बरोबर सांगितलेंत. हिचें लग्न केल्यामुळें मला आतां वाटेल तेव्हां गृहस्थाश्रम सोडतां येईल."

"या मुलीचें सासर फार चांगलें आहे. हिला मुलगे होतील आणि ते हिच्या-देखत म्हातारे होतील."

"खरेंच का शास्त्रीबुवा!" आक्कानें एकदम प्रश्न विचारला.

आपण कोणाला काय विचारीत आहों याचेंसुद्धां तिला भान राहिलें नाहीं! आपल्या आजीची व आईची जी गत झाली तीच आपली होईल कीं काय, अशी जी मघां यमीशीं बोलतांना तिला धास्ती वाटली त्याची तिला आठवण होऊन तिचें भान नाहींसें झालें. आपण कुणासमोर कुणाला काय विचारीत आहोंत, याचा तिला विसर पडला. तिनें अगदीं अधीरपणें वरील प्रश्न विचारला आणि शास्त्रीबुवांनीं त्याची खात्री केल्यावर तिला एक प्रकारचें समाधान वाटलें—आनंद वाटला. आपली आई म्हणत होती, त्याप्रमाणें अशा गोष्टी पिढ्यानूपिढ्या चालत नसतात एकूण! असें तिचें तिलाच वाटलें. मग आजीचें व आईचें दोघींचेंही म्हणणें त्यांच्या बाबतींत खरें कसें झालें? तिचें मन गोंधळून गेलें. आणखी कांहीं सटरफटर गोष्टी सांगून शास्त्रीबुवांनीं आपलें भविष्यकथन समाप्त केलें.

त्या दिवशीं आक्काच्या मनांत काहूर माजून राहिलें. शास्त्रीबुवांनीं सांगितलेलें भविष्य तिच्या मनांत घोळत होतें. मुलगा होणें म्हणजे काय, याचीसुद्धां तिला नीटशी कल्पना नव्हती. पण आईचें निरनिराळ्या प्रसंगींचें बोलणें तिच्या पुरें लक्ष्यांत राहिलें असल्याकारणानें तिला या गोष्टी प्रत्यक्ष अनुभवानें ठाऊक नव्हत्या तरी कल्पनेनें जाणतां येत होत्या.

ॐ ॐ ॐ

आसन्नमरण स्थितींत अंथरुणावर निश्चेष्ट स्थितींत पडलेल्या आक्काला वरील चाळीस वर्षांपूर्वी घडलेल्या प्रसंगाचें स्मरण झालें. तेव्हां जोशीबुवांनीं सांगितलें कीं, हिचे मुलगे म्हातारे झालेले ही पाहील. शास्त्रीबुवांचें तें भविष्य खरें ठरण्याचा योग येत नाहीं हें तिला पुरतेपणीं समजलें होतें. वसंताचें लग्न आपल्यादेखत

होणार अशी आपल्याला किती खात्री होती ! त्या लग्नाबद्दल आपल्याला किती हुरूप वाटत होता. पण शेवटीं आई म्हणाली तेंच खरें होणार का ! माझ्यादेखत वसंताचें लग्न होतच नाहीं तर मग...

ती अगदीं जुन्या चालीची बाई असल्याकारणानें तिला आपल्या मुलाच्या लग्नाची फार हौस असणें साहाजिक होतें. पण तिच्यादेखत तें लग्न होण्याचा योग आला नाहीं. तिचें शरीर इतकें क्षीण झालें होतें तरी तिचे मनोव्यापार अतिशय जलद रीतीनें काम करीत होते. या विचारतंद्रींत निमग्न असतां ती दुःखाचे सुस्कारे सोडीत होती. पण ते सुद्धां तिला जोरानें सोडतां येत नव्हते. भोंवतालच्या लोकांना तिच्या श्वासोच्छ्वासांत यत्किंचितही फेरबदल झाल्यासारखें वाटत नव्हतें. तिच्या मनोभावनांच्या अनुरोधानें तिचा चेहरा हताश, खिन्न असा होत होता; पण तिच्या चेहऱ्यावर अंतकाळची जी कळा आलेली होती तिच्याखालीं या सर्व सूक्ष्म छटा मावळून जात होत्या. हा प्रसंग तिच्या मनांतून नाहींसा होतो न होतो तोंच दुसऱ्यानें डोकें वर काढलें.

* * *

३

मे महिन्याच्या सुटींतला तो दिवस ! त्या दिवशीं संध्याकाळीं आपल्या एका शेजारणीशीं आक्का गप्पा मारीत बसली होती. दुपारीं तिनें पापड केले होते. वसंताच्या लग्नाच्या वेड्या आशेनें तिन ही लग्नाची तयारी चालविली होती. आज पापड केल्यामुळें तिच्या शरिराला जरी थकवा आला होता तरी वसंताच्या लग्नाच्या आशेनें तिच्या मनाला विलक्षण हुरूप वाटत होता. तिची वृत्ति उल्हसित होती. उमाकाकूंशीं बोलतां बोलतां ती म्हणाली, "काकू, दोन वर्षें हें असेंच चाललें आहे. मी दरवर्षीं लग्नाची तयारी करतें आहें, पण दरवर्षीं कांहीं ना कांहीं तरी लग्नाला अडथळा होतो आहे."

"पण आक्का, यंदां मात्र तुमच्या येथें खास लग्न होणार !"

"मला असें वाटतें कीं, दुजा बिजा तसेंच तिजा होणार !"

"आक्का, असें मुळींच म्हणू नका. आतां तुमच्या वसंताचें लग्न होईल...!"

"वसंताचें लग्न व्हायचें नाहीं..."

आंतल्या बाजूला वसंत कायसें करीत बसला होता; त्याच्या कानीं वरील संवाद जाऊन तो बाहेर आला. बाहेर येतां येतांच त्यानें वरील शब्द उद्गारले—!

त्याचे ते शब्द ऐकून त्या दोघींनाही भीति वाटली; पण तितकेंच आश्चर्यही वाटलें. आक्काचा सर्व उल्हास—सर्व आनंद पार मावळून गेला. तिला काय झालें हेंसुद्धां नीट समजलें नाहीं. वसंताला इतकें रागवायला काय झालें त्याचें कारण तिला समजेना. उमाकाकूही चट्कन् संध्याकाळ झाल्याचें मिष करून तेथून निघून गेल्या. वसंत आपल्या आईसमोर बसला आणि मर्यांच्या चढलेल्या स्वरांतच त्यानें विचारलें." हें तुम्हीं काय चालविलेलें आहे ! माझ्या लग्नाची इतकी वाच्यता झालेली मला खपणार नाहीं. ज्याच्या त्याच्याजवळ माझ्या लग्नाची कहाणी तूं कां सुरू करतेस ! आज मी तुला निक्षून सांगून ठेवतों कीं, तूं जिवंत आहेस तोंपर्यंत मी लग्नच करणार नाहीं."

दुसरी कोणतीही बाई त्या जागीं असती तर ती रागावल्याशिवाय खास राहिली नसती; आणि मुलगा बिलगा कांहींएक न बघतां कांहीं तरी अधिकउणें उत्तरसुद्धां देऊन गेली असती. पण मुळींच न रागावतां तिनें विचारलें, " अरे, पण मी तुझ्या म्हातारपणापर्यंत जगणार आहें."

" जग. तिथपर्यंत जगलीस तर मी आजन्म ब्रह्मचारीच राहीन ! "

" आणि मग मी मेलें तर म्हातारपणीं लग्न करशील का ! "

" मी इतका जगतोंय कशाला ! मला एका ज्योतिष्यानें सांगितलें आहे कीं, माझे आईबाप माझ्यामागें राहणार आहेत ! "

" वसंता, असें नको रे बोलूं ! "

हें बोलतांना आक्का अतिशय विव्हळ झाली होती. दुसऱ्या एखाद्यानें—एखाद्यानें कशाला !—मघांच्या उमाकाकूंनीं ह्या दोघांचा संवाद जर ऐकला असता तर तिला खास वाटलें असतें कीं, किती मूर्ख, गाढव आणि अविचारी मुलगा आहे ह्या ! नुसता अविचारीच नाहीं तर दुष्टसुद्धां वाटला असता ! वसंताची आतांची वागणूक त्याच्याविषयीं दुसऱ्याचा असा ग्रह व्हावा अशीच होती. वास्तविक त्याला इतकें रागावण्याचें कांहींच कारण नव्हतें. आक्काला या त्याच्या वर्तनाचा फारसा राग आला नाहीं; पण तिला अतोनात वाईट वाटलें. आपल्या बोलण्याचालण्यांत खरोखरच कांहीं चूक झाली का ! त्याला तरी असा उगीच राग कसा येईल ! किती

झालें तरी शिकलासवरलेला मुलगा ! तो उगीच अशी डोक्यांत राख कशी घालील ? आपल्याच बोलण्यांत कांहीं तरी चूक झाली... आपण तो म्हणतो तशी त्या गोष्टीची वाच्यता फार नाहीं का केली ?....हो. आपलेंसुद्धां जरा जास्त झालें ...जिच्या तिच्याजवळ आपण वसंताच्या लग्नाची गोष्ट काढली. जिला तिला आपण ही गोष्ट सांगण्याकरितां घरींदेखील बोलाविलें...कित्येक आतेष्टांना आपण लग्नाचीं—तें ठरायच्या आधीं—उगीच आमंत्रणेंसुद्धां दिलीं...हो, माझीसुद्धां चूक झाली. ती वसंताला म्हणाली, "हो वसंता, अरे वेडी आई चुकली तर इतकें रागावूं नये."

"रागावूं नको तर काय करूं ? तीच गोष्ट कितीदां उगाळायची ?"

"हो. माझें चुकलें खरें !"

तिचा श्वासोच्छ्वास मंदमंद होत चालला होता. लांबून तिच्याकडे बघणाराला तिची अखेर शांतपणानें होणार असें वाटलें असतें. तिच्या तोंडावर कोणताही विकार उमटत नव्हता. तिची कोणतीही हालचाल होत नव्हती. श्वासोच्छ्वासाबरोबर नासिकाग्राचें जें आकुंचन आणि प्रसरण चाललें होतें तेवढीच काय ती तिची हालचाल होत होती ! ती आपल्याकडून तोंडावर बसणाऱ्या माशा वारण्याचा प्रयत्न करीत होती. हात न हालवतांच त्या माशा आपण वारल्या असाच तिला भास होई—! तिचे हातपाय गार होते. ते कितपत गार आहेत हें पहाण्याकरितां त्यांना कोणीं स्पर्श केला तर तिला त्या स्पर्श करणाराकडे बघण्याचा मोह अनिवार होत असे. तिची दृष्टि बंद झाली होती. तिचे डोळे थिजलेले होते; पण आशेचा शेवटचा किरण हृदयांत प्रकाशित होता तोंपर्यंत तिनें डोळे उघडण्याचे सारखे परिश्रम चालविले होते. पतिदेवांना, पोटच्या लहान लहान गोऱ्यांना एकवार डोळे भरून पाहून घ्यावें या अनिवार इच्छेनें तिच्या पापण्या एकमेकींपासून विभिन्न होण्याच फार प्रयत्न करीत होत्या. आपण इतकी धडपड करीत आहों तरी कडेची मंडळी इतकी स्तब्ध कां ? असा तिनें मनालाच प्रश्न केला. बिचारीला आपण हालचाल करीत आहों असा नुसता भास होत होता ! कडेच्या कांहीं लोकांना ती गेल्यासारखीच वाटत होती इतका तिचा श्वास क्षीण झालेला होता. आपल्या धडपडीचा कांहीं एक उपयोग होत नाहीं हें पाहून तिला एक तऱ्हेचा वैताग आला आणि सर्व शक्ति एकवटून तिनें एक दीर्घ निश्वास टाकिला. तो मात्र सर्वांनीं नीट पाहिला. वसंताचे शब्द तिच्या कानीं आले.

" बाबा, झालें; ती गेली."

" दादा, आक्का गेली ! " एका मुलीनें प्रश्न विचारला.

" हो गेली. संपला तिचा लागाबांधा ! "

तिच्या क्षीण झालेल्या कर्णेंद्रियांना हें सर्व बोलणें ऐकूं गेलें. आपली आता यांना खरोखरच जरूर दिसत नाहीं. इतक्यांत तिनें ऐकलें,

" तिचे हे हाल पाहून ती केव्हां जाते आहे असें मला झालें होतें."

तिला वाईट वाटलें. ही केव्हां उठेल असें कुणालाच वाटलें नाहीं ना ? तिनें मनालाच प्रश्न केला व एक दीर्घ निश्वास टाकला; आणि त्याबरोबरच तिच्या शारिरांतील प्राण विलयास गेले !

समाप्त